मुक्तांगणची गोष्ट : अनिल अवचट



‘मुक्तांगण’ला देणगी देतेवेळी पु. ल. म्हणाले होते, ‘एका जरी घरात व्यसनमुक्तीचा दिवा लागला, तर माझ्या देणगीचे सार्थक झाले, असे मी समजेन.’

पु. ल. तसे माझे वडीलच. त्यांचे अनुकरण करून म्हणावेसे वाटते, की हे पुस्तक वाचून व्यसनाच्या अंधारात चाचपडणाऱ्या एका जरी व्यसनीला बाहेर यायचा प्रकाशाचा ठिपका दिसेल तर सार्थक झाले समजेन.

व्यसनी नवऱ्याच्या एका जरी पत्नीला पूर्वीच्या जखमा विसरून चांगले आणि आत्मविश्वासाने जगावेसे वाटले, की त्याहून काय हवे? एका जरी व्यसनी बापाच्या लहानग्या पोराच्या मनावरचे काळेकुट्ट मळभ दूर होऊन छानसे कोवळे ऊन पसरेल आणि त्यात ते पोर मस्त, अनिर्बंध नाचेल.. त्यापेक्षा अधिक काय मिळवायचे असते?

- अनिल अवचट



आश्चर्य सांगतो, हे पुस्तक लिहायचा मी कधीही बेत केला नव्हता. साधा विचारही मनात आला नव्हता. इतर अनेक विषयांचे मी बेत करीत असतो. त्यासाठी भेटाभेटी करतो, प्रवास करतो, काही विषयांबाबत पुस्तके वाचतो, कधी तज्ज्ञ गुरु भेटले की शिकवणीही लावतो. पण असं काहीच इथं घडलं नाही. तसा मुक्तांगणमध्ये मुलांना मुक्तांगणच्या जन्माची गोष्ट सांगतो. कधी विषय निघाल्यावर एखाद्या जुन्या पेशंटची हकीगत आठवली की ती सांगतो. पण तेवढेच. सांगण्यासारखे आठवणींचे पुस्तक भरेल एवढे भांडार आपल्याजवळ आहे याची मलाच कल्पना नव्हती. मी इतका त्यात आहे, त्याच्या जवळ आहे, की मलाच ते दिसत नव्हते. जसे आपण पुस्तक अगदी डोळ्यांलगत धरले तर काहीच दिसत नाही, तसे.

मध्यंतरी अमेरिकेचा दोन महिन्यांचा दौरा झाला. मित्रांनी आपापल्या गावी माझे कार्यक्रम ठेवलेले. शनिवार-रविवार सोडला तर मधले दिवस मस्त मोकळे. मी यजमान मित्रांना सांगत असे, तुम्ही तुमच्या कामाला जा, माझा वेळ मी छान घालवीन. अशा निवांतपणात एक विचार मनात आला, मुक्तांगणमध्ये काम करणाऱ्या पुढच्या पिढ्यांसाठी हे सगळे लिहू यात का? संस्था कशी आकार घेते? कितीदा खचायला होते, पण त्यातनं कसा रस्ता निघू शकतो...सुरुवातीचा मजकूर पेशंट मित्रांना अनेकदा सांगितलेला. त्यामुळे कंटाळा येईल असे वाटले होते. पण त्या निवांतपणाची जादू अशी, की न सांगितलेलेही काही आठवले. असा काही भाग लिहून झाल्यावर गाडी सुटली ती सुटलीच.

भारतात परत आलो. पण थोड्याच दिवसांत दुबईला जायचे होते. तिथं पाय घसरुन पाठीवर पडलो. एका मणक्याचे आणि उजव्या हाताच्या हाडाचे कोपराजवळ फ्रॅक्चर झाले. या लिखाणाचं गारुड असं, की पालथा पडून मी हे पुढं लिहीत राहिलो. तो हात फक्त वळवला की खूप दुखायचा. पण नशीब, लिहिण्यामध्ये काही अडचण नव्हती. तिथून परत आल्यावर विश्रांती पर्वच होते. मग काय, ते आणि तेच!

पहिला प्रतिसाद मिळाला तो आनंद (नाडकर्णी)चा. त्याने ज्या शब्दांत वर्णन केले ते लिहिणे जरा अवघड आहे. पण परिणाम सांगतो. आधीच वेडा..त्यात...अशी अवस्था. मधनं मधनं कागदाची पुडकी त्याला कुरियर करत होतो. रात्री फोन यायचा, “बाब्या...” एरवी मी बिघडेन किंवा डोक्यावर बसेन म्हणून तो (आणि मुक्ताही) बरे शब्द वापरत नाही. पण या वेळी सगळाच अपवाद. तोही मुक्तांगणच्या जन्मापासून निगडित. हे सगळे पेशंट मित्र त्याला माझ्यापेक्षाही चांगलेच माहीत असत. तो त्यांच्या आणखी आठवणी सांगत असे. काही मित्रांचे आता काय चाललेय त्याची भर घालत असे.

माझी एरवीची लिहिण्याची मर्यादा लेखाइतकी. कधी तो दीर्घ लेख होई इतकेच. पण असे एकटाकी पुस्तक लिहिणे हा अजबच अनुभव होता. ‘अमेरिका’ हे पुस्तकरूपाने आले असले, तरी वर्षभर अधूनमधून प्रकरणे लिहिली. आणि त्यांचे विषयही वेगवेगळे होते. ‘वाघ्यामुरळी’ही तसेच. पण या लिखाणात आपण मागे काय लिहिलेय, तेच तेच परत तर लिहीत नाही ना, ही भीती. पण एकदा ठरवले, या दुरुस्त्या नंतर करता येतील. आत्ता कशाला विचार करायचा?

जे आठवेल ते लिहीत गेलो. पुस्तकाचे विभाग पाडले नाहीत की मुद्दे काढले नाहीत. ते वाहत गेलं, आणि त्याच्याबरोबर मीही. एकदा सगळे झाले. आसपासच्या कुणी कुणी वाचले. मधल्या काळात काही नव्याने आठवले की भर घालायचो. पण ती त्या लिखाणात घुसवणे दुरापास्त होई. मग तो सगळा भागच नव्याने लिहून ती आठवण प्रवाहात सामावून जाई.

या वेळी प्रथमच ‘समकालीन प्रकाशना’तर्फे माझे पुस्तक येतेय. आनंद अवधानी खूप दिवसांपासून मागे लागला होता, मी मुक्तांगणवर असे काही लिहावे म्हणून. मी ती कल्पना मुळातूनच

उडवून लावीत होतो. आता हे लिहिल्यावर त्याचा आग्रह होता, त्यांना ते पुस्तक द्यावे. मी द्विधा होतो. माझा मित्र-मानसपुत्र महेंद्र कानिटकर. त्याने हे वाचल्यावर तो म्हणाला, हे 'समकालीन'कडे द्या. बापाचे मुलाने ऐकावे, अशी रीत आहे. पण विचार केला, चला, मुलाचे ऐकावे. म्हणून हे पुस्तक त्यांच्याकडे आले. या निमित्ताने आनंद (अवधानी) व सुहास (कुलकर्णी) यांची नव्याने ओळख व मैत्री झाली.

माझा धाकटा भाऊ सुभाष याची मुखपृष्ठे पूर्वी माझ्या पुस्तकांना लाभायची. पण नंतर तो मोठमोठी चित्रे काढण्यात मश्गूल झाला. जरा धाडसानेच विचारले; आणि तो 'करतो' तर म्हणालाच, पण आठवड्याच्या आत मला ते बघायलाही मिळाले. त्याची ताकद, त्याचे पॉवरफुल स्ट्रोक्स परत एकदा अनुभवायला मिळाले. आणि त्यावर एक लाल रंगाचा ब्रशचा स्ट्रोक असा उठवलाय, की वाटले, सुभाष तो सुभाषच. माझ्या आगामी पुस्तकांना, जमेल तेव्हा, त्याच्या मुखपृष्ठांनी कवेत घ्यावे, ही इच्छा.

देणगी देतेवेळी पु. ल. म्हणाले होते, 'एका जरी घरात (व्यसनमुक्तीचा) दिवा लागला, तर माझ्या देणगीचे सार्थक झाले, असे मी समजेन.' ते तसे माझे वडीलच. त्याचे अनुकरण करून म्हणावेसे वाटते, की हे पुस्तक वाचून व्यसनाच्या अंधारात चाचपडणाऱ्या एका जरी व्यसनीला बाहेर यायचा प्रकाशाचा ठिपका दिसेल तर सार्थक झाले समजेन. एकाही कार्यकर्त्याला, मग तो कुठल्याही क्षेत्रातला असो, आणि धडपडणाऱ्या मित्राला प्रतीत झाले, कामात अडचणी असोत, संकटे येवोत, खचवणाऱ्या घटना घडोत, निरपेक्ष काम करीत असताना मिळणारं समाधान ही जगातली अपूर्व कमाई असते. एका जरी पत्नीला पूर्वीच्या जखमा विसरून (मग नवरा कुठल्याही अवस्थेत असेना का) चांगले आणि आत्मविश्वासाने जगावेसे वाटले, की त्याहून काय हवे? एका जरी व्यसनी बापाच्या लहानग्या पोराच्या मनावरचे काळेकुट्ट मळभ दूर होऊन छानसे कोवळे ऊन पसरेल आणि त्यात ते पोर मस्त, अनिर्बंध नाचेल.. त्यापेक्षा अधिक काय मिळवायचं असतं?

- अनिल अवचट

१

कशी सुरुवात होणार आहे कोण जाणे! मी लिहायला बसलोय मुक्तांगणवर. समोर तेवीस-चोवीस वर्षे पसरलेली आहेत. काय काय सांगायचे, असा प्रश्न. दुसरा, माझ्यात वाढत असलेल्या विसराळूपणाचा. कालचे आठवेना, आणि इतक्या वर्षांपूर्वीचे कसे आठवणार? पण तरी ते लिहिले तर पाहिजेच. कुणी येवढा प्रवास पाहिलेला लिहिता माणूस भेटला असता तर सोपवून मोकळा झालो असतो; पण तसाही कुणी दिसेना. बरं, ही संस्था आता लिहिण्यायोग्य नक्कीच झालीय. एक तर इतकी वर्षे ती टिकलीय. या क्षेत्रात संस्थांचा मृत्युदर अफाट असताना ती जगलीय.

पण कसं लिहिणार मी? एक प्रकारे मीच मुक्तांगणमय झालोय. मग मीच माझ्यावर लिहायचं, म्हणजे अवघडच काम. तरीही सांगतो. कारण हे अनुभव कुणाला पुढं उपयोगीही पडू शकतील. मग ती व्यसनमुक्तीची संस्था असो, की कुठली शैक्षणिक, सामाजिक संघटना असो. प्रसूतिवेदना तशाच, मुलांची आजारपणं तशीच, आणि फेटे बांधून त्यांची लग्नेही तशीच.

मुक्तांगणची सुरुवात कशी झाली हे मी मुक्तांगणच्या पेशंटशी बोलताना अनेकदा सांगितलंय. शिवाय कुठं कुठं केलेल्या भाषणातूनही. माणसाला तेच तेच सांगायचा कंटाळा येतो; पण ते सांगायला तर हवंच ना! आणि लिहिताना अधिक सविस्तर, निवांतपणे लिहिता येईल.

तर ती ८५ सालातली एक दुपार. बेल वाजते. सुनंदाची ठाण्याची मैत्रीण अलका आणि तिचा तरुण मुलगा धनू दारात उभे. आं? अलका अशी का दिसतेय? काय झालंय तिला? अलकाला येवढा मोठा मुलगा असून ती छान, उत्साही, देखणी दिसते. कायम हसरी. एरवी धनूही हसून ओळख देणारा. आज असा मान खाली घालून चेहरा पाडून का उभा? माझ्या मागे सुनंदा उभी. अलका तिच्या गळ्यातच पडली. सुनंदा तिला आत घेऊन गेली. मला काहीच कळेना. माझ्या समोर धनू बसलेला. मी त्याला काय झाले विचारु शकलो असतो. पण ही सुनंदाच्या अखत्यारीतली बाब होती. मी त्यात पडू इच्छित नव्हतो. तिच्याकडे अनेकदा मानसिक प्रश्नांसाठी लोक यायचे. मी चुकूनही त्यांच्याबद्दल विचारायचो नाही. अगदी जवळचे, ओळखीचे असले तरी.

काही वेळाने ते दोघं परत गेले. सुनंदा माझ्याकडे वळली आणि म्हणाली, "ब्राऊन शुगर."

"बाप रे! धनूला?"

"हो."

"कसं काय लागलं?"

"कोल्हापूरला, त्याच्या इंजिनियरिंग कॉलेजात." धनूला तिथे शिकायला ठेवले होते. तिथून तो घरी पत्र पाठवायचा, की अमक्या इन्स्ट्रुमेंटसाठी पैसे पाहिजेत. हे पाठवत राहिले. एक दिवस कॉलेजचे पत्र आले, पुरेसा अटेंडन्स नसल्याने त्याला परीक्षेला बसता येणार नाही. तशी अलका तिकडे तातडीने गेली आणि हे समजले.

अलकाला एक धास्ती होती. तिचा नवरा महेश डोक्याने भडक होता. त्याला हे कसे सांगायचे? तो तर धनूला बेदम मारतच सुटायचा. सुनंदाने त्याला समजावण्याचे काम केले. तो फक्त तिचेच ऐकायचा, म्हणून तिला ते जमले. "आता धनूला रागावू नकोस. त्याला मदतीची गरज आहे. आपण सगळे मिळून यातनं वाट काढू..." अशा अर्थाचे काही तरी सांगितले. आणि तो शांत झाला.

संध्याकाळी आम्ही त्यांच्या घरी गेलो. बेडरूममध्ये धनूला झोपवले. सुनंदाने त्याला गोळ्या सुरू केल्या. त्याला कुठल्याही परिस्थितीत बाहेर जाऊ द्यायचे नाही, कारण तो लगेच ड्रग्जकडेच जाईल, असे बजावले. अलकाने, महेशने आळीपाळीने त्या खोलीत खुर्ची टाकून बसायचे ठरवले. आणि आम्ही परत आलो.

पहाटे पहाटेच अलकाचा फोन. महेशचा डोळा लागल्याचे पाहून धनू उठला. खिडकीतून खाली उडी मारली. पहिल्या मजल्यावर राहत होते म्हणून बरे. तो त्याच्या त्या अड्ड्यावर गेला. तिथं त्यानं बरंच कर्ज करून ठेवलं होतं. त्या लोकांनी याला सपाटून मार दिला. तशाच रक्ताने भरलेल्या कपड्यांनी तो घरी आला. बेल वाजवली. काय वाटलं असेल त्या आईबाबांना? मग परत आम्ही त्यांच्याकडे गेलो. सुनंदाने त्याचे ड्रेसिंग केले. मी तिचा मदतनीस. परत सगळी ट्रीटमेंट सुरू केली.

या मुलाला आम्ही अगदी जन्मापासून पाहिलेलं. सुनंदाने तर त्या प्रेग्नन्सीमध्ये अलकाला इंजेक्शनेही दिली होती. छोटा गोरा देखणा मुलगा. घरभर तीनचाकी सायकल चालवताना मला आठवतोय. किती वेळा मी त्याला खेळवलंय, फोटो काढलेत. आणि या मुलाला हे जीवघेणे व्यसन लागावे? हे व्यसन, मी समजत होतो, की श्रीमंतांच्या मुलांना लागते. सुनील दत्त यांच्या मुलाला लागल्याचे ऐकले होते. कुणा उद्योगपतीच्या मुलालाही. पण आता हे थेट आमच्या घरापर्यंत पोहोचले होते.

दोन दिवस धनूला बराच त्रास झाला. त्या बेहोशीमध्येच तो ड्रगसाठी सिगरेटमध्ये ड्रग भरल्याची ॲक्शन करायचा. काडी पेटवल्याची. फूं फूं...फक् फक् असे आवाज करीत तो काल्पनिक धूर पकडायचा प्रयत्न करायचा. पाठीला होणाऱ्या वेदनेने ओरडायचा. पण शेवटी ते थांबत गेले. आणि दोन-तीन दिवसांत तो नेहमीसारखा दिसू लागला. डोळ्यांत जिवंतपणा आला. अलका, महेशला खूप हायसे वाटले. पण आता त्याची चौकशी करायला त्याचे मित्र येऊ लागले. अलका-महेशने कधी पाहिलेलेही नव्हते. सुनंदाने बजावले होते, कुणालाही धनूला भेटू द्यायचे नाही. गावाला गेलाय म्हणून सांगा. दोन-चार दिवसांत तेही यायचे बंद झाले. आता त्याला घरात फारच कोंडल्यासारखे वाटू लागले. मग सुनंदाने मला सुचवले, "तू त्याला घेऊन फिरायला जा, म्हणजे त्याला जरा बाहेरची हवा लागेल. तू बरोबर असल्यावर त्याचे तसले मित्रही येऊन भेटणार नाहीत." तसा मी त्याला घेऊन विद्यापीठाच्या मोठ्ठ्या मैदानावर फिरायला घेऊन जाऊ लागलो.

मला प्रश्न पडला होता : 'ड्रग्ज'च्या विषयावर बोलायचे की नाही? पण थोड्याच वेळात तो विषय निघालाच. आणि धनूही मोकळेपणाने बोलू लागला. मला या ड्रग्जविषयी काही माहिती नव्हती. वर्तमानपत्रातून आलेले लेख एक - दोनदा वाचले होते, पण त्यात ड्रग्जचे प्रकार, माहिती तितपतच होती. इथे मी ड्रग्जमध्ये सापडलेल्या मुलाशी बोलत होतो. ते किती भयंकर असते, हे गेल्या काही दिवसांत कळले होते. 'त्या' दुपारी आमच्या घरी माझ्या समोर धनू बसला होता. त्याचा चेहरा किती भकास होता! डोळ्याभोवतीची त्वचा काळी झालेली. ओठ काळे पडलेले. गाल किती आत गेले होते! आता ड्रग्ज सोडून आठच दिवस झाले होते, पण सगळा नूरच बदलला होता! आधी तो फर्ग्युसनला होता. तेव्हा मागच्या बाकावर यांचा ग्रुप बसायचा. हा खिडकीतून उडी मारून बाहेर पळायचा. कँपात 'माल' मिळायचा. मग हा त्या पुड्या घेऊन कॉलेजला यायचा. खूण केली की मुलंही उड्या टाकून पळून यायची. मग कुठे कुठे बसून ते ड्रग्ज ओढायचे. कुठे माहिताहे? एका होस्टेलमधे स्वा. सावरकरांची जिथे खोली आहे, त्याच्या बरोबर खाली! काय भयानक योग बघा. त्या त्यागी महापुरुषाचे वारे जरी अंगाला लागले तरी जीवन बदलून जायचे, तिथे ही मुलं ड्रग ओढत बसायची.

नंतर त्याच्या ग्रुपमधल्या मुलांची नावे आम्ही मिळवली. सगळे डेक्कन परिसरातले, उच्चभ्रू कुटुंबांतले. अलका-महेशला कळायला उशीर झाला, तसा त्यांना होऊ नये म्हणून सुनंदाने त्यांच्या

घरी फोन केले. “आम्हाला हे कळले आहे. हवे तर स्वतंत्रपणे तुम्ही चौकशी करा. आणि मदत हवी असल्यास आम्ही ती करायला उत्सुक आहोत.” पण प्रतिसाद अनपेक्षित आला. ‘आमच्या मुलाला असलं काही व्यसन नाही. तुम्ही उगाच आमच्या घराची बदनामी करु नका,’ अशी उत्तरे. पुढे दोन-चार-पाच वर्षांनी हेच पालक त्यांच्या मुलांना घेऊन मुक्तांगणमध्ये दाखल करायला आले, तेव्हाचा सूर पालटून आता तो असहाय सूर झाला होता. पण मधली काही वर्षे गेली नसती तर? कदाचित त्याच वेळी काही करता आले असते. ही उच्चवर्गीय संस्कृतीची एक झलक.

धनू सांगत होता आणि ड्रग्जचे विश्वच उलगडत होते. तिथे माल घ्यायला कोण कोण यायचे? तर गरीबवर्गच जास्त. झोपडपट्टीत राहणारी पोरं, कचरा वेचून-भंगार विकून पोट भरणारी कंगाल पोरं, हलकी कामं करणारे हेल्पर, रिक्षावाले, कामगार...असेच बहुतेकजण. संजय दत्त कॅटॅगरी नव्हतीच तिथं. आणि पुड्या महाग तरी किती? वीस रुपयाला एक. अशा रोज पाच-सहा पुड्या तरी लागणारच. म्हणजे ड्रग सुरु केल्यापासून चार-पाच महिन्यांत तेवढा डोस वाढतोच. म्हणजे रोजचा शंभर-सव्वाशेचा खर्च (तो ऐंशी सालातला हां!), आणि तो टाळून चालत नाही. त्याचा परिणाम संपला की त्रास व्हायला सुरुवात झालीच समजा. तुम्ही सगळ्यापासून पळून जाऊ शकता. पण या ड्रगपासून? कुठे जाणार? जिथे असाल तिथे तुम्हाला त्रास सुरु होणार, आणि घेतले नाही की तो वाढतच जाणार. किती वाढणार? कितीही. यात माणसे मेलेलीसुद्धा आहेत. सर्वांत महागडे व्यसन सर्वांत गरीब थरात! हे मला लिहिण्यासाठी आव्हान वाटू लागले आणि त्यावर मी लिहायचे ठरवले.

पण त्याआधी धनू प्रकरण सांगून टाकतो. त्याला व्यसन कसे लागले, हेही त्या मैदानावरच्या फिरण्यात मी विचारले. तो म्हणाला, “तुला माहीतच आहे, माझे बाबा संध्याकाळी रोज ड्रिंक्स घेतात, प्रमाणात घेतात. मी लहानपणी आईला विचारलं, ‘डॅडी हे रोज काय पितात?’ आई म्हणाली, ‘ते ड्रिंक घेतात.’ काही वर्षांनी समजलं, की ते ड्रिंक म्हणजे दारु आहे. तसं मी आईला विचारलं, ‘डॅडी रोज दारु पितात? का पितात?’ आईनं सांगितलं, ‘त्यांना ऑफिसमध्ये टेन्शन्स असतात, म्हणून त्यांना घ्यावी लागते.’ मग मी दहावीला गेलो. माझ्या अभ्यासाचं मला टेन्शन यायला लागलं. मग वाटलं, आपण डॅडींसारखं ड्रिंक घेऊ या का? पण नको. सिगारेट ट्राय करु. घरी कळणार नाही. तिथून सगळं सुरु झालं. पहिल्यांदा सिगारेट...त्यात चरसची गोळी घालून ओढू लागलो. आणि शेवटी ब्राऊन शुगर.”

मी या विषयावर सभांमध्ये बोलताना नेहमी सांगतो, की आपण घरात रोज थोडी दारु घेत असाल. चांगल्या दर्जाची घेत असाल, कंट्रोलमध्ये घेत असाल; पण तरी त्याकडे तुमची लहान मुलं कशा दृष्टीने पाहत असतील यावर तुमचा कंट्रोल नसतोच. त्यामुळे घरात अल्कोहोल संस्कृती आणायची की नाही हे तुम्ही ठरवा.

त्यावरुन एका मित्राची आठवण झाली. तो एकदा असाच गंभीर चेहऱ्याने, अस्वस्थ होऊन आला. म्हणाला, “आमच्या चिरंजिवांनी काल एक पराक्रम केला. सिग्रेट ओढली. आता ते साहेब आठवीत आहेत फक्त!”

मला आश्चर्य वाटले. हा मित्र स्वतः जवळपास चेनस्मोकर (अग्निहोत्री म्हणूयात का त्याला?) आहे. मी त्याला म्हटलं, “मित्रा, त्याला हा नाद लागू नये, असं वाटत असेल तर तुला सिगारेट सोडली पाहिजे. तयार आहेस का त्याला?”

तो म्हणाला, “नाही, मला ते शक्य नाही.”

“मग त्या मुलाला तू काय, कसं सांगणार आहेस?”

“मी त्याला सांगितलंय, की मी आठवीत असताना ओढत नव्हतो. नोकरी लागल्यावर मी ओढायला लागलो...”

मला त्याही परिस्थितीत हसू आले. म्हणालो, “मित्रा, त्याला ते कसे पटेल? त्याला आठवतं तेव्हापासून जर तुझ्या ओठांत तो सिगारेट पाहत असेल, तर ती एक चुकीची गोष्ट आहे, हे त्याला कसे पटावे?”

तो मुलगा माझाही लाडका होता. त्याला घेऊन मी सिंहगडला गेलो. खूप बोललो आम्ही. या सवयीविषयी बोललो. त्याने नंतर सिगारेट ओढलीच नाही.

तर परत धनूकडे येऊ.

नंतर मुक्तांगण निघाले. धनू सुनंदाचा मदतनीस झाला. नंतर सगळे कुटुंब बदलीमुळे मुंबईला हलले. तिकडे गेल्यावर तो दोन-चार वेळा स्लिप झाला, म्हणजे परत व्यसनाकडे वळला. त्या त्या वेळी तो मुक्तांगणमध्ये दाखलही झाला होता. नंतर तो त्यातून सुटला तो सुटलाच. वर्ष पूर्ण झाल्यावर आम्ही त्यांना टोकन - शाबासकी देतो. त्या वेळी आपले अनुभव त्याने ‘शेअर’ केले, म्हणजे सांगितले. तो म्हणाला, “माझी आणि डॅडींची नेहमी भांडणे व्हायची. त्यानंतर मी प्यायला जायचो. माझी स्लिप व्हायची. एकदा रात्री असेच भांडण झाले. डॅडी ओरडून म्हणाले, ‘गेट आऊट’! मी दाराबाहेर जिन्याच्या पायरीवर बसून राहिलो. विचार केला- आता दोनच रस्ते. एक म्हणजे परत ड्रगकडे जाणे. दुसरा, डॅडी बदलणार नाहीत, आपल्यालाच बदललं पाहिजे. मी आत आलो. डॅडींसमोर जाऊन उभा राहिलो. नजरेला नजर देऊन म्हटलं, ‘सॉरी’. डॅडी थक्कच झाले. मित्रांनो, मी कधीच हा शब्द डॅडींसमोर उच्चारला नव्हता. आणि आश्चर्य म्हणजे डॅडींनी हात पुढे करून मला मिठीत घेतलं. आम्ही दोघंही खूप रडलो त्या दिवशी. त्यानंतर मी सुधारलो, आणि डॅडीही सुधारले.”

आम्ही सगळ्यांनी उत्स्फूर्त टाळ्या वाजवल्या. कुठल्या पुस्तकात शिकला हे शहाणपण? त्या जिन्यात त्याने नेमका चांगला रस्ता का आणि कसा पकडला? सगळेच आश्चर्य. जाता जाता आणखी एक गंमत. धनू बरा झाल्यावर त्याचे डॅडी-आमचा मित्र आम्हाला सांगत होता, “महाराजांची कृपा म्हणून धनू यातनं बाहेर आला.” तो कुणा महाराजांचा भक्त होता. घरात त्यांचा एक मोठा फोटोही लावलेला होता. मला आश्चर्य वाटले. मग सुनंदाचे प्रयत्न? मुक्तांगणमधल्या सर्व सहकाऱ्यांची दिनरात्र मदत? या सगळ्याचा धनूच्या बरे होण्यात काही रोल आहे का? पण महेशला तसे म्हणण्यात अर्थ नव्हता. कारण त्यावर तो म्हणाला असता, त्यांची कृपा म्हणून तुम्ही भेटलात. आणि हे सगळं करायला त्यांनीच तुम्हाला बुद्धी दिली.

धनूला हे सांगताच तो हसून म्हणाला, “त्यांना सांग, की मी बेडरुममधल्या महाराजांच्या फोटोखाली बसूनच माल ओढायचो.” मी महेशला तसे कधीही म्हणालो नाही. जर त्यामुळे त्याला छान वाटत असेल तर वाटू द्यावे की.

पुढं मुक्तांगणमध्येही आम्हाला असेच अनुभव यायचे. एखादा पेशंट बरा झाला, की लोक म्हणायचे, “आमच्या नवसाला देव पावला. आता त्याची पूजा घालायला पाहिजे.” सुनंदा हसून म्हणायची, “जरूर घाला पूजा. फक्त आम्ही सांगितलेल्या सूचना, पथ्य पाळा म्हणजे झालं.”

तर या धनू प्रकरणाने मला खूप चालना मिळाली. जसा त्या प्रश्नाचा ध्यास लागला. आनंद नाडकर्णी मुंबईत हेच काम करतो असे ऐकले. मग काम सोपेच झाले. आधी त्याच्या ठाण्याच्या घरी जाऊन या विषयावर त्याला विचारत सुटलो. त्यानेही माझी जशी शिकवणीच घेतली! नंतर परळच्या के.ई.एम. हॉस्पिटलमधल्या त्याच्या खोलीवर राहिलो. ते दिवस खूप शिकवणारे, वेदना देणारे आणि बहारीचे होते. बहार म्हणजे आनंद नावाचा उत्साहाने उसळणारा मित्र मिळाला. माझे कॉलेज- जीवन संपून बारा-पंधरा वर्षे लोटली होती. इथं ती तरुणाई परत भेटली. त्याचा पार्टनर महेश गोसावी होता. मुख्यमंत्री निलंगेकरांच्या मुलीला बेकायदा प्रवेश दिला म्हणून तो कोर्टात गेला. खूप दरडावण्या, धमकावण्या आल्या; पण तो खंबीर राहिला. त्या सगळ्यात मुख्यमंत्र्यांना राजीनामा

द्यावा लागला. ते प्रकरण त्याच वेळी चाललेले. ती खोली म्हणजे त्या हालचालींचे केंद्रस्थान होते. रोज नव्या घटना, नवे थरार.

आनंदच्या बरोबर त्याच्या सायकियाट्री डिपार्टमेंटला जायचो. दगडी इमारती. पुण्याच्या ससूनच्या मानाने खूपच स्वच्छता. कार्यक्षमताही. त्याच्या ग्रुप मीटिंगला तीस-चाळीसजण. प्रत्येकाच्या 'शेअरिंग'मध्ये मन हादरवणाऱ्या कहाण्या. आनंद या सगळ्यांमध्ये छान मिसळायचा. बरोबरीच्या नात्याने. त्याचे एम.डी. सायकियाट्री हे बिरुद बाजूला उतरवून ठेवलेले. त्या मुलांचा तो आवडता हीरोच जसा! सायकियाट्री वॉर्डमधल्या सात-आठ खाटा यांच्या 'डी-ॲडिक्शन'साठी दिलेल्या. प्रश्न नवीन, उत्तरे शोधणेही नवीन. त्यामुळे सगळीच एक्साइटमेंट. होस्टेलच्या त्याच्या छोट्याशा खोलीत दोन कॉट्स जेमतेम बसायच्या. त्यात खाली काही तरी टाकून त्यावर झोपायचो.

पेशंटच्या घरोघर जायचो. त्या निमित्ताने एक वेगळीच मुंबई पाहायला मिळाली. या प्रश्नामुळे उद्ध्वस्त झालेली घरे आता सावरली, तरीही साशंक. काय होणार या पोरांचं? यातनं कुटुंबांचे अनेक पैलू बघायला मिळत. एका ड्रगच्या व्यसनी मुलाच्या घरात आई, थोरला भाऊ आणि वहिनी राहायचे. या पोरानं व्यसनासाठी पैसे चोरले, अनेकांकडून बहाणे करुन पैसे उसने काढले...वगैरे. या सगळ्याला कंटाळून त्याच्या थोरल्या भावाने शेवटी या धाकट्याला घराबाहेर काढले. तो बाहेर पडला आणि घरासमोर एक सार्वजनिक बाग होती तिथल्या एका बाकावर बसला. त्याच्या मागोमाग कपडे पिशवीत टाकून त्याची आई पण बाहेर पडली. ती त्याच्या शेजारी जाऊन बसली. जिथं तू, तिथं मी. मग शेवटी थोरला भाऊ उतरुन बागेत आला आणि या सगळ्यांना हाताला धरून त्याने घरी परत आणले. हे ऐकून मला तर गहिवरुन आले. या एका घटनेने आपल्याला काय काय दाखवले! मला तर कपडे पिशवीत घालून घरदार सोडून मुलाशेजारी जाऊन बसणारी माउली धन्य वाटली. आणि ती गेल्यावर दादाने जाऊन सगळ्यांना परत आणणे? सगळेच मोहरुन टाकणारे. मी नंतर परदेशात तिथल्या या क्षेत्रात काम करणाऱ्यांसमोर बोलताना हे सांगितलं, तर त्यांना ते खरंच वाटेना. एका मुलाने आई व्यसनाला पैसे देत नाही म्हणून तिचे डोके तीन-चार वेळा भिंतीवर आपटले, तर ती आंधळीच झाली. आता तो सुधारला. आता तो आईची काळजी घेतो. काही नुकसान भरुन येणारे, तर काही न भरुन येणारे. त्या खड्ड्यांसहित जगणे.

त्याच काळात मुंबईच्या अल्कोहोलिक ॲनॉनिमस (ए.ए.किंवा अनामिक मद्यपी) या संघटनेच्या सभांना हजर राहिलो. पुढे पुण्यातही त्यांना जात राहिलो. सुरुवातीला 'मी (आद्याक्षरांनी ते नाव घेत, ओळख लपवण्यासाठी) एक दारुडा आहे,' असे बोलणारा म्हणायचा, की ऐकणारे हाय...अमुक (त्याचे संक्षिप्त नाव) म्हणून ओरडायचे. हे जरा विचित्र वाटायचे. काहीजण अनुभव फार मोकळेपणाने व्यक्त करीत, तर बऱ्याचजणांच्या आत्मनिवेदनात तोचतोपणा असे. पण तरीही ते सगळे भावले. त्यांच्या अनामिकतेविषयी मला अगत्य नव्हते. कारण ही संघटना अमेरिकेत जन्मली. तिथे अनामिकता महत्त्वाची. इथे सगळ्यांना सगळे आधीच माहीत असते. त्यांच्या कार्यक्रमातल्या बारा पायऱ्याही अनुभवसिद्ध वाटल्या. दारुपासून दूर राहताना त्या पायऱ्यांनीच पुढे जायचे. आधी मी व्यसनी आहे हे मान्य करणे. ही आधीची पायरी. आणि दुसऱ्या व्यसनी माणसाला व्यसनापासून दूर राहायला मदत करणे, ही शेवटची बारावी पायरी. आपली व्यसनमुक्ती ऊर्फ सोब्रायटी पक्की नसताना दुसऱ्याला मदत करायला जाणे धोक्याचे. त्यांचे एक अनुभवाने गच्च भरलेले 'बिग बुक' आहे. त्यांच्या प्रार्थना आहेत. मीटिंगच्या वेळी भिंतींवर टांगण्यासाठीची वाक्ये आहेत. या एएमधली आवडणारी गोष्ट म्हणजे या व्यसनींसाठी व्यसनापासून दूर असलेल्या व्यसनींनी चालवलेली ही संघटना. यात कुणी एक्स्पर्ट डॉक्टर नाही की कुणी समाजातली मान्यवर व्यक्ती अध्यक्ष नाही. संध्याकाळी, जेव्हा दारुची वेळ असते तेव्हा, या मीटिंगला जायचे. इतरांचे अनुभव ऐकायचे, हवे तर आपलेही सांगायचे आणि ती दारुची वेळ चुकवायची आणि एक दिवस पदरात पाडून घ्यायचा.

या एएची अनेक भावंडे आहेत. ड्रग्जवाल्यांचे ‘नार्कोटिक ॲनॉनिमस’ आहे. येवढेच काय, अति स्थूल माणसांचे अतिखाण्यापासून दूर राहण्यासाठी ‘ओबेसिटी ॲनॉनिमस’ आहे. आणि हो, जुगाराचेही व्यसनी असतात, त्यांचं गॅंबलिंग (किंवा गॅंबलर्स) ॲनॉनिमसही आहे.

तर हे सगळं विश्व मला आनंदने दाखवलं. तो या क्षेत्रातला माझा, सुनंदाचा गुरूच. माझा तो छानच मित्र झाला. तो नाटकं लिहायचा. गाण्याचे कार्यक्रम सादर करायचा. ललित लेखन करायचा. त्याच्या उत्साहाला त्याची निर्मितिक्षमता मॅचिंग होती म्हणून बरे, नाही तर इतरत्र झालेले घोटाळे आपण पाहतोच. पुढे मुक्तांगण निघाले. उभारणीत त्याचा मोठाच सहभाग. पुढे सुनंदाला कॅन्सर झाला. मग तो तिचं काम हलकं करण्यासाठी महिन्यातले २-३ दिवस पुण्याला येऊ लागला. तो येवढा बिझी असूनही. ते आजतागायत चालू आहे. त्या काळात तो सुनंदाला आई मानू आणि म्हणू लागला. त्यामुळे मी त्याचा ‘आपोआप बाबा’ झालो. आता तो मला प्रेमाने ‘बाब्या’ म्हणतो. त्याच्या येण्याची आम्ही वाऽऽऽट पाहतो. तो आला की नव्या कल्पनांची, नव्या उपक्रमांची जशी झुळूक येते. सकाळी ट्रेनने येऊन परस्पर मुक्तांगणमध्ये जातो. तिथं सर्व पेशंट मिळून एखादा उपक्रम, मग पेशंटना वैयक्तिक भेटणे, दुपारी स्टाफबरोबरची भरगच्च मीटिंग. घरी येईस्तो चार, पाच वाजलेले. मी म्हणतो, आता तू जरा शांतपणे पड. तर तो म्हणतो, बोलू यात ना. मी ठीक आहे. कधी त्या वेळी कुणी भेटायलाही येते. मानसिक प्रश्नात अडकलेल्यांशी बोलणे सोपे नसते; पण तो सहजपणे व्यग्र न होता करू शकतो. या सगळ्यामुळे त्याला मी महामानवच म्हणतो. डेक्कन क्वीनने परत गेल्यावर फोन येतो, “बाब्या, नवे नाटक लिहायला घेतले. गाडीत पहिला अंक लिहूनही झाला!” माझ्या-त्याच्या भेटायच्या काही खास वेळा असतात. तिथं तो दुसऱ्या कुणाचं आक्रमण होऊ देत नाही. एक म्हणजे रात्री आम्ही कुठे तरी बाहेर निवांत ठिकाणी जेवायला जातो आणि छान गप्पा मारतो. दुसरे म्हणजे सकाळी डेक्कन क्वीनला मी सोडायला जातो. गाडीमध्ये आमच्या पंधरा मिनिटांच्या खास गप्पा होतात. मला आठवते, केईएमच्या त्याच्या खोलीवर राहत असताना रात्री आम्ही पायी पायी ‘ठाकर्स क्लब’मध्ये जेवायचो. चौपाटीवरच्या रस्त्याने चालत जायचो. चर्नी रोडला कुठे तरी पारशाचे आइस्क्रीम मिळायचे. रेल्वेच्या जिन्याच्या पायरीवर बसून आइस्क्रीम खात तो मला त्याच्या जीवनाविषयी, त्याच्या स्वप्नांविषयी सांगायचा.

व्यसनाच्या विषयात पडलो. पेशंटना फायदा झाला असेलच. पण माझा मोठ्ठा फायदा म्हणजे मला आनंदसारखा मुलगा, बाप आणि जिवाभावाचा मित्र मिळाला. आम्ही एकमेकांच्या सुखदुःखात बरोबर राहिलो. आमची कुटुंबे जशी मिसळलीच गेली.

आनंदकडून पुण्याला आलो. पुण्याच्या सायकियाट्रिस्ट मित्रांनी काही ॲडिक्ट्सचे पत्ते दिले. एकाची आई तर धुणी-भांडी करणारी. पोलिसांनाही भेटलो. या सगळ्यावर लिहायला सुरुवात केली आणि त्याची लेखमालाच झाली. महाराष्ट्र टाइम्समध्ये दिनकर गांगल होता. त्याने उत्साहाने ती स्वीकारून रोज एक लेख याप्रमाणे छापली. ते अकरा लेख झाले. त्यात आणखी भर घालून ‘गर्द’ नावाचे पुस्तक प्रकाशित झाले. या लेखांनी खूप खळबळ झाली. हे गर्द ओढणाऱ्या आणि नंतर आमच्याकडे उपचार घेतलेल्या काही पेशंट मित्रांनी सांगितले, “आम्ही व्यसनात होतो, पण म. टा. येण्याची वाट पाहायचो. उत्सुकतेने वाचायचो. कारण जसं आमच्यावरच ते लिहिलेलं असायचं.” या अर्थाचे काही लेख वाचून काही मध्यमवयीन, वयस्क पालक भेटायला येऊ लागले. “तुम्ही त्या लेखात जी लक्षणे लिहिलीत तशीच माझ्या मुलात आहेत.” त्या मुलाला भेटताच तसे असल्याचे लक्षात यायचे. मग याचे काय करायचे? सुनंदाने ससून हॉस्पिटलला सायकियाट्री विभागाकडे त्याला ॲडमिट व्हायला पाठवले. रोज एक-दोन मुलं आम्ही पाठवू लागलो. तसा तिथल्या डॉक्टरांचा सुनंदाला फोन आला : “अहो, तुमच्या या पोरांनी इथं गोंधळ घातलाय. आम्हाला हे झेपायचं नाही. आमचं हे कामच नाही. पाठवू नका असले पेशंट.” आता काय?

एके दिवशी दुपारी एक तरुण मुलगा बेळगावहून आला. म्हणाला, “मी ड्रगपासून गेले चार दिवस दूर आहे. पण उद्या माझा इंटरव्ह्यू आहे. ही नोकरी लागली तर माझे सगळेच प्रश्न मिटतील...”

मी म्हणालो, “बरोबर आहे. पण यात मी काय करु शकतो?”

तो म्हणाला, “मला ड्रगची एक पुडी पाहिजे. ती मी खिशात ठेवीन. ओढणार नाही. पण ती नुस्ती खिशात असली तरी मला आधार वाटेल. तेवढी पुडी मला मिळवून द्या.”

मी थक्क झालो. आजवर धीर येण्यासाठी खिशात अंगाऱ्याच्या पुड्या ठेवतात, हे ऐकले होते. म्हणालो, “मी आणि तुला पुडी मिळवून देऊ? आम्ही तुला यातनं बाहेर पडायला मदत करु. पण हे काय?”

“मला इथले ड्रग विकणारे माहीत नाहीत. बेळगावचे माहीत आहेत. म्हणून तुमच्याकडे आलो. तुम्ही लेखात लिहिलेत, तुमच्या पोलिसांच्या ओळखी आहेत. त्यांनी पकडलेल्या मालातली एखादी पुडी काढून द्यायला सांगा की...”

मी मनातनं संतापलो, पण संयमाने म्हणालो, “तुला ड्रगमधनं बाहेर पडायचं असलं तर ये. नसलं तर चालू लाग!”

तो गयावया करून गेला अखेर. मी आणि सुनंदा सुन्न होऊन बसलो. पाच-दहा मिनिटांत एक गोरे, साठीचे, टक्कल पडलेले गृहस्थ दारात उभे. त्यांना आत बसवले. म्हणाले, “मी अमुक अमुक. (ते तिथल्या प्रसिद्ध श्रीमंतांपैकी एक.) मघाशी आलेला माझा मुलगा. त्याला खरोखरीच एक पुडी मिळवून द्या. एक बाप म्हणून हात जोडून विनंती करतो.”

आमचा हा धक्क्यावर धक्के खायचा दिवस होता. सुनंदाने त्यांना ड्रग सोडताना जो त्रास होतो तो कमी करण्याची औषधे लिहून दिली आणि त्यांना निरोप दिला. पुढे मुक्तांगण सुरु झाल्यावर तो मुलगा पेशंट म्हणून आला. ‘तेव्हा’ त्याचा इंटरव्ह्यू वगैरे काही नव्हता. त्याला पुडी मिळत नव्हती, त्रास सुरु झालेला, म्हणून तो आला होता. नंतर त्या कुटुंबाशी काही वेळा संबंध आला. श्रीमंती अफाट होती. पण त्या घरात संस्कृतीच नव्हती. घरात एकमेकांमध्ये संवाद नव्हता. प्रत्येकाची दिशा भलतीकडेच. या निमित्ताने एक असं घर आतून पाहायला मिळालं. काय नव्हतं तिथं? बंगला, वस्तू, गाड्या...पण काय होतं तिथं? शिकलोय त्यांच्याकडून, की नुसत्या पैशात सुख-समाधान नसतं. ते व्यक्त होतं आपसातल्या हृद्य नात्यांमध्ये, आपलं मागे ठेवून इतरांसाठी करण्यामध्ये. घराघरांतल्या सर्वांसाठी अखंड झिजणाऱ्या कित्येक आया आठवल्या. त्यातनं ती समाधानी घरं उभी राहिलेली. हे जागोजाग दिसतंय, तरी लोक पैशामागे धावताहेत, प्रॉपर्टीसाठी एकमेकांवर खटले भरुन आयुष्यभर लढताहेत...काय म्हणावे याला?

नंतर कधी तरी सुनीताबाईंचा फोन आला. नंतर पु.ल.ही बोलले. ते या लेखांनी खूप अस्वस्थ झाले होते. ‘भेटायला या दोघं’ असं म्हणाले. मग काय, आम्ही लगेच गेलोच त्यांच्या घरी. ते जवळच राहत. आमच्या दोघांचे त्यांच्याकडे बरेच जाणेयेणे असायचे. हक्काने काही बाहेरची कामेही सांगायचे. आम्ही त्यांची मुलेच जशी. मला दरवर्षी एकदा खास कामाला बोलावत. त्यांच्या ट्रस्टमधून ते काही छोट्या उपक्रमांना मदत करत. मी कुठून जाऊन आलो की त्या त्या वेळी एखाद्या कामाविषयी, ते करणाऱ्या माणसांविषयी सांगायचो. ते लक्षात ठेवून मला अधिक माहिती विचारून त्यांच्या गरजांची चर्चा करायचे. मग मी त्या व्यक्तींना बोलावून घ्यायचो. असे बऱ्याचदा.

या वेळी त्यांनी बोलावले आणि म्हटले, “या मुलांसाठी काही तरी करा तुम्ही. आत्ता एक लाख द्यायचे ठरवलेय, पण आम्ही पैशाला कमी पडू देणार नाही.” हे दोघे तोपर्यंत चालू असलेल्या, स्थिरावलेल्या कामांना मदत करीत आलेले. इथे कामाचा पत्ताही नव्हता. तरी एक लाख? बाप रे, केवढी मोठी रक्कम! काय करूयात? प्रचारासाठी पुस्तिका काढता येतील. हजारो हँडबिले छापू.

किंवा एखादा फोटोंचा स्लाइड शो करता येईल. अधिक पैसे जमवून अर्ध्या तासाची डॉक्युमेंटरी? तेवढ्यात सुनंदा म्हणाली, “या लोकांसाठी आपण व्यसनमुक्ती केंद्र काढू.” मी थक्क झालो. एवढा मोठा घाट घालायचा? बाप रे! पण पु.ल., सुनीताबाईंनी ती कल्पना उचलून धरली. परत येताना मी सुनंदाला म्हटलं, “अगं, असं का म्हणालीस तू? आपल्याला झेपणार आहे का हे?”

“झेपेल की.”

“पण असं एकही केंद्र आपण पाहिलेलं नाही. त्या शास्त्रामधलं कसलं ट्रेनिंग घेतलेलं नाही...”

तशी सुनंदा सायकियाट्रिस्ट असल्याने मेंटल हॉस्पिटलमध्ये चरस-गांजामुळे वेडे झालेले किंवा दारुमुळे अल्कोहोलिक सायकोसिसचे पेशंट तिने पाहिलेले होते. पण ते काही झाले तरी मेंटल पेशंट होते. इथं तसं नव्हतं. ते बाकीच्या दृष्टीने नॉर्मल होते. त्यांना कसं हाताळायचं?

त्यावर सुनंदा जे म्हणाली त्यानं मला तिचं वेगळंच दर्शन झालं. ती म्हणाली, “त्यात काय? निदान या पेशंटला ठेवायला जागा तर होईल! आणि नंतर शिकू आपण पेशंटकडनंच.” तिच्यात ज्ञानाचा, डिग्रीचा कसलाही अहंकार नव्हता. ‘आय नो एव्हरीथिंग’ ही बहुतेक उच्चशिक्षितांची वृत्ती तिच्यात औषधालाही नव्हती. कुणाकडनं शिकायचं, तर पेशंटकडनं? त्या दारुड्या, गर्दुल्ल्यांकडनं?

पण सुनंदा खरेच त्यांच्याकडून शिकत गेली. ती विचारायची पेशंटला, की तुझ्यासाठी काय झालं तर तू बरा होशील? नेहमी पेशंटपासूनच ती विचार करायला सुरुवात करायची. त्यामुळे पेशंट तिच्याशी जोडलेच जायचे. आणि हे पेशंटकडून शिकणं आमचं आजतागायत चालू आहे. हजारो पेशंट पाहिलेत तरी. अशी ही सुनंदा!

केंद्र काढायची कल्पना पुलं-सुनीताबाईंनी लगेच उचलून धरली. सुनंदा त्या वेळी मेंटलमध्ये सीनियर सायकियाट्रिस्ट होती. तिचे अधीक्षक डॉ. इक्बाल हजच्या यात्रेसाठी सहा महिन्यांच्या रजेवर गेले होते. तेव्हा त्यांचा चार्ज सुनंदाकडे असायचा. (सुनंदाला अधीक्षक होण्याबद्दल अनेकदा विचारले होते; पण तिला क्लिनिकल कामाची आवड असल्याने तिने नकार दिला होता.) अलीकडच्या काळात दोन मोठ्या इमारती ‘मेंटल’च्या आवारात बांधल्या गेल्या होत्या. एकीमध्ये सर्व ऑफिसेस हलली, पण दुसरी तशीच काही वर्षे रिकामी पडून होती. तळमजल्यावर काही पेशंट होते. ते पण सुनंदाने दुसरीकडे हलवले आणि या कामासाठी या इमारतीची सरकारकडे मागणी केली. सरकारने मेंटल हॉस्पिटलच्या आवारात मेंटल हॉस्पिटलतर्फे हे केंद्र चालवावे, अशी त्या प्रयत्नांची दिशा होती. सरकार त्या वेळी आर्थिक अडचणीत असावे. म्हणून मुख्यमंत्र्यांनी झीरो बजेट मांडलेले होते. म्हणजे नेहमीचा खर्च चालू राहणार; पण नव्या योजना, उपक्रम यावर जशी बंदीच. कुठेही काहीही प्रयत्न करायचा, तर मंत्रालयातल्या अधिकाऱ्यांचा परवलीचा शब्द होता, झीरो बजेट. म्हणजे पुढे रस्ता बंद. अशा परिस्थितीत सरकारकडनं नकार अपेक्षित होता. पण पु. लं.चं नाव, सुनंदाच्या डॉ. संभाजी देशमुख या सहकाऱ्याने मुंबईला जाऊन केलेले निकराचे प्रयत्न यामुळे त्या खडकाला हळूहळू चिरा पडू लागल्या. संभाजी हा अत्यंत सरळमार्गी, सालस, शांत डॉक्टर. बाकी सगळे पांगले तरी हा तिच्या मागे ठाम उभा होता. आता तोही जगात नाही. मग सरकारने असा तडजोडीचा मसुदा पाठवला, की जागा वापरा, पण नोकरवर्ग तुमचा. त्यांचा पगारही तुम्ही करायचा. त्यांनी नंतरही सरकारी नोकरीवर हक्क सांगता कामा नये. वगैरे वगैरे.

परत प्रश्न आला : पु.लं.ची देणगी स्वीकारायला आमची संस्था कुठेय? ते कोणाला पैसे देणार? आणि तिथे पैसे खर्च कोण करणार? पु. लं.चे ‘पु ल देशपांडे प्रतिष्ठान’ होते. पण त्यांचे काम म्हणजे योग्य त्या संस्थेला मदत करायची आणि नामानिराळे व्हायचे. देणगी देताना ते खूप कसोशीने माहिती घेत, पण नंतर त्यांची अजिबात ढवळाढवळ नसे. ही त्यांनी घालून ठेवलेली मर्यादा योग्यच होती. हा एक चांगला, हितचिंतकाचा रोल होता. पण आमच्या बाबतीत ते जरा जास्तच गुंतले होते.

सुनीताबाई म्हणाल्या, "तुम्ही संस्था स्थापन करण्याची प्रोसेस सुरु करा. तोपर्यंत तुम्ही नेमाल त्या माणसांचे पगार, इतर व्यवहार आमच्या ट्रस्टतर्फे करु."

हे ऐकून मी चकितच झालो. त्यांच्या संस्थेच्या मार्फत? किती कटकट होईल त्यांच्या डोक्याला! पण त्यांनी पत्करले. पुढे मुक्तांगणचा सेवकवर्ग वाढत गेला. त्यांचे पगाराचे चेक पु.ल. फाउंडेशनमार्फत दिले जायचे. ती नावे, त्या रकमा लिहून सुनीताबाई तयार ठेवायच्या. मग त्या दोघांच्या सह्या व्हायच्या. दर महिन्याला हा सोपस्कार.

सुनंदाने ती बिल्डिंग साफ करुन घेतली. मी ॲल्युमिनियमची जाड, पिवळ्या रंगाची मुक्तांगणची अक्षरे करुन लावून घेतली. संडास, ड्रेनेज लाइन्स ...सगळेच साफ करुन घ्यावे लागले. सुनंदाला मेंटलमधला कर्मचारीवर्ग फार मानत असे. इलेक्ट्रिशियनने सडलेले वायरिंग काढून नवे बसवले. काही कर्मचारी आले आणि त्यांनी जमेल तिथे, जमेल तसा सरकारी रंग लावून टाकला. फरशा इतक्या काळ्या झाल्या होत्या, की त्यांनी ॲसिड टाकून धुतल्या तेव्हा त्यांचा मूळ रंग हळूहळू दिसू लागला. तिच्या आवडत्या नर्सेस तिने इकडे घेतल्या. त्यांनी औषधांची खोली सजवली, तपासणीची खोली तयार केली. सुनंदाच्या ऑफिसवर हॉस्पिटलच्या पेंटरने पाटी करुन लावली. हे सगळे कर्मचारी इतर डॉक्टरांच्या, अधिकाऱ्यांच्या मते 'नाठाळ' होते, पण सुनंदाच्या हाताखाली कसे ते धावून धावून काम करीत.

सुनंदाला मेंटलमधला गेल्या पंधरा वर्षांचा अनुभव होता. जसा पेशंटबाबतचा क्लिनिकल अनुभव होता, तसाच तिला 'ॲडमिनिस्ट्रेशन'चाही अनुभव होता. तिने पेशंट आल्या आल्या नोंदवतात त्या रजिस्टरपासून ते केसपेपरपर्यंत, औषधांचे स्टॉक रजिस्टर, रोज किती गोळ्या कुणाकुणाला दिल्या याची हिशोब वही, मेंटलमधून किती कॉट-गाद्या-चादरी-फर्निचर आणले त्याचे डेड स्टॉक रजिस्टर...अशी बहुविध तयारी केली. सरकारी यंत्रणेला आपण किती गलथान समजत असलो, तरी प्रत्येक गोळीचा, प्रत्येक उशीच्या अभ्र्याचाही हिशोब ठेवणारी ती एक अजब यंत्रणा आहे, हे या निमित्ताने समजले. त्यात गैरव्यवहार करणारे असोत, हलगर्जीपणा करणारे असोत; पण त्या सिस्टीमला मला दाद द्यावीच लागली.

पु.लं.च्याकडे त्या काळात जवळपास रोज बैठका होत. या केंद्राला नाव काय द्यायचे? सुनीताबाईंची सूचना होती, की 'तुमच्या मनात दुसरे काही नाव नसले, तर आम्ही ज्या उपक्रमांना देणगी दिली तिथे मुक्तांगण हे नाव सुचवतो. भाईचं ते आवडतं नाव आहे.' आम्ही लगेच ते उचलून धरले. मग पु. ल. म्हणाले, "'मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र' असं नाव दिलं तर?" वाः वाः म्हणून ते नाव नक्की झाले.

मुक्तांगण हे पुण्यातल्या एका शाळेचे नाव आहे, हे माहीत होते. पण नंतर हळूहळू समजत गेले, की अनेक छोट्या-मोठ्या संस्थांना ते नाव आहे. वृद्धाश्रम आहे, दलित वसतिगृह, वाचनालय, संशोधनसंस्था...असे बरेच. केंद्र सुरु झाल्यावर काही काळानंतरची गोष्ट. माझा जुना मित्र पुण्यात वरिष्ठ पोलिस अधिकारी म्हणून बदलून आला. आमची भेट झाल्यावर तो म्हणाला, "तुझं ते मुक्तांगण मला बघायचं आहे." मी त्याचा कार्यक्रमच ठरवला. वेळ ठरली. मी पत्ता सांगू लागताच तो हसून म्हणाला, "आम्हा पोलिसांना सगळे रस्ते माहीत असतात!" त्या दिवशी आम्ही वाट पाहतोय, पण त्याचा पत्ता नाही. पोलिसांना आयत्या वेळी अडचणी येतात तसे वाटले. पण त्याचा फोन आल्यावर कळलं, की तो सहकारनगरच्या मुक्तांगण शाळेत पोहोचला आहे. आमच्या बरोब्बर उलट दिशेला!

मुक्तांगण जोरात चालू लागलं, तेव्हापासून आमच्याकडे प्रवेश मिळवण्यासाठी काही महिन्यांची (कधी एक, तर कधी चारही) प्रतीक्षा यादी असते. लवकर ॲडमिशनसाठी मला परिचितांचे नेहमी फोन येत असतात. असाच एका जुन्या वर्गमित्राचा फोन आला.

"मुक्तांगण ते तुझंच ना?"

"हो. का रे?"

"माझ्या बहिणीच्या मुलाला तिथं..."

"कसलं व्यसन आहे त्याला? दारूचं की ड्रग्जचं?"

तो गडबडून म्हणाला, "नाही नाही, तो मुलगा फक्त पाच वर्षांचा आहे. त्याला पहिलीत प्रवेश पाहिजे..." असे अनेक घोटाळे. कधी आमचं टपालही त्या संस्थेकडे चुकून जायचं, त्यांचं आमच्याकडे. काही वर्षांनंतर हे सगळं स्थिरावलं. येवढ्यात घोटाळा झालेला आठवत नाही. पण तरीही कधी तरी त्या शाळेची पेपरमध्ये क्रीडा विभागात बातमी येते, मुक्तांगणचा कबड्डीत विजय, किंवा अमक्या खेळात मुक्तांगण पराभूत, तेव्हा आसपासच्या कुणाचा तरी फोन येतो. पुढे दिल्लीशी संबंध आल्यावर तिथले अधिकारी 'मुक्तांगन' असा उच्चार करीत. म्हणत, "मुक्त आँगन! वाः, बहुत अच्छा नाम रखा है..."

सर्व तयारी झाल्यावर उद्घाटनाचा दिवस ठरवला. २९ ऑगस्ट १९८६. डॉ. ह.वि. सरदेसाईंच्या हस्ते उद्घाटन करायचे ठरवले. पु. लं.च्या नावामुळे, फोनमुळे सगळेजण होकारच देत. बाबा आमटे त्या दिवशी पुण्यात होते. ते तर आपण होऊन या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला आले. असा पाहुणा प्रयत्न करूनही मिळाला नसता, तो आम्हाला आपोआप मिळाला!

या सगळ्या गडबडीत मी मात्र आतून जरा हादरलोच होतो. माझी मूलभूत शंका अशी, की आपल्या या केंद्रात कोण येणार? त्यांनी, म्हणजे अशा व्यसनी माणसांनी आपल्याकडे का यावे? एक तर अशी किती माणसे व्यसने सोडायला तयार होतील? आनंदकडे असा उपक्रम पाहिला होता. पण तो मुंबईच्या के.ई.एम.सारख्या मोठ्या, जुन्या हॉस्पिटलचा भाग होता. त्यातही त्यांना सायकियाट्री वॉर्डमधली जेमतेम साताठ बेड्स दिलेली. मुंबईत माहिती घेताना बऱ्याचजणांकडून कळले, की जे. जे. हॉस्पिटलने असे केंद्र सुरु केले आहे. ठाणे मेंटलमध्येही अशा केंद्राचे उद्घाटन सुनील दत्त यांच्या हस्ते झाले. पण ही दोन्ही केंद्रे बंद पडली. जे.जे.मध्ये दारु सोडण्यासाठी दाखल झालेल्या पेशंटना तिथले वॉर्डबॉईजच दारु पुरवायचे. कुठल्या मार्गाने? तर शहाळ्यात दारु भरून आणून द्यायचे आणि पेशंट डॉक्टरसमोर स्ट्रॉने दारु पीत असत! ठाण्यालासुद्धा असले घोटाळे झाले. जे ऐकत होतो त्यावरुन निष्कर्ष एकच होता, या क्षेत्रातल्या संस्थांचा मृत्युदर फार म्हणजे फारच मोठा आहे. थोडक्यात, जगलेलं पोर समोर कोणी दिसतच नव्हतं. बंद पडण्याचं उघड कारण म्हणजे पेशंट ॲडमिट असताना त्यांना दारु किंवा ड्रग्ज मिळणे हे. जी केंद्रे बंद पडली ती सरकारी हॉस्पिटलमध्ये होती. तिथल्या स्टाफविषयी कोण गॅरंटी घेणार? त्यांच्यातच व्यसन इतके बोकाळलेले, की दारुच्या बदल्यात कुठलेही काम करायला बरेचजण तयार.

मग इथे तरी काय होतं? मेंटलचा स्टाफ काही वेगळा नव्हता. तो याच भ्रष्ट समाजाचा भाग होता. मग कसं चालणार, कसं टिकणार हे केंद्र? आपल्या यंत्रणेतला एक माणूस जरी अप्रामाणिक असेल तर सगळा प्रोग्रॅम कोसळतोच. इथे 'ऑल ऑर नन लॉ' असतो. इथे एक तर संस्था चांगली चालेल, नाही तर पूर्ण बंद पडेल. मधली अवस्था नाही. सुनंदाने घाट घातलाय खरा, पण ती यातून कशी वाट काढणार? मी तिचा निष्ठावंत सहायक. जरी केंद्राची सुरुवात व्हायला माझे लिखाण कारणीभूत झालेले असले, तरी हे केंद्र म्हणजे पूर्णपणे तिचेच अपत्य होते. तोपर्यंत मी अनेक प्रश्नांवर लिहिले होते, पण त्या प्रश्नांसाठी कुठल्या कामात मी कधी स्वतःला गुंतवून घेतले नाही. यावर काहीजण टीकाही करीत. मी त्यांना सांगायचो, तो माझा स्वभाव नाही. पण इथे माझ्या लिखाणानंतर सुनंदामुळे मी या कामातही गुंतत गेलो. यापूर्वी मी युक्रांदमध्ये होतो. बाबा आढावांबरोबर महात्मा फुले प्रतिष्ठानमध्ये होतो. पण तिथे इतर अनेकजण होते, त्यातला मी एक होतो. तिथेही मी फार

गुंतायचो नाही. आंदोलनात इतरांबरोबर भाग घ्यायचो. तुरुंगवासही पत्करायचो. पण लोक म्हणायचे तसे एका जागी जेठा मारून बसून काम केले नव्हते. आणि इथे तर सुनंदामुळे ते सगळे करणे भागच होते. पण तेवढ्यातही माझा असा हिशोब होता, की सुरुवातीला माझी मदत लागेल, पुढे मला त्यातून बाहेर पडता येईल. त्या काळात आमच्या कुठल्याशा वाढदिवसाला मी सिंहगडावर सुनंदाला एक'प्रेझेंट' दिले. म्हणालो, "चल, तुझ्या या कामाला माझी दोन वर्षे देतो. या काळात मी माझे असे काही काम करणार नाही. तुला सर्व कामांना उपलब्ध राहीन." ती दोन वर्षे कधीच संपली. त्यानंतर तेवीस वर्षे लोटलीत. मला अजून त्यातून बाहेर पडता आले नाही.

कार्यक्रमाच्या दिवशी 'सकाळ'मध्ये माझा लेख प्रसिद्ध झाला. 'मुक्तांगण'च्या इमारतीच्या फोटोसह. त्यात असे असे केंद्र सुरु होणार आहे, वगैरे काही लिहिले असावे. त्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाची माहितीही दिली असावी. माझ्या मते शहरापासून इतक्या लांब या सभेला कितीसे लोक जमतील? पण तिथेही धक्काच. आमच्या मेंटलचा 'रिक्रिएशन हॉल' भरुनच गेला. बाबा आमटे स्टेजकडे तोंड करून एका खाटेवर पहुडले होते. सस्मित नजरेने कार्यक्रम पाहत, ऐकत होते. आनंदचे सुरेख सभा नियोजन आठवते. सभेत कोण काय बोललं ते आठवत नाही, पण सुनंदा अतिशय नेटके आणि छान बोलली. ती कधी सभांमध्ये भाषण करीत नसे. तसा तो भाग माझ्यावर सोपवलेला असे. पुढे मुक्तांगणची वाढ झाल्यावर तिने स्टेजवर जाणे सोडलेच. आमच्या संस्थेच्या वाढदिवस कार्यक्रमात, किंवा २६ जूनच्या आंतरराष्ट्रीय दिवसाच्या कार्यक्रमात ती मलाच स्टेजवर बसायला भाग पाडायची, आणि मला ती वरुन समोर प्रेक्षकांमध्ये- म्हणजे आमचे पेशंट, त्यांच्या बायकांमध्ये बसलेली दिसायची. त्या पहिल्या कार्यक्रमात मात्र ती छान बोलली. बहुधा खादीचा गुरुशर्ट, सलवार आणि वर जाकीट घातलेलं असावं. पण नक्की आठवत नाही. या स्मृतीची गंमत बघा... त्याआधीचे, नंतरचे प्रसंग मला जसेच्या तसे आठवतात, पण टेपचा तेवढाच भाग खराब व्हावा? नंतर दुसऱ्या दिवशी पु.लं.चे मित्र नंदा नारळकर यांनी पुलंना म्हटलेलं लख्ख आठवतंय, की 'काय ती मुलगी छान बोलली! केवढा आत्मविश्वास होता तिच्या बोलण्यात'

मला मात्र कार्यक्रमाच्या बाहेरचं एक दृश्य चांगलं आठवतंय. हा रिक्रिएशन हॉल मेंटलच्या खूप आत आत आहे. पण गेटच्या जवळ, मुक्तांगणच्या दारात कोणी महिला आल्याचे कळल्यावरुन मी तिकडे गेलो. त्या चार-पाच महिला म्हणजे एका शाळेतल्या शिक्षिका होत्या. त्यांनी 'सकाळ'मधला माझा लेख वाचला होता. त्यांच्याबरोबर मळकट कपड्यांतला, दाढी वाढलेला त्यांच्या शाळेतला शिपाई होता. एक शिक्षिका म्हणाल्या, "याला दारूचं व्यसन आहे. याला ॲडमिट करायला आणलंय." तो शिपाई मान खाली घालून गप्प उभा. त्या सकाळी तो शाळेत आला, तेव्हा या शिक्षिकांनी त्याला सांगितलं, "असं असं केंद्र निघालंय पुण्यात. चल, तुला आत्ताच तिथं ॲडमिट करू." तो 'नाही' म्हणू लागला. 'घरी सांगितलं नाही', म्हणाला. तसं या शिक्षिका म्हणाल्या, "आम्ही सांगू तुझ्या घरी जाऊन." नाइलाज झाल्याने तो आला यांच्याबरोबर.

त्याचं नाव महादेव घारे. कार्यक्रम संपवून सुनंदा मुक्तांगणमध्ये आल्यावर तिनं त्याला ॲडमिट केलं. तो आमचा पहिला पेशंट. शकुनावर सुनंदाचा विश्वास नव्हता, तरी ती गमतीने म्हणे, "हा महादेव म्हणजे माझा शकुनाचा पेशंट आहे!" कारण तो खरोखरीच फार शहाणा पेशंट आहे. तो सुनंदा असेपर्यंत सोबर (व्यसनमुक्त) होताच, पण आजतागायत गेली चोवीस वर्षे तो सोबर आहे. (या सोबर शब्दाची गंमत सांगतो. ए.ए.कडून मिळालेला, या क्षेत्रात रुढ असलेला हा शब्द. मी त्याला आपल्या संस्कृतीतला जवळचा शब्द शोधत होतो, तर काय, साईबाबांचा 'सबुरी' हा शब्द सापडला. वाःवाः! सबुरी म्हणजे संयम. पिण्याची इच्छा झाली तरी संयम पाळायचा, सबुरी धरायची, म्हणजे तुम्ही सोबर राहता!) इतर अनेकांना दारु सोडल्यावरही दारुची तीव्र तलफ (याला 'आमच्यात' ऑब्सेशन म्हणतात.) येते. मग ते परत दारुकडे, व्यसनाकडे ओढले जातात. तसे

महादेवला एकदाही ऑब्सेशन आले नाही की परत तो दारुकडे वळला नाही.

प्रत्येक क्षेत्रातली एक परिभाषा असते, तशीच या क्षेत्रातही आहे. व्यसनमुक्त राहिल्यावर कधी तरी एकदा दारु प्याली तर ती 'स्लिप' होते, म्हणजे पाऊल घसरते. तेव्हा लगेच कुणाची मदत घेतली, तर तो व्यसन टाळू शकतो. पण परत परत पीत राहिला तर मग तो 'रिलॅप्स'झाला! म्हणजे ते परत पूर्वीसारखे चोवीस तास पिण्याचे चक्र सुरु झाले. मग त्याला परत ॲडमिटच व्हावे लागते. म्हणजे एकदा पाऊल घसरले तर आधार घेऊन परत उभे राहता येते, पण दलदलीत फसला आणि तिथं खेळतच बसला तर त्याला बाहेर काढून आंघोळच घालावी लागते. महादेवची कधी स्लिप झाली नाही तर रिलॅप्स कुठून होणार? एरवी संकट आले, टेन्शन आले, नैराश्य आले की पेशंट स्लिप होतात, रिलॅप्स होतात. मग महादेववर संकटे आलीच नाहीत का? आली तर. मोठीच संकटे. दत्तवाडीत एका झोपडीत तो अनेक वर्षे राहत होता. तरीही कॉर्पोरेशनने त्याची झोपडी तोडली आणि त्याचा छोटा संसार त्यांनी अक्षरशः रस्त्यावर फेकला. तरीही महादेव व्यसनाकडे वळला नाही. नंतर त्याचा जावई अकाली निधन पावला, तरीही तो स्थिर राहिला हे विशेष. पायजमा-शर्ट-डोक्यावर पांढरी टोपी, असा त्याचा नेहमीचा वेश. त्याची बायकोही नऊवारीमधली, डोक्याला मोठं कुंकू लावलेली मराठमोळी स्त्री होती. पती-पत्नींच्या सहजीवन मीटिंगला ते दोघंही येतात. असा हा सुनंदाचा शकुनाचा पेशंट! मुक्तांगणला दहा वर्षे पूर्ण झाली, तेव्हा साहजिकच मोठा कार्यक्रम करायचा, असे आमच्यातल्या काहींच्या मनात होते. प्रमुख पाहुणा म्हणून मंत्री किंवा उद्योगपती बोलावू. त्यानिमित्त स्मरणिका काढून 'फंड रेजिंग' करु...असे बोलणे चालू असतानाच सुनंदा म्हणाली, "तसलं काही नको. या कार्यक्रमात प्रमुख व्यक्ती म्हणून दीपप्रज्वलन आपला महादेव करेल." आणि तसेच आम्ही केले. दशवार्षिक उत्सवाला आमच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची व्यक्ती म्हणजे महादेव घारे. त्याच्याइतकी योग्य व्यक्ती कुणी असू शकेल काय? तो दोन वाक्येही बोलला नाही, तरीही?

पु.ल.-सुनीताबाईंनी तेव्हा आमच्यावर धरलेली छत्री नंतरही बराच काळ तशीच धरून ठेवली होती. या छत्रीचे वैशिष्ट्य असे, की त्यातून मायेच्या, प्रेमाच्या धारा थेट आमच्यावर पडत असत. नंतर सरकारने हे केंद्र 'टेक-ओव्हर' करावे, म्हणजेच याचा सर्व खर्च सरकारने अंगावर घ्यावा, असा आमचा प्रयत्न चालला होता; पण त्याला यश येत नव्हते. कारण सरकारचे 'झीरो बजेट'. (त्यात मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण असावेत. पु.लं.ना ते ओळखत होते की नाही याची शंका.) दर महिन्याला दहा-पंधराजणांच्या पगाराचे चेक्स सुनीताबाई सुनंदाने दिलेल्या यादीप्रमाणे लिहून तयार ठेवत. मग पु.ल. त्यावर सह्या करीत बसत. त्यांना हा त्रास द्यावा लागतो याचे वाईट वाटे; पण करणार काय? अखेरीस त्यांनी दिलेली एक लाखाची देणगी संपत आली. आम्ही चिंताग्रस्त झालो. पण पु.लं.नी सांगितले, "जिवात जीव असेतोवर हे केंद्र मी बंद पडू देणार नाही. तुम्ही निर्धास्तपणे काम करा." काय या शब्दांनी आधार वाटला असेल आमच्या सगळ्या टीमला! तरीही मी प्रयत्न करीत राहिलो. आणि केंद्र सरकारची आम्हाला ग्रँट मिळाली. ती आनंदाची बातमी सांगायला पु. लं. कडे गेलो. तोवर त्यांनी आणखी सुमारे अडीच लाख रुपये दिलेले होते. तरीही ते म्हणाले, "मला आता जाता जाता मुक्तांगणसाठी काही तरी द्यायचेय. काय देऊ?" सुनंदाने सांगितले, "मुलांना मोकळ्या वेळेत वाचनाची आवड लावायचीय." पु. ल. म्हणाले, "लायब्ररीची कपाटं मी देतो." शेजारी बसलेल्या नंदा नारळकरांनी पुस्तकखरेदीसाठी पाच हजार रुपये दिले. कपाटाचं बिल पस्तीस हजार रुपये झालं, ते पु.ल.-सुनीताबाईंनी दिलं.

तरीही ऋणानुबंध राहिलेच.

२९ ऑगस्टच्या वर्धापनदिनाला ते आवर्जून यायचे. पेशंट मित्रांचे, कुटुंबीयांचे अनुभव ऐकताना ते गलबलून जायचे. एका पेशंटची मुलगी बोलताना तर त्यांचे डोळे डबडबले होते. परत येताना गाडीत

म्हणत होते, “त्या पोरांनी काय पाप केलंय रे, त्यांना असं लहानपण मिळावं?” एका पेशंटचे सासरे सभेत उठून म्हणाले, “पु. ल. स्वतः पद्मश्री आहेत. त्यांनी आमच्या मॅडमना पद्मश्री मिळवून द्यावी.” त्यावर पु.ल. म्हणाले, “हजारो माणसांनी तिला आई मानलंय. आईपेक्षा जगात कोणती पदवी मोठी आहे?” असे काही क्षण.

■

२

आमचा मेंटलमधला मुक्तांगण संसार सुरू झाला. सुनंदा तिथे काम करत होतीच. आता हे काम म्हणजे दुप्पट काम झाले. सकाळी मेंटलच्या वॉर्डांमध्ये जाऊन ती पेशंट तपासून ऑफिसमध्ये यायची. तिथलं ॲडमिनिस्ट्रेटिव्ह काम करून मग मुक्तांगणमध्ये यायची. मग ते संपेपर्यंत ती तिथंच. एरवी दोन-अडीचपर्यंत घरी येणारी सुनंदा साडेचारला घरी येऊ लागली. जेवण, थोडी विश्रांती घेतेय तोच हमाल पंचायतीच्या नाना पेठेतल्या दवाखान्याची वेळ व्हायची. मग तिथून यायला रात्री दहा-साडेदहा वाजत. त्यानंतर ती मला आग्रह करून विद्यापीठातल्या रस्त्यांवर चालायला न्यायची. मग आल्यावर दूध पिऊन झोपत असू. परत सकाळी सहाला दिवस सुरू व्हायचा.

पुढे पुढे तिच्यावर ताण दिसू लागला. मुलींचीही 'आई मिळत नाही'ची तक्रार सुरू झाली. मग दोघांतलं एक काम फक्त करायचं. मग एक उपाय काढला, की तिला 'डेप्युटेशन'वर मुक्तांगणला पाठवायचे. अशी नोकरीत तरतूद होती. पण चौकशीला गेल्यावर वरिष्ठ ऑफिसातल्या लोकांनी सांगितलं, की दुसऱ्या शासकीय विभागात किंवा महानगरपालिका अशा निमसरकारी सेवेत डेप्युटेशनवर जाता येते. परत सगळे ठप्प. त्या सुमारास मंत्रालयाच्या आरोग्य विभागातच नेमका माझा मित्र अरुण घाटे भेटला. त्याने पुढे सदासर्वकाळ आम्हाला मदतच केली. प्रायव्हेट एजन्सीजकडेही डेप्युटेशन्स झाली असल्याचे त्याने शोधून काढले. परत केस 'पुट-अप' (हा तिथला खास शब्द) केली. तो तिथं ऑफिस सुपरिंटेंडेंट होता. नंतर तो अंडरसेक्रेटरीही झाला. शासनाला केस कशी पुट-अप करावी लागते यात तो मुरलेला होता. मंत्रालयाच्या खाली डायरेक्टरचे ऑफिस. ते व्ही.टी.च्या शेजारी. तिथल्या काहींचा या उपक्रमाला सुरुवातीपासून विरोध. त्यांनी खूप अडचणी, अडथळे उभे केले. पण वर महाना नावाचे सेक्रेटरी होते. त्यांनी डेप्युटेशन दिले. आता सुनंदा मुक्तांगणचे काम करायला एकदम मोकळी झाली. वेळेचा ताण कमी झाला. मुलींना आई मिळू लागली, आणि मुक्तांगणमधल्या मुलांनाही.

शासनाचा विषयच निघाला आहे, तर तो भाग सांगूनच टाकावा, नाही का? महाना एकदा मेंटलमध्ये व्हिजिटला आले, तसे ते मुक्तांगणमध्येही आले. बरोबर डायरेक्टर ऑफिसमधले वरिष्ठ अधिकारी वगैरे लवाजमा होताच. वॉर्डात ते पेशंटशी बोलले.

उभ्या उभ्या आमच्याशी प्रश्नोत्तरे झाली. सुनंदा, मी उत्तरे देत होतो. मध्येच ते डायरेक्टर खोडा घालून काही तरी तिसरेच काढायचे. महानांनी सर्वांसमक्ष त्यांना गप्प बसायला सांगितले. त्या भेटीनंतर महानांनी कल्पना मांडली, की 'तुम्ही आता ॲडमिनिस्ट्रेटिव्ह दृष्टिकोनातून मेंटल हॉस्पिटलचे भाग आहात. तुम्ही स्वतंत्र का होत नाही?"

'स्वतंत्र? ते कसे काय?' माझ्या मनात भीती तरळून गेली. पेशंटचे जेवणखाण मेंटलमधूनच यायचे. वीज, पाणी...कशाचा म्हणून खर्च आम्हाला येत नव्हता. मेंटलपासून सुटे झाल्यावर तो खर्च कसा पेलणार?

मी ही शंका सांगताच ते म्हणाले, "तुम्हाला लाँग लीजने नाममात्र भाड्याने जागा देऊ, आणि या सर्व फॅसिलिटीजसह. मग तर झाले?"

वाःवाः! अगदी 'छप्पर फाडके'च! महाना अगदी अबोल होते. काही सहकाऱ्यांचा येवढा विरोध असून त्यांनी मुक्तांगणसाठी एवढे का केले कोण जाणे! बरं, काम केल्यावर हसणे नाही, चार

शब्द बोलणे नाही. नंतरही अंतर्धान पावावे तसे नाहीसेही झाले. याउलट ते डायरेक्टर ऑफिसातले अधिकारी. खरं तर ते आमच्या कॉलेजमधले, माझ्या मागे चार-सहा वर्षे असलेले विद्यार्थी. मागासवर्गीय असल्याने मी आवर्जून बोलायचो. ज्युनियर असल्याने अरे-तुरेचे संबंध. पण या नोकरीत तो एकदम वरिष्ठ अधिकारी झाला आणि बदललाय. मंत्र्यांच्या पुढे पुढे करायचं, आसपास राहायचं, सगळ्या आमदार-खासदारांची धावून धावून कामं करायची. खरं तर पुढारीच व्हायचा तो. कॉलेजमध्ये एकदा भेटला, तेव्हा मी याबद्दल सुनावले होते : "यांच्यापुढे साहेब साहेब का करतोस? तू एक डॉक्टर आहेस. जरा सन्मानाने वाग." पण पुढे असा संबंध येईल असे वाटले नाही. त्याचे नाव? आपण त्याला भांबरे म्हणूयात?

मधल्या काळात सुनंदाच्या बदलीची ऑर्डर हातात पडली. 'पायाखालची वाळू सरकली' असे म्हणतात ना, त्याचाच पडताळा आला. आता मुक्तांगणचे काय होणार? संध्याकाळच्या हमाल पंचायतीच्या दवाखान्याचे काय होणार? मग काही करून बदली रद्द करुन घ्यायला पाहिजे. एक आधार होता. आपला भांबरे तिथे आहे. तो करील आपले काम. म्हणून मुंबईला जाऊन त्याला भेटलो. त्याने बदलीच्या प्रकरणांचा ढीग दाखवला. म्हणाला, "मी काही करु शकत नाही. मुख्यमंत्र्यांची सक्त ऑर्डर आहे. तेव्हा त्यांच्या हातात आहे." मी बाहेर पडलो. निराश झालो. ते मुख्यमंत्री हेकट म्हणून प्रसिद्ध. मी एक्स्प्रेस टॉवरमध्ये गेलो. माधव गडकरी 'लोकसत्ता'चे संपादक. त्यांनी मला विचारले, "का हो, चेहरा का एवढा टाकलाय?" मी त्यांना हे सांगताच ते उठलेच. म्हणाले, "चला, आमच्या भाई सावंतकडे जाऊ." मी त्यांना कसं सांगणार, भाई सावंत हे आरोग्यमंत्री आहेत आणि या फायली मुख्यमंत्र्यांकडे आहेत ते. पण निघालो. पायी पायी समोरच्या विधानभवनात. आम्ही त्यांच्या केबिनमध्ये बसलो. ते सभागृहात होते, पण जसे धावत आले. गडकरींनी एकदम फैरच सुरु केली. 'महाराष्ट्राच्या एका पत्रकाराच्या पत्नीचा शासन छळ करीत आहे...' अशी भाषा. अगदी थेट अग्रलेखाचीच. भाईंनी त्यांना थांबवले. काम विचारले. त्यांनी सेक्रेटरीला सांगितले. म्हणाले, "तुमचे काम झाले. तुम्ही भांबऱ्यांना सांगा. ते करतील."

मी खुषीत परत भांबरेकडे आलो. तर त्याने काय म्हणावे?

"तुला येवढं वरपर्यंत जायची गरज होती? मी ते काम करीत आणलंच होतं."

बाप रे! दीड-दोन तासांपूर्वीच ना तो ते बोलला? इतका फरक?

याउलट गडकरींचं. हातातलं काम ठेवून उठले. काय म्हणावे या विरोधाभासाला!

त्यानंतरच्या काळातही त्याने तीनदा बदल्या केल्या. मधल्या काळात भाई सावंतांचेही निधन झालेले. हेकट मुख्यमंत्र्यांकडेही जावे लागले. शेवटी राजवट बदलली तेव्हा काम झाले.

बदली नको, असे आम्ही आमच्या सोयीसाठी म्हणत नव्हतो. मुक्तांगणचे थोड्या काळात फोफावलेले रोपटे मरणार होते. जयवंतराव टिळकांनी मध्यस्थी केली. तरी ते मुख्यमंत्री म्हणाले, "त्या बाईला तिकडे जाऊन ते काम करायला सांगा." हे कसे शक्य होते? पुणं हे आमचं गाव होतं. आमच्या ओळखी होत्या. आम्ही बऱ्या झालेल्या अनेकांना छोट्या-मोठ्या नोकऱ्या लावू शकलो होतो. ते नव्या गावात कसे शक्य होते?

कितींदा मी निराश व्हायचो. मुख्यमंत्र्यांचं 'ते' उत्तर ऐकून मी बाहेर आलो. फोर्टमध्ये संध्याकाळची सामसूम पसरलेली. रस्त्याच्या मधोमध असलेल्या शुष्क कारंज्याच्या कठड्यावर बसून राहिलो. वाटलं, कुणासाठी करतोय हे काम? आणि एवढा मनस्ताप कशासाठी सोसतोय? सोडून द्यावं आणि व्हावं रुजू बदलीच्या गावी. जगावं एका नोकरदाराचं जीवन. पण मग रात्रंदिवस काम करणारी सुनंदा आठवली. तिची वाट पाहणारे पेशंटचे चेहरे आठवले, गुरुवारी पेशंटना भेटायला येणारे मनं फुललेले नातेवाईक आठवले...गळूनच गेलं सगळं मळभ. तेव्हा मनात आलं, नंतर अशा

संकटाच्या वेळीही ते वाक्य उच्चारत राहिलो, ते असं...मी स्वतःला म्हटलं, 'सामाजिक काम करतोस काय? मग तुला शिक्षा हवीच.' आणि ही शिक्षा कामाचा भाग समजायचा, की संपली त्याची पॉवर. गांधीजींचा जसा इंग्रज सत्तेविरुद्ध सत्याग्रह, तसा आपला या आडमुठ्या यंत्रणेविरुद्धचा हा सत्याग्रहच. पण त्या सत्याग्रहात हजारो लोक सामील व्हायचे. देशभर काय, जगभर त्याच्या बातम्या व्हायच्या. इथे आपण एकटे. सगळ्या जगड्व्याळ यंत्रणेविरुद्ध एकटे. आणि जरी समजा तुमचे काम झाले, तरी ती यंत्रणा अगदी तश्शीच राहते. 'त्या' सत्याग्रहात इंग्रजांना निघून जावे लागले, ते सुख आपल्याला इथे मिळत नाही. आणि हीच खरी शिक्षा.

एक बरे आहे, की यातल्या काहीजणांना मदत करण्याची भावना होते. त्या यंत्रणेत राहून त्यांचं चांगुलपण टिकून राहिलं, असे काही लोक भेटले म्हणून मार्गी लागलं आहे. पुढे मुक्तांगणच्या अनेक कामांत या यंत्रणेचा संबंध आला. आम्ही त्यांना पैसे देत (चारत) नाही, हा त्यांना आमचा 'उद्धटपणा' वाटायचा. लहानातल्या लहान माणसालाही इथे आपल्या प्रकरणात अडचणी निर्माण करता येतात. काही वरिष्ठ, सेक्रेटरी लेव्हलचे आयएएस अधिकारी खूप मदत करायचे. पण क्लार्क त्यांना सांगायचा, आपल्याला हे करता येणार नाही. नियमात बसत नाही. तिथं गाडं ठप्प व्हायचं. पण त्यापुढे जाऊन जर कोणी छडा लावलाच, तर तसा नियम वगैरे काही नसायचाच. आणि वरिष्ठ अधिकाऱ्याने हे उघडकीला आणले, तरी क्लार्क निर्विकारच असायचा. मुक्तांगणला जागा नाममात्र भाड्याने दिली असून, ते भाडे भरले असूनही आमची केस पी.डब्ल्यू.डी.कडे पाठवली गेली, आणि त्यांनी त्यांच्या नियमाप्रमाणे सत्तावीस लाख रु. बाकी ताबडतोब भरा, असा हुकूम काढला. परत पायाखालची वाळू...परत धावाधाव. परत पु.लं.कडून शरद पवारांना पत्र लिहून घेणे...त्यांनी हसून कागदाच्या कोपऱ्यात रद्द केल्याची नोट लिहिणे आणि पुढच्या कागदाकडे वळणे...इकडे भार उतरला, आनंदीआनंद झाला, दगडाखाली सापडलेला हात सही सलामत निघाला...वगैरे झाले, आणि ती जगड्व्याळ व्यवस्था तशीच, निर्विकार. माझ्याकडे बघून छद्मीपणाने हसण्याचेही श्रम न घेणारी.

सुनंदाने मुक्तांगणची घडी नीट बसवली होती. त्यात आनंद ठाण्याहून अधूनमधून यायचा आणि सुनंदाने नांगरलेल्या जमिनीत नव्या उपक्रमांच्या बिया पेरून जायचा. अनेक उपक्रम सुनंदा आणि पेशंटच्या संवादातूनच सुचत गेलेले. सुनंदाविषयी वाटणारे माझे आश्चर्य द्विगुणित होत चालले. कॉलेजपासून आम्ही ओळखत होतो. बरोबरच वाढलेलो. पण या मुलीत हे सगळे कुठे लपलेले होते? तशी ती मेंटलमधल्या कामात, हमाल पंचायतीच्या दवाखान्यात मला वेगळी जाणवली होती. एक सहृदय डॉक्टर म्हणून वेगळेपण होतेच. पण इथे त्याहून अधिक काही तरी व्यक्त होत होते. तिच्या स्वभावात एक चांगला प्रशासक होता, आणि दुसरा सहृदय डॉक्टर. आतापर्यंत मेंटलच्या मोठ्या यंत्रणेचा ती एक भाग होती. तिथं तिनं चांगलं काम करून ठसा उमटवला होताच. पण तरी तो सेटअप आधी अस्तित्वात होताच. तो फक्त तिने चांगला चालवला. पण इथे कॅनव्हास पूर्णपणे कोरा होता. सर्व काही नव्यानेच निर्माण होत होते. आधीच्या मेंटलमधल्या, हमाल दवाखान्यातल्या, तिच्या बाहेरच्या मतिमंद शाळा- वृद्धाश्रम इ. ठिकाणच्या कामामधल्या अनुभवाचा तिला इथे खूप उपयोग झाला, हे ठिकठिकाणी दिसतच होतं.

पण इतकं काटेकोर असूनही पेशंट, उपचार, भेटायला येणारे नातेवाईक, त्यांची मुलं, वृद्ध आईवडील...या सगळ्या बाबतीत ती मृदू या शब्दाहून मृदू असायची. ठरलेले नियम असूनही या माणसांसाठी ते प्रसंगी बाजूला ठेवायची तिची तयारी असे. एवढी सायकियाट्रिस्ट, सुपरिंटेंडेंट कधीही होऊ शकली असती. पण ते नाकारणारी वरिष्ठ अधिकारी, पंधरा वर्षांची कामाची सीनियॉरिटी...हे सगळं बाजूला ठेवून पेशंट नातेवाईक या सगळ्यांकडून शिकण्याची तिची तयारी.

त्यामुळे तिनं घालून दिलेला ‘पेशंटकडून शिकणे’ हा परिपाठ आजही चालू आहे आणि तो आम्हाला बनचुकेपणापासून वाचवतो आहे.

“तुझ्यासाठी काय झालं असता तुझी दारू सुटेल?’ हा प्रश्न ती पेशंटला विचारायची. आजतागायत त्याला बहुधा हा प्रश्न कोणीच विचारला नसणार. ‘या बेवड्याला काय कळतं?’ ‘यानं घरात इतके तमाशे केलेत, याच्यामुळं घराची अब्रू धुळीला मिळाली, याच्यामुळं बायको मुलांना घेऊन माहेरी निघून गेली...’ वगैरे उद्गार ज्याने सतत ऐकलेले, आणि त्यात खोटं काही नाही, अशी परिस्थिती, त्या माणसाला सुनंदा हे विचारते? त्याला कळत असतं तर तो या परिस्थितीला येऊन पोहोचला असता का? पण सुनंदा म्हणायची, “त्याचे म्हणणे कदाचित चुकीचे असेल, पण ऐकू या तरी.” तिथून सुरुवात करणे, हे योग्य वाटेवरचे एक पाऊल असे. त्याने पेशंटला तिच्याविषयी विश्वास वाटू लागायचा. तिचा कुणाहीपेक्षा पेशंटवर जास्त विश्वास असे (ज्याने अनेकांच्या विश्वासाला तडा दिलेला). त्या भरघोस टाकलेल्या विश्वासाने ती पेशंटचा विश्वास मिळवायची. विश्वास टाकल्याशिवाय कसा मिळणार, हा तिचा साधा-सरळ प्रश्न होता.

एक पेशंट आठवला. बंगलोरला त्याच्या वडिलांच्या काही फॅक्टरीज होत्या. सर्व माल एक्स्पोर्ट होत असे. हा आमचा पेशंट, संदीप चित्रे म्हणू यात त्याला, त्यांच्या सर्व उद्योगांमधला पार्टनर, डायरेक्टर बोर्डावरचा डायरेक्टर होता. संदीपला दारू, ड्रग्ज सगळ्याचे व्यसन होते. त्याला भारतातल्याच काय, विदेशांतल्याही व्यसनमुक्ती केंद्रांत ट्रीटमेंट दिलेली होती. पण हा कशालाच बधला नाही. दिसायला, संस्कृतीने विदेशी. डोक्यावरचे केस असे वाढलेले, पिंजारलेले, की एखादा हिप्पीच जसा. शेवटी नाइलाजाने त्याला मुक्तांगणमध्ये आणले. आमच्या इथे स्पेशल रुम्स नाहीत, स्पेशल जेवण नाही, सगळे एकाच हॉलमध्ये...तरीही त्यांनी त्याला इथं आणलं. सुनंदासमोर बसवलं. त्याचे वडील यशस्वी, शून्यातून विश्व उभे केलेले उद्योजक. त्यांच्या बोलण्यात एक हुकमत असे, यशस्वी माणसाची. ते सुनंदाला सांगू लागले, “ही इज लाइक दॅट...त्याला तुम्ही हे सांगा, ते सांगा...” सुनंदा त्यांना थांबवत शांतपणे म्हणाली, “त्याला काय सांगायचं हे मला कळतं. तुम्हाला मी विचारेन तेव्हा तुम्ही बोला.” त्यांना हा एखादा हजार व्होल्टचा धक्काच जसा. पण एकदम गप्प झाले, आणि संदीप एकदम खूष! त्याचा सुनंदावर एकदम विश्वासच बसला. तो नंतरही इतका अढळ राहिला की बस्स. ॲडमिट झाल्यावर सगळ्यांमध्ये मिसळलाच एकदम. एवढा मोठ्यांचा मुलगा, पण सगळ्या ड्यूट्या करु लागला. सुनंदाचा तर तो लाडका मुलगाच झाला. पुढे तो बरा होऊन बंगलोरला गेला. पण तिथे त्याचे त्या आक्रमक वडलांबरोबर सतत खटके उडत राहिले. त्याचा एकदा सुनंदाला फोन आला, की ‘मला काहीही काम द्या, अगदी स्वीपरचंही, पण मला तिथे आश्रय द्या. माझं-वडलांचं अजिबात पटत नाही. हे चालू राहिलं तर मी परत ड्रग्जमध्ये जाईन.’ सुनंदाने त्याला लगेच फोन करून बोलावले. आणि तो पडेल ते काम करु लागला.

एकदा सुनंदाबरोबर मी मुक्तांगणला आलो होतो. समोरुन संदीप आला. एका हातात बादली आणि दुसऱ्या हातात खराटा. डोक्याला केसांना आवरणारी एक कापडी पट्टी गुंडाळलेली. त्या अवतारात सुनंदासमोर उभा राहून म्हणाला, “मॅडम, कसा दिसतो मी?” सुनंदाने हसून अंगठा आणि शेजारच्या बोटात गोल करून हलवून ‘छान छान’ची खूण केली. त्याने स्वतः होऊन ते काम हातीच घेतले जसे. मेंटलचे सगळेच बांधकाम टिपिकल सरकारी दर्जाचे. संडासची भांडी फुटलेली, ड्रेनेजलाइनच्या लेव्हल्स खालीवर झाल्याने ते वरच्यावर तुंबत. संदीपने ही साफसफाई हाती घेतली. त्याच्या नादाने आणखी साताठजण त्याच्या टीममध्ये सामील झाले. डोक्याला पट्ट्या गुंडाळून हातात झाडू-बादल्या घेऊन उत्साहाने कामाला निघत. संदीपने नाव दिले होते, ‘मेंटेनन्स टीम’. ड्रेनेजलाइन तुंबल्यावर खाली उतरून ब्लॉक काढावा लागे. संदीप स्वतः आत उतरत असे आणि ब्लॉक काढत असे. मला एकदा तो म्हणाला, “बाबा, मनात वेडेवाकडे विचार आले की मी झाडू-बादली घेऊन चार

संडास साफ करून टाकतो, की मन एकदम शांत होतं." तो इंग्लिशमध्ये चांगलं लिहायचा. कविताही करायचा. पुण्यातल्या इंग्लिश पेपरांमध्ये त्या छापून येऊ लागल्या. तो कमी बोलायचा, पण त्यात मॅच्युरिटी दिसायची. त्यांची टीम इकडून तिकडे जाताना दिसली, की मला वाटलं होतं, हे पाहून गांधीजींनी नक्की पाठ थोपटली असती, अगदी सगळ्यांची. पण हा आनंद त्याच्या वडलांना कळणे कठीण होते. त्यांना जेव्हा कळले की संदीप येथे 'असे' काम करतोय, तेव्हा त्यांनी त्यांच्या मॅनेजरला पाठवले. वडलांचा निरोप होता, हे काम ताबडतोब सोडून परत ये. येणार नसलास तर पार्टनरशिप, डायरेक्टरशिप, सगळ्याचा राजीनामा द्यावा लागेल. संदीपने क्षणाचाही उशीर न लावता मॅनेजरकडून त्या सगळ्या राजीनामापत्रांचा गठ्ठा घेतला, भराभर सह्या केल्या आणि म्हणाला, "नाऊ, आय ॲम ऑन माय ओन." आता माझा मी. पुढे त्याचे इथेच लग्न ठरले. त्याला आम्ही सगळे गेलो होतो. नंतर मुलगा झाला. आई-वडील येऊ-जाऊ लागले, ही सगळी पुढची गोष्ट.

जसे संदीपच्या वडलांबद्दल झाले, तसेच आणखी एकदा झाल्याचे आठवते. एक खासदार बाई त्यांच्या मुलासाठी मुक्तांगणमध्ये आल्या. पूर्वी त्यांच्या जिल्ह्यात ज्यांनी कलेक्टर म्हणून काम केले तेच आता पुण्याचेही कलेक्टर होते. त्यांना बरोबर घेऊन आल्या. स्थूल शरीर, डोक्यावरून पदर, अशा त्या होत्या. आमच्याकडचे काम करणारे धावत आले, ते आलेत हे सांगायला. सुनंदाने सांगितले, "मला भेटायला येणारे कुठं बसतात तिथे बसव." ते तिच्या खोलीबाहेरचे बाक होते. पेशंट संपल्यावर त्यांना आत घेतले. त्या बाई खूप बोलत सुटल्या. सुनंदा त्यांना थांबवत म्हणाली, "हे तुम्ही आधी सांगितलंय. नवीन सांगायचं असेल तर सांगा." त्या बाई (तसाच) धक्का बसल्यासारख्या गप्प बसल्या. कलेक्टरांकडे वळून म्हणाल्या, "आम्ही पुढारी मानसं. बोलायला लागलं की बोलतच सुटतो. पण मला अशी थांबवणारी ही बाई पहिल्यांदाच भेटली."

तो मुलगा चांगला राहायचा. पण त्या बाईंचे राजकारणातले प्रतिस्पर्धी कधी तरी संधी पाहून त्याला पाजायचे, की गावभर, अगदी यांच्या घरासमोर त्या अवस्थेत धिंगाणा घालायचा. मग त्या बाईंचा सुनंदाला फोन यायचा. असे एक-दोनदा झाल्यावर सुनंदाने त्याला तिथून दुसरीकडे स्थलांतर करायला सांगितले. त्या बाई संतापल्या. म्हणाल्या, "अहो, तो माझा राजकीय वारस आहे. असं कसं करता येईल?" सुनंदा शांतपणे म्हणाली, "तुम्हाला वारस हवा की मुलगा?" या वाक्याने सगळे बदललेच. आता तो मुलगा मुंबईला छोटा व्यवसाय चालवतो. आधीच्या मानाने परिस्थिती बेताची असली तरी तो व्यसनापासून दूर आहे. आणि आजीबाईंना नातवंडे इतकी प्रिय, की त्या पुढारीपणातून वेळ काढून खेळायला येतात. (कदाचित बाई त्यांच्यात वारस शोधत असतील!)

सुनंदा नेहमी म्हणायची, पेशंट्सना हँडल करणं सोपं आहे, अशा कटकट्या पालकांना हँडल करणं अवघड आहे. पेशंटचा तिच्यावर फारच लोभ असे. तिच्यात असे काही तरी होते की गोंधळ घालणारे पेशंटही क्षणात शांत होत. नाना पेठेतल्या दवाखान्यात अशा व्यसनींनाही तिला दाखवायला आणत. बाहेर ओट्यावर गोंधळ चाललेला. त्या पेशंटला चार-सहाजणांनी धरून आणले; पण त्या कोणालाही तो आवरत नव्हता. सगळी गर्दी दवाखान्यात घुसली. सुनंदा म्हणाली, "बाकी सगळे बाहेर जा. मी पेशंटशी बोलेन." कुणी बाहेर जायला तयार होईना. कारण संतापलेला पेशंट काहीही करु शकेल. शेवटी ते बाहेर गेले. पाच-सात मिनिटांनी सुनंदाने बाहेरच्या लोकांना खूण करून बोलावले. ते आले. पेशंट शांत बसला होता. ती म्हणाली, "याला घेऊन जा, तो ॲडमिट व्हायला तयार आहे. उद्या तिकडे घेऊन या." सगळे थक्कच्या पुढची काय अवस्था असेल तसे झाले.

ही काही गूढ शक्ती होती का? मला तसे वाटत नाही. हा फरक कशामुळे पडत असेल? तिच्या दृष्टिकोनामुळे, तिच्या वृत्तीमुळे? माणूस कितीही वाईट, आक्रमक, कसाही असो, तिची त्याच्याकडे पाहायची दृष्टी त्यानुसार बदलत नसे. पूर्वग्रह कधी आड आले नाहीत. त्या माणसामध्ये एक चांगला माणूस आहे, यावर तिचा दृढ विश्वास होता. मग तो व्यसनी असो, वेडा असो की मतिमंद. सगळ्यांमध्ये

तिला चांगली शक्यता दिसायची. तो विश्वास तिच्या नजरेतून समोरच्याला जाणवत असावा. ती कधी न्यायाधीशाच्या भूमिकेतून पाहत नसे. त्याने काय काय कृत्ये केलीत, काय घोटाळे केले, यावर त्याच्याकडे पाहायची तिची दृष्टी बदलत नसे. पेशंटविषयी वाटणारे अगत्य, वात्सल्य तिच्या डोळ्यांतून, शब्दांतून व्यक्त होत असावे. ती कधी उपदेश करीत नसे. 'दारु सोड' असे शब्द तिने कधी उच्चारले नसतील. कारण ते आधी घरच्यांनी, हितचिंतकांनी हजारदा उच्चारले असणारच. त्याचा परिणाम त्या अवस्थेत शून्यच असतो. मग ज्याचा उपयोग नाही ते कशाला म्हणायचे?

एकदा नुकताच ॲडमिट झालेला पेशंट खूप रागावलेला होता. गुरुवारी त्याची आई भेटायला आली नाही म्हणून सगळीकडे आदळआपट चालली होती. म्हणाला, "ती कोण अवचटबाई आहे तिला येऊच दे. तिला सांगून निघूनच जातो. कोण मला अडवतो ते मी पाहतो!"

तेवढ्यात सुनंदाची गाडी आली. आमच्या घरासमोर बुचाच्या फुलांचा सडा पडतो. त्यातली थोडी ताजी फुले उचलून ती गाडीत बसायची. उतरली तेव्हा तिच्या हातात ती फुले होती. हा रागावलेला पेशंट एकदम पुढे आला. सुनंदा त्याच्याकडे बघून हसली आणि हातातली फुलं त्याला देण्यासाठी तिनं पुढं धरली. तो सर्दच झाला. सगळा राग कुठल्या कुठं पळून गेला. तो नंतर इतरांना म्हणाला, "माझी आई नाही आली तर नाही आली, इथं मला एक आई मिळालीय!" त्यानंतर बदललाच तो पूर्णपणे. सगळ्या थेरपींमध्ये भाग घ्यायचा. घरचे भेटायला यायचे, तर त्यांना खरं वाटायचं नाही, की हा आपलाच माणूस आहे की दुसरा. असे प्रसंग मुक्तांगणमध्ये नेहमीच घडत. मी नेहमी म्हणायचो, चमत्कार मुक्तांगणमधली रोजची घटना आहे. कोणी विचारत असे, "रोज घडेल त्याला चमत्कार कसे म्हणाल?" मी सांगायचो, "त्या कुटुंबाच्या जीवनात, अनेक वर्षांनी अगदी अनपेक्षित घडतो, म्हणून."

त्या काळात 'अल्कोहोलिक ॲनॉनिमस'च्या मीटिंगला आम्ही अधूनमधून जाऊ लागलो. जगभरात हजारो ठिकाणी त्यांच्या मीटिंगा चालतात. ए.ए.चे लोकही बोलताना म्हणायचे, 'मी अमक्या ठिकाणची मीटिंग करतो.' 'करणे' या शब्दाची गंमत वाटायची. या मीटिंग करण्यामागे एक गोष्ट आहे. अमेरिकेत बॉब आणि डॉ. बिल दोघं दारुडे भेटले. त्यातला एक तात्पुरता दारूपासून दूर होता. आपापले अनुभव सांगता सांगता (ए.ए.च्या परिभाषेत 'शेअर' करताना) ती संध्याकाळ कधी उलटून गेली हे त्यांना कळलेच नाही. आणि ती खूप काळानंतर, वर्षांनंतर पहिलीच संध्याकाळ होती, जेव्हा त्यांनी दारु घेतली नव्हती. "उद्याही जमू यात का असेच?" "जमू यात की" आणि त्यांना दारुशिवाय संध्याकाळी मिळू लागल्या. त्यांना आणखी काही दारुडे येऊन मिळाले. तेही 'सोबर' (व्यसनमुक्त) राहू लागले. त्यातनं एए सुरु झाली.

त्यांच्या आवडणाऱ्या स्लोगन्स होत्या. त्यातली एक मला फार आवडायची. 'वन डे ॲट अ टाइम' (फक्त आजचा दिवस) या एका वाक्याने किती व्यसनी लोकांची आयुष्ये बदलली असतील! काल होऊन गेलेला. भूतकाळ आपण बदलू शकत नाही. भविष्यकाळ आपल्या हातात नाही. आपल्या हातात आहे 'आज'. फक्त आजचा दिवस. त्यातही आत्ताचा क्षण. हा मंत्र आम्ही उचलला आणि वापरला, वापरत आलेलो आहोत. भूतकाळ आठवला तर केलेल्या कृत्यांचा पश्चात्ताप होतो. गमावलेल्या संधी, आयुष्य आठवले की मनस्ताप होतो. आणि याचे पर्यवसान परत व्यसनाकडे वळणे, हेच. त्यामुळे भूतकाळाचे ओझे उतरवले की आमच्या या मित्राचे निम्मे ओझे कमी होते. आता दारु सोडली तर आयुष्यभर दारुशिवाय कसे राहू शकू, याचे भय मनाचा ताबा घेते. शिवाय व्यसनाच्या काळात केलेले कर्ज कसे फेडणार, माहेरी निघून गेलेली बायको परत येईल का, त्या काळात केलेल्या गुन्ह्यांचे खटले...अशा अनंत काळज्या मनाला पोखरत असतात, की परत याचा शेवट म्हणजे पिण्याकडे वळणे. तेव्हा भविष्यकाळाची काळजी करु नका, कारण तो आपल्या हातात नाही. म्हणून हा 'फक्त आजचा दिवस'. आज सकाळी उठल्यावर ठरवायचे, आज मी दारु पिणार

नाही. रात्री झोपताना म्हणायचे, चला, एक दिवस पदरात पडला. हवे तर त्यासाठी देवाचे आभार माना. आपल्याला मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना.

असे जे करत राहतात त्यांची वर्षे कशी पुरी होतात ते त्यांनाही कळत नाही. मंत्र हा लहानच असावा, तसा आहे. पण तो चपखल हवा. 'सहना भवतु' हा किती सोपा मंत्र! पण आपल्या संस्कृतीचा जसा गाभाच बनला आहे. तसाच हा 'फक्त आजचा दिवस' यातला 'फक्त' शब्द किती अर्थवाही आहे! तो या मित्राला सांगतो, मित्रा, जास्त नाही, 'फक्त' आजचा दिवस. म्हणून मला इंग्लिशमधल्या 'वन डे ॲट अ टाइम'पेक्षा हा आवडतो. त्यात फक्त या शब्दाने मैत्रीपूर्ण आधार दिलाय.

या मंत्राचा आम्हा दोघांवरही विलक्षण परिणाम झाला. मी मुक्तांगणसाठी जी गाणी, प्रार्थना लिहिल्या, त्यात लिहिले,

उजाडे दिवस, नाही घोट मी घेणार
मिळे एक दिन, मानी सर्वांचे आभार

यशोला त्याच सुमारास फिट येणे (एपिलेप्सी) हा त्रास सुरु झाला. काही काळ रोज, तर कधी दिवसातनं ५-६ वेळाही त्रास व्हायचा. ती म्हणायची, "त्रास होणं, न होणं माझ्या हातात नाही, पण दोन फिटमधला काळ माझ्या हातात आहे. तो मी कारणी लावीन." किती लहान वय आणि किती शहाणपण! सुनंदाला कॅन्सरचे निदान झाल्यावर ती म्हणायची, "मी 'फक्त आजचा दिवस' हा मंत्र आता जगते आहे." तिला तिच्या डॉक्टरांनी कितीदा सांगितले, "तू आता तुझ्या ॲक्टिव्हिटीज कमी कर. ते मुक्तांगण, नुकतीच सुरुवात झालीय ना, ते बंद करून टाक. फॉरेन ट्रिपला जा." वगैरे. पण सुनंदाने जराही ऐकलं नाही. ती म्हणायची, "मी खूप जगणार आहे आणि खूप काम करणार आहे." आणि तसेच तिने केले. मला म्हणायची, "आत्ताचा क्षण आपला. तो आपण काम करण्यात घालवू आणि एंजॉयही करू."

हा मंत्र मला गीतेतल्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणांसारखा वाटायचा. गीताईमधल्या त्या ओळी आठवायच्या. 'कृष्णा सांग कसा बोले, कसा राही, फिरे कसा?' या अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे आमची ही 'फक्त आजचा दिवस' या मंत्राप्रमाणे जगणारी मुलं.

आणखीही ए.ए.ने दिलेले, स्वीकारलेले मंत्र आवडायचे. चीनमधला तत्त्वज्ञ कन्फ्युशिअसचं एक वाक्य त्यांच्या सभास्थानी लावलेलं असायचं, धिस टू शाल पास...(This too shall pass). याचं त्यांनी मराठीत केलं होतं, 'हेही दिवस जातील'. (या मंत्राच्या बाबतीत मला इंग्रजी मंत्र जास्त आवडायचा.) तू कितीही दुःखात असलास, अगदी रसातळाला गेला असलास, तरी लक्षात ठेव, हेही दिवस जातील. या वाक्यानं केवढा आधार मिळतो! आणि ज्या वेळी सुखात असतो, पैसा भरपूर असतो, त्या वेळी जर मस्ती आली तर हा मंत्र सांगतो, जास्त मस्ती करू नको, हेही दिवस जाऊ शकतात. 'धिस टू शॅल'मधला हा 'शॅल' हा शब्द कठोर भविष्यवाणी उच्चारतो, ते मला खूप अर्थपूर्ण वाटायचं.

तसाच एएचा हॉल्ट (HALT) प्रोग्रॅम. एच म्हणजे हंगर- भूक, ए म्हणजे अँगर-राग, एल म्हणजे लोन्लीनेस- एकटेपणा, आणि चौथे टी म्हणजे टायर्डनेस- थकवा. या चार गोष्टी परत व्यसनाकडे नेऊ शकतात. त्या टाळल्या तर वाचाल. मी गीतात लिहिलं होतं-

आवरी रागाला, कधी राही न भुकेला
दमू नको जास्त, कधी राही न अकेला...

हे दारूकडे नेणारे सिग्नल्स आहेत, आणि हे ज्ञान हजारो एए मेंबर्सच्या अनुभवातून आलेलं आहे. आम्ही अनुभवातून त्यात आणखीही काही धोक्याच्या सिग्नल्सची भर घातली. त्यातला एक

म्हणजे खिशात जास्त पैसे न ठेवणे. अगदी जरुरीपुरते असले तर चालतील. त्याचा पहिला अनुभव आठवतोय. एक पेशंट बरा होऊन घरी गेला. नोकरी नव्हती. रिकामा वेळ खायला उठतो. मग दारूचे विचार मनात येतात. म्हणून आम्ही अशा पेशंटसाठी डे-केअर सेंटर सुरू केलं होतं. त्यांनी सकाळी ९ ते दुपारी ५ एवढा वेळ मुक्तांगणमध्ये यायचं. तिथली पडेल ती कामं करायची. तसा तो मित्र येणार होता. वडील त्याला स्कूटरवरून सोडायला आले होते. आतपर्यंत येण्याऐवजी त्यांनी याला मेंटलच्या गेटपाशी सोडलं. मुक्तांगणचे १८० रु. भरायचे राहिले होते, ते त्याला दिले आणि अकाउंटमध्ये भरायला सांगितले आणि ते निघून गेले.

तो नंतर ती हकीगत सांगत होता. "मी तसाच उभा राहिलो. खिशात १८० रुपये होते. आता आपण मोकळे आहोत. अडवायला कोणी नाही. पिऊ या का थोडी? अंगाला घाम फुटला. मला काही कळेनासे झाले. तसाच उभा." एक मुक्तांगणमधला मित्र तिथून जात होता. त्याने याची अवस्था पाहिली. त्याला हलवून जागे केले. तिथे चहाची टपरी आहे. तिथल्या बाकड्यावर बसवलं, चहा पाजला, तेव्हा तो भानावर आला. मग त्याला घेऊन हा मुक्तांगणमध्ये आला. सगळ्यांना ही हकीगत कळली. सगळ्यांनी त्याचे अभिनंदन केले. त्याने बाहेरच्या जगाच्या दृष्टीने काय असा पराक्रम केला होता? पण त्याच्या दृष्टीने ती केवढी तरी मोठी घटना होती! तो जर प्याला असता तर ते चक्र सुरु झाले असते. कदाचित तो मुक्तांगणमध्ये ॲडमिट व्हायला आलाही नसता. कदाचित पिऊन पिऊन या जगातून गेलाही असता. तो तिकडे न जाता उभा राहिला, हा चमत्कार.

पैसे खिशात ठेवण्याची आणखी एक आठवण आहे. मनोहर नावाचा आमचा मित्र. सुनंदाचा मेंटलमधला सहकारी. पुढे तो बरा झाला. एएमध्ये चांगले काम करूही लागला. तो पेशंटना अनुभव सांगायचा. याचे रात्रंदिवस पिणे चालू होते. त्याच्या मुलीचा वाढदिवस आला. त्याची बायको म्हणाली, "कृपा करून निदान त्या दिवशी तरी पिऊ नका." त्या दिवशी तो उशिरा उठला. त्याच्या बायकोने त्याच्याकडे पैसे आणि पिशवी दिली. संध्याकाळी मुलीच्या मैत्रिणी येणार होत्या. त्यांच्यासाठी पदार्थ करायचा, त्या सामानाची यादी दिली. हा सायकलवर निघाला. सायकल मारत थोडा दूर, बंडगार्डन पुलापाशी आला आणि विचार बदलायला सुरुवात झाली. थोडी घेतली तर? पण बायकोला आपण आज पिणार नाही हे प्रॉमिस केलंय. तोवर स्टेशन जवळ यायला लागलं. मग विचार सुरू झाला, पण आज कधी सुरू होतो? दुपारी बारापासून. मग आपण आत्ता प्यायला काय हरकत आहे? एव्हाना तो स्टेशनसमोरच्या 'सम्राट' नावाच्या गुत्त्यात शिरला होता आणि त्याने प्यायला सुरुवातही केली होती.

तो पोहोचला घरी ते थेट दुसऱ्या दिवशी सकाळी. मनोहर म्हणायचा, "मी आजवर बायकोला विचारायचं धाडस करू शकलो नाही, की त्या वाढदिवसाच्या संध्याकाळी काय झालं?"

हे दारूचं तीव्र आकर्षण (क्रेविंग) आपण समजूच शकत नाही. ते कसं चोरपावलांनी येतं आणि पाहता पाहता कसा कब्जा करतं ते. एकदा घरी प्रसाद आला होता. तो ड्रग ॲडिक्ट. बरा होऊन आमच्याकडेच काम करणारा. आम्ही आमच्या गॅलरीत उभे होतो. ढग दाटून आले होते. पहिला पाऊस पडायचा होता. लांब कुठे तरी पाऊस पडतही असावा, कारण मातीचा सुवास झुळकीबरोबर येत होता. थंड झुळूक अंगावर येत होती. मी प्रसादला म्हटलं, "किती छान हवा पडलीय नाही?" प्रसाद म्हणाला, "पण बाबा, ही हवा आमच्या मनात खळबळ करते. मन इकडे-तिकडे धावायला लागतं. स्वतःला प्रयत्न करून सावरायला लागतं. कारण अशाच हवेत पूर्वी आम्ही अनेकदा प्यालेलो असतो."

मला आश्चर्य वाटले, आणि वाईटही. आपण जी गोष्ट रास्त समजून त्याचा आनंद घेतो ती यांच्यासाठी धोकादायक ठरावी? एक असाच मित्र पावसाळ्यात ट्रेनने नाशिकला चाललेला. इगतपुरी स्टेशन येईपर्यंत तो अगदी नॉर्मल होता. गाडी तिथं थांबली, आणि मनात विचार आला,

घेऊ या का? कारण पूर्वी पिण्याच्या काळात इथं खाली उतरुन स्टेशनबाहेरच्या दुकानातून तो बियर आणून प्यायचा. त्या विचाराने त्याला आता घेरले. त्याला तिकडे जायचे नव्हते, पण शरीर त्याला ओढत होते. त्याने खालचा बाक घट्ट धरुन ठेवला, आणि त्याला कळेनासे झाले. तेवढ्यात गाडी हलली आणि हा वाचला. शेजारच्या माणसाला कळलंही नसेल की इथं काय घडलंय ते.

ही उदाहरणं आम्हा सर्वांना खूप शिकवत होती. हे तीव्र आकर्षण ऊर्फ ऑब्सेशन पहिल्यांदाच पाहत होतो. त्याआधी आम्हाला आणि त्याच्या घरच्यांना आश्चर्य वाटायचं, की येवढं दारुपायी नुकसान होऊनही, अनेकदा सोडायच्या शपथा घेऊनही, त्याने कित्येकदा तसा खराखुरा निश्चय केला असूनही तो परत प्यायला का जातो? आणखी काय वाईट व्हायचं राह्यलंय, इतकी सगळी धूळधाण होऊनही तो परत परत तिकडे का जातो? मग ही आजारी माणसं आहेत का? हो, ऑब्सेशन, तीव्र आकर्षण हाच त्यांचा आजार. मग त्यांच्याकडे पाहायची दृष्टीच बदलून गेली. आमच्याकडून चांगला होऊन उत्साहाने घरी गेलेला एखादा मित्र परत अतिशय वाईट अवस्थेत उभा राहायचा, तर पूर्वी राग, वैताग यायचा. पण आता त्यांच्याकडे एक चक्रात सापडलेला दुःखी माणूस म्हणून पाहू लागलो. घरच्यांना राग आवरण्यासाठी किंवा निराशेतून वर काढण्यासाठी आम्हाला प्रयत्न करावा लागे. त्यांना जेव्हा या आजाराचे स्वरुप सांगायचो, तेव्हा ते म्हणायचे, त्याला काय धाड भरलीय? खातोय, पितोय, बायकोवर हात टाकतोय. आम्ही आईबाप... आम्हालाही शिवीगाळ करतोय. हा कसला आजारी? खरे आजारी आम्हीच आहोत.

तेही खरेच होते. ते सगळे घरच आजारी पडलेले असते. त्यांनाही मदतीची गरज असतेच. त्यामुळे मग मुक्तांगणमध्ये फॅमिली काउन्सेलिंग सुरु झाले. कुटुंबाचा उपचारांमध्ये सहभागही सुरु झाला. व्यसनी मित्राचे व्यसन हा फक्त त्याचा नव्हे, तर कुटुंबाचा प्रश्न म्हणून आम्ही सगळे त्याच्याकडे पाहू लागलो.

तर ए. ए.विषयी चालले होते. त्यांच्या 'हॉल्ट' प्रोग्रॅमविषयी. आम्ही त्यात आणखी गोष्टींची भर घातली. पेशंटच्या खिशात गरजेपेक्षा जास्त पैसा ठेवणं हाही धोक्याचा सिग्नल आहे असं आम्ही मानलं. पैशावरुन आठवलं, एक शिरीष कोलगावकर म्हणून पेशंट होता. मध्यम वयाचा, सोनेरी काड्यांचा चष्मा, रुबाबदार. मला पहिल्यांदा वाटलं, तो त्याच्या मुलाला अ‍ॅडमिट करायला आलाय. पण पाहतो तर तोच पेशंट. कंपनीत मोठ्या पदावर. हाताखाली शंभर माणसे. बरा झाला की काही दिवसांत त्याची बायको त्याला घेऊन यायची. काही दिवसांनी येताना अत्यंत वाईट अवस्थेत, चेहरा लपवीत, मान खाली घालून तो यायचा. परत जाताना ताजातवाना, उत्साही, इतरांना मदत करणारा. अतिशय सुस्वभावी. पण बाहेर गेल्यावर काय व्हायचे ते त्यालाही कळत नसे, आणि आम्हालाही. मग त्याची बदली पुण्याला करुन घ्यायचं सुनंदाने ठरवलं. सुदैवाने ती कंपनी पुण्यातही होती. आम्ही त्याच्या गावी जाऊन त्याच्या बॉसना भेटलो. सगळ्यांचा तो आवडता. पण या त्याच्या प्रश्नाने सगळे चिंतित. त्यांनी आनंदाने त्याची बदली करुन दिली. मग मुक्तांगणमध्ये 'आफ्टर केअर सेंटर'मध्ये त्याने राहायचे आणि तिथून बसने ऑफिसात जायचे. मागे तो स्कूटर वापरायचा, नशेमध्ये त्याने अपघातही करुन घेतला, म्हणून ही दक्षता. सुनंदाची शिस्त म्हणजे शिस्त. त्याला रोज अकाउंट ऑफिसातून दहा रुपये मिळायचे. चार रुपये जायचं आणि चार रुपये यायचं तिकीट आणि दोन रुपये चहाला. येवढंच नाही, तर आदल्या दिवशीची तिकिटे कागदाला पिन करुन सबमिट करायची, तेव्हा त्या दिवशीचे दहा-बारा रुपये मिळणार. ज्याला कित्येक हजार रुपये पगार, हाताखाली सगळं ऑफिस तरी त्याला ही शिस्त. त्यातही सुनंदाने एकदा भलत्याच तारखेची तिकिटे लावलेली 'झोलझाल' उघडकीला आणली होती. शिरीषने असं वर्षभर व्यसनापासून दूर राहणं पुरं केलं. त्याची बायको त्याला घ्यायला आली. लग्न झाल्यापासून पहिल्यांदाच इतका काळ तो सोबर राहिला होता.

एएची प्रार्थना मला आवडायची. कुठल्या तरी संताने लिहिलेली होती. ती मुळातली इंग्रजी आहे. सातार्‍याच्या देवदत्त दाभोलकरांनी त्याचे सुरेख काव्यमय भाषांतर करून दिले. ती प्रार्थना मुक्तांगणमध्ये रोज म्हटली जाते.

जे टाळणे अशक्य
दे शक्ती ते सहाया
जे शक्य साध्य आहे
निर्धार दे कराया।
मज काय शक्य आहे
आहे अशक्य काय
माझे मला कळाया
दे बुद्धि देवराया॥

यातला 'देवराया' शब्द त्यांनी असा काही वापरलाय, की त्याने त्या प्रार्थनेला थेट आपल्या संस्कृतीत आणून ठेवलंय. मुक्तांगणमध्ये अलीकडे अन्यप्रांतीय मित्र वाढलेले आहेत. मी त्यामुळे त्याचं हिंदी रुपांतर केलंय.

नहीं कर सकता आज कभी जो
सहने की दे हिम्मत रे।
कर सकता हूँ मुमकिन है जो
करने की दे ताकद रे॥
कर क्या सकता, नामुमकिन क्या
कैसे सुलझे उलझन रे।
फर्क मुझे जो नहीं समझता
कर दे मुझे सयाना रे॥

मला देवाच्या अस्तित्वाचा अनुभव नाही. तेव्हा माझ्यापुढे सुरुवातीला अडचण आली होती. पण एएनेच ती सोडवली.

"तुमचा देवावर विश्वास नसेल तर तुम्ही कुठल्या तरी 'हायर पॉवर'वर विश्वास ठेवा. हा एएचा ग्रुप असेल, हा मीटिंग हॉल असेल..."

"मुक्तांगण?"

"हो, जरुर. मुक्तांगणला हायर पॉवर मानू शकता." मग हायर पॉवर या शब्दाचाही विचार केला. समूहाचं शहाणपण...हे मला मान्य झालं. निदान आमच्या मित्रांच्या बरे होण्यात जर उपयोग होत असेल तर काय हरकत आहे? जे अशक्य वाटेल त्याला स्वीकारायचं. जसं सुनंदाने कॅन्सरला स्वीकारलं होतं, यशोने एपिलेप्सीला. नसीमा हुरजुकांनी अपंगतेला, माझे ओरिगामी गुरु साबुरो कासे यांनी अंधपणाला...पण जे शक्य असेल ते ताकद लावून करायचं, जसं हे सर्व लोक करत होते. पण काय शक्य आणि काय अशक्य हे समजायचं कसं? ते देवापाशी, समूहापाशी हे ज्ञान मागायचं. माझ्या बाबतीत मी कुठे मागणार? मी माझ्या आतल्या, आतल्या, खोल, शुद्ध नैसर्गिक अंतर्मनाला विचारावे? तिथून जो कौल येईल, ते माझं मार्गदर्शक, ती माझी हायर पॉवर.

सुनंदा गेल्यावर मी जगलो, तगलो तो या अंतर्मनावरच. चार दिवस डोळ्यांतून पाणी वाहत राहिलं. आणि मग आतून आलं, सुनंदाच्या मुक्तांगणमधल्या टेबलाशी बसलो आणि ठरवलं, आता तिच्यावरच्या प्रेमाची एकच अभिव्यक्ती... मुक्तांगण चालवणं. त्या क्षणी दुःखाचे कढ शांत झाले आणि लागलोच कामाला.

या रस्त्यानं जात राहिलं, की हळूहळू अशक्य वर्गात घातलेल्या काही बाबी हळूच शक्य कोटीत येऊन बसतात. म्हणजे शक्य आणि अशक्य यामध्येसुद्धा ये-जा होऊ शकते. वाःवाः! मग जमलेच गड्या! आता येऊ देत संकटे. माझ्याकडे रस्ता तयार आहे. मला वाटले होते, मी सुनंदाच्या जाण्याशी जुळवून घेतलं आहे. पण तीन-चार महिन्यांनीच अपरात्री उठून बसलो. विचारांचं काहूर उठलं. आता मी एकटा आहे. आयुष्याच्या मध्यावर माझी प्रिय पत्नी, मैत्रीण, गुरु...सोडून गेली. उरलेलं आयुष्य कसं रेटणार? तिथंही अंतर्मन धावून आलं. उठून बाहेरच्या खोलीत जाऊन बसलो. माझ्या प्रिय माणसांच्या मनातल्या मनात याद्या केल्या. मी कुठे आहे एकटा, या विचाराने मन व्यापून गेलं. आणि हिंमतच आली.

तेव्हापासून मुक्तांगणमध्ये मित्रांना मी हा अनुभव सांगत आलोय. नको त्या विचाराला दडपून टाकून चालत नाही, तर योग्य विचाराने त्याच्याशी सामना करुन त्याला हाकलून लावावे लागते. आपण चुकीचा विचार येऊ दिला, तर तो वाढून जास्त ताकदवान होतो, आपण त्याच्यापुढे हतबल होतो. तेव्हा तो विचार आल्या आल्या त्याला फटका बसला पाहिजे. तसंच दारुचा विचार मनात आल्या आल्या त्याला सांगायचं, मित्रा, तुझ्यामागे मी आजवर आलो. माझं खूप नुकसान झालंय. (किती, कुठलं नुकसान ते अशा वेळी आठवून पाहायचं, त्याच्या याद्या करायच्या.) आता मी तुझ्यामागे येणार नाही. तू आला तसा जा कसा.

मित्रांना हे खूप आवडायचं. आजवर ते असा विचार आला की दडपून टाकायचे. असा विचार आलाच कसा, म्हणून अपराधी भाव मनात यायचा. तो तर धोकादायकच. पण इथं मी सांगत होतो, त्याला दडपून टाकू नका. सामोरे जा, पण आहारी जाऊ नका. योग्य विचारांनी सामना करा. अशी वाक्ये, प्रसंग, युक्त्या, मंत्र आम्ही किती 'परस्परांनी दिले- घेतले' याची गणतीच नाही. हा प्रसंग वानगीदाखल.

तर एएविषयी सांगत होतो. त्यांच्या अनुभवाने, तंत्राने मुक्तांगणला बेस दिला हे खरेच आहे. पण मुक्तांगण म्हणजे फक्त एए प्रोग्रॅम नाही. जे जे योग्य वाटेल त्याचा स्वीकार करीत गेलो. आनंद नाडकर्णीने आर.ई.बी.टी.चे तंत्र आणले. तेही आम्ही स्वीकारले. अल्बर्ट एलिस नावाच्या माणसाने ते मांडलंय. म्हणजे समजा, एखादा पेशंट म्हणाला, 'त्याचं माझं भांडण झालं, माझं डोकं मग सटकलं, की मग लगेच प्यायला गेलो.' म्हणजे भांडण आणि पिणे म्हणजे कारण आणि परिणाम. तसंच असायचं कारण नाही. त्या दोघांमध्ये आपण असतो. आणि तो परिणाम बदलू शकतो. भांडण झाल्यावर शांत बसू शकतो. विचार करु शकतो. कुणाची मदत घेऊ शकतो. पुढच्या वेळी भांडण टळेलच हे बघू शकतो. असं थोडक्यात मला समजलेलं. आम्ही दोघांतलं चांगलं घेऊ शकलो. आपल्या परंपरेतले संत, मोठी माणसं यांचीही उदाहरणं देऊ लागलो. त्यातून मुक्तांगणचा प्रवाह तयार झाला. विरोध सोडून द्यायचा, पूरक असेल तेवढे घ्यायचे. त्यामुळे आमचे कुणाशी भांडण नाही, की आम्ही आमचाच मार्ग खरा, असंही म्हणत नाही. काही करा पण व्यसनापासून दूर व्हा, हा उद्देश. या सगळ्यात आम्हाला आलेले अनुभव या सगळ्या प्रवाहात आणून सोडत होतोच. शिवाय आपापल्या वैयक्तिक जीवनातले अनुभवही.

■

३

मी बोलता बोलता माझं व्यक्तिगत जीवनही सांगत बसलो. पण ते साहजिकच नाही का? आपण कधी स्वतःवर प्रयोग करतो ते अनुभव कामात कामाला येतात, तर कामातले आपल्या खासगी आयुष्यात. अनुभव हा निखळ अनुभव असतो. तो कुठेही लावून, ताडून पाहता येतो. माझं, सुनंदाचं, येवढंच काय, बऱ्याच प्रमाणात मुलींचंही जीवन मुक्तांगणमध्ये बेमालूम मिसळलं होतं. इतक्या शेकडो, हजारोंचे जीवनप्रवाह आमच्यासमोर वाहत होते- त्यात आम्ही 'वॉटरप्रूफ' अजिबात नाही. एवढं आतून जीवनदर्शन झाल्यावर कोण बदलणार नाही? कधी घाबरुन जावं असं विश्वरुप दर्शन, तर कधी मनावर मायेचे लेप चढावेत असं. घराघरांतली विस्कटलेली नाती पाहून मन सुन्न व्हायचं, पण एखाद्या मुलीनं सावरलेलं घर पाहून ते उल्हसितही व्हायचं. सगळ्यांकडून आम्ही सगळेच शिकत राहिलो. हे जीवनाचे धडे मिळाले नाहीत असा दिवसही जात नसेल. लढाई हरलेल्या पेशंट मित्रांकडून, तर हिम्मत धरणाऱ्या घरच्या सगळ्यांकडून... शिकतच होतो, आणि आहोतही. माणसं अगदी मुळापासून बदलताना आम्ही पाहत होतो. तोवर 'स्वभावाला औषध नाही' या म्हणीवर विश्वास होता. पण हे सगळं पाहताना आमचे मित्र ती म्हणही खोटी ठरवत होते. दत्ता श्रीखंडेचं उदाहरण बऱ्याचजणांना माहीत असेल. त्याने 'सकाळ'मधे अनुभव लिहिलेत. टीव्हीवरही तो आलाय. आहेच त्याचं जीवन वेगळं, विलक्षण.

दत्ता अंबरनाथचा. तो रिक्षा चालवायचा. त्याला ड्रग्जचं व्यसन लागलं. ड्रग म्हणजे ब्राऊन शुगरचं. ते व्यसन खूप महाग होतं. त्याची पूर्तता करता करता तो थकून गेला. तिथला एक ग्रुप ट्रेनमधे पाकीटमारी करत होता. त्यातला एकजण म्हणाला, "तू आमच्याबरोबर चल. नुसता उभा रहा, काही करु नको. तुला तुझा वाटा मिळेल." तसा तो जाऊ लागला. त्याच्या व्यसनाचा खर्च त्यातून निघू लागला. असेच काही दिवस गेले. याचा ब्राऊन शुगरचा डोस वाढला होता. त्या पैशातही भागेनासे झाले. ह्याने ती कला पाहून ठेवली होतीच. विचार केला, आपण सेपरेट धंदा करु, म्हणजे जे मिळतील ते आपल्यालाच. तसा स्वतंत्रपणे पिकपॉकेटिंग करायचा. काही वेळा पकडला गेला. मग केसेस झाल्या. तडीपार झाला. प्रत्येक स्टेशनवर पाकीटमारांचे, गुन्हेगारांचे फोटो लावतात तसे याचेही फोटो सगळीकडे लागलेले. घरातून एव्हाना तो रस्त्यावरच आलेला. जेलच्या वाऱ्या चालू. महाराष्ट्रातलं एकही जेल राहिलं नाही की जिथं दत्ता नव्हता.

असाच तो येरवडा जेलमधे होता. तेव्हा त्याने मुक्तांगणविषयी पेपरात वाचले. त्याने सुनंदाला एक पोस्टकार्ड टाकले. मी असा असा बंदी आहे, मला व्यसन सोडायचंय, काय करु, असं त्या पत्रात लिहिलेलं. सुनंदाने त्याला लिहिलं, तू सुटल्या सुटल्या इकडे ये. तसा तो आला. राहिला. बरा झाल्यावर सुनंदाने त्याला अंबरनाथला पाठवले. त्या स्टेशनवर उतरल्या उतरल्या पोलिसाने हटकले-

"काय रे, धंदा करत नाहीस?"

"नाही साहेब. मी आता सुधारलोय. धंदा सोडलाय."

"तू धंदा सोडला, पण मग आमचं काय होणार? चल, परत मुकाट्याने धंद्याला लाग आणि हप्ता सुरु कर. नाही तर टाकतो तुला आत"

दत्ताजवळ सुदैवाने सुनंदाने दिलेले पत्र होते म्हणून तो सहीसलामत मुक्तांगणला परत आला. परत जायचंच नाही म्हणाला. मग सुनंदा म्हणाली, "रहा इथंच. किचनमधे काम कर." तसा तो

मुक्तांगणमधे राहून तिथंच काम करु लागला.

इथंच ती हकीगत एरवी संपायची. पण तिथून खरी सुरु झाली, म्हणायचे. सुनंदाने त्याला पुस्तके वाच असे सुचवले. त्याने पहिलेच पुस्तक वाचले ते माझे 'स्वत:विषयी'. माझी सगळी पुस्तके त्या झपाट्यात वाचली. किचनमधे मदत करता करता तो सर्व स्वयंपाक शिकला, करु लागला. तो आता आमचा स्टाफ मेंबर झाला होता. एक वर्षानंतर सुनंदा म्हणाली, "तू आता बाहेर खोली घेऊन राहिलास तरी चालेल." विश्रांतवाडी भागात आमचे असे बरे झालेले पेशंट खोल्या घेऊन राहतात. एकाला खोली खाली करायची होती. ती याला दिली. तिथे तो राहू लागला, तरी व्यसनाकडे परत वळला नाही.

तीन-चार वर्षांनंतर सुनंदाने विचार केला, आता याचे लग्नाचे पाहायला हरकत नाही. मग मुलींचा शोध सुरु झाला. याला कोण मुलगी देणार? याचा गुन्हेगारीचा, व्यसनाचा इतिहास असताना? कर्वे रोडवरच्या महिला सेवाग्राममधे सुनंदा अधूनमधून काम करायची. तिनं तिकडली एक मुलगी पाहिली. तिचं नाव राधा. सावळी, बारकुडी होती- आणि चुणचुणीत होती. तिला याची पार्श्वभूमी सांगितली. तिला आई-वडील नव्हते, पण गावात तिची एक आज्जी होती. तिची परवानगी घेतली आणि त्यांचे लग्न मुक्तांगणमधे लागले. मुक्तांगणमध्ये यापूर्वीही लग्ने लागली होती. फुलांची सजावट करणारा बरा झालेला आमचा एक पेशंट मित्र होता. तो येऊन फुलांनी-पानांनी सगळा हॉल सजवायचा. मुंबईला आमचा असाच एक 'गुरुजी' पेशंट होता. तो हौसेने त्याचे पोट सावरत पुण्याला येऊन यथासांग लग्न लावायचा. त्याला गुरुजी वेषात पाहून गम्मत वाटायची. कारण तो ॲडमिट असताना सर्वांबरोबर पोट सावरत नाचायचा. मग पंक्ती बसायच्या. एक जुना पेशंट- जो बाहेर उत्तम 'शेफ' होता, तो येऊन स्वयंपाक हातात घ्यायचा आणि त्याची खास डिश बनवायचा.

हे सगळे दत्ताच्या वेळेसही झाले. राधाचे आईबाप आम्हीच झालेलो. दत्ताचे नातेवाईक तिकडून आले होते. आमच्याकडच्या या भरुन वाहणाऱ्या उत्साहाकडे ते स्तिमित होऊन पाहत होते.

पुढे दत्ताला-राधाला दोन मुलं झाली. त्यांची बारशी मुक्तांगणमधेच झाली. अगदी पाळणा फुलांनी, फुग्यांनी सजवून. आमच्या दुसऱ्या पेशंटच्या बायकांनी पाळणे म्हटलेही. पहिल्या मुलीचं नाव सुनंदाने ठेवलं, परीस. दुसरा झाला तेव्हा सुनंदा नव्हती. ते नाव मी ठेवलं, मानस. त्यांना जागेचा सतत त्रास होता. मालक भाडं वाढवून मागायचे, नाही तर 'जागा सोड' म्हणायचे. मग त्याने विमानतळाच्या रस्त्यावर एका वस्तीतली जागा बघितली. बँकेचे कर्ज काढले. त्याला मी आणि माझा मित्र विदूर जामीन राहिलो, आणि ते घरही झाले.

दत्ता-राधा उद्योगी खूप. दत्ता संध्याकाळी विश्रांतवाडीला पथारी पसरुन लहान मुलांचे तयार कपडे विकायचा. राधाने भाजीची गाडी चालवली. अधूनमधून बाहेरची जेवणाची कंत्राटे घेत असतो. आता त्या दोघांना तशी इतकं काम करायची गरज उरली नाही. मला दत्ताचे फार आश्चर्य वाटते. दत्ताचे पूर्वायुष्य गुन्ह्यांनी भरलेले, तुरुंगात गेलेले; पण आज त्याच्याइतका निखळ प्रामाणिक माणूस सापडणे कठीण आहे. मुक्तांगणमधले माझे सहकारी सगळेच प्रामाणिक आहेत, पण दत्ताची झळाळी काही औरच. असे कितीक दत्ता गुन्हेगारीत अडकले असतील, जेलमधे सडत असतील. सगळ्यांना जर असा मदतीचा हात मिळाला तर तेही दत्ता-राधासारखे उपयोगी जीवन जगू शकतील.

गुन्हेगारीतून आमच्याकडे आलेल्या या पेशंटचा वर्गच आहे. त्यांच्यात काही तरी वेगळं असतं. ते सहसा कुणावर विश्वास ठेवायला तयार नसतात. आमच्या इथं आल्यावर असा काही धोका नसतो, तरी त्यांचा तो स्वभाव उतरायला वेळ लागतो. सिद्धू असाच ड्रग ॲडिक्ट, आणि पाकीटमार. त्याने मला पाकिट मारायची कलाही शिकवली होती. पण त्याचा उपयोग मी करु शकलो नाही. तर या सिद्धूचं कुणाशी पटायचं नाही, पण 'मॅडम' (सुनंदा)वर फार श्रद्धा. सुनंदाचा वाढदिवस २ डिसेंबरला

असायचा. त्या वेळी तो बाहेर, मुंबईला ड्रगमधे आकंठ बुडलेला होता. पण तेव्हा त्या अवस्थेतही त्याला तो दिवस आठवला आणि तिला थर्मास भेट द्यायला तो मुंबईहून आला. पेशंटनी हॉलमधे सुनंदाच्या वाढदिवसाचा कार्यक्रम ठेवला होता. आम्ही हॉलकडे निघताना दाढी-केस वाढलेला, काळवंडलेला भिकाऱ्यासारखा दिसणारा सिद्धू सुनंदाला दिसला. मला तर तो ओळखूही आला नाही. ती हसून त्याला म्हणाली, "सिद्धू, ॲडमिट होणार ना?" तो खरे तर प्रेझेंट देऊन पळून जाणार होता. पण सुनंदाने असे विचारताच तो 'हो' म्हणाला. त्याला घेऊनच ती हॉलमधे आली. अनेकांनी तिला पत्रे, स्वतः काढलेली चित्रे दिली. या वर्षीचे निश्चय लिहून दिले. त्या सगळ्यांचे कौतुक करुन ती शेवटी म्हणाली, "आज मला सगळ्यात आवडलेलं प्रेझेंट कुठलं आहे माहीत आहे?"

सगळ्यांचे चेहरे प्रश्नार्थक झाले.

"सिद्धू. आज माझा सिद्धू परत आला, हे माझं सर्वांत मोठं प्रेझेंट!"

त्या एका वाक्याचा सिद्धूवर इतका परिणाम झाला, की बस्स. त्यानंतर त्याने सगळी ट्रीटमेंट पुरी केली. म्हणायचा, "मी आता चांगला राहणार आहे. कारण मी आता मॅडमचं प्रेझेंट आहे. मॅडमचं प्रेझेंट कधी खराब होता कामा नये." नंतर मुंबईत गेला. बराच काळ चांगला राहिला. परत पाय घसरला आणि ड्रग्ज बेसुमार घेतली आणि त्यातच तो गेला. एक बरे, की सुनंदा गेल्यानंतर हे झाले.

दत्ता काय, सिद्धू काय, ही मनाने चांगली मुलं होती. व्यसनाची गरज भागवण्यासाठी ते गुन्हेगारीत शिरले. व्यसनामुळे त्यांच्यात सगळे अवगुण शिरले. त्यांच्यापासून इतर अनेक अनामिकांना त्रास झाला असेल. पण व्यसनाचे मळभ दूर करुन पाहिले की आत शांत स्वच्छ पाणी होते. त्यात ही वरची अशुद्धता मिसळली गेली नव्हती. सिद्धूच्या बाबतीत परत त्या पाण्यावर ते शेवाळे साठायचे. मग त्यात किती काळ जाईल सांगता यायचे नाही. दत्ताने एकदाच प्रयत्न केला, पण नंतर ते पाणी स्वच्छ आणि वाहते राहिले.

पण वृत्तीनेही गुन्हेगारी वळणाचा नायर आमच्याकडे आला, तेव्हा त्याच्याशी कसे वागता येईल याची मला काळजीच वाटली होती. पण सुनंदा निश्चिंत होती. मी पोलिसांच्या 'नार्कोटिक सेल'मध्ये बसलो असताना एका कॉन्स्टेबलने विचारलं, "आमच्या ताब्यात एक केरळी गुन्हेगार आहे. तो ड्रग सोडायचं म्हणतो. पाठवू का त्याला?" तसा तो आला. ॲडमिशनला बरोबर पालकांनी यावे अशी अट असतानाही सुनंदाने त्याला ॲडमिट केले. कारण त्याचे आईवडील केरळात होते. हा घरातून बाहेर पडल्याला तेरा-चौदा वर्षं झाली होती आणि मध्ये कुठलाही संपर्क नसल्याने ते जिवंत आहेत की नाहीत हे त्याला माहीत नव्हते. तो कसलेला गुन्हेगार होता. तो मुंबईत वस्तऱ्याने इजा किंवा खून करायचा, म्हणून तिथल्या गुन्हेगारी जगात तो 'वस्तरा मलबारी' म्हणून प्रसिद्ध होता. अनेक जेलची हवा खाल्लेला. अनेक ठिकाणांहून हद्दपार झालेला. श्रीलंकेच्या तमिळ अतिरेक्यांच्या ड्रग रॅकेटमधे हा होता. त्यांची ड्रग पोहाचवा- पोहोचवी करायचा. वगैरे वगैरे.

नायरने मुक्तांगणचे ३५ दिवस पूर्ण केले. त्यानंतरही तो तिथेच राहिला. तिथली कामे करु लागला. पहिल्या दिवशीचा दाढी वाढलेला, खंगलेला, उदास चेहऱ्याचा नायर आता तरतरीत तरुण झाला होता. वॉर्डची कामं रात्रंदिवस, धावून धावून करायचा. थोड्याच काळात तो वॉर्ड इन्चार्ज झाला. त्याने काम करणाऱ्यांची त्याची टीम जमवली. ती त्याला 'बॉस' म्हणून हाक मारायची. थोडक्यात, तो मुक्तांगणमध्ये त्याची 'जेल संस्कृती' आणू पाहत होता. सुनंदाने ते सगळे मोडून काढले. तिने नायरला आपल्या हाताखाली ऑफिसमधे कामाला घेतले. इंग्लिश उत्तम, टायपिंगचे स्पीड चांगले. त्यामुळे त्या कामातही त्याने जम बसवला. मराठी तर हां हां म्हणता शिकला. सुनंदा महिन्यातून एकदा ओतूरला बाह्यरुग्ण उपचार केंद्र चालवायची, तिथं तो तिला मदत करायचा. सुनंदाचं पाहून तिनं गोळ्या दिल्या की तो इतकं छान समजावून सांगायचा, की थोड्याच काळात

लोक त्याला डॉक्टर म्हणू लागले. सुनंदाची तो जसा सावलीच झालेला.

असा नायर एके दिवशी पळून गेला. व्ही.सी.आर आणि काही रोख रक्कम घेऊन पळून गेला. कुठलेही कुलूप उघडणे हा त्याच्या दृष्टीने पोरखेळ होता. सगळ्या पेशंटना हा मोठाच धक्का बसला. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे पेशंटही हळहळले, त्याच्यावर संतापले. म्हणू लागले, “अरे, चोरी करनी तो किधर भी कर। अपने माँ के घर चोरी करता है? चोरों के भी कोई उसूल होते हैं।” संस्थेचे सामान गेलेले, त्यामुळे पोलिसात तक्रार करणेही भाग होते. तो ड्रगमधे असताना ठाण्याला आनंद (नाडकर्णी)कडे गेला. पोलिसांनी ठाण्याला जाऊन त्याला ताब्यात घेतले. त्या वस्तू त्याने विकल्या होत्या, त्याही ताब्यात घेऊन त्याला पुण्याला आणले. पोलिस स्टेशनमधून बोलावणे आले. सुनंदा आणि राजाराम (तिचा सहकारी) गेले. त्याला तेच जामीन राहिले. त्याला घेऊन मुक्तांगणमधे आले. त्याला वॉर्डमधल्या मित्रांनी आंघोळ घातली. दाढी, केस करुन घेतले. एका आठवड्यात तो खडखडीत बरा झाला. हळूहळू कामात भाग घेऊ लागला. आता त्याचा गुन्हेगारी रुबाब गळून पडला होता, आणि मान खाली घालून तो काम करु लागला. त्या काळात कुणी मुक्तांगणला कॉम्प्युटर भेट दिला होता. सुनंदाने नायरला कॉम्प्युटर शिकवायची व्यवस्था केली. बघता बघता तो त्यातही एक्स्पर्ट झाला. आमची तर कामे करायचाच पण आमचा संबंध असलेल्या समाजकल्याण खात्याचीही कामे करायचा. त्या काळात कॉम्प्युटर ही नवलाई होती. त्याने त्या खात्याच्या डायरेक्टर वगैरे लेव्हलच्या लोकांनाही कॉम्प्युटर शिकवला.

तो त्याचे अनुभव सांगताना म्हणायचा, “आमच्या गुन्हेगारी जगात कुणी आपल्याशी चांगलं वागू लागलं की ‘डाऊट’ येतो. हा का चांगला वागतोय, याचा काय उद्देश आहे? असं मनात येतं. इथं मुक्तांगणमधे आल्यावर सगळे माझ्याशी चांगले वागत होते. हे का चांगलं वागताहेत? मी खूप शोधलं. पण मधल्या काळात मी त्यांना इतकं फसवूनही परत ते चांगलेच वागू लागले, तेव्हा मात्र माझा खडक फुटला.”

कधी तो म्हणायचा, “मी इथला व्ही.सी.आर.चोरला, त्याची शिक्षा म्हणून मॅडमनी मला त्याच्यापेक्षा महाग कॉम्प्युटर दिला.” त्याला वॉर्डात सगळे ‘व्हीसीआर’ म्हणून हाक मारायचे, तर हसून तो हात वर करायचा.

पुढची हकीगत खूप आहे. तो काही वर्षं चांगला राहिला. एका मुलीचं त्याच्याशी लग्न झालं. परत डोक्यात धंदा करायचं चक्कर आलं. हळूहळू धंद्यात पड, असं आम्ही सांगितलं पण त्याने ते ऐकलं नाही. मुक्तांगणचं काम सोडलं. सगळ्या बाजूंनी खोट आली आणि बायकोला सोडून परागंदा झाला तो झालाच. अजून पत्ता नाही.

या लिखाणात इतके पुरे. माझ्या दृष्टीने आम्ही यातनं काय शिकलो, हा प्रश्न महत्त्वाचा. एक म्हणजे अगदी हार्डकोअर, निगरगट्ट गुन्हेगारही बदलू शकतो, पण कुठलाही बदल हा टिकवावा लागतो. आणि दुसरं म्हणजे विश्वास टाकल्यानेच विश्वास निर्माण करता येतो. त्यामुळे विश्वास टाकताना कधी कधी होणारी किंचितशी द्विधा मनःस्थितीही लयाला गेली. ‘विश्वास टाकल्याने मिळतो’ हे आमचे परवलीचे वाक्य झाले. कधी कधी विश्वासाला जाईलही तडा, पण त्यासाठी उरलेल्या नव्याण्णव टक्के लोकांकडे अविश्वासाने का पाहायचे? पेशंट बरे झाल्यावर आफ्टर केअरला राहायचे. नोकरी शोधताना मी शिफारसपत्र द्यायचो, गरज पडल्यास फोनही करायचो. याचा त्यांच्यावर खूप परिणाम व्हायचा. बाहेर ज्याची पत पूर्णपणे गेली आहे, कुणी दारात उभे करायला नाही, त्याची हमी मी घेत होतो. व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जावर जामीन राहत होतो. पण मला एकही विपरीत अनुभव आला नाही. ते एकमेकांना म्हणायचे, “बाबांनी शब्द टाकलाय, त्यांच्या नावाला कमीपणा येऊ द्यायचा नाही.” मी अशा सगळ्यांना म्हणायचो, “मला फसवाच तुम्ही. जास्तीत जास्त काय होईल? आपल्या दोघांना तुरुंगात टाकतील. मग तिथं मी तुला

ओरिगामी शिकवीन." ते हसून म्हणायचे, "बाबा, पण असं कधी होईल का?"

या मित्रांसाठी मी तुरुंगापर्यंत नाही पोहोचलो, पण पोलिस स्टेशने, चौक्या इथपर्यंत अनेकदा गेलो. जावेच लागले, आमच्या या पोरांसाठी. एक मित्र होता. नाव? बहुधा विजय सोनार. तो एका अशाच सोनारी दुकानात कामाला होता. मित्रांमुळे ड्रगचं, दारुचं व्यसन लागलं. बाकीची मुलं गुन्हे सराईतपणे करायची. याला ते करायची इच्छाच नव्हती. मुलांनी सुचवले, रात्री तू दुकानाची एक फळी आतून उघडी ठेव. बाकी आम्ही बघतो. तुला तुझा वाटा पोहोचवतो. तशी ती दुकानफोडी झाली. पोलिसांनी ही गँग पकडली. यातल्या विजयने गुन्हा कबूल केला. बाकीचे सुटले... हा अडकला. त्याची शिक्षाही भोगून तो परत आला. आमच्याकडे बरा झाला. तरी पोलिसांचा त्रास सुरुच राहिला. कुठंही दुकान फुटलं की याला रात्री-अपरात्री उठवून पोलिस चौकीवर न्यायचे. त्याचे कुटुंब मध्यमवर्गीय. अपरात्री पोलिसांचा असा आरडाओरडा ऐकून त्यांच्या अब्रूचे काय धिंडवडे निघत असतील! तिथं गेल्यावर पोलिस मारहाण.

"मी तिथं नव्हतो."

"मग कोण होते?"

"मला नाही माहीत." की परत मारहाण.

असं परत परत घडायचं.

आणखी एक त्रास, म्हणजे त्या चौकीच्या, पोलिस स्टेशनच्या हद्दीत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची राऊंड असली, की त्या भागातल्या गुन्हेगारांना जमवीत. सकाळी अकरा-बाराला राऊंड असली की पहाटे तीन पासूनच यांना तिथं न्यायचे. आम्ही त्याला एका ठिकाणी नोकरीला लावले. त्याला पोलिस कामावरुनही घेऊन जायला आले. तसं त्याचं ते कामही गेलं.

मग मी स्थानिक, वरिष्ठ अधिकारी, सर्व संबंधितांना भेटलो. त्या यादीतनं याचं नाव काढा, असा अर्ज केला. एकच गुन्हा. त्याआधी नाही, आणि नंतर पाच-सहा वर्षं नाही. कधी भेटून ही बाजू मांडली. पण सगळे प्रयत्न व्यर्थ. मग शेवटी विजयला सांगितले, "तुला असे बोलावणे आले की मला सांग, मी बरोबर येईन." फरासखाना पोलिस स्टेशनचे बोलावणे आले. सकाळी आठची वेळ. रस्त्याकडेला पार्किंगच्या जागेत दहा-वीस साधी, फाटकी माणसे उभी होती. हे गुन्हेगार. विजय त्यांच्या रांगेत जाऊन उभा राहिला. मीही त्याच्या शेजारी जाऊन उभा राहिलो. समोरुन मोटरसायकलींवर, लाल दिव्याच्या गाड्यांमधून ऑफिसर येऊन दाखल होत होते. यांनी कितीदा मला त्यांच्या ऑफिसात बसवून मानाने चहा पाजलेला. पण आज मी गुन्हेगारांच्या लायनीतला, म्हणून माझ्याकडे त्यांचे लक्ष नव्हते.

कॉन्स्टेबलच्या हे लक्षात आले. त्याने विजयला बाजूला नेले. म्हणाला, "तू यांना इथं कशाला आणतोस? जास्त शहाणपणा करु नकोस. परिणाम भोगावे लागतील." मग विजयने मला हात जोडून परत जायची विनंती केली. मला वरिष्ठांनी विचारलेच असते, की तू काय गुन्हा केला आहेस, तर म्हणणार होतो, या पोराचा बाप व्हायचा गुन्हा केलाय. त्या वेळी काही झाले नसले तरी ही मात्रा लागू पडली असावी. आणि नंतर त्याला पोलिसांचा त्रास असा झाला नाही. कारण कळले नाही.

असे काही मित्र थेट गुन्हेगारीपर्यंत पोहोचलेले. कधी ड्रग विकणारे पकडल्याची बातमी वाचून सुनंदा म्हणायची, अरे, हा आपला पेशंट! किंवा पत्नीस मारहाण, पेटवायचा प्रयत्न, अशाही बातम्यांमध्ये आमचे हे मित्र दिसायचे. मी सुनंदाला म्हणायचो, "कसली आपली ही बिरादरी! कुणी बक्षीस मिळाल्याच्या बातमीत का दिसत नाहीत?" ती म्हणायची, "त्या बिरादरीसाठीच आपण आहोत. बाकीच्यांसाठी टाळ्या वाजवायला असतात सगळे." कधी पकडलेल्यांची हमी देऊन परत ॲडमिट करायला आम्ही आणत असू. दारुच्या अमलाखाली माणूस कितीही क्रूर होऊ शकतो.

पण ती दारू सोडवली तर तो कितीही चांगला माणूस बनू शकतो, हे आम्ही रोज पाहत होतो. एका हमालाच्या बायकोने नवऱ्याच्या दारूला कंटाळून अंगावर रॉकेल ओतून घेतले, तर नवऱ्याने काड्यापेटी समोर टाकली. काय म्हणावे याला? असले कधी माझ्या कौटुंबिक वर्तुळात कधी ऐकलेलेही नसायचे. पण नंतर तो हमाल मित्र व्यसनमुक्त झाला आणि चांगला माणूस झाला. पण त्या वेळी त्याने फेकलेल्या काड्यापेटीतल्या काडीने तिने पेटवून घेतले असते तर? किंवा त्याने सरळ जळती काडीच फेकली असती तर?

पण या झाल्या दुर्मिळ घटना. शिवीगाळ, मारहाण, हे बऱ्याचजणांच्या हातून होते. 'दारूला पैसे दे' यावरनं पत्नीला मारहाण, मग तिने कुठे तरी लपवून ठेवलेले चार पैसे काढायचे, हे सर्रास. या सगळ्यातून खोटं बोलण्याची सवय अनेकांना. पेशंट मित्राची बायको सांगत होती, "दारू सुटली, राग डोक्यातनं गेला; पण खोटं बोलणं जात नाही. आणि आश्चर्य म्हणजे काही कारण नसताना खोटं बोलतात. बाकी सगळं चांगलं चाललंय. दारूचं तर नाव काढत नाहीत. घरात भांडणं करत नाही. मग हा असं खोटं का बोलतो?" त्यांना उत्तर देणं अवघड. चिकटलेल्या सवयी या. तोही ती सवय टाळण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायचा; पण तरी प्रतिक्षिप्त क्रियेसारखं ते होऊन जायचं. त्यावर आम्ही खूप, सविस्तर बोललो. नंतर प्रत्येक वेळी त्याच्या खोट्या बोलण्यानंतर त्याने सर्वांशी, संबंधितांशी मोकळेपणाने स्वतः होऊन बोलायला सुरुवात केली. अवश्य तिथे क्षमाही मागितली. आता तो फक्त त्याचा एकट्याचा राहिला नाही. तो सोडवण्यात सगळेच सामील झाले, अगदी त्याच्या ऑफिसातले, बॉससुद्धा.

जसे खोटे बोलणे, तशाच तोंडात बसलेल्या शिव्या, हाही असाच प्रश्न तयार झालेला. ड्रग, दारूची अशी संस्कृती असते. रस्त्यावरची टपोरी भाषा तोंडात बसते. जरी उच्चवर्गीय, उच्चवर्णीय मित्र असला, तरी दारूच्या प्रवासात तो देशी दारूवर, शेवटी हातभट्टीवर पोहोचतोच. काही थोडे अपवाद. तर या गुत्त्यांवरची, गुन्हा घडल्यावरची लॉकअपची, क्वचित जेलचीही भाषा अंगवळणी पडते. हे मित्र व्यसनमुक्त जीवन जगतात, पण नकळत रागात, भांडणात ही भाषा वर येते. त्या भाषेवरून भांडण चिघळते आणि त्याचे पर्यावसान परत ड्रग किंवा दारू. सुनंदा त्या वेळी या मित्रांची भाषा सुधारण्याचा प्रयत्न करायची, तेव्हा मला त्याचे महत्त्व कळले नव्हते. पण असे पर्यावसान होताना पाहिले, तेव्हा त्याचे महत्त्व पटले.

शिवम कद्री आठवतोय. जाडजूड, काळा. पण दिसण्यात मोठा असला तरी वयाने जेमतेम वीस-बावीस असेल. त्याच्या तोंडात शिव्या होत्या. सुनंदाने त्याला एकेका शिवीमागे दंड बसवला होता. बोलता बोलता एखादा तसला शब्द अर्धवट निघून जायचा आणि लाजून तोंडावर हात ठेवायचा. मुक्तांगणमधे तो आफ्टर केअरला राहायचा. त्याने रात्री आपसात जरी अपशब्द वापरले तरी सुनंदाला ते कळायचे. तोही दंड भरावा लागे. त्यांना कळायचंच नाही, की मॅडमना हे कोण सांगतं. एकदा मला तो हसून म्हणाला, "मला माहीत आहे, मॅडमचा स्पाय कोण आहे तो. अशोक पवार मॅडमना सांगतो. त्यामुळे तो जवळ असला की आम्ही ती लँग्वेज वापरत नाही."

सुनंदाला नंतर मी म्हणालो, "तुझा हेर उघडकीला आलाय. अशोक पवार ना?" ती हसून म्हणाली, "तो माझा उघडपणे दाखवायचा हेर आहे. माझा खरा हेर वेगळाच आहे."

कद्रीचा विषय निघालाच, म्हणून त्याविषयी सांगतो. त्याच्या वडिलांची मोठी ट्रान्स्पोर्ट कंपनी होती. अनेक ट्रक्सचा ताफा होता. पण या शिवमच्या आईव्यतिरिक्त त्यांची एक रखेली होती. या बाह्यसंबंधांमुळे शिवमच्या आईने आत्महत्या केली. शिवम त्यामुळे ड्रगमधे अधिकच बुडाला. आई गेल्याचं दुःख, ती जिवंत असताना तिला दुःख दिल्याची रुखरुख, वडिलांबरोबरचा संताप असं सगळं मिश्रण घेऊन तो आला होता. ती 'दुसरी' आई घरी येऊन राहायला लागल्याने त्याला स्वतःचं घर उरलं नव्हतं. जगात आपल्याला कोणी नाही अशी त्याची भावना होती. त्या वेळच्या बऱ्याच ड्रग

ॲडिक्ट्समधे ‘पीते पीते मर जाएंगे’ अशी एक टोकाची भावना असे. तशी शिवमची होती.

सुनंदाने त्याला ड्रायव्हर म्हणून मदतीला घेतले. आणि तो त्याच्या जीवनातला बदलाचा क्षण होता. त्या वेळी सुनंदाचा कॅन्सर सुरु झालेला होता. तिला मुंबईला रेडिएशन्स घ्यायला जावे लागे. त्या वेळी जुना मुंबई-पुणे रस्ता होता. एखादे वाहन आडवे झाले की मैलोन् मैल वाहनांच्या रांगा लागत. शिवम कसा त्यातनं गाडी काढायचा, तसं मी आजवर पाहिलेलं नाही. रस्त्याच्या कडेच्या वाहनाच्या बाजूला फूटभर जागा असली, तरी एक चाक रस्त्याखाली, एक वर अशा अवस्थेत गाडी पुढं काढायचा. आणि हे सगळं पावसाळ्यातही. पण एकदाही गाडी कुठं फसली नाही की कुणाला टच झाली नाही. एरवी पुण्यात घरी, मुक्तांगणमधे सुनंदाची एवढी काळजी घ्यायचा की बस. आत पैसे असूनही सुनंदा बिनधास्तपणे पर्स त्याच्याकडे सोपवायची. सुनंदाच्या पर्समध्ये काय काय भरलेलं ! कागदपत्रं, औषधं, चिठ्ठ्या-चपाट्या. ते काही फार वजन होतं असं नाही. पण पर्स उचलायची मुक्तांगणमधल्या तिच्या पोरांमध्ये मानाची गोष्ट होती. ते त्यासाठी धडपडत असत. शिवम हा तर फारच लकी समजला जायचा. मुक्ता-यशो तर त्याला दरवर्षी राखी बांधायच्या. त्याच्या वाढदिवसाला सुनंदाने एक चित्र काढून दिले. तो हात पसरुन टेकडीवर उभा आहे, असे ते चित्र. तिनं काढलेलं हे त्या काळातलं एकमेव चित्र.

सुनंदा त्याला म्हणायची, तुझ्या लग्नाला मी तुझ्या गावी (कारवारमध्ये) नक्की येईन. पण त्याआधीच ती गेली. त्याचे वडीलही गेले. सदाशिव (अमरापूरकर)ने मुंबईत त्याला चांगल्या कंपनीत ड्रायव्हरची कायमची, अनेक फायदे असलेली नोकरी लावून दिली. त्याचे त्याच्या गावी लग्न झाले. वडील अचानक गेले. ती खरी तर त्याची इस्टेट. पण न भांडता शांतपणे तो कष्टाची नोकरी करतो. सुनंदाच्या वाढदिवशी किंवा स्मृतिदिनाला तो यशोला फोन करतो आणि खूप बोलतो.

त्याचा परवा फोन आला. मी म्हटलं, तुझी हकीगत मी लिहिलीय. नावं बदलून लिहिलीय. तो म्हणाला, “खरं नाव लिवा की. माझं काय बी आब्जेक्शन नाय बाबा”

“अरे, पण तुझ्या वडलांविषयी तो उल्लेख आहे.”

लगेच म्हणाला, “पन बाबा, खरं हाय ते खरं हाय. त्याला कशाला लाजायचं? ”

मी थक्क झालो. ही त्याची तत्काळ प्रतिक्रिया. आतून आलेली. परत फोन करुन त्यानं तेच सांगितलं. खरं हाय ते खरं हाय...ज्याचं पूर्वायुष्य खोटं बोलण्यात, फसवण्यात गेलेलं, त्याचे हे शब्द. ‘पीते पीते मर जाएंगे’ यापासून तो कष्टाचे जीवन प्रामाणिकपणे जगण्यापर्यंत... सुनंदाने त्याला काय दिलं असावं? असं काही दिलं, की नेमकं तेच त्याला हवं होतं. ते आईपण मिळाल्यावर त्याची अरेरावी, गुन्हेगारी, शिवराळ भाषा, खोटे बोलणे, झोलझाल करणे... सगळं सगळं विसरला. आणि तो एक साधासुधा आणि आनंदी माणूस झाला. अशा उदाहरणाने केवढा हुरुप यायचा त्या वेळी! मग कितीही अडचणी येवोत, ही बदललेली मुलं म्हणजे औषधं वाटायची. कारण अशा अडचणी, अशी संकटे ही आमची वैयक्तिक नव्हती. ती सगळ्यांची होती. त्यामुळे सामना करायला ताकद मिळे.

तसं बघायला गेलं तर आमची फौज तरी कोण होती? जॉब गेलेली, घरात-दारात कुठेही पत नसलेली, अनेक घोटाळ्यांचा इतिहास असलेली आमची पोरं. बहुधा बालवर्गाच्या पुढे शिक्षण नसलेलीही बरीचशी. पण ती वेगळीच मुलं होती. बदललेली, बदलू पाहणारी.

जगण्याच्या भट्टीत भाजून निघालेली ही पक्की मडकीच जशी. अशा ठिकाणी ते रसातळाला पोहोचले होते, की जो आपण बऱ्याचजणांनी पुसटसाही पाहिला नसेल. ‘आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर’. पण भाकर प्रत्येकाला मिळतेच असे नाही. मुक्तांगणपर्यंत जे येऊ शकले त्यांना तो आधार मिळाला. कित्येक तर जागीच करपून नष्टही झाले असतील. म्हणून मला, आम्हाला, ही

सगळी मुले (मग ती कुठल्याही वयाची असेना का) फार आवडत. त्यांनी खरंखुरं जीवन पाहिलेलं आहे. हे जेव्हा सर्वस्व गमावून बसलेले असतात, तेव्हा सगळे दूर पळतात. पण त्याही परिस्थितीत कोणी मदत करतो, माया करतो, चहा पाजतो, जेवायला घालतो. नात्यांचे अर्थ त्याला आतून कळलेले असतात. मीटिंगमधे ते आपलं पूर्वायुष्य इतक्या प्रांजळपणे, प्रामाणिकपणे सांगत की ऐकणाराचं मन गलबलून जावं. कित्येकदा खऱ्याचा चटका बसावा, इतकं खरं. इतकं खरं एरवी ऐकायची सवय नसते हो. आपली दुनियाच वेगळी. आपले चेहरे म्हणजे मुखवटे, आपले शब्द असत्यात लोळणारे, आपलं जीवन म्हणजे इमेज जपण्याचा अविश्रांत खटाटोप. बाहेरच्या सभा मला नंतर नंतर ऐकवेनात. किती औपचारिकता, किती खोटी स्तुती! इथं कोणीही उठून आपले अनुभव सांगून त्याचे ओझे उतरवत असतो. कोणी अध्यक्ष नाही, की हारतुरे नाहीत.

अशोक वैद्य फार सज्जन माणूस. आता तो आपल्यात नाही. स्वतः बरा झाला. नंतर तो इतरांना मदत करायचा. दारुड्यांना त्यांच्या कलाने घेऊन घेऊन समजावणं आणि अक्षरशः रस्त्यावर पडलेल्यांना स्कूटरवर बसवून मुक्तांगणला आणणं, हे त्यानं कितीदा केलंय. त्याचं घर म्हणजे अडचणीत आलेल्या पेशंटचं, नातेवाइकांचं आश्रयस्थान, आधार. पण त्याच्या पूर्वायुष्यात त्याच्या हातनं काय काय केलं हे सांगायचा, तेव्हा वाटायचं, तोच हा माणूस आहे?

एकदा त्याला दारुसाठी पैसे हवे होते. पत्नी देत नव्हती. तर याने गच्चीवर जाऊन आपल्या लहान मुलाचे पाय वर धरुन उलटे धरले आणि बायकोला म्हणाला, “पैसे देते का टाकू याला खाली?” बाप रे! त्याच्या मुलांवर प्रेम करणारा आजचा अशोक पाहिला तर हे खरेच वाटायचे नाही. काय काय अनुभव सांगायची ही मुलं! आमचा प्रसाद (चांदेकर), त्याने पैशासाठी घरातले जे हाताला येईल ते विकले. अगदी ज्ञानेश्वरीही रद्दीच्या भावाने विकली. घरातले देव विकल्याची तर किती तरी उदाहरणे. कुणी देवळात जाऊन, देवापुढे साष्टांग नमस्कार घालून देवापुढचे पैसे उचलून आणायचे. जसे व्यसन भागत नाही म्हणून दत्ता पाकीटमार झाला. तसे कोणी उचलेगिरी करायचे, कुणी स्त्रियांच्या गळ्यातली साखळी- मंगळसूत्र हिसकावणारे चोर व्हायचे. ते काही मुळातले असे नव्हते. ते पटकन पकडले जायचे. आधी पब्लिकच्या हातचा मार, नंतर पोलिसाच्या हातचा, दंडुक्याचा मार. हे सगळे ते का करत होते? त्यांना ते करायचे नव्हते. ते अतिशय कळकळीने सांगत. पण ‘साली नशा हमें मजबूर करती थी।’ ते हे करायचं थांबवू शकत नव्हते, यातनं सुटका करून घेऊ शकत नव्हते. दुष्टचक्रकात फिरणारे जीव हे. पण काहीजण म्हणायचे, बरं झालं, व्यसनात होतो. म्हणून मुक्तांगण दिसलं. मॅडमसारखी आई मिळाली.

सुनंदाने यांच्यातूनच काहींना तिच्या कामात सामावून घेतले. तिच्या हाताखाली काम करणारा मित्र बाहेरच्या खोलीत बसे. सुनंदाने दिलेल्या पेशंटच्या यादीप्रमाणे त्यांच्या फायली काढून ठेवणे, त्या पेशंटना ठराविक वेळेला तिथं आणून बसवणे. अशी कामे ते करीत. फोनवर कसे बोलायचे, निरोप कसे लिहून घ्यायचे, वगैरे सुनंदा त्यांना शिकवायची. जरा शिकलेले असले की पत्राचा मजकूर लिहायला द्यायची. मराठी येत नसलेल्यांना पुस्तकातला एकेक पॅरेग्राफ लिहायला लावायची. नायर, कद्रीसारखे अनेक मित्र चांगले मराठी बोलू-लिहू लागले होते. सुनंदा संध्याकाळी हमाल पंचायतचा दवाखाना चालवायची. पेशंटची तक्रार कसलीही असो, ती त्याला हात दाखवायला सांगायची. नखं वाढलेली असली की पर्समधून नेलकटर काढायची आणि सगळी नखे काढून द्यायची. पुढच्या वेळी बाजारातून तसे नेलकटर विकत आणायला सांगायची. ते त्याला तिला दाखवावे लागे, तरच पुढचं काम ती करणार. हेच ती मेंटल पेशंट बघताना करायची, आणि तसेच मुक्तांगणमध्येही. मी तिची याबद्दल थट्टा करायचो, अगं, ते व्यसन सोडवायला येतात. नखाशी काय संबंध? ती म्हणायची, “स्टार्ट फ्रॉम सिंपल थिंग्ज.” तिचे हे पेशंटच्या तोंडच्या शिव्या काढणे, हेसुद्धा नखे काढण्यासारखेच होते. तिला त्यांचे नुसते व्यसन सोडवायचे नव्हते, तर त्यांच्यात सर्वांगीण बदल

करून चांगला, आरोग्यसंपन्न चांगला माणूस बनवायचे होते.

यासाठी ती आपण सायकियाट्रिस्ट आहोत, हे जसे विसरूनच काम करायची. योग्य ठिकाणी ती सायकियाट्रिस्ट असेच, पण ती त्यांची सर्वांगीण काळजी घ्यायची. त्यासाठी कुणाची घाणेरडी, वाढलेली नखे काढायची तिला लाज वाटत नसे. तिने कुठल्याही उपाधीमधे स्वतःला कोंडले नव्हते. पेशंट जेवायला बसले की ती तिकडे फेरी मारायची. कुणी जेवत नसेल तर ती खाली त्याच्या शेजारी सतरंजीवर बसायची. तो का जेवत नाही, याची चौकशी करायची. घरी कधी मधूनच सकाळी तिच्या जाण्याच्या गडबडीत पीठ कालवून भाकरी करताना दिसली की विचारायचो, “सुनंदा, आज हे काय?” ती म्हणायची, “अरे, एक पेशंट नीट जेवत नाही, त्याच्यासाठी.” या तिच्या वागण्यामुळे पेशंटच्या तिच्याविषयी काय भावना असतील, याची आपल्याला कल्पनाही करता येणार नाही. तिच्या मायेच्या पाखरीसाठी कसलीही निवड, अट नव्हती. ‘श्रीमंतांना सगळे असतात, गरिबाला फक्त आपण आहोत’, हे तिचे नेहमीचे वाक्य असले, तरी सगळी तिची जशी लेकरेच. रस्त्यावरून, गटारातून थेट आलेल्या पोरांना तर ती आई वाटणे साहजिकच होते, पण श्रीमंतांच्या घरातली खरीखुरी माया न मिळालेली पोरंही त्यात असत. कित्येक मोठ्या घरच्यांना सर्व मिळायचे, पण आई-वडिलांचा सहवास सोडून सगळे. त्या सुमारास सुनील दत्त मुक्तांगणमधे येऊन गेले. पेशंटबरोबर खूप मोकळेपणाने बोलले. म्हणाले, “माझ्या मुलाच्या व्यसनाला खरे तर आम्हीच जबाबदार आहोत. मी शूटिंगमध्ये बीझी, त्याची आई सोशल वर्कमधे. याला नोकरांवरच सोपवलेले. आम्ही कधी त्याचं ड्रॉइंग बुक उघडून पाहिलं नाही की कधी त्याच्या गॅदरिंगला गेलो नाही.” खालच्या थरातल्यांचे इतके खालचे, कष्टाचे जीवन, की तिथेही भावनिक वाढ थांबलेली. म्हणजे श्रीमंत असो- गरीब असो, ही मुलं भावनिक ओलाव्याच्या भुकेने वखवखलेली. सुनंदाची माया या सगळ्यांना शांत करीत असे. जे दारी तेच घरी. घर आणि दार असा फरक नव्हताच तिच्यापाशी. मित्रमंडळी, नातेवाईक, एवढंच काय, घरी काम करणारी प्लोमिना, तिची मुले, सुरेखा... या सर्वांवर तिच्या मायेची पाखर असे. कधी तिची माया पातळ झाली नाही की झरा आटला नाही. सगळ्यांनाच तिचा हा मायेचा, प्रेमाचा झरा इतका अखंड वाहता कसा, याचं आश्चर्य वाटे. कधी तरी हा आटेल का, अशी भीतीही वाटायची. पण अखेरपर्यंत तो पाझरतच राहिला. कॅन्सरनंतर तर त्या झऱ्याला आणखीनच उमाळे फुटले.

बंगलोरला ‘निमहॅन्स’ या प्रसिद्ध संस्थेत तिने एक प्रोजेक्ट केला होता. त्यासाठी ट्रेनिंगला ती तिकडे अधूनमधून जायची. तिकडे जे विद्यार्थी होते ते सगळे सायकियाट्रिस्ट होते. त्यांनी जर्नलमधे अनेक संशोधनाचे ‘पेपर्स’ लिहिलेले असायचे. सुनंदाचे इतक्या वर्षांचे, येवढे काम असून तिने एकही पेपर लिहिलेला नव्हता याचे सगळ्यांना आश्चर्य वाटायचे. तिचे गुरुजी आर. एस. मूर्ती हे जगप्रसिद्ध होते. त्यांची सुनंदाची खूप मैत्री होती. ते तिला पेपर लिहिण्याविषयी सुचवायचे, आग्रहही करायचे. नंतर एकदा ते पुण्याला आले. सुनंदाबरोबर ते मेंटलला, मुक्तांगणला दिवसभर होते. संध्याकाळी मी त्यांना विमानतळावर पोहोचवायला गेलो. तिथं ते म्हणाले, “मी अनिताला (सुनंदाचं दुसरं नाव) पेपर लिहिण्याबद्दल खूप आग्रह करत होतो. पण आता मी ते सोडून दिलंय. तिची कॅटॅगरीच वेगळी आहे.”

“कसली कॅटॅगरी?” मी उत्सुकतेने विचारले.

ते म्हणाले, “मदर तेरेसा, बाबा आमटे... या कॅटॅगरीतील ती आहे. तिने तेच करावं. तोच तिचा पिंड आहे.”

मला मूर्तींचंही कौतुक वाटलं. त्यांना अखेरीस सुनंदा ओळखू आली. मुक्तांगणच्या पेशंटना मात्र ती लगेचच समजत असावी. पण तिची माया भोळी-भाबडीही नव्हती. तिला कुणाची चूक, लबाडी लगेच लक्षात येत असे. मी ‘पाथफाइंडर’ शब्दावरून तिच्यासाठी ‘फॉल्ट फाइंडर’ हा शब्द योजलेला

होता. हॉटेलमधे वेटरने आणलेल्या बिलात ती चूक काढत असे. कसलेल्या दुकानदारांनीही त्यांची चूक दाखवल्याबद्दल त्यांनी तिला हात जोडले होते. पण इथे तिची गाठ होती आमच्या टपोरी जनतेशी. त्यांनी घरच्यांना, पोलिसांना, डॉक्टरांना, भल्याभल्यांना हातोहात फसवलेले. पण त्यांचेही सुनंदापुढे काही चालत नसे. डॉ. नाडकर्णींकडून आलेला एकजण दुसऱ्याला सांगत होता, "नाडकर्णीसाब को इझ्झीली फँसा सकते हैं, लेकिन इधरकी मॅडम बहुत खतरनाक है। उसको सब पैलेच समझता है।" तिचं हेरखातं तर होतंच, पण चेहऱ्यावरून, बोलण्यातनं तिला बऱ्याच गोष्टी ओळखता यायच्या.

मी माझ्यावरूनच सांगतो, मी जरा काही खोटं बोललो की ती पटकन माझ्याकडे अशी पाहायची, की मी मग खरं खरं ते सांगून टाकायचो. आधी वडील कडक, शिक्षक मारकुटे, त्यामुळे खोटं बोलायची सवय लागलेली. सुनंदाने बोलून, कधी माझं खोटं उघडकीला आणून ती सवय घालवली. मग माझ्या मनावरचं एक मोठ्ठं ओझं उतरल्यासारखं झालं. गेली किती तरी वर्षं, बहुधा तीस-पस्तीस वर्षं मी खोटं बोलल्याचं मला आठवत नाही. त्या आमच्या मुक्तांगणमधल्या पोरांना असंच हलकं वाटत असेल का? खांद्यावर घेणेकऱ्याचा हात पडो की पोलिसाचा, त्यांचा तो निर्भयपणा आत्मविश्वास टिकवत असेल का?

ती अक्षरशः तिच्या मुलांना पैलूच पाडायची. एका तीर्थक्षेत्री भटजींचं काम करणारा पोरगा आठवतोय. सुरेश नाव. आडनावाशी आपलं देणं-घेणं नाही. तीर्थक्षेत्र प्रसिद्ध. तिथला देव पॉवरफुल. नवसाला पावणारा. त्याच्या पूजेला हजारो रुपये खर्च. तिथे हे ड्रग्जचं व्यसन पसरावं? सुरेश सांगत होता, "तिथं काहीच काम नसतं. सगळ्या ब्राह्मणांमध्ये आपण पंचा नेसून उघड्यानं बसायचं. नुसते बसायचे पैसे. पूजा आली की काम. बाकी आराम. त्यात या सवयी लागल्या." नंतर त्या क्षेत्री आमचा फॉलोअप सुरु करावा लागला. कारण बरेचजण व्यसनी. देवळासमोर ज्याचं माळांचं, प्रसादाच्या पुड्यांचं दुकान आहे तोही आमचा पेशंट. दारूचा व्यसनी. त्या ठिकाणी दुकान असल्याने ते आपोआप चालतंच. नोकरावर सोपवून हा पडलेला. गांजा हे तर अनेक तीर्थक्षेत्रांमधले नेहमीचे व्यसन. ही मंडळी आमच्याकडे येऊन बरी होत होती. मी त्या ठिकाणी फॉलोअपला गेलो, तर सुरेशकडे तिथले गावकरी जमले. म्हणाले, "इथली कीड काढताय, हे देवाचं काम करताय." सुरेश आमच्याकडे बरेच महिने राहिला. आश्चर्य म्हणजे तो जवळपास निरक्षर होता. त्याला सुनंदाने पहिले धडे दिले. ती त्याला म्हणाली, "तू नंतर भटजीचे काम करणार आहेस ना, मग तू चांगला भटजी हो." तिने शोधून काढले, की आळंदीला पौरोहित्य शिकवणारी संस्था आहे. मग त्याला तिथं घातलं. आमच्या तिथून आळंदी जवळ. रोज बसने जायचा, यायचा. आता तो चांगला पुरोहित झालाय. माझा कर्मकांडावर, पौरोहित्यावर विश्वास नाही. तसा सुनंदाचाही नव्हता. पण त्याचे हित तिने पाहिले. आपली मतं बाजूला ठेवली.

नंतर दुसऱ्या एका पेशंटचे नातेवाईक तिला भेटायला आले. त्यांचा मुलगा बरा झाला होता. ते म्हणाले, "आम्ही 'ह्या' तीर्थक्षेत्रीच्या देवाला 'पूजा' बांधू असा नवस केला होता. तो आता तिथं जाऊन फेडतो." सुनंदा हसली. एवढंच म्हणाली, "फार खर्च करु नका तिथं." ती असं नाही म्हणाली, की तिथं पूजा सांगायला आमचीच मुलं आहेत. किती संयम! मला नसतं जमलं हे.

तिचा विचार पेशंट मित्रांपासूनच सुरु असे. सगळ्याच्या केंद्रस्थानी तो मित्रच असे. त्याचं मन ती इतकं जाणत असे, इतकी एकरूप होत असे, की त्याच्या बाबतीत काय करावे याचे वेगळेच उत्तर तिला सापडत असे. एका न्हावी मित्राची आठवण होते. शिरुर तालुक्यातल्या खेड्यातून आलेला. काम काय करतोस, असे तिने विचारले.

"न्हावीकाम."

"तुम्ही कुठले न्हावी?"

पेशंटला कळलेच नाही. म्हणाला, "म्हणजे?"

"म्हणजे तुम्ही वाजंत्री न्हावी की मशालजी न्हावी? जुनरी की सातारी?" माझा त्या सुमारास बलुतेदारांचा अभ्यास चालला होता. हे फरक तिनं माझ्याकडून ऐकलेले होते. तो हे ऐकून थक्कच झाला असणार.

म्हणाला, "वाजंत्री न्हावी."

"मग सनई वाजवतोस की नाही?"

"नाही. पूर्वी वाजवायचो. दारु सुरु झाली. सगळं गेलं. कितीक वर्सांत वाजवलीच नाही. आता बोटं पण बसणार नाहीत."

सुनंदाने त्याच्या घरी निरोप पाठवला आणि सनई मागवून घेतली. त्याला ऑफिसात बोलावून घेतले आणि मळक्या फडक्यात गुंडाळलेली ती सनई त्याच्यापुढे ठेवली. त्याला कळेचना, ही सनई इथं कुठे? सुनंदा म्हणाली, "वाजव ना." तो म्हणाला, "नाही. आता जमणार नाही."

"निदान आवाज तरी काढून दाखव."

त्याने घाबरत सनई हातात घेतली. रीड नीट बसवले. हो-ना करत त्याने आवाज काढला. मॅडमच्या खोलीतून हा कसला आवाज, म्हणून बाहेरच्या खोलीतले बघायला धावलेच. सुनंदाने सांगितले, "रोज आता सनई वाजवायची." आणि खरोखरच चार दिवसांतच तो चांगलं वाजवू लागला. तो असेपर्यंत रोजची सकाळ सनईच्या सुरांनी उजाडत असे. तो बुजरा पेशंट नंतर इतका खुलला की बस्स. असा आत्मविश्वास आला, की व्यसनाचा प्रश्नही त्याचा त्यानेच सोडवला.

ती सायकियाट्रिस्ट असूनही ज्ञानाचा गर्व नव्हता. ती म्हणायची, "आम्ही पेशंटला बरं करत नाही, तर बरं व्हायला मदत करतो." हे आज मुक्तांगणचं जवळपास ध्येयवाक्य झालंय. कुणी म्हणतं, "पेशंट बरा होईल याची गॅरंटी आहे का?' मी म्हणतो, "तो बरा होईल की नाही याची गॅरंटी नाही, पण आम्ही शंभर टक्के प्रयत्न करु याची गॅरंटी देतो." ही गॅरंटी मी माझ्या सर्व सहकाऱ्यांमुळे देऊ शकतो, याची जाणीव मला आहे. कुणी मित्र बरा झाला तर घरचे लोक भरभरुन श्रेय देतात. आम्ही म्हणतो, "नव्याण्णव टक्के श्रेय पेशंट मित्रांचं, एक टक्का आमचं."

ही वृत्ती कोणी दिली, तर सुनंदानं.

त्या काळात येणाऱ्या अनुभवांचा आमच्या उपचारांमधे समावेश होत होता. 'आम्ही' या शब्दात सगळे येतात. सुनंदाने पहिल्यापासून बऱ्या झालेल्या, व्यसनापासून चांगल्या रीतीने दूर असणाऱ्या पेशंटना आपले सहकारी म्हणून घेतले. कित्येकांचे शिक्षण म्हणजे लिहिता-वाचता येण्याइतपत. तरी तिला ते चालत असे. प्रामाणिकपणा हा मुख्य. तो असेल तर व्यसनापासून दूर राहायला मदत होते, तशी अन्य स्वभावदोष काढायलाही. प्रत्येकाने पडेल ते काम करायचे. इथं म्हटलं तर काही प्रमाणात कामाचं वर्गीकरण आहे, पण ते हवाबंद कप्पे नव्हेत. बाबा शेख हा गांजा ॲडिक्ट. इथे तो बागकाम, झडती अशी कामे करायचा. पण तो पेशंटची ग्रुप थेरपीही घ्यायचा. त्याचे अनुभव हे ऐकणाऱ्याला हादरवून टाकणारे. त्यामुळे पेशंटमधे त्याचे ग्रुप्स मुक्तांगणमधे खूप लोकप्रिय. पण शिक्षण? ते जसे नव्हतेच. बाबा शेखची मला एक मजेदार आठवण आहे. आमच्याकडे कुंपणाच्या गंजलेल्या तारांचं एक मोठं भेंडोळं पडलं होतं. बाबाने ते मला मागितलं. मला वाटलं, तो भंगारमधे घालणार, आणि त्यातून त्याला चार पैसे मिळतील. मी विचारलं, "कशाला पाहिजे हे?" तो जरा लाजत म्हणाला, "आमच्या मंदिराच्या मागच्या बाजूला लावायचीय. तिथनं जनावरं आत येतात." मला वाटलं, आमचं मंदिर म्हणतोय, तर मशीद किंवा दर्गा असणार. तर तसं नव्हतं. ते हिंदूंचंच देऊळ

होतं. बाबाला विचारलं, "तुझा तिथं काय संबंध?"

तो लाजत म्हणाला, "मी त्याचा ट्रस्टी आहे." आमचा निरक्षर बाबा शेख? आणि हिंदूंच्या मंदिराचा ट्रस्टी? वाः वाः! भारत टिकलाय तो अशाच अनेक बाबांमुळे.

तर ही अशी सुनंदाची नवरत्ने. नव कशाला, शतरत्ने म्हणू या हवं तर. आम्ही नंतर यांच्या जोडीला काही 'एम एस डब्ल्यू' झालेले क्वालिफाइड लोकही घेतले. त्यातले काही टिकले, बरेचसे गळले. माझ्याकडे एक असाच तरुण मुलगा आला होता. त्याने अशा सर्टिफिकेटांची फाइलच आणली होती. मी ती बाजूला ठेवून त्याला म्हटले, "मित्रा, रस्त्याच्या कडेला पडलेल्या कुठल्याही दारुड्याला पटवून इकडे ॲडमिशनला आण- तुझी नोकरी पक्की." तो गेला तो परत आला नाही. मला वाईट वाटले. मी त्याच्या जागी असतो तर नक्की तसे केले असते. रस्त्याच्या कडेला बसून दारूने धुंद पडलेल्या, चेहऱ्यावर माशा घोंघावणाऱ्या त्या दारुड्याला मनवायचा प्रयत्न केला असता. अयशस्वी झालो असतो तरी परत येऊन सांगितले असते. या अनुभवातनं मी खूप शिकलो असतो. या मित्राने तसे का केले नाही? त्याच्या त्या सर्टिफिकेटांनी त्याला मागे खेचले असेल का? मग शिक्षण हेच करतं का? आत्मविश्वास देण्याऐवजी त्यानं पांगळं करावं? याउलट आमची ही रत्ने. अलीकडे आम्ही एका झोपडपट्टीत काम सुरु केले. जे व्यसनी मित्र इथपर्यंत पोहोचू शकत नाहीत, त्यांच्यासाठी, आपण त्यांच्यापर्यंत पोहोचायचे. त्या वस्तीत एक संपलेली दगडाची खाण होती. तिथं एका खचलेल्या खड्ड्यात प्रचंड घाण होती. लोक सर्व विधी तिथंच करायचे, अशी ती घाण. तिथं काहीजण ड्रग ओढत बसायचे, असं आमच्या या लोकांना कळलं.

आमच्या टीमचा म्होरक्या होता द्विजेन स्मार्त. गुजराथी माणूस. बऱ्याच वर्षांच्या व्यसनानंतर आता सुधारलेला. ह्या सगळ्यांनी त्या मुलांना शोधून काढलं, त्या सगळ्या घाणीतून वाट काढत. रोज त्या मुलांशी ते बोलत, त्यांना पटवायचा आटोकाट प्रयत्न करत. त्या वस्तीतल्या मोकळ्या असलेल्या शाळेत आम्ही ब्रेकफास्ट सेंटर चालू केले. तिथं ते खाण्यासाठी येऊ लागले. मग आम्ही त्या शाळेतच त्यांना ॲडमिट केले. दहा दिवसांचा तो कॉम्पॅक्ट कोर्स होता. शेवटच्या दीपप्रज्वलन कार्यक्रमास मी होतो. ती बरी झालेली मुले बोलली. एक म्हणाला, "आम्ही जिथं प्यायला बसायचो तिथं वस्तीतलं पण कोणी पाऊल टाकत नव्हतं, पण ही लोकं आली. रोज यायची. मग आम्ही ठरवलं." ती कमालीची कृश होती. पण दहा दिवसांपूर्वी याहून वाईट अवस्थेत होती. दहा दिवसांत त्यांचं रंग-रुप बदललं होतं. वजन वाढलं होतं. त्या वस्तीतली माणसं भरभरुन बोलली. मला सुनंदा आठवत होती. तिनं असंच संगम पुलाशेजारच्या वस्तीत खरूज झालेल्या मुलांना अंघोळ घालून, साफ पुसून घेऊन, औषध लावून दाखवलं होतं. तिनं पेरलेलं हे अस्सल दाणेदार बी होतं. त्याला ही आमची पोरं म्हणजे फुटलेले ताटवे होते. याच्याबरोबर उलट्या अर्थाचा कबिराचा दोहा आठवला-

'तूने बोया पेड़ बबुलका, आम कहाँसे आय?'

आम्ही बाभळीचं बी लावून आंब्याची वाट नव्हतो पाहत. आम्ही त्या बाभळीच्या रोपांना खतपाणी घालून खुरपणी करून एक चांगलं पूर्ण वाढलेलं बाभळीचंच झाड करु पाहत होतो. दुष्काळी भागातलं उपयुक्त झाड. जे शेतकऱ्याच्या औताला लाकूडफाटा देईल. जे शेताच्या कुंपणाला काटेरी फांद्या पुरवेल. शेळ्यांना खाद्य पुरवेल. झाड गेल्यावर त्याच्या सोटमुळाचं मुसळही होईल. असं ते झाड. आमची या वस्तीतली पोरं खुरटलेली, रोग पडलेली बाभळीची झाडं होती. आता ती फोफावायला सुरुवात झालेली. सुनंदा आणि मी मुक्तांगण सुरु करताना समाजातल्या ज्या थरापर्यंत पोहोचू पाहत होतो, तिथं आमच्या या पोरांनी आम्हाला आणून पोहोचवलं होतं. त्यांना याबद्दल कुठली पगारवाढ नको होती की पेपरात येणारं बोटभर नाव नको होतं, तरी जीव लावून ते काम करत होते. ते म्हणजे सुनंदाने पेरलेल्या बियाच जशा. त्यापासून आंबे न मिळोत, पण रखरखत्या उन्हाळ्यात, रेताड वाळवंटात ती टिकणारी झाडं होणं महत्त्वाचं.

मुक्तांगणमध्येही मला तसेच काहीसे दर्शन नेहमी घडते. शुक्रवारी ॲडमिशनचा दिवस. त्यापुढचे दोन-तीन दिवस काहींना खूप शारीरिक त्रास होतो. त्या वेळेला आमचे सिनियर मित्र या नव्या मित्रांची अशी काही काळजी घेतात की बघत राहावे. हे सगळं सुरु केलं बंधूने. त्याला आजही सगळे बंधू का म्हणतात? तर तो तेव्हा वॉर्डमधे राहायचा. कुणाला हाक मारायची झाली, तर बंधू, जरा हे काम करतोस प्लीज? बंधू, बंधू, करता करता त्यालाच ते नाव पडले. जुने पेशंट कधी भेटले की त्याच्या आठवणी निघतात, तेव्हा ते त्याला 'बंध्या' म्हणतात. आजचे पेशंट घरी जाताना सर्वांसमोर बोलतात, तेव्हा कुणी त्याला बंधुदादाही म्हणतं, तेव्हा या द्विरुक्तीची गंमत वाटते. जसं त्या वेळी संदीप चित्रेने खराटा-झाडू घेऊन 'मेन्टेनन्स टीम' सुरु केली होती, तसेच बंधूची ही विथड्रॉल टीम. व्यसन थांबवल्या थांबवल्या जो शारीरिक त्रास होतो त्याला विथड्रॉल सिम्प्टम म्हणतात. या क्षेत्रातले अगदी खेडूत, अशिक्षितही हा शब्द वापरतात. त्याला आनंद नाडकर्णीने सुचवलेला 'वियोग लक्षणे' हा चांगला, मला आवडणारा शब्द नाही वापरत. 'लई इथड्राल, लय म्हणजे लईच." त्या विथड्रॉलचा कुणाला काहीच त्रास होत नाही, तर कुणाला खूप होतो. त्यात दारुवाल्यांचा कमी त्रास, तर ड्रगवाल्यांचा जास्त. कधी उलट्या, जुलाबही. तर दारुवाल्यांना कधी कधी उशिरा 'हॅल्युसिनेशन्स'. (म्हणजे माणूस आभासमय जगात जातो आणि स्वतःचे, इतरांचे काहीही नुकसान करु शकतो. कित्येकदा जिवावरही बेतू शकते.), बंधू या काळात या सगळ्यांची अगदी धावून धावून सेवा करायचा. त्याचे पाहून वॉर्डातले चौथ्या, पाचव्या आठवड्यातले पेशंट मित्रही मदतीला धावून यायचे. ते करायचे ते सर्व करत. जुलाबामुळे पेशंटने कपडे खराब केले की एकजण ते उतरवतोय, लगेच बाथरुममधे जाऊन ते कपडे धुऊन टाकतोय, वाळत घालतोय, दुसरा त्याला पाण्याने स्वच्छ करतोय, तिसरा त्याला धुतलेल्या कपड्यांचा सेट आणून चढवतोय, अशी स्थिती. यात बंधू आघाडीला असे. त्याने सांगितलेली कामे धावत जाऊन इतरांनी करायची. कधी पेशंटचे या वियोग लक्षणात अंग खूप दुखते, विशेषतः पाठ. मग सीनियर पेशंट मित्र त्याचे हात, पाय, पाठ छान चेपून देणार. कुणी हॅल्युसिनेशनमध्ये गेला तर त्याला सांभाळणे फार अवघड. मग ते त्याच्या खाटेपाशी दोन-दोन तास पहारा करतात. कधी तो अपरात्री तटकन उठून चालायला लागला की मागून जाऊन त्याला थांबवावे लागे. त्याला याचे काही भानही नसे. कार्यक्रमात या सगळ्या गमती सांगून बंधू सगळ्यांना हसवत असे. मधली काही वर्षे बंधू नव्हता, तरी हे काम त्याच निष्ठेने, त्याच आत्मीयतेने चालू राहिले. आता ते तिसऱ्या-चौथ्या आठवड्यातले पेशंट आपण होऊन करतात. पहिल्या आठवड्यातली ही लक्षणं संपली की मित्र खडखडीत बरा होतो. दुसऱ्या आठवड्यात ॲडमिट झालेल्या पेशंटना केलेली मदत पाहतो आणि पुढच्या आठवड्याला तोही या टीममधे सामील होतो. जातेवेळी पेशंट बोलतात. त्या वेळी ते याविषयी भरभरून बोलतात. 'घरच्यांनीसुद्धा इतकी सेवा केली नसती इतकी सेवा इथल्या अनोळखी लोकांनी केली,' हे वाक्य मी जेव्हा जेव्हा ऐकतो तेव्हा मन भरुन येते.

अशी सेवा फार फार क्वचित पाहायला मिळते. ही अनोळखी लोकांची सेवा. त्याच्यापासून काहीही फायदा होणार नसतो, तरीही केलेली. या अपरात्री केलेल्या सेवेचे कुणी श्रेयही देणार नसते, तरीही. मुक्तांगणमध्ये ही माणसे बदलतात कशी? घरचे म्हणतात, "आम्ही सांगून थकलो, पण तो तुमचेच ऐकतो, ही काय जादू करता तुम्ही?" निरपेक्ष सेवेचा स्पर्श, हेच याचं उत्तर असू शकेल. आतापर्यंत आसपासच्या सगळ्यांनी सांगितलेलं असतं, की तू वाईट माणूस आहेस, तुझ्यामुळे तू स्वतःचं आणि आमचं नुकसान करून घेतलंस. त्याच्याही मनातनं तो उतरला गेलेला असतोच. आणि इथं ही सेवा करताना त्याला वाटत असेल, की मीही एक चांगला माणूस आहे. मी चक्क इतरांना उपयोग पडू शकतो. जे काम आजवर केलेलं नाही, अशी मी दुसऱ्याची सेवा करु शकतो, आणि तेही निरपेक्षपणे, अनोळखी माणसासाठी. सेवाक्षेत्रात अनेक लोक काम करतात. काहींचे ते उपजीविकेचे साधन असते म्हणून, तर काही त्यात नाव-सन्मान मिळतो म्हणून. तर काही पुण्य मिळते आणि मृत्यूनंतर त्याचा फायदा होतो म्हणूनही करत असतील. इथं तसं काहीच नसतं. आजवर कधी

सेवेचं वारंही ज्यांच्या अंगावरुन गेलं नाही अशा लोकांच्या जीवनात अशी ती झुळकीसारखी येते. भल्याभल्यांना वर्षानुवर्षे सेवा करुनही इतका विशुद्ध आनंद मिळत नाही, तो या जगाने टाकलेल्या-फेकलेल्या, ज्यांच्या हातून अनंत अपकृत्ये घडली आहेत अशांच्या वाट्याला तो यावा? काय जादू होत असेल त्याने! किती झपाट्याने त्यांच्या मनातली ढासळलेली स्व-प्रतिमा वर वर यायला लागत असेल! मी दुरुन या अनुभवाचा साक्षी आहे, पण इतक्या शुद्धतेचा मी धनी नाही.

आणि हेच वातावरण तिथं सर्वत्र, सर्वकाळ. तिथं प्रत्येक आठवड्याची बॅच असते. या बॅचला क्रमाक्रमाने सगळी कामे करावी लागतात. किचन ड्यूटी म्हणजे भाज्या चिरण्याचे काम. साफसफाईचे काम. भांडी ड्यूटी म्हणजे किचनमधली स्वयंपाकाची मोठमोठी भांडी घासण्याचं काम. एखाद्या वयस्कर माणसावर ही ड्यूटी आली, की पटकन त्यांना कोणी म्हणतं, “काका, सरा बाजूला. मी करतो तुमचं काम.” कुणी उदास बसला असेल तर दुसरा जाणार, विचारणार. खेळात, गाण्या-बजावण्यात त्याला ओढणार. किंवा ही गोष्ट वॉर्ड इनचार्जच्या कानावर तर नक्कीच घालणार. प्रत्येक वॉर्डचा त्यांनीच निवडलेला त्यांच्यातलाच एक मॉनिटर असतो, तो तर अशा गोष्टींची सतत देखरेख करत असतोच. एखादा पेशंट जेवत नसेल तर पूर्वी सुनंदा जाऊन विचारपूस करायची. ते काम आता पेशंट मित्र एकमेकांसाठी करु लागलेत. तिची माया अनेक मार्गांनी सर्वांपर्यंत झिरपलीय, ही किती छान गोष्ट!

एखादा पेशंट शारीरिक रोगांनी आजारी पडला, आणि त्याचे सर्व उपचार मुक्तांगणमधे शक्य नसले की आम्ही ससून किंवा इनलॅक्स हॉस्पिटलमध्ये त्याला हलवतो. त्याच्या नातेवाईकांना फोन, तार करुन बोलावून घेतो. मग ते त्या हॉस्पिटलमधे पोहोचतात. हे काम आता आफ्टर केअरमधले पेशंट सांभाळतात. फोनवरच मुक्ता सूचना देते. पेशंट त्या हॉस्पिटलमध्ये हलवला जातो. आमचे दोन पेशंट त्याच्यापाशी बसून राहतात. गावाहून लांबून येणाऱ्या नातेवाइकांना बऱ्याचदा वेळ लागतो, पण तरी तोवर बसून राहतात. नातेवाइकांच्या ताब्यात दिल्याशिवाय तिथून चहा प्यायलाही हलत नाहीत. ते नातेवाईक नंतर आम्हाला सांगतात, “काय तुमचे लोक! सख्ख्या भावासारखे बसून राहिले हो...” हे ऐकलं ही आमची छाती फुगून जाते. तो आजारी पेशंटही असा, की बरा झाल्यावर परत येऊन मुक्तांगणमधले उपचार पुरे करतो. कधी कुणा पेशंटच्या घरचं कुणी, अगदी आई किंवा वडील निधन पावतं. त्याला मधूनच मयतीला जावं लागतं. खरं तर या प्रसंगी एरवी तो भरपूर प्याला असता. पण तसे न करता दोन-चार दिवसांत तो पेशंट परत उपचारांसाठी येतो, तेव्हा सगळ्यांना धन्य धन्य वाटतं.

तर बंधूविषयी सांगत होतो. तो फार गुणी मुलगा. माझा अगदी लाडका. घरी यायचा. मी आरामखुर्चीत बसलो असेल, तर येऊन पायाशी, जमिनीवर बसायचा. मी त्याला खूपदा समोरच्या खुर्चीत बसायला सांगायचो. पण म्हणायचा, “बाबा, मला इथे छान वाटतं.” मुक्तांगण हे त्याचं घर, माहेर, सर्वस्व होतं. कुठली कला त्याला येत नाही असे नाही. त्याने पथनाट्य बसवलं आणि त्याचे शेकडो प्रयोग केले. चित्र काढतो, उत्तम खेळतो, लहान मुलांना छान खेळवतो, इत्यादी इत्यादी. पेटी चांगली वाजवतो, गाणी म्हणतो, पेशंटकडून म्हणवून घेतो. किती सांगावे! मला ओरिगामी प्रदर्शनात मदत करायचा. माझ्या वस्तूंना पुठ्ठ्याचा बेस तयार करणं, ती छान मांडणं, एवढंच नव्हे तर चार दिवस उभं राहून ओरिगामी करून मुलांना हसवणं, खेळवणं. त्यानं माझ्याकडून ओरिगामीची सुरुवातीची मॉडेल्स शिकूनही घेतली होती. मुक्तांगणमध्ये तो पेशंटना शिकवायचा.

त्या काळात सुमित्रा भावे-सुनील सुकथनकर हे नव्यानेच फिल्मच्या क्षेत्रात आले होते. सुमित्रा ही खूप वर्षांपासूनची मैत्रीण. विषय निघाला, मुक्तांगणवर फिल्म करु यात का? फक्त खर्च भागतील असे पैशाचे बजेट काढले. सुमित्राची मुक्तांगणमध्ये पहिल्यापासून ये-जा होतीच. तिला सर्व संकल्पना माहीत होतीच. त्या आधारे स्क्रिप्ट लिहिले. त्यात बंधूला हीरोची- एका ॲडिक्टची

भूमिका दिलेली. त्याचा तो स्वानुभव तर होताच, पण तो कसलेला नटही होताच. त्यामुळे त्याने जीव ओतून भूमिका केली. मुक्तांगणमधे पंधरा दिवस अहोरात्र शूटिंग चालले होते. सर्व पेशंट-स्टाफ यात चोवीस तास सामील. शूटिंग चालू असताना सुमित्रा म्हणाली, "तुमची काय पोरं आहेत! माइकचा दांडा हातात धरून तो किती वेळ उभा आहे, न कंटाळता." शूटिंग संपले. नंतर ती 'मुक्ती' नावाची फिल्म आम्ही पथनाट्यानंतर जागोजाग दाखवली. मुक्तांगणमधे प्रत्येक बॅचला दाखवण्याचेही रुटीन बसून गेले. शूटिंग संपल्यावर पेशंट म्हणाले, "बाबा, असंच सारखं काढा काही तरी. ही थेरपीच आहे. आम्ही असेच बरे होऊ."

शूटिंग संपले की बंधूचा उत्साही धबधबा परत त्याच वेगाने. बंधू म्हणजे मला मुक्तांगण चालवू शकणाऱ्या पुढच्या पिढीचा प्रतिनिधी वाटायचा. पण बंधूमधे एक मोठा दोष, म्हणजे त्याच्यात सातत्य नसे. तो उत्तम असेल तेव्हा सर्वोत्तमच, पण भरवसा नाही. त्या सगळ्याला एक 'जर-तर'ची किनार होती. जर तो चांगल्या मूडमधे असला तर हे सगळं. जर नसेल तर मग त्याची चिडचिड व्हायची. ज्या पेशंट्ससाठी जिवाची बाजी लावायचा, न ऐकलं की त्यांच्यावर ओरडायचा. बेभान व्हायचा. त्याच्या अजोड प्रेमामुळे मित्र त्याचे सर्व अपराध पोटात घालत. कित्येक गोष्टी आमच्यापर्यंत येऊ देत नसत. पण त्याची फेज बदललेली आम्हा सगळ्यांना कळायचीच. एरवीचा मान खाली घालून ऐकणारा आता वाद घालू लागायचा. त्याची बुबुळेही आडव्या बाजूला हलायची. तो एक प्रचंड ऊर्जास्रोत होता. योग्य रीतीने बाहेर आला तर सेवेची जनित्रे चालायची, आणि उलट, भलतीकडून ती बाहेर पडली, तर नुसती सर्वत्र मोडतोड.

मग त्याला आम्ही सांभाळून घेत असू. सर्वत्र निरोप जात असे, बंधूचा 'बॅड पॅच' सुरु झालाय. पेशंट, इतर स्टाफ मेंबर संयम राखत. मी त्याला बोलावून घेत असे आणि सांगत असे, "बंधू, खूप दमलास. तू एक महिनाभर घरी राहून विश्रांती घे. फ्रेश झाल्यावर ये. मुक्तांगण तुझंच आहे.' तो खूपदा 'कशाला, कशाला' करायचा, पण मी त्याला पाठवायचोच."

दोन-तीन दिवसांनी मुक्तांगणमधे बागेत कुठे तरी उभा असायचा. बहुधा तोंड लपवत. मग कधी तरी समोर यायचा, मान खाली घालून म्हणायचा, "बाबा, घरी करमत नाही. येऊ का?"

मी म्हटलं, "अरे, पुरती विश्रांती घे ना."

"नाही नाही. माझी चूक मला कळली. मी परत ती करणार नाही." पाण्याबाहेर मासा पडल्यावर जशी परिस्थिती होती, तशी त्याची झालेली. मग मी "चल जा, कामाला लाग" म्हटलो की धावतच सुटायचा, त्याच्या आनंदनिधानाकडे, म्हणजे वॉर्डाकडे.

ही जशी युक्तीच सापडली. असाच एक मुधोळकर खूप चांगलं काम करणारा. पण त्याला खोटं सहन व्हायचं नाही. मुक्तांगणची शिस्त कुणी मोडलेली त्याला चालायचे नाही. मग तो रागाने बेफाम व्हायचा. चार-पाच लोकांना त्याला आवरावे लागे. म्हणजे कारण बरोबर, पण रागाचा उद्रेक होणं अनावश्यक, घातकही. त्यालाही अशा प्रसंगानंतर घरी पाठवायचो. पगाराचा चेकही घरी पोहोचवला जायचा. पण नंतर यायचा तो बदललेला मुधोळकर. कुणी चूक केली की त्याची शिक्षा म्हणजे (किंवा खरं तर बक्षीस) त्याला भरपगारी रजा. हे कुणाला अजब वाटेल.

मुधोळकरसारख्या पेशंट मित्राला सुनंदा एकीकडे सायकियाट्रिस्टच्या गोळ्याही देत असे. तिचा जरी भर माणुसकी, मायेने रागावणे, वागवून घेणे यावर असला, तरी तिची सायकियाट्रिस्टची नजर शाबूत होती आणि ज्यांना आवश्यक त्यांना ती तशा गोळ्या देऊन उपचारही सुरु करायची. हे या कानाचे त्या कानाला कळत नसे. हे तिच्यात आणि त्या मित्रापुरतंच असे. त्याने गोळ्या बंद केल्या की रागाचे उद्रेक सुरु व्हायचे. मग परत गोळ्या सुरु करून गाडी रुळावर आणायची. सुनंदा गेल्यावर मुधोळकर आनंदकडे जाऊ लागला. आनंद म्हणाला, "सुनंदाची ती ट्रीटमेंट इतकी परफेक्ट होती,

की इतकी वर्षे लोटली तरी त्याला तिची मी अजून तीच गोळी ठेवली आहे." नायर किंवा त्या वेळच्या बऱ्याचजणांना व्यक्तिमत्त्वाच्या घडणीतले प्रॉब्लेम्स होते. त्यांना ती समजावून घ्यायची. गैरवर्तनाबद्दल कोणीही रागावेल, शिक्षा करेल; पण ती तसं करायची नाही. कारण तिला माहीत होतं, की हा व्यक्तिमत्त्वातला कच्चेपणा आहे. त्यासहित चालायला हवं. त्यांना तिने असे वागवून घेतले, की 'बॅड पॅच' वगळता ती मुलं उत्साही, धावून काम करणारी चांगली मुलं असायची.

तर चुका करणाऱ्यांना शिक्षेऐवजी विश्रांती देणे, हे तत्त्व आमच्या मॅनेजमेंटमधे रुजू झालं. आनंद नाडकर्णी याला विनोदाने 'बाबाची मॅनेजमेंट मेथड' म्हणतो. तो इंडस्ट्रियल मॅनेजमेंटचे प्रोग्रॅम्स घेतो. अगदी बड्या बड्या कंपन्यांचे बडे बडे सी.ई.ओ.ज त्याचे विद्यार्थी असतात. त्यांच्या मॅनेजमेंट भाषेत, शैलीत तो त्यांना धडे देतो. त्याला आम्ही मॅनेजमेंट गुरूच म्हणतो. त्याने असे म्हणावे? कधी एखादा स्टाफवरचा मित्र दुसऱ्याला त्रास होईल असे वागत असतो. कधी शिस्तीबाहेरचेही. अशांना मुक्ता 'आता बाबालाच भेट' असे सांगते. मला ती तसं सांगून ठेवते. मी बसतो त्या खोलीबाहेर तो घुटमळताना दिसतो. मी त्याला बोलावतो. "काय मित्रा, कसा आहेस, काय काम नवीन चाललंय, बायको-मुलं काय करताहेत?" असं विचारतो. थोड्या गप्पा मारतो आणि सांगतो, "मित्रा, आता जा तुझ्या कामाला. मधनं मधनं येत जा भेटायला." तसा तो जातोही. मुक्ता नंतर मला विचारते, "मग काय, सांगितलं का त्याला?" मी म्हणतो, "अगं, त्याला समजलेलीच होती चूक. मग कशाला सांगायचं?" ती बऱ्याचदा हात जोडते. कधी बजावून सांगते, की ही चूक अमुक मित्र परत परत करतो आहे. त्याच्याशी त्याच्यावरच बोल. मग तो मित्र येतो. समोर मान खाली घालून बसतो. मीच बोलणं काढतो. "मित्रा, अरे अशी चूक पूर्वी अनेकदा माझ्याकडूनही झालेली आहे. परत परत झालेली आहे. (त्याची काही उदाहरणे सांगतो.) मला कळायचं, की त्यामुळे इतरांना त्रास होतो." मग ती चूक दुरुस्त करायचा मी कसा प्रयत्न केला, वगैरे सांगायचो. तो मित्र हात जोडून म्हणायचा, "बाबा, माझी चूक समजलीय. परत नाही होणार." आणि खरोखरच परिणाम नंतर दिसायचाही.

हेच मी त्याची चूक सप्रमाण दाखवली असती तर? प्रत्यक्ष किंवा मनात म्हणाला असता, ती चूक नाहीच, किंवा एकदा चुकी झाली तर एवढं का बोलता? किंवा माझ्या चुका दिसतात, पण मी केलेले काम दिसत नाही, वगैरे. माझ्या बोलण्यानं तसं होत नसावं. त्याची उपक्रमशीलता, त्याचा उत्साह याला धक्का तर नाही लागला पाहिजे. कारण ती कामाच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट. पण चूक तर दाखवायला हवी. मग मी ती चूक माझ्याच अंगावर घेतो. आपण केलेल्या चुकांचा भरपूर स्टॉक आपल्यापाशी असतोच. आणि खरोखरच, आपण सगळे चुका करीत असताना या खुर्चीत मी बसलोय म्हणून मी बरोबर, असं कसं म्हणता येईल? आत्मविश्वास, मैत्री, कामाचा उत्साह कायम ठेवून चूक सुधारता आली तर बघायचं. 'कासया पहावे, दोष आणिकांचे, मज काय त्यांचे कमी असे' हे तुकारामाचे वाक्य अगदी मनावर बिंबवावेच आपण. यात कसली आलीय 'बाबाची मॅनेजमेंट'? हे घराघरांत घडत आलेलं आहेच. आईनं आपल्या किती चुका पोटात घातल्या असतील! आणि त्या परत परत करूनही? मग मुक्तांगण हे घरच आहे की!

खरंच, मुक्तांगण हे घर आहे, म्हणून किती सोपं झालंय सगळं! सुनंदा असताना तिचं आईपण होतं. आता मी आपोआप बाबा झालो आहे. मुक्ता-यशो मला बाबा म्हणतात म्हणून इतरही बाबा म्हणू लागले. राजाराम शेजारीच राहतो. तोही यशो-मुक्तासारखं मला 'ए बाबा' म्हणतो. तो मुक्तांगणमध्ये असल्याने हे माझं ए बाबा नाव तिकडंही गेलं आणि सगळ्यांचाच मी बाबा झालो. ते नातं, ती जबाबदारी मला निभवावीच लागलं. बंधूचे वडील रस्त्यावर चक्कर येऊन पडले आणि गेलेच. त्यांना उचलून जवळच्या हॉस्पिटलमधे नेलं. मी होतो तिथून तसाच पोहोचलो. बंधू, त्याची आई, भाऊ, सगळे पोहोचलेलेच होते. जाताना बंधू रडतच म्हणाला, "आता तुम्हीच माझे बाबा." हे बापपण फार अवघड, कारण त्याच्या मानसिक हेलकाव्यांमध्ये आपलंच मनःस्वास्थ्य सांभाळणं

ही एक कसरत असते. पण कधी तरी त्याच्या त्या वाक्याची मी आठवण करून देतो. त्याच्या त्या जोरदार प्रवाहात ते वाक्य शिरते आणि बऱ्याचदा ते थेट पोहोचतेही.

पथनाट्यामध्ये तो खूप जीव ओतून काम करायचा. ते पथनाट्य त्यानेच लिहिलेले, बसवलेले. घसा बसेपर्यंत एकामागोमाग प्रयोग करायचा. पथनाट्य झाले की लोक चौकशी करत, फोन नंबर-पत्ता घेत. बंधू माहिती सांगे. सांगताना ती एक वेगळीच सभा होत असे. अनेकजण अशी माहिती घेऊन उपचारांसाठी आलेले आहेत. हे नाट्यगुण त्याच्यात कुठून आले? तो दादरचा. छबिलदास नाट्य चळवळीत, शिबिरात जात असणार. बंधूचे पथनाट्यातले फोटो पेपरात येत. मुक्तांगण म्हणजे बंधू, असे समीकरण. नाशिकला आमचा व्यसनमुक्ती सप्ताह झाला होता. तिथं बंधू आणि मित्रांनी सात दिवसांत अठ्ठावीस पथनाट्ये केली होती. काय म्हणावे? अर्थात पथनाट्यानंतर तिथं सभा व्हायची. तिथं पोलिस अधिकारी पाटीलसाहेब, मी बोलायचोच. पण माइकवर बोलणं वेगळं आणि घसा फोडून माइकशिवाय अभिनय करणे वेगळे. कुसुमाग्रज समारोपाच्या सभेचे अध्यक्ष. त्यांनी मला अशा शब्दांत गौरवले की सांगणे अशक्य आहे. हा गौरव खरं तर सुनंदाचा, तिच्या सर्व सहकारी पेशंट मित्रांचा. मला हे चांगले शब्द झेलताना शरमल्यासारखे वाटले.

तर बंधूचं सांगत होतो.

त्याच्या 'बॅड पॅच'मध्ये तो दुसऱ्या टोकाला जाऊन म्हणत असे, "मी इथं कुजतो आहे. मलाही महत्त्वाकांक्षा आहेत. मला नाटकातून, सिनेमातून भूमिका करायच्या आहेत." हे माझ्या कानावर आल्यावर मी म्हटलं, "मित्रा, आम्हाला तू हवा आहेस, पण तुझं नुकसान व्हावं अशी इच्छा नाही. तू मुंबईला जा, पुण्यातही भेटाभेटी कर. तुला मी सहा महिन्याची भर पगारी रजा देतो, मग तर झालं? तुला संधी मिळाली तर उत्तमच. समजा, नाही मिळाली, तर हे घर तुझंच आहे." तो तसा गेला; पण तिथं त्याचं जमलं नसावं.

मधल्या बॅड पॅचमध्ये परत व्यसनाकडे वळला. दोन-चार गचके खाल्ल्यावर आता परत तो जाग्यावर आलाय. त्याचा चेहरा अगदी फ्रेश आहे. तो मुक्तांगणमधे तर काम करतोच, पण इथे राहून एका जिममधे इन्स्ट्रक्टरचे पार्ट टाइम काम करतो. परत काही दिवसांतच पेशंट मित्रांचा लाडका बंधू दादा झालाय. आम्ही सगळे सावधपणे त्याची प्रगती पाहतोय.

■

४

आता थोडा विषय बदलू. मुक्तांगणच्या संस्थात्मक बाबतीत बोलायचं?... तर पु. ल. फाउंडेशनतर्फे देणगी मिळाली होती. ती संपत आली होती. सरकारने आता हा उपक्रम 'टेकओव्हर' करायला हवा होता. त्या बाबतीत जो जो प्रयत्न करावा, तो तो एकच शब्द, खरे तर दोन शब्द भिंतींसारखे पुढे येत होते 'झीरो बजेट'. सरकार कुठलीही नवी जबाबदारी स्वीकारणार नाही, कुठलाही नवा खर्च सुरु करणार नाही. मग ड्रगसारखे नवे प्रश्न उभे राहिले तर? मग काय करायचं? त्यांना हे झीरो बजेट माहीत नसतं. तरीही उत्तर तेच : झीरो बजेट. त्या वेळी डी.टी. जोसेफ नावाचे आरोग्य विभागाचे सचिव होते. ते खूप चांगले होते. तत्त्वाने चालणारे होते. आरोग्य विभागाचा चार्ज घेण्यापूर्वी ते चेन-स्मोकर होते. इथं आरोग्य विभागात काम करायचं तर सिगारेट सोडली पाहिजे. म्हणून त्यांनी ती सोडली. बराच त्रास झाला. एकदा तर ऑफिसमधे चक्कर आली. पण तरीही त्यांनी ते रेटले आणि मुक्त झाले. त्यांना आमच्या कामाची चांगली माहिती होती. पण या झीरो बजेटमुळे हात बांधलेले. त्यांनी समाजकल्याण विभागाच्या सचिव श्रीमती शशी मिश्रा यांना हे सांगितले. त्यांनी यांना सांगितले, की ते केंद्र सरकारकडे अर्ज का करीत नाहीत? त्यांच्याकडे यासाठी स्कीम आहे. हा विषय त्यांच्याच अखत्यारीतला आहे. मग त्यांनी दिल्लीला फोन लावला. तिथे आशा दास नावाच्या जॉइंट सेक्रेटरी होत्या. त्यांनी त्या स्कीमचे फॉर्म्स पाठवून दिले. आमच्याकडे ती माहिती, फॉर्म्स येऊन पडले. पण त्या दरम्यान मी चार महिने अमेरिकेत गेलो होतो. आल्यावर ते पेपर मी वाचले. सुनंदा म्हणाली, "आपली पद्धत वेगळी आहे, त्यांची स्कीम वेगळी. स्कीम त्यांची पेशंटला सात दिवस ठेवण्याची आहे, आपण दीड महिना ठेवतो. नंतर अडचणी यायला नकोत." मला ते पटत नव्हते. म्हणालो, "शशी मिश्रांना भेटून तर येतो."

तसा मंत्रालयातल्या त्यांच्या ऑफिसात गेलो. त्या गोऱ्या, चष्मा लावलेल्या प्रसन्न चेहऱ्याच्या बाई होत्या. त्या म्हणाल्या, "अहो, तुम्ही घेऊन टाका ही स्कीम. काय प्रॉब्लेम येतील ते नंतर सॉल्व्ह करता येतील. आणि तुम्ही जास्त काम करताय. स्कीमपेक्षा जास्त काम करायला तुमचे हात कुणी बांधलेत?"

नंतर मार्चमधे काही लाखांचा चेक एक येऊन धडकलाच. हादरूनच गेलो. ते पैसे नोव्हेंबरपासून दिलेले. त्यांच्या स्कीममधे दाखवलेली इतकी माणसे आम्ही नेमलेली नव्हती. जी काम करत होती, त्यांना आम्ही चेक दिले. ते म्हणाले, "आम्ही काम करत होतो ते स्वतःसाठी." त्यातल्या बहुतेकांनी देणगी रूपाने संस्थेला परत दिले. एप्रिलपासून ते पगार घेऊ लागले. बरेचसे पैसे आम्ही केंद्र सरकारला परत पाठवून दिले. बाजूची अनेक व्यवहारी माणसे म्हणत होती, "नुसती नावे टाका, सह्या घ्या कुणाच्या तरी. संस्थेला मिळालेले पैसे असे हकनाक परत का पाठवता? ते पैसे त्यांचे तरी कुठे आहेत?" वगैरे. पण तरीही आम्ही पुढची काही वर्षं जेवढा स्टाफ तेवढाच दाखवून पैसे परत करत राहिलो. नंतर अशा संस्थांमधून काम करणारांची ओळख, मैत्री झाली. दिल्लीवाले मित्र म्हणाले, "डाक्टरसाब, ग्रांट वापस मत भेजो। नहीं तो अगले साल कम ही ग्रांट भेजेंगे। कोई नाम डालो, कौन देखता है? इधर दफ्तर में इतनी ढेर फाइल्स पड़ी हैं, किसको समय है डीटेल्स देखने को?"

पण त्यांचं ऐकलं नाही, आणि बावळट राहिलो ते बरंच झालं. जसं काम वाढत गेलं तशी ग्रँट वाढत गेली. पण त्या वेळी ती केवढी मोठ्ठी वाटली, ती आता तशी वाटत नाही. पहिल्या ग्रँटच्या वेळेला ३१ मार्चच्या आत खर्च करायचा, म्हणून भराभरा फर्निचर घेतले. कॉट्स, गाद्या-उशा घेतल्या.

दवाखान्याचे सामान घेतले. वगैरे वगैरे. पूर्वी आम्ही दोनशे रुपये पगार द्यायचो. आता ग्रँटमुळे दीड ते तीन हजार देऊ लागलो. सगळ्यांची बँकेत खाती काढली. पहिल्या वर्षी अडाणीपणाचा कारभार होता. चार्टर्ड अकाउंटंटने कान उपटल्यावर मग शंभर टक्के व्यवहार चेकने सुरू केले. अगदी पेपरवाल्याचे बिलही. मग त्या सी.ए.ची संस्थेवर मर्जी बसली ती आजपर्यंत.

केंद्र सरकार हा वेगळाच प्रकार. किती तऱ्हेच्या कागदांची गरज असायची! ते सर्व पाठवायचो. म्हणूनच त्यांचे पत्र यायचे, 'तुमच्या प्रोजेक्टमध्ये अमुक डॉक्युमेंट नाही.' परत ते पाठवायचे. एकेका वर्षात तीनतीनदा, कधी चारचारदा सर्व कागदांचे सेट्स पाठवले तरी ३१ मार्चच्या तोंडावर तसंच एखादं पत्र येणार, की गेली ग्रँट पुढच्या वर्षावर. मग वर्षाच्या सुरुवातीला प्रत्यक्ष जाऊन त्यांना फाइलमधला एकेक कागद दाखवून 'आता झाले' म्हणून त्यांनी सबमिट करून घेतली. तरीही आधीच्यासारखी पत्रे येणे चुकत नसे.

एरवी दिल्लीला जायचे म्हणजे छान वाटायला पाहिजे. पण मी अक्षरशः पाय ओढत जात असे. 'शास्त्री भवन' नावाची खास सरकारी इमारत होती. बाकीच्या विभागांची भवने भव्य, पॉश. आमचं हे गरीबडं. तिथं वर जाणं हे दिव्य. गेल्यावर काय!... पहिली वेळ आठवतेय. त्या हॉलमध्ये गच्च टेबले, त्यावर गच्च फायली, मागे मांडण्यांमध्ये तशीच गच्च गच्च ओणवती कागदपत्रे...मध्ये टेबलावर एक माणूस काही तरी काम करीत होता. त्यांच्याच सहीने ती दमदाटी पत्रे येत. मी उभ्याउभ्याच सांगितले, नाव, संस्थेचे नाव, पुण्याहून आलोय वगैरे. पण मला त्याने समोरच्या खुर्चीत बसाही म्हटले नाही. मान वर करून बघितले नाही. 'क्या है?' असे विचारले. 'तुमच्या पत्राप्रमाणे हे डॉक्युमेंट आणले आहे,' असे मी सांगताच कागदांनी भरलेल्या ट्रे कडे बोट दाखवून 'रखखो उधर' म्हटले. मी धाडस करून विचारले, "आणखी काही डॉक्युमेंट्स हवी आहेत का? मी आणली आहेत." ते म्हणाले, "जब हम लिखेंगे तब भेजना।" बास, झाले आमचे संभाषण.

मग दिल्लीवाल्या इतर संघटनांची ओळख झाली. एका मित्राने सांगितले, "तिथं जाऊन आपण आपली फाइल शोधून काढायची. त्यात आपले डॉक्युमेंट आपणच फाइल करायचे, तेव्हा ते काम पुढे सरकेल." एका मित्राने तर सांगितले, की आपण पाठवतो ते लखोटे खाली, रिसेप्शनपाशी येऊन पडतात. कोणी तरी लिफ्टने ते पोते ओढत ओढत वर नेतो. वाटेत कुठंही लखोटे पडू शकतात.

पुढे पुढे या सगळ्याची सवय झाली. दिल्लीतला एक संस्थाचालक राजेश कुमार, तो चांगला मित्र झाला. त्याची अशा आमच्यासारख्या संघटनांची 'फिंगोर्डप' ही फेडरेशन होती. आम्ही मग प्रोजेक्ट, कागदपत्रे राजेशकडे पाठवू लागलो. तो ते चेक करून प्रत्यक्ष जाऊन सबमिट करायचा. त्याची पद्धतही आक्रमक. गोड बोलायचा, पण स्वतः त्या ऑफिसात जाऊन फाइल शोधून काढायचा. योग्य ठिकाणी तो कागद फाइल करायचा. क्लार्कच्या 'भाईसाब, इधर साइन करना' म्हणून सह्या घेऊन पुढच्या माणसाच्या टेबलावर ठेवणार. हे असे धाडस माझ्याच्याने जन्मात झाले नसते.

पुढे राजेश, चेन्नईची शांती रंगनाथन, राजस्थानचे बलकालाव, वगैरे शास्त्रीभवनमधल्या एका मीटिंगसाठी दिल्लीत आलो होतो. मीटिंगनंतर बलकालावांच्या राजस्थान भवनवर गेलो. चहा पिता पिता म्हणालो, "असेच आपण सगळे प्रतिनिधी जमू यात का एकदा?" सगळ्यांनी उत्साहाने होकार भरला. मी आणखीच उत्साहाने म्हणालो, "मग पहिली मीटिंग पुण्याला. आम्ही करू सगळी व्यवस्था." तसे फिंगोर्डपचे पहिले अधिवेशन पुण्यात घ्यायचे ठरले. वसंत गोवारीकर त्या वेळी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु होते. त्यांनी विद्यापीठातली सर्व जागा दिली, सोयी उपलब्ध करून दिल्या. सुटी असल्यामुळे अगदी वसतिगृहही. जयंत नारळीकरांनी महत्त्वाच्या लोकांसाठी आयुकाचे गेस्ट हाऊस उपलब्ध केले. शशी मिश्रा आता 'यशदा' (यशवंतराव चव्हाण ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इन्स्टिट्यूट)च्या डायरेक्टर होत्या. त्यांनी काही आरामदायी गेस्ट हाऊसेस दिली. नामदेव सभागृहात

अधिवेशन झाले. भारतातून सर्व भागांतून तीनशे प्रतिनिधी आले. दिल्लीतल्या आमच्या विभागाचे जॉइंट सेक्रेटरी आनंद बोर्डिया व सर्व सहकारी आले. पहिल्यांदाच सरकार आणि संस्था एकत्र आले. आम्हा सगळ्यांना सरकारी यंत्रणेच्या अडचणी कळल्या. सगळ्या भारतातल्या तीन-चारशे संस्थांचे काम करायला फक्त दोन क्लार्क. ते कसे हे सगळे रेटणार? त्यांनाही आम्ही काय काम करतो, त्यात किती मोठे आव्हान असते ते कळले. एरवी त्यांच्या लेखी आम्ही म्हणजे कागद भरलेल्या फाइल्स होतो.

तो मुक्तांगणने आयोजित केलेला राष्ट्रीय पातळीवरचा पहिला 'इव्हेंट' होता. मुक्तांगणची मुलं उत्कृष्ट टीम म्हणून राबत होती. आनंदने सर्व मॅनेजमेंट केली होती. पाहुणे ज्या खोल्यांमध्ये उतरणार त्या प्रत्येक खोलीत सर्व सुखसोयी ठाकठीक आहेत की नाहीत ते आमची मुले तपासून पाहत होती. स्टेजवरही आनंदचे आयोजन इतके व्यवस्थित, नेमके आणि आकर्षक होते, की पाहणारे सगळे थक्क झाले. आनंद बोर्डिया मला म्हणाले, "काय माणूस आहे हो हा! कुठून मिळवलात?" मी म्हटलं, "तो सुनंदाचा लाडका मुलगा आहे. आम्ही त्याला कसे मिळवणार? त्यालाच आम्ही मिळालोत."

एका संध्याकाळी आम्ही या सगळ्या पाहुण्यांना मुक्तांगणला आणले. काय ती संध्याकाळ... सगळे किती रमले... पेशंटनी किती उत्साहाने त्यांची ऊठबस केली...सर्व पाहुणे मंडळी मुक्तांगणभर घोळक्याघोळक्यांनी बागडत होती. पेशंटभोवती घोळके जमायचे. पेशंट त्यांना उत्स्फूर्तपणे इथला दिनक्रम, ॲक्टिव्हिटीज, मिळणारे प्रेम वगैरे सांगायचे. सगळे एकत्र जमले तेव्हा सगळ्यांची मनं तृप्त झाली होती.

एरवी मी दिल्लीच्या मिनिस्ट्रीच्या मीटिंगमध्ये क्वचित बोलणारा. त्यामुळे नगण्य. पण आता हे काम पाहून सगळे थक्क झालेले. स्कीममध्ये सात दिवस पेशंट ठेवायचे, इथं पाचपट अधिक दिवस. शिवाय स्कीममध्ये नसलेले अनेक उपक्रम. हस्तलिखित 'मनोगत' नावाचे मासिक. पेशंट पत्नींच्या 'सहजीवन' सभा, पेशंटच्या मुलांसाठी 'अंकुर' उपक्रम, असे बरेच काही. बोर्डिया म्हणाले, "डाक्टसाब, आप इतना काम करते हैं तो रिपोर्ट क्यूं नहीं करते?"

मी म्हणालो, "आपले फॉर्म्स भरून पाठवतो की."

ते म्हणाले, "पण हे त्याबाहेरचं इतकं काम..."

मी म्हटलं, "आमचे बाप म्हणजे महर्षी कर्वे वगैरे. त्यांनी आम्हाला शिकवलंय, की स्वतःच्या तोंडाने आपलं काम कधी सांगू नये. कामाने बोलावं."

आनंद बोर्डियांची माझी चांगली मैत्रीच झाली. त्यांना चांगली दूरदृष्टी होती. त्यांनी या स्कीमची पुनर्रचना करायचे ठरवले आणि त्यासाठी आम्हा सगळ्यांची कमिटी बनवली. मग आम्ही सुधारणा सुचवून अनेक बदल केले. येवढंच नव्हे, तर भारतातल्या चार उत्तम चालणाऱ्या संस्था निवडल्या (त्यात मुक्तांगणचा पहिला नंबर). त्यांच्यावर त्या भागातल्या व्यसनमुक्ती केंद्रांना मदत करणे, त्यांच्या अडचणी सोडवणे, त्यांचे इन्स्पेक्शन करणे अशी कामे सोपवली. त्या चारांत आणखीही २-३ संस्थांची भर पडली. आमच्याकडे गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमधील व्यसनमुक्ती केंद्रांचे नियंत्रण, संगोपन, अभ्यास हे काम आले. याला एक नाव मिळाले, आर.आर.टी.सी. (रिजनल रिसोर्स अँड ट्रेनिंग सेंटर). यानंतर मात्र केंद्र सरकारची दृष्टी खरोखरीच बदलली. लोकांना बरोबर घेऊन चांगला कारभार करता येतो, हे बोर्डिया आणि इतर अधिकाऱ्यांनी दाखवून दिले.

पण खरोखरच इतक्या कागदपत्रांची जरुरी असते का, हा प्रश्न पडतोच. काम न करणारे मात्र कागदपत्रं तत्परतेने पुरवणारे असतात, आणि ते यंत्रणेला चालते. यावर उपाय म्हणजे इन्स्पेक्शन. प्रत्यक्ष कामाची पाहणी, तपासणी करणे. पण आलेल्या माणसांना हे स्मार्ट लोक व्यवस्थित मॅनेज

करतात. आणि काम करणारे नेहमीच अडचणीत येतात. यंत्रणेला पैसे न देणे म्हणजे उद्धटपणा समजला जातो. या सगळ्यात आम्ही ठरवले, योग्य मार्गाने जाता येईल तेवढे जायचे. अशक्य झाले तर काम थांबवायचे. पण तशी वेळ आली नाही. यंत्रणेतली चांगली माणसे मित्र झाली. काहींना या कामाचे महत्त्व कळले म्हणून तेही अपेक्षा करीनासे झाले. थोडक्यात, आपण नेटाने काम करत राहिलो तर संस्थेचीही इज्जत तयार होत असते, हे कळले. एक असेच 'चांगले' अधिकारी म्हणाले, "खोट्यालासुद्धा खऱ्याचं स्वरूप द्यावं लागतं, हासुद्धा आपला विजयच आहे." हो, नाही तर या लोकांनी देश एव्हाना विकून खाल्ला असता.

असे प्रामाणिक अधिकारी, क्लार्क, अगदी शिपाईही अनेक ठिकाणी भेटत गेले. त्या सगळ्यांनी मुक्तांगणच्या कामाला हातभार लावला. कुठलंही काम 'मी' उभं केलं, असं कुणी म्हणूच नये. ते जर नावारूपाला आलं असेल, तर ते अनेकांचे हात लागूनच झालेलं असतं. आज मला अरुण घाटेची आठवण येते. अरुण हा आमची त्या वेळची सचिवालयातली कामे सांभाळायचा. तो तसा अबोल होता. मित्रही मर्यादित. पण कामाला स्वच्छ. साहित्याची चांगली जाण. कविता लिहायचा. पुस्तकाची मांडणी (ले-आऊट) करायचा. त्या काळी मराठी क्षेत्रात तसे करणारा तो दुर्मिळ असावा. देवीदास बागूल हे त्यातले पायोनियर. काही पुस्तकांवर छापलेलं असायचं, मांडणी : अरुण घाटे. मी त्याला म्हणायचो, ही मांडणी कोण? मुलगी की बायको? त्या सचिवालयाच्या कागदगच्च वातावरणात अरुण हा माझं एक ओयासिस होता. शासनाकडून काही दमदाटी पत्र आलं की आम्ही धावायचो अरुणकडे. तो ते वाचत असताना डॉक्टरकडे पाहावं तसं मी त्याच्याकडे पाहायचो. तो शांतपणे ते बाजूला ठेवायचा. म्हणायचा, "यात काही अर्थ नाही. आपण उत्तर देऊ." कधी म्हणे, "मी त्या कन्सर्ड माणसाशी बोलेन. तू काळजी करु नको."

त्या काळात पहिल्यांदाच कळले, संस्थांचे प्रतिनिधी ऊर्फ पी.आर.ओ. असतात. मुंबई लेव्हलला आणि दिल्ली लेव्हलला. मला अरुण म्हणायचा, "तुम्ही कोणी तरी सतत मंत्रालयात यायला पाहिजे, भेटायला पाहिजे. आमच्यापुढं इतके कागद येत असतात आणि जात असतात. आठवण ठेवून काम करणं होत नाही. फॉलोअप, पी. आर. कमी पडतोय तुमचा."

मी म्हटलं, "नेमलाय ना आम्ही एक पीआरओ."

तो म्हणाला, "आं? भेटला नाही मला कधी."

मी हसून म्हणालो, "अरे, तूच तो! तुलाच नाही का आम्ही नेमलं?" इस बातपर आम्ही खाली जाऊन गाडीवरचं मेवाडचं आइस्क्रीम खाल्लं आणि खाता खाता खूप हसलो.

अरुणला एकदा म्हटलं, "ही शासनाकडनं अमुक त्रुटी तमुक त्रुटीची कोरड्या, दमदाटी भाषेत पत्रं येतात. एकदा तरी असं का पत्र येत नाही, की 'तुम्ही हे छान काम करीत आहात.' कधी शाबासकीचं, प्रोत्साहनपर असं का पत्र येत नाही?" तो मान हलवून म्हणाला, "आमच्याकडून तू ती अपेक्षाच करू नकोस. वुई आर नॉट ट्रेंड फॉर दॅट. आम्हाला एवढंच शिकवलंय, की समोर येणाऱ्या कागदातील फॉल्ट (त्रुटी) शोधायचे आणि समासात किंवा खाली ती नोट लिहून कागद पुढं ढकलायचा."

अरुण क्लार्क होता, त्याचा हेडक्लार्क, पुढे ऑफिस सुपरिंटेंडेंट झाला. नंतर तो अंडरसेक्रेटरी झाला. त्याला त्या यंत्रणेतल्या सगळ्या खाचाखोचा माहीत होत्या. पण एवढ्या वर्षांत तो 'सरकारी' माणूस झाला नाही. आरोग्यखात्याकडे ज्या ज्या नव्या योजना यायच्या (उदा. अंधत्वनिवारण, एड्स, व्यसनमुक्ती) त्या त्याच्या या बिनसरकारीपणामुळे त्याच्यावरच सोपवल्या जायच्या. त्याने त्या वेगळ्या, अभिनवतेने राबवल्या. मात्र त्याने अतिशय विपरीत रीतीने आत्महत्या केली. मला, आम्हा सगळ्यांनाच तो एक मोठा धक्का होता. आमचा मोठा आधार हरपला. पण त्याच्या निमित्ताने

मला सरकारी यंत्रणेचे आतून दर्शन झाले आणि बरीच ओयासिस सापडली, ज्यांच्या आधाराने पुढे वाटचाल करता आली.

तसेच पोलिसखात्याबद्दलही झाले.

माझा त्या खात्याशी कधी संबंध आलेला नव्हता. सर्वसाधारण लोकांप्रमाणे माझ्याही मनात त्यांच्याविषयी भीती होती. त्यांच्या ड्रेसचा खाकी रंग, त्यावरचे बिल्ले, पट्ट्या, त्यावरचा उग्र चेहरा, त्यावरच्या आकडेबाज मिशा..हे जरा घाबरुनच टाकणारं. त्यातही आपली माणसं भेटली. त्या उग्र चेहऱ्यावरचे स्मित पाहायला मिळाले.

मुक्तांगणच्या सुरुवातीच्या काळातच पोलिसखात्याशी संबंध आला. ड्रग ॲडिक्ट मुलगा स्लिप होऊन परत परत येऊ लागला, तर त्याच्या सांगण्यावरुन कळले, की कोणी तरी ड्रग विकणारा त्याच्याभोवती ड्रगची पुडी दाखवीत घोटाळत असे. पूर्वी त्याच्याचकडून हा पुडी घ्यायचा. आमच्याकडे हा बरा झाला आणि त्याचे एक गिऱ्हाईक सुटले, म्हणून तो त्याला फुकट पुडी ऑफर करत होता. एक पुडी घेतली की त्यातच गटांगळ्या खाणार, आणि मग त्याचं तो रोजचं गिऱ्हाईक बनणार. मग त्यासाठी तो घरच्या वस्तू विकेल, चोऱ्या करेल, पण पुडी घ्यायला येणार म्हणजे येणार. पुढे दिवसांगणिक थोडा थोडा डोसही वाढतोच.

ड्रगच्या पेशंटमध्ये नुसतं ड्रग पाहिलं तरी मन खळबळ करु लागलं. पेशंट तिकडे ओढला जातो जसा. आधीचे उपचार, त्याने केलेला निश्चय...सगळी दारं-खिडक्या फटाफट बंदच होतात आणि एकच रस्ता उरतो, ड्रगचा. मग मी त्या ड्रग विकणाऱ्या माणसाची- त्यांच्या भाषेत 'पेडलर'ची माहिती घेतली. योग्य पोलिसांचा शोध सुरु केला. दिलीप शिंदे नावाचे सबइन्स्पेक्टर क्राइम ब्रँचला होते. तिथं एक नार्कोटिक विभागच होता. त्यांनी त्या माणसाला पाळत ठेवून अटक केली आणि या पोराचा त्रासच वाचला. त्याची सोब्रायटी (व्यसनमुक्ती) ही जास्त काळ टिकू लागली. मग मला हा रस्ताच सापडला. नव्याने ॲडमिट होणाऱ्या ड्रग ॲडिक्टकडून तो भानावर आल्यावर माहिती घ्यायची आणि त्याचे नाव वगळून पोलिसांच्या हवाली करायची. त्यातनं पोलिसांच्या हाती हे रस्त्यावर विकणारे पेडलर हाती लागले. तेही बहुधा ड्रग ॲडिक्टच असायचे. त्यांनी नऊ-दहा पुड्या विकल्या की त्यांना एक पुडी मिळायची. त्यांच्याकडून पोलिसांना मुंबईहून माल कसा येतो, कधी येतो, कोण आणतं, हे कळू लागलं. कधी माल घेऊन येणारा माणूस बसने यायचा, कधी ट्रेनने. कधी लोणावळ्याला उतरुन लोकलने येईल, तर चिंचवडला उतरुन पुढे बसने येईल. रस्त्यावरचे पेडलर्सही वारंवार जागा, पद्धत बदलायचे. एका ठिकाणी सायकलवरुन कोणी येणार, माल देऊन जाणार. तर कोणी चौकात दूर उभे राहून लहान मुलांकरवी माल पोहोचवणार. त्याआधी दुसऱ्या पोराकडून गिऱ्हाईकाकडून पैसे आणले जायचे. ही सगळी बदलती, अप-टु-डेट माहिती आमच्या या पोरांकरवी पोलिसांना मिळाल्यावर गुन्हेगार लगेच सापडू लागले. त्यातले मोठे असे पुण्यातले दोन गुन्हेगार होते. त्यांच्यावर अनेक केसेस होत्या. पण जामिनावर सुटायचे, नंतर गुन्ह्यातूनही. कारण या ड्रग ॲक्टमध्ये खूप गोष्टींची पूर्तता करावी लागते. त्यातली एखादी जरी राहिली तर गुन्हेगार सुटत असत.

मग आम्ही या कायद्यात सुधारणा व्हावी म्हणून चर्चासत्र घेतले. सत्यरंजन साठ्यांनी पुढाकार घेऊन लॉ कॉलेजमध्येच ते घेतले. त्यात हायकोर्ट जजेस, सेशन कोर्टाचे जजेस, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि आमच्यासारख्या संस्था होत्या. आम्ही बऱ्याच सुधारणा सुचवल्या. या चर्चासत्राचा परिणाम असेल किंवा आणखी काही, यातल्या बऱ्याच सुधारणा मान्य झाल्या. आता तो कायदा बऱ्यापैकी सुटसुटीत झाला. व्यसनी गुन्हेगाराकडे सुधारणेच्या दृष्टीने पाहावे, त्याची शिक्षा सौम्य असावी, त्याने जर आमच्यासारख्या संस्थेत राहून उपचार घेतले तर त्यास शिक्षा न करता चांगले जगण्यास अधिक उत्तेजन द्यावे... यासारख्या गोष्टी कायद्यात आल्या.

पुढे पुण्याच्या बाबतीत आम्ही जे करत होतो ते सर्व महाराष्ट्राच्या बाबतीत करणे आले. कारण जिल्ह्याजिल्ह्यांतून ड्रग ॲडिक्ट येऊ लागले. त्यांच्याकडेही अशी उपयुक्त माहिती होतीच. भास्करराव मिसर आधी पुण्याचे पोलिस कमिशनर होते. तेच नंतर सी. आय.डी., क्राइम, महाराष्ट्र झाले. मग त्यांनी एका ऑफिसरवर हे कामच सोपवले. ते महिन्यातून एकदा मुक्तांगणला यायचे आणि माहिती घेऊन जायचे. पण त्यांच्याशी माहिती देणाऱ्याचा संबंध असंही येऊ देत नसू. आमच्या स्टाफवरच्या भास्कर मोरेला हे काम दिलं होतं. तो या माहितीचं रजिस्टरच करायचा. त्यावर माहिती देणाराचं नाव न घालता ते लिहिलेले असे. भास्करला पोलिस खात्याचा मंत्रीच म्हणू लागले.

एकदा त्यांना लिहिले, की या माहितीचा तुम्ही काय उपयोग करता ते कळवा. काही दिवसांनंतर त्यांचं पत्र आलं. त्यात टेबलफॉर्ममध्ये आकडे लिहून शेवटी असं होतं, की 'आपल्याकडून नेलेल्या माहितीनुसार सुमारे एक हजार ड्रग विकणाऱ्यांवर कारवाई झाली. त्यातले बहुसंख्य मुद्देमालासहित सापडले. खटले भरुन कोर्टाकडे पाठवले आहेत.' पुढची माहिती मिळणं शक्य नव्हतं. कारण निरनिराळ्या कोर्टांत ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया होती. या पत्राने आम्हा सगळ्यांनाच उत्साह आला. मुंबईसारख्या ठिकाणी याचा परिणाम दिसला नसता, पण जिल्ह्या-तालुक्याच्या गावी नक्कीच परिणाम झाला असणार. तेव्हाचे पोलिस महासंचालक श्री. सोमण मुक्तांगणमध्ये आले होते. त्यांनी बरोबरच्या ऑफिसरना ही माहिती घ्यायला सांगितले. नंतर मला ड्रग ॲडिक्ट मुलं सांगत होती, "एकदम काय झालं कोण जाणे, सगळीकडे पोलिस पेडलरना पकडतच राहिले. इथं माल मिळत नाही म्हणून तिथं जावं, तर तिथलाही माणूस पकडलेला." या धंद्यातल्या मोठ्या लोकांपर्यंत कायद्याचे हात पोहोचत नाहीत. असे असले, तरी रस्त्यावर ड्रग विकण्यावर अशा कारवाईने नक्कीच प्रेशर येत असणार. मुख्य म्हणजे यातून आमच्या बऱ्या झालेल्या मुलांचा धोका आता जवळजवळ नाहीसा झाला होता. मी या सगळ्यात उत्साहाने भाग घेत होतो म्हणून हितचिंतकांनी मला सावध करायला सुरुवात केली. डॉक्टर मित्र म्हणाले, "तुझं काम पेशंटला ट्रीट करणं...हे बाहेरचे धंदे कशाला करतोस?" आमच्यासारख्या बंधू संस्थांचे मित्रही म्हणाले, "यू आर क्रॉसिंग द लाइन." सगळे सांगत होते, हे गुन्हेगार लोक डूख धरुन तुला खलास करतील. मी म्हणत असे, "मग दुसरं कोण हे काम करणार? कोणी तरी करायला हवंच ना." डॉक्टर मित्रांना सांगत असे, की 'उपचाराच्या पुढचाच भाग आहे हा. पेशंट आमच्या इथं बरा झाला तर तसाच बरा राहणं, हा आमच्या कामाचा भाग नाही का?' असे बरेच काही.

पण मला काही झाले नाही. उलट, पुण्यातल्या ड्रगचा धंदा करणाऱ्या दोन दादांची मुले ड्रग ॲडिक्ट झाली, ती आमच्याकडेच उपचारांसाठी आली. ते दादा आमच्या पालकसभेला येऊन बसत. त्यातल्या एकाने तो धंदा सोडलाही. त्या दोन मुलांपैकी एक बरा झाला. दुसरा धंदा करत राहिला, त्याच्यावर असे अनेक गुन्हे नोंदवले असूनही.

या सगळ्यात एकूण पोलिसखात्याशीच आमचं नातं जमलं. त्यांच्यापैकी अनेक कॉन्स्टेबल दारुच्या व्यसनात अडकलेले होते. त्यांचे वरिष्ठ त्यांना आमच्याकडे पाठवू लागले. ते बरे होऊन गेले की दुसऱ्या दोघांची बॅच हजर. पुढे पुढे पी.एस.आय., इन्स्पेक्टर्सही येऊ लागले. दारुचं व्यसन हा पोलिसखात्याचा मोठाच प्रश्न आहे. एरवी, त्यांना फुकट मिळते म्हणून पितात, असे आपण सगळेच म्हणतो. पण त्यांच्याशी बोलताना त्यांचे खडतर जीवन हे फार मोठे कारण असावे, हे जाणवले. ड्यूटी अवर्सचा पत्ता नाही. हक्काच्याही रजेचं नाव नाही. सतत वरिष्ठांचं दडपण, काही वेळा तर अगदी गुलामगिरीही. कौटुंबिक जीवनाला पारखे. मुलांकडे लक्ष देता येत नाही. म्हणून बऱ्याचदा ती चुकीच्या रस्त्याने चाललेली. असे बरेच काही. या सगळ्यातून पैसे खाणे, व्यसने करणे याची मात्र सर्वत्र मुभा असते. पगार खूपच कमी. त्यातून सुरुवात होते. मग कोणी त्यात अफाट कमावू लागतो. या सगळ्या गोष्टी एकमेकींत बेमालूम मिसळलेल्या.

एक पुरी (की गिरी?) नावाचे ए. सी. पी. अधिकारी आठवतात. आमचा एक बरा झालेला कॉन्स्टेबल मित्र (सुनील त्याचं नाव) त्यांच्या पुढे गेला. त्यांनी चौकशी केली. सुनीलला त्यांनी अशी ऑफर दिली, की जे कॉन्स्टेबल व्यसनाच्या कारणाने नोकरीतून 'ॲबस्कॉंडिंग' (फरार) आहेत त्यांनी जर मुक्तांगणला जाऊन व्यसन सोडले तर मी त्यांना हजर करून घेईन.

सुनील सगळ्यांना भेटला. त्यांच्या हद्दीत असे २६ कॉन्स्टेबल त्याला सापडले. त्यातले अगदी पराकोटीचे व्यसनी होते, त्यांना त्याने मुक्तांगणला पाठवले. उरलेल्यांची रोज मीटिंग घेत असे. त्यातून ते दारु घेईनासे झाले. मग या सगळ्यांना हजर करण्याच्या वेळी त्या ए.सी.पीं.नी मला आणि सुनंदाला बोलावले. मुंबईतल्या नायगाव भागातल्या पोलिस हेडक्वार्टरमध्ये ते ऑफिस होते. तिथे जाऊन आम्ही साहेबांशी बोलत बसलो. तेवढ्यात 'सावधान' म्हटल्याचा आणि पाय आपटल्याचा आवाज आला. सुनील पुढे आणि तीन रांगांनी हे साध्या वेषातले कॉन्स्टेबल्स मार्च करत खोलीत आले आणि मोकळ्या जागेत खाडकन बूट वाजवून उभे राहिले. मला त्यांचे चेहरे पाहून धन्य वाटले. सगळ्यांनी चेहऱ्यावर एकसारखा दगडी भाव चढवलेला. तरी ते आता बरे झाले होते. किती महिने चोरुन लपून पीत राहिले असतील. कुटुंबाची काय धूळधाण झाली असेल. आणि आमच्या सुनीलमुळे त्यांना नवा रस्ता दिसला, तेव्हा त्यांना काय वाटले असेल...

साहेबांनी चार शब्द सांगितले. मलाही बोलायला सांगितले. काय बोलणार? मन भरुन गेले होते. कसे काय हे मुक्तांगणचे काम पुढे आले. सगळ्यांच्या साहाय्याने करत राहिलो. आणि या काही ओळखदेख नसलेल्या या समोरच्या लोकांपर्यंत येऊन पोहोचलो. कोण जाणे, पण ही सगळी माणसे आपली वाटत होती. हे काम करणाराचे भाग्य.

त्या एसीपींनी सगळ्यांना 'हजर' करुन घेतले आणि ती व्यसनमुक्तांची फौज मार्च करीत निघून गेली. सुनील दर आठवड्याला त्यांच्या मीटिंगा घेत राहिला. त्यात जे सोबर राहू शकले नाहीत त्यांना मुक्तांगणमध्ये पाठवले. मधल्या काळात सुनीलच्या लहान मुलाचे निधन झाले. तरी तो व्यसनाकडे वळला नाही हे विशेष. आमचे मित्र हेमंत करकरे तेव्हा क्राइमचे डीसीपी झाले. त्यांनी सुनीलला त्यांच्या हाताखाली घेतले. अनेक ठिकाणी जाऊन तो पोलिसांमार्फत व्यसनमुक्तीवर भाषणे करु लागला. कधी टीव्हीवरही तो झळकला.

एकदा एक निवृत्त एसीपी आमच्याकडे आले. त्यांचा मुलगा डी.सी.पी. म्हणजे डेप्युटी पोलिस कमिशनर होता. तो व्यसनाधीन झालेला. मी म्हटलं, आमचे पेशंट सगळे एका मोठ्या वॉर्डात राहतात. स्पेशल रुम नाही. भांडी घासण्यापासून सगळी कामे करावी लागतात. तिथं आतल्या आत सगळ्यांची नावं-गावं सगळ्यांना कळतात. वगैरे. ते म्हणाले, "माझा मुलगा जगला पाहिजे, येवढंच मला कळतं. त्याचं नाव कळलं, इज्जत गेली, एवढंच काय, नोकरी गेली तरी हरकत नाही, पण तो जगला पाहिजे." आणि ते डी.सी.पी.आमच्याकडे ॲडमिट झाले. पहिले एक-दोन दिवस ते कॉटवर बसून राहिले. नंतर हळूहळू बारीकसारीक कामे करायला सुरुवात केली. नंतर नंतर ते मोठमोठी भांडी घासण्याची 'भांडी ड्यूटी'ही करु लागले. ज्यांच्या बंगल्यावर प्रत्येक कामाला ऑर्डर्ली असणार. हात उचलला की कोणी तरी सिगारेटचे पाकीट ठेवत असणार...नंतर ते बरे होऊन जिथं गेले तिथं आमच्या लोकांना बोलावून पोलिसांसमोर व्यसनमुक्तीचे कार्यक्रम घडवून आणले.

माझे त्या काळात नाशिकच्या पोलिस ट्रेनिंग कॉलेजमध्ये दोनदा कार्यक्रम झाले, आणि ठिकठिकाणी अनेकदा. अजूनही चालूच असतात. त्यांच्या साहाय्याने कोल्हापूर, नाशिक इ. ठिकाणी आम्ही प्रचार सप्ताहही पार पाडलेत. पेशंट मित्राकडे पाहायची आमची दृष्टी इथं पोलिस डिपार्टमेंटशी वागताना उपयोगाला आली. जसे काही वेळा पेशंटला ठेवताना नातेवाईकही सांगतात, तो सुधारण्यातला नाही. अगदी गॉन केस आहे. तसेच पोलिसांबाबतही लोक आम्हाला सावध राहायला सांगत. पण माणसं इथून तिथून एकच. आपण त्यांच्यात चांगलं पाहावं, मग तो

चांगलेपणा त्यांनाही दिसतो आणि काही तरी चांगलं घडू शकतं. तीच गोष्ट सरकारी खात्यातल्या माणसांचीही. आपण त्या यंत्रणा बदलू शकत नसलो, तरी आपल्यापुरता चांगला विसावा निर्माण करू शकतो, हे या निमित्ताने कळलं ते बरं झालं.

जागेच्या बाबतीत आम्ही भाग्यवान. खरं तर कुठल्याही संस्थेला सुरुवातीला जागा ही फार मोठी अडचण असते. त्याभोवतीच कित्येकांची ताकद खर्च होत असते, ती एरवी त्या सामाजिक कामाकडे लावता आली असती. आम्हाला मात्र पहिल्या दिवसापासून प्रशस्त, मुबलक जागा. दुमजली स्वतंत्र इमारत. कडेला चार प्रचंड हॉल आणि मध्ये किती तरी लहान-मोठ्या खोल्या. त्यातला एका बाजूचा वरचा हॉल आमचा वॉर्ड झाला. खालच्या हॉलमध्ये आफ्टर केअर. डे-केअरच्या ॲक्टिव्हिटीजही तिथेच. दुसऱ्या बाजूला वरचा हॉल आमच्या सगळ्या कॉमन मीटिंग्जसाठी, तर खालचा हॉल योगासने, पी.टी., म्युझिक थेरपी, बाहेरच्यांसाठीच्या सभा यासाठी. मधल्या खोल्यांमधून सुनंदा, तिचे सहकारी, खाली आल्या आल्या अकाउंटंट इ. नंतर इतर व्यसनमुक्ती केंद्रे पाहिली. त्यांची जागेची केवढी अडचण असते! जिथे पेशंट राहतात (कॉट्स बहुधा नसायच्या.) तिथेच मीटिंग्ज आणि इतर ॲक्टिव्हिटीज. त्यामानाने आम्हाला जागेचे घबाड सापडलेले.

आणखी दुसरा फायदा, हे मेंटलच्या भिंतीपासून, गेटपासून आत होतं. बाहेरचा माणूस सहजासहजी मुक्तांगणपर्यंत पोहोचू शकत नसे. इतर बरीच केंद्रे गावात, कुठल्या तरी भाड्याच्या जागेत. ड्रग विकणाऱ्यांच्या अशा केंद्रांभोवती घिरट्या सुरू होतात. मग कितीही बंदोबस्त केला तरी खिडकीच्या फटीतून पुड्या आत येऊ शकतात. आणि ती लागण झाली की सगळा उपचार कार्यक्रम पूर्ण कोसळतोच. आपण जीव तोडून कौन्सेलिंग करतोय आणि पेशंट नशेत सुम्म होऊन आपल्याकडे पाहतोय, ही किती केविलवाणी अवस्था! आमच्याकडे तो प्रश्नच कधी आला नाही.

कुठल्याही व्यसनमुक्ती केंद्राची किमान अट म्हणजे उपचाराच्या काळात ड्रग, दारुपासून पेशंट दूर राहणे. त्यासाठी १०० टक्के प्रामाणिक माणसांची टीम हवी. सरकारी हॉस्पिटलमध्येही त्या काळात अशी केंद्रे सुरु झाली. जे. जे.मध्ये झाले, ठाण्याच्या मेंटल हॉस्पिटलातही झाले. ती पुढे चालू शकली नाहीत. त्यामुळे या क्षेत्रातल्या संस्थांचा मृत्युदर जवळपास ९९ टक्के असेल. मुक्तांगण का तगले? सरकारी सेटअप आणि चालवणारी स्वयंसेवी संघटना, असे ते मिश्रण होते. त्यात सुनंदा दोन्हीकडे, आणि तिची करडी नजर. त्या काळात एका वार्षिक कार्यक्रमाला त्या वेळचे मुख्यमंत्री शरद पवार आले होते. त्यांनी आम्हाला अशी ऑफर दिली, की 'प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी, तिथल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये एक स्वतंत्र जागा तुम्हाला देतो. तुम्ही महाराष्ट्रभर अशी व्यसनमुक्ती केंद्रे काढा.' आम्ही ही ऑफर स्वीकारली नाही. एका ठिकाणचे केंद्र चालवणे, ते शंभर टक्के नशामुक्त ठेवणे हेच आम्हाला मोठे आव्हान वाटत होते. केंद्रात फेरी मारताना मुख्यमंत्री म्हणाले, "तुमच्या काय काय गरजा आहेत? काय हवं आहे तुम्हाला?"

मी जरा बुचकळ्यात पडलो. म्हणालो, "नाही बुवा. इथे आहे सगळं."

तरी ते म्हणाले, "इक्विपमेंट वगैरे?"

मी म्हणालो, "नाही बुवा. काम करणाऱ्या चांगल्या माणसांची गरज असते. पण ते इथं मुक्तांगणमध्येच घडवले जातात."

मी नंतर हे इतरांना सांगताच मित्र हळहळले. म्हणाले, "साक्षात कुबेर तुला हवे ते द्यायला तयार होता, आणि तू कसला दळिंद्री!" नंतरच्या काळात मुक्तांगणसाठी अनेक गोष्टींची गरज निर्माण झाली. त्या वेळी मला या कुबेराची आठवण झालीही. पण खरी गरज कसली विचाराल तर प्रामाणिक माणसांचीच. बाकीचं असलं तर आनंद, नसलं तरी अडत नाही. पण या बाबतीत

आम्ही भाग्यवानच. एरवीची ती अप्रामाणिक, हिंसक, रागीट, फसवेगिरी करणारी माणसे होती. पण मुक्तांगणस्पर्शाने असा काही बदल झालाय की पूछो मत.

कुणी म्हणेल, तुम्ही माणसे अशीच. तुम्ही छोटीच राहणार. तुमची स्वप्नंही अशी किरटीच. तुमच्यामध्ये महत्त्वाकांक्षा नाही, वगैरे. पण मला त्या शूमाखर (जो गांधीजींचा चाहता होता)चं वाक्य आठवतं, स्मॉल इज ब्यूटिफूल! याचं मला अजून इतकं सोपं भाषांतर करता आलेलं नाही. जे लहान ते सुंदर, किंवा लहान ते महान, इथवर येऊन थांबलो. त्या काळी आम्ही सर्वत्र शाखा काढल्या नाहीत, हे आमच्या पुणेरी बाण्याला साजेसेच. पण ते बरे झाले. मुक्तांगणमध्ये अनुभवातून आम्ही सगळेच शिकत गेलो. त्यातनं आपल्या संस्कृतीला अनुरूप अशी एक पद्धत विकसित झाली. मुक्तांगणमध्ये पेशंट म्हणून असलेला रवी पाध्ये याने नंतर नागपूरला 'मैत्री' नावाचे व्यसनमुक्ती केंद्र काढले. चांगले चालवले आहे. त्याच्या केंद्रात काम करणारे बरेचजण मुक्तांगणमध्ये बरे झालेले. अभय बंगने गडचिरोलीत दारूमुक्ती चळवळ चालवली होती. त्यानेही व्यसनमुक्ती केंद्र काढायचे ठरवले. त्यांचा एक पेशंट इकडे बरा होऊन तिकडे गेला. त्यांचा एक कौन्सेलर मुक्तांगणमध्ये राहून अनुभव घेऊन गेला आणि त्यांनी 'मुक्तिपथ' व्यसनमुक्ती केंद्र काढले. त्याच्या केंद्रात आमचे काही मित्र सुरुवातीला पाठवले होते. नंतर त्यांनी भोवतालच्या परिस्थितीनुरूप त्यांच्या केंद्राला आकार दिला. साताऱ्याच्या शैला, नरेंद्र (दाभोलकर)च्या परिवर्तन केंद्राला सुरुवातीची, अगदी ग्रँटसाठी अर्ज करण्यापासून मदत केली. तेही केंद्र त्यांच्या पद्धतीने जोमाने चालू आहे. आम्ही आमच्या शाखा काढत बसलो असतो तर हे झाले नसते. आता तर या आर.आर.टी.सी.मुळे मोठ्याच संख्येने अशा संस्थांशी अनुभवांची देवाणघेवाण चालू आहे.

आता आठवलं की गंमत वाटते. मुक्तांगण चांगलं चालू लागलं होतं. त्या काळात दुसरं एक व्यसनमुक्ती केंद्र निघालं. आमच्या मंडळींना काळजी वाटू लागली. आता आपले बरेच पेशंट तिकडे जाणार...वगैरे बोलू लागले. मी म्हणालो, "अरे, निघू देत केंद्र. हे शहर वाढतेय. आणखी केंद्राची गरज आहेच." कोणी म्हणालं, "पण आपल्याच स्लिप झालेल्या पेशंटना घरी जाऊन भेटून तिकडे वळवतात. याला काय अर्थ आहे? काही झालं तरी तो आपला पेशंट आहे." मी समजावलं, "अरे, त्याला तिथं जाऊन फायदा झाला तर चांगलंच की. शेवटी काय महत्त्वाचं? आपण आपलं काम करायचं." अलीकडेही असेच एक केंद्र निघाले. परत आमच्या स्टाफमध्ये गडबड. परत समजावले, "आपण आपले काम करू यात. आपली स्पर्धा कुणाशी? तर आपल्याशीच." अशा वेळी त्यांच्या चेहऱ्यावर जे भाव असतात ते मला बघायला फार आवडतात. 'आपल्या बाबाला काहीच कसं कळत नाही', किंवा 'बाबाचं कसं होणार?' असे काहीसे ते भाव.

...तर मेंटल हॉस्पिटलचे सुनंदा असेपर्यंत संबंध चांगले होते. नंतर काय बिनसले कुणास ठाऊक. कुणी मेंटलविरोधात हायकोर्टमध्ये खटला दाखल केला होता. हायकोर्टाने महाराष्ट्रातल्या सगळ्या मेंटल हॉस्पिटलांची पाहणी करायला एक कमिटी नेमली. ती या आमच्या मेंटल हॉस्पिटलमध्येही आली. तिथली पाहणी झाल्यावर कुतूहल म्हणून ते लोक मुक्तांगणही पाहून गेले. रिपोर्टात मेंटलवर बरेच ताशेरे ओढले. एक वाक्य असे होते, 'ओन्ली ब्राइट स्पॉट इन धिस कँपस इज मुक्तांगण.' त्यामुळे ती यंत्रणा आमच्यावर फारच घसरली. एव्हाना आम्ही पूर्ण स्वतंत्र झालो होतो. अन्नाबाबत, स्टेशनरीबाबत आणि औषधांबाबतही. पण रात्र पडल्यावर आमचे आफ्टर केअरचे काही पेशंट नोकरीवरून परत यायचे. त्यांना गेटवरचे लोक अडवायचे. मग त्यांचे मला फोन. की मग माझा सुपरिंटेंडेंटना फोन, की मगच त्या मुलांना आत प्रवेश. एकदा स्वतः सुपरिंटेंडेंट बाई तर सुनंदाची शिष्याच होती. तिच्या तापट स्वभावाने काही वेळा संप होणार होता, तेव्हा सुनंदाने युनियनला समजावले होते आणि हिला वाचवले होते. आता तिचा सगळा नूरच बदललेला. आमची कोंडी करण्याचे काम ती सतत करायची. मुक्तांगणच्या जागेचे भाडे २७ लाख काढण्याच्या आचरटपणाचा

मी आधी उल्लेख केलाय, ते पत्र तिच्याच सहीचे. स्वतः सुपरिंटेंडेंटना आम्ही मुक्तांगणमध्ये पेशंटसमोर बोलायला बोलावले होते. त्यांनी सुनंदाचा केवढा तरी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला होता. (काय, ते सांगणे प्रशस्त नाही.) हे असूनही सगळे ग्रह का फिरले? आम्ही जरी कुणाला 'ब्राइट स्पॉट' वाटलो असलो, तर आम्ही तर तसे म्हणत नव्हतो. आमच्याकडून मेंटलला कधी कसलाही त्रास झालेला नव्हता.

शेवटी आम्ही इथून बाहेर पडायचे ठरवले. येवढी मोठ्ठी जागा सोडता कशाला, असे सल्ले मिळत होते, तरीही. सुनंदा गेलेली. त्यांच्या परिसरात आमचे वास्तव्य. त्यांच्याशी लढण्यात किती शक्ती घालावी? एकदा मन उडले ते उडलेच.

आणि तोपर्यंत जागेचा दुसरा पर्याय निर्माण होत होता, म्हणून आम्ही तो निर्णय घेऊ शकलो. त्याविषयी नंतर सांगेन. इतकी वर्षे त्या परिसराशी एकरूप झालो होतो. सुनंदाच्या मेंटलच्या सेवेतली पहिली दहा वर्षे तर आम्ही या परिसरात राहिलो होतो. इथेच आमच्या मुलींचा जन्म झाला, लहानपण गेले. आमचे घर जरी या भिंतीबाहेर होते, तरी हे आमच्या घरचे अंगणच होते. नंतरही मुक्तांगण सुरु झाल्यापासून पंधरा वर्षे इथं काढली. खरं तर ही वास्तू सोडताना खूप दुःख व्हायला हवं होतं. पण मन इथल्या प्रतिकूल वागणुकीने सुन्न आणि बथ्थड झालेलं. कधी एकदा जातोय आपल्या घरात, असं झालं होतं.

आता नव्या मुक्तांगणचा रस्ता या परिसरावरूनच जातो. पण कधी वाटलं नाही, गाडी वळवावी, आत जावं आणि त्या वेळच्या मुक्तांगणच्या इमारतीचं दर्शन घ्यावं. माणसांच्या वागणुकीने वास्तू उजळतात तशा पुसल्याही जातात हे खरं.

■

५

मुक्तांगणमधले पेशंट ही सुनंदाची मुलं होती आणि त्यांच्या बायका या माझ्या मुली. तसे दोघांनाही ते सगळे आईवडीलच मानायचे. पण आपल्या मुलांमध्ये एक आईचं तर एक वडलांचं जास्त लाडकं असतं, तसा इथेही फरक पडायचा. या मुली मला बाबा म्हणायच्या, आणि हक्काने काही सांगायच्याही, “बाबा, लई धावपळ करु नका. तब्बेतीला जपा.” किंवा “चांगलं खात-पीत जा. तुम्ही फार आबाळ करु नका स्वतःची. (माझे पोट सुटलेले आहे तरीही) अलीकडे रोडावलाय जरा.” वगैरे. सुनंदा गेल्यावर तर जरा हे जास्तच.

एका सक्काळी अशीच आमची मुलगी दारात उभी. हातात गुलाबाचं फूल. मला आश्चर्य वाटलं. ही इतक्या सकाळी कशी आली? एरवी नवऱ्याशी, सासूशी जोराचं भांडण झाल्यावर येतात तसं हिचं नसावं. कारण चेहरा प्रफुल्लित होता. तिचा नवरा बऱ्याच वर्षांच्या व्यसनानंतर आता जवळपास वर्षभर चांगला होता. मी विचारलं, “काय, फूल घेऊन आलीस?”

“काल माझा वाढदिवस होता.”

“वाःवाः! उशिराचं अभिनंदन!”

पुढे ती म्हणाली, “हे फूल काल नवऱ्यानं दिलंय.”

“वा वा, छानच!”

नंतरच्या वाक्यानं मी एकदम थबकलोच. म्हणाली, “लग्नाला पंधरा वर्षं झाली. आज हे पहिल्यांदाच घडतंय.”

मी गलबललोच. आमचा तो मित्र बरा झाला. त्याने बायकोच्या वाढदिवसाची आठवण ठेवून ते फूल आणलं. त्या दोन-चार रुपयांच्या फुलानं काय जादू केली होती! एखाद्या पूर्ण वठलेल्या झाडाला एखादा पालवीचा हिरवा कोंब फुटावा असं झालं. ते फूल किंवा हा हिरवा कोंब ग्वाही देत होता, की मी जिवंत आहे. माझी मुळं जीवनरस शोषून वर पाठवू लागली आहेत. वाः वाः! कसला हा जीवनोत्सव! या मुलीने काय काय सोसलं होतं! व्यसनाच्या काळात जे जे होतं ते सर्व झालेलं. मारहाण, शिवीगाळ, माहेरच्यांचा उद्धार. आणि शेवटचा प्रहार म्हणजे हिच्या चारित्र्यावर घेतलेला संशय...हे सगळे घाव सोसलेले. जखमा भळभळत्या. पण त्या एका, आठवण ठेवून दिलेल्या फुलानं सगळं पुसलं गेलं आणि उजळलंच अवघं जीवन.

किती थोड्या गोष्टींची अपेक्षा असते या मुलींची! एकजण सांगत होती, “दिवसभर कष्ट उपसते, सासूची बोलणी खाते. संध्याकाळी तो कामावरुन येतो. ‘किती दमलीस तू!’ येवढं म्हणाला तर सगळे श्रम पळून जातील. तेवढं सोडून सगळं बोलेल, पण ते दोन शब्द तोंडात येणार नाहीत.” काही नवऱ्यांना हे जाणवतही असेल, पण बोलायचं कसं? त्याचं नवरेपण आड येत असावं. ज्या दिवशी मित्र मुक्तांगणमधून घरी जातात, तेव्हा मी त्यांना विचारत असतो, “घरी गेल्यावर पहिलं काय करणार?” बरीच वेगवेगळी उत्तरं येतात. मग मी विचारतो, “मी एक सुचवू का?”

सुचवा... सुचवा... असा सामूहिक आवाज येतो. मग म्हणतो,

“घरी जाल तेव्हा पहिल्याच दिवशी ‘भांडी ड्यूटी’ करा.”

सगळे हसू लागतात.

“का बरं? तुम्ही इथं पस्तीस दिवस केलीच ना भांडी ड्यूटी? इथल्या मोठमोठ्या भांड्यांपेक्षा घरची तर किती लहान असतात. पण ती एक ड्यूटी केली की शब्दात सांगायलाच नको. घरच्यांना समजेलच, की तुम्ही आता बदललेले माणूस आहात.”

नवरा या शब्दात काय भरलेलं आहे? अहंकार? अधिकार? त्या शब्दाबरोबर मार्दव शब्दाची का आठवण होऊ नये? आमचे जे जे मित्र घरी गेल्यानंतर भाज्या चिरणे, भांडी घासणे अशी मदत करतात, त्यांचे सहजीवनच बदलून जाते. पोकळ शब्द, शपथा यांचा जिथं काही परिणाम होत नाही, तिथं एका कृतीमुळे केवढा परिणाम होत असेल!

हे सगळे आपल्या संस्कृतीचे विशेष. परदेशात हा प्रश्न फारसा येत नसणार. तिथं नवरा हुकूमशाही गाजवू लागला तर दुसऱ्या क्षणी बायको निघून जाईल. (माझा एक मित्र अशा वारंवार डायव्होर्स घेणाऱ्या परदेशातील स्त्रियांना ‘डायव्होर्सिनी’ म्हणतो, ते सोडा.) पण काम करता करता परत परत लक्षात येत होतं, की जोवर घर, घरातली नाती दुरुस्त होत नाहीत तोवर आमच्या या मित्राची व्यसनमुक्ती टिकणं कठीण आहे. ती सगळी नाती या मित्राच्या व्यसनाच्या काळात खूपच दुखावलेली असतात. आणि यातून कडवटपणा आलेला असतो. तो कसा घालवायचा? पण काही कुटुंबे अतिशय आशावादी दिसली. मग आमच्या मित्रांनी त्यातून एक छोटी नाटिका तयार केली. गुरुवारच्या पालकसभेपुढे ती करून दाखवायचे. एक मित्र मुक्तांगणमधून घरी जातो त्या दिवसाचं हे दृश्य. कोणी म्हणतं, “वा:, सुधारून आलेत वाटतं चिरंजीव? अशी नाटकं खूपदा झालीत.” दुसरा म्हणतो, “बघा, पैज लावा, साहेब संध्याकाळी पिऊन येतात की नाही...” मग मित्र संतापतो. स्वत:शी म्हणतो, “थांबा, यांना पिऊनच दाखवतो.” म्हणून तो बाहेर जातो. दुसऱ्या घरातील दृश्यात मित्र घरी आलाय. त्याला सगळे म्हणतात, “छान झालं. ट्रीटमेंट पूर्ण करून घरी आलास. या वेळी तू नक्की बरा होणार आहेस. तुला काही मदत लागली तर सांग. आम्ही सगळे तुझ्याबरोबर आहोत. हा प्रश्न फक्त तुझा नाही, आपल्या सर्वांचा आहे.” या अर्थाचे काही संवाद. ऐकणाऱ्या पालकांना वेगळं सांगायची गरजच उरत नसे.

सुनंदा घरातली भांडणं छान मिटवायची. एक नेहमीचं कारण म्हणजे मुलीकडच्यांचा आरोप असे, मुलाला व्यसन आहे, ही गोष्ट आमच्यापासून यांनी लपवून ठेवली, फसवून लग्न लावलं आणि आमच्या पोरीचं नुकसान झालं. मुलाकडचे म्हणत, “तो अधूनमधून प्यायचा. तसं कोण पीत नाही? पण ही मुलगी घरात आली आणि घरात भांडणं सुरु झाली. त्यात याचं पिणं वाढलं.”

यात कोण खरं-कोण खोटं हे ठरवायला वावच नसे. त्या होऊन गेलेल्या गोष्टी. अशीच काही शब्दाशब्दाने वाढत गेलेली भांडणं, लोक डोक्यात डूख धरून बसलेले. या जंगलातून वाट काढावी लागे. सुनंदा मग सगळ्यांना एकत्र आणून समोर बसवत असे. एकेकाला बोलायची मुभा देऊन सगळ्यांचे संपले की म्हणायची, “हा माणूस दारुतून बरा व्हावा, अशी तुमची इच्छा आहे का?” मग सगळे अर्थातच ‘हो’ म्हणत. मग ती एकेकाला सांगत असे, तुम्ही अमुक अमुक बोलायचे नाही. दुसऱ्याला, ‘तुम्ही असे असे नेहमी बोलायचे’ असे ठरवून देई. सगळे मान्य करीत आणि आनंदाने एकमेकांना मिठ्या मारुन मीटिंग संपत असे. मी एकदा त्यांच्यातल्या एकाला विचारलं, मग हे आधीच का नाही झालं? ते म्हणाले, “असं आम्हाला कुणी एकत्र आणलंच नव्हतं.” त्यावरनं एक समजलं, आपल्या कुटुंबांमध्ये प्रेम आहे, चांगल्या भावनाही आहेत. पण या अहंकाराच्या आहारी जाऊन माणसे अडाणी होतात. हे साठलेले मळभ दूर केले तर चांगला डोळसपणा येऊ शकतो.

घरचे बदलतील न बदलतील, आपल्याला बदलायचं, हा मुक्तांगणच्या उपचारातला जसा मंत्रच. एक मित्र उपचार घेऊन गेला की काही दिवसांत परत दाखल व्हायचा. त्याचं वडलांशी भांडण व्हायचं आणि पर्यावसान म्हणजे परत पिण्याकडे. सुनंदाने त्याला वडलांबरोबरचे नेहमीचे

भांडण लिहून काढायला सांगितले. तो गडबडलाच. सुनंदाने सांगितले, “नेहमीचे भांडण आठव. ते काय म्हणाले, मग तू काय म्हणालास, हे संवादरूपाने लिहायचे. नेहमीचे संवाद तेच असतात.” तो हसला. आणि त्याने खरोखरच संवाद लिहून आणले. मग तिने सर्वच पेशंट मित्रांसह ते वाचले. प्रश्न विचारला, “हे भांडण कुठे कुठे थांबवता आले असते?” मुलांनी त्याला खूप चांगल्या सूचना केल्या. ‘वडील हे म्हणाल्यावर तू असं असं म्हणालास, त्याऐवजी असं म्हणालास तर?’ असं अनेकांनी एकेका वाक्याला भांडण थांबवण्याच्या जागा दाखवून दिल्या. यातनं तो तर शिकलाच, पण सूचना करणारेही शिकले. येवढेच काय, ऐकणारे आम्हीही शिकलो. माघार घेणे, माफी मागणे ही एरवी पराभवाची वाक्ये. पण माफी मागायला खूप ताकद लागते ही गोष्ट आम्ही शिकलो. प्रत्यक्ष भांडणात आपला पराभव झालेला असला, तरी स्वतःच्या अहंकारावर काबू मिळवण्यात आपण यशस्वी झालेले असतोच. आणि आमच्या मित्रांच्या व्यसनाच्या लढाईतला एक मोठा धोका टाळलेला, टळलेला असतोच.

हे सगळं पाहताना परत परत वाटत होतं, मनुष्यजातीचं लहानात लहान युनिट (एकक) कुठलं? तर व्यक्ती, हे आजवर समजत होतो. आता म्हणतो, नाही, त्याचं कुटुंब. माणूस हा समूहाने राहणारा, त्यातलं हे सर्वांत लहान एकक. हे सुरक्षित असेल तर अनेक प्रश्न उद्भवणार नाहीत. जे उद्भवतील त्यांना सामावून घेतलं जाईल. अशा कुटुंबांनी एकमेकांना जोडून घेतलं की होतं बृहत् कुटुंब. मुक्तांगण हे असंच एक विस्तारित कुटुंब.

यासाठी सुनंदाने सहजीवन सभा सुरू केल्या. महिन्यातून एकदा नारायण पेठेतल्या कौन्सेलिंग सेंटरवर पती-पत्नी जमायचे. कधी कुणी म्हणे, आपल्या घरी पुढची मीटिंग घ्या, की त्याच्या घरी व्हायची. त्या काळात अनेकांची घरे पाहिली. घरे छोटी असली तरी दाटीने बसण्यातही मजा असे. तो मित्र, त्याचं सर्व कुटुंब, येवढंच नव्हे तर, ती चाळ, वस्तीही या आयोजनात भाग घ्यायची. आमच्या त्या मुलीला पदार्थ करण्यासाठी मदत म्हणून इतर मुलीही दुपारपासून तिच्याकडे दाखल व्हायच्या. केवढा उत्साह असायचा सगळ्यांना!

काही काही प्रश्न, तक्रारी साध्या वाटतील, पण त्या त्यांच्या जीवनात महत्त्वाच्या असायच्या. मला त्यातल्या काही गोष्टी आठवताहेत. एक मित्र व्यापारी होता. किराणा मालाचा दुकानदार. मागच्या खोलीत संसार. तरुण चुणचुणीत बायको घर सांभाळायची. त्या दिवशी मीटिंगमध्ये ती बोलली, “हे मनचं काही बोलत नाहीत. काही विचारलं की झटकून टाकतात.”

मी विचारलं, “का रे बुवा असं?”

तो म्हणाला, “तिच्याशी काय बोलायचं? त्या येडीला काय समजतं?”

असं म्हटल्यावर जे सगळे त्याच्यावर तुटून पडले म्हणता.

एक सहचरी (पेशंटच्या बायकोला आम्ही हे नाव दिलेलं) म्हणाली, “तिला तुम्ही कधी फिरायला घेऊन जाता का?”

“छेः छेः! आमच्या मारवाडी समाजात ती पद्धत नाही.”

“तुम्ही तिला बाहेर नेत नाही, तर ती मग अडाणी राहणारच.”

दुसरा मित्र म्हणाला, “तू एवढा शहाणा, तर व्यसनात कसा फसलास?” या सगळ्या चर्चेनंतर असे एकमत झाले, की त्या दोघांनी रोज फिरायला जायचं.

तो म्हणाला, “आम्ही निघालो की आख्खी गल्ली आम्हाला पाहायला उभी राहील.”

“राहू दे. एक दिवस पाहतील. रोज पाहायला कुणाला वेळ आहे?”

नंतर चांगली गोष्ट म्हणजे ते दोघे फिरायला जायला लागले. त्या निमित्ताने दिवसातल्या बऱ्याच गोष्टी, टेन्शन्स ते एकमेकांना सांगत असतील आणि तो भार हलका होत असेल.

एका दुसऱ्या मीटिंगमध्ये सुनंदाने प्रश्न टाकला, की या महिन्यात आपल्या दोघांत कितीदा आणि कशावरून भांडणे झाली? मीटिंगमध्ये मस्त गोंधळ. बायकांना सांगायची घाई झाली होती. सुनंदाने एका जोडप्याचा प्रश्न घेतला. मित्र म्हणाला, "मी कामावरून दमून येतो. मला चहा, थोडा आराम हवा असतो, तर ही घरातल्या कटकटी सांगत बसते. मग माझं टाळकं सटकतं..."

तिला यावर बोलायला सांगितलं. "मी दिवसभर सगळे कष्ट करते. याच्या व्यसनाबद्दल मलाच सगळ्यांनी जबाबदार धरलंय. आता हा बरा झाला तरी मागचा उद्धार चालू असतोच. परत मुलांचे डबे, अभ्यास...याच्याशिवाय मी तरी कोणाला सांगणार? याला बघितलं की राहवतच नाही."

त्यावर दुसऱ्या मित्राने त्याला विचारलं, "तुझ्या घरापाशी कोपऱ्यावर कुठं चहाचं हॉटेल आहे का?"

त्याला रोख समजला नाही, पण तरी म्हणाला, "हो, आहे."

"मग तू कामावरून येताना तिथं आधी जात जा. बेसिनवर तोंड धूत जा. चहा पी. आरामात पी. फ्रेश हो आणि मग घरी जा. मग वहिनींनी तुला काही सांगितलं तर चालेल ना?"

या मित्राने मान हलवली.

दुसरी मुलगी या सहचरीला म्हणाली, "जसं दिवसभर तू दाबून धरलंस तसं आणखी दोन तास दाबून धर. रात्रीची जेवणं झाली की पाय मोकळे करायला बाहेर पडा. मग तुला सांगायचं ते सांग. ते नीट ऐकून घेतील."

यावर सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

एकदा एक मित्र भेटला. म्हणाला, "बाबा, शनिवारी आपली सहजीवन सभा आहे ना? आमच्या बायका शस्त्रं परजून तयारच आहेत." ते खरेच होते. सुनंदा आणि मी असल्याने त्यांना अभय असे. बरे, हेही ठरलेले होते, की मीटिंगमध्ये जे बोलले जाते त्यावरून घरी भांडायचे नाही. जर झालंच भांडण, तर त्याची चर्चा पुढच्या मीटिंगमध्ये होईल. त्यामुळे एक प्रकारे नेहमीच्या भांडणांचा, प्रश्नांचा निचरा होत असे.

कधी मुलांच्या अभ्यासावरचा विषय. तो तर फार जिव्हाळ्याचा. मग आम्ही त्यांना मुलांना मोकळेपणाने वाढवण्याबद्दल सांगायचो. आमच्या मुलींचे अनुभव सांगायचो. मार्क, नंबर यापेक्षा चांगलं वागणं महत्त्वाचं आहे. यावर मित्रांच्या टाळ्या. कारण असा अट्टाहास शक्यतो बायकांचा, पोरांच्या आयांचा. एका मीटिंगमध्ये अभ्यास घेण्यावरनं निघालं. आमच्या या मित्रांना अभ्यास घ्यायची हुक्की येते. मग रागावणं, ओरडणं, कधी मारही. सहचरी म्हणाली, "ते पोर म्हणतंय, बाबा पीत होते तेव्हा बरं होतं. येऊन निवांत झोपायचे." सगळे हसले. मग अभ्यास कसा हसत-खेळत घेता येऊ शकेल यावर चर्चा. त्याआधी त्या पुस्तकांचा आपणही अभ्यास करावा, अशीही सूचना, त्यावर एकाचा 'म्हणजे आमच्या इज्जत का फालुदा' असा कॉमेंट. त्यावर हास्यकल्लोळ, इत्यादी इत्यादी.

कधी आम्ही नवरा-बायकोला एकमेकांचे रोल करायला सांगायचो. आयत्या वेळी सुचेल तो संवाद. बायकोने नवऱ्याची आणि नवऱ्याने बायकोची भूमिका करायची. विषय दिला होता, पगाराचा पहिला दिवस. बायका नवऱ्याची अशी काय भूमिका करायच्या की बास. लाथेने दार उघडून झिंगत आत यायचे. वस्तूंची (प्रतीकात्मक) फेकाफेक करायची. तोंडाने शिव्यांचा पट्टा. बायको झालेला नवरा अजिजीने -"अहो, हळू बोला. शेजारी ऐकताहेत..." मग त्यावर शेजाऱ्यांना एखादी शिवी. ते पाहताना आम्ही हसून बेजार व्हायचो. पण दर महिन्याला ते खरे घडणारे नाटक, नाटक तरी कशाला

म्हणा, दृश्य होते. नवऱ्याला कळायचे, की त्या वेळी बायकोची काय अवस्था झाली असेल. एका आई-मुलाला असेच नाट्य करायला दिले. मुलगा नंतर म्हणाला, “मला आईचं दुःख पहिल्यांदाच कळलं.” ते सांगून कळलं नसतं, पण या काही मिनिटांच्या ‘परकाया प्रवेशामुळे’ ते कळलं.

या सगळ्या प्रवासात खूप ताकदवान मुली भेटल्या. बहुतेकजणी तशाच. आमच्या मित्रांपेक्षा काकणभर सरसच. काही मित्रांच्या बायका कंटाळून माहेरी निघून गेलेल्या. काहींचे डायव्होर्स झालेले, तर काहींचे त्या मार्गावर असलेले. आमच्याकडे असा मित्र दाखल झाला, की आम्ही त्याच्या बायकोला पत्र पाठवायचो, की ‘असा असा माणूस आमच्याकडे ॲडमिट आहे. तुम्ही येऊन भेटल्यास त्याच्या उपचारांना मदत होईल.’ हे पत्र घेऊन ती बाई पोरांना घेऊन यायची. म्हणायची, “ हा बरा होणार असेल तर मी परत येऊन राहायला तयार आहे.” मी चकित व्हायचो. सगळे अपमान, स्वप्नांचा चुराडा, वगैरे वगैरे सगळे एका क्षणात विसरुन ती परत संसार उभा करायला तयार? हे पुरुष करु शकेल का? आमच्या राजारामची बायको मेधा अशीच माहेरी निघून गेलेली. तिकडे तिला नोकरीही होती. पण लग्नानंतर हनिमूनला गेले तिथेच लक्षात आलं, याचं दारुशिवाय पंधरा मिनिटंही चालत नाही. आईनं तिला तिच्या घरी आणलं. राजाराम आमच्याकडे ॲडमिट झाला. सुनंदाने तिला फोन केला. पण तिच्या आईचा इकडे यायला ठाम विरोध. मग ऑफिसच्या वेळात ती गुपचूप मैत्रिणीबरोबर पुण्याला आली. राजाराममध्ये एकदोन आठवड्यांत इतका बदल झाला होता की, तो समोरुन गेला तरी तिला ओळखू आला नाही. सुनंदाने तिला सांगितलं, की ‘हा बरा होणार आहे आणि तू इकडे यायची तयारी कर.’ तशी पठ्ठी भरोसा ठेवून सरकारी नोकरी सोडून आली. राजारामही असा, की गेल्या बावीस वर्षांत त्याला दारुची साधी आठवणही आली नाही. तेव्हापासून त्याला मुक्तांगणची आवडच लागली. ज्या दिवशी तो उपचारानंतर घरी आला, त्याला घर खूप लहान वाटू लागलं. तिथल्या जेवणाची आठवण आली म्हणून रात्री मुक्तांगणमध्ये गेला. घरचे काळजीत पडले. पण सुनंदाने फोन करून सांगितले, की तो तिकडे आहे आणि सुरक्षित आहे. तेव्हापासून तो मुक्तांगणचं काम करतोय. आधी सुनंदाचा ड्रायव्हर होता. नंतर तो किचन इन्चार्ज होता. आता कौन्सेलर आहे. सुनंदाचा तो लाडका मुलगा. सावलीसारखा राहून मदत करायचा. मुक्तांगणमध्ये असला तरी एका जागी थोडा वेळ थांबणार. आणि जास्त वेळ फिरत राहणार. कुठे काही वादविवाद भांडण चाललं असेल तर हा मध्ये पडून, दोष अंगावर घेऊन ते विझवणार. एखाद्या पेशंटला आल्याआल्याच घरी जायची ओढ निर्माण होते. सारखा ‘सोडा’ म्हणून मागे लागलेला. ते न जमल्यामुळे इतरांशी वाद उकरुन काढणारा. पण राजारामच अशांना पटवू शकतो. काही वेळातच तो मित्र मुक्तांगणमध्ये नीट राहायला लागतो. प्रत्येक बाबतीत त्याची ‘वेगळी थेरपी’ असते. मेधाला खूप थेरपीनंतर ‘मुद्रा’ झाली. ती आमची लाडकी नात. तिच्या जन्माच्या वेळी आम्ही दोघं हजर होतो. राजारामच्या प्रत्येक वाढदिवशी, तिला बरं नसतानाही सुनंदा छान पत्र लिहायची. ती पत्रं म्हणजे त्याचा ठेवा आहेत.

मुलींवरनं चाललं होतं. मला आमच्या आटपाळकरची बायको आठवते. पुण्याच्या पूर्वभागात चाळीत राहणारं हे कुटुंब. तो दुकानात कामाला होता. या मुलीला लग्न झाल्यावर कळलं, की नवऱ्याला व्यसन आहे. तिचे वडील दूर खेड्यात, गरीब शेतकरी. ती परत जाऊ शकत नव्हती. घरात सासू आणि नणंद. तिनं ठरवलं, काही तरी काम शोधायचं आणि आर्थिक लंगडी बाजू सावरायची. भाड्याने शिवणयंत्र घेतलं. तुळशीबागेतले दुकानदार पर्स बनवायचं काम बाहेर देतात, असं ऐकलं होतं. ते काम आणायला लागली. सासू आणि नणंद यांना दोष देण्याऐवजी तिने त्यांच्याशी चांगले संबंध ठेवले होते. त्या दोघींना मदतीला घेऊन पर्सेस करायची. ही कापून-शिवून द्यायची, त्या बटन लाव, लेस लाव अशी कामं करायच्या. मधल्या काळात तिला दोन मुली, एक मुलगा झाला. नवऱ्याचे व्यसन चालूच. नवऱ्याचे व्यसन चालू असले तरी मुलांची आबाळ होऊ दिली नाही. त्यांची

आवड म्हणून त्यांना नाचाच्या क्लासला घातले. त्या दोघी मुक्तांगणच्या कार्यक्रमातही हौसेने नाच करून दाखवायच्या. आसपासच्या गणेशोत्सवाच्या कार्यक्रमांत लोक या मुलींना बोलावू बोलावू नाच ठेवायचे.

नंतर तिला मुक्तांगणची माहिती कळली. मग नवऱ्याला घेऊन आली. ॲडमिट केले. त्या दिवसापासून तो जो बरा आहे तो आजवर सतरा-अठरा वर्षे. त्याला डायरी लिहायचे वेडच लागले. कुठेही भेटला की डायरी दाखवून सही घ्यायचा. त्याच्या गोजिरवाण्या मुली मला फार आवडायच्या. रिझल्टचे प्रगतिपुस्तक आणून दाखवायच्या. बरोबर पेढेही. मी आमच्या त्या मुलीला म्हणायचो, “यातली एक पोर मला देऊन टाक बरं.” ती हसून म्हणायची, “एक नाही मिळणार, तिन्ही पोरं घ्यावी लागतील!”

“चालेल. मग छानच की!”

“बरोबर त्यांची आई बी घ्यावी लागंल!”

“चालेल.”

“मग बाप कसा एकटा राहील? आन सासू-नणंद? समदी घ्यावी लागतील.”

“चालेल.”

मग ती हसून म्हणायची, “मग आमी तुमचंच हावो की.” ऐकणारांची हसून पुरेवाट व्हायची.

ती अशिक्षित किंवा अगदी प्राथमिक शिक्षण झालेली असणार. खेड्यातली, गरिबाघरची. पण किती शहाणपण आहे तिच्यात! दुसरी एखादी भांडून घरी निघून गेली असती, तर तिकडच्यांवर भार, त्रास. राहिली असती आणि सासू, नणंद, नवऱ्याशी भांडत बसली असती तर? त्यातून मुलं झाली. हा सगळा राग पोरांच्या वर काढला असता तर? जितका विचार करावा तितकं त्या पोरीचं शहाणपण भावतंच मनाला.

ही आमची मुलं-मुली. एकमेकांना आधार देण्याचं काम ही परस्पर आणि साध्यासोप्या रीतीने करत की बस्स. वॉर्डातले पेशंट मित्रही एकमेकांना खूप आधार देतात, की ते जेव्हा कळते तेव्हा वाः असा उद्गार आपोआप येतोच. महेंद्रची पत्नी गौरी हिने आमच्या मीटिंगमध्ये एक अनुभव सांगितला. तिच्या धाकट्या दिराने कर्ज काढून जागा घेऊन एक व्यवसाय सुरु केला. त्याचे निमंत्रण आले होते. ऑफिसमध्ये ती काम करते. पण तिथं तिचं अजिबात लक्ष लागत नव्हतं. आपला नवरा किती हुशार! किती चांगला व्यवसाय होता! पण आपली काहीच प्रगती होऊ शकली नाही. आणि तो धाकटा दीर आज पुढं चाललाय. काय आपलं नशीब! जेमतेम भागतंय एवढंच. पण त्याला परत परत ॲडमिट करणं...हे खर्च आहेतच... वगैरे वगैरे विचारांनी ती गळफटून गेली. हे कुणाला तरी सांगावं, मन मोकळं करावं म्हणून आमच्या दुसऱ्या एका सहचरीला (ती तिची मैत्रीणच) फोन केला. हिचं सगळं ऐकताच ती म्हणाली, “वेडी आहेस की काय? ऊठ, खाली जा. चितळेचे एक किलो पेढे विकत घे आणि तत्काळ जा तिकडे. कसलाही विचार करु नको. आत्ता ऊठ आणि जा.”

तशी ती खरोखरीच उठली आणि पेढे घेऊन दिराच्या त्या नव्या ऑफिसात गेली. दिराला इतका आनंद झाला की बस्स. म्हणाला, “वहिनी, मी तुझीच वाट पाहत होतो. हे कौतुक पाहायला तुम्हा दोघांशिवाय आहेच कोण? तुम्ही नसलात तर काही उरत नाही.” दोघेही बराच वेळ बोलत राहिले. दोघांच्या डोळ्यांत अश्रूंच्या धारा लागल्या होत्या.

हे जेव्हा मी ऐकलं तेव्हा थरारूनच गेलो. त्या सल्ला देणाऱ्या सहचरीची कमाल वाटली. तिनं माणसाचं बळ खच्ची करणारा नकारात्मक विचार कसा बरोब्बर ओळखला. त्या विचारातही सत्यता असतेच. पण तो भलतीकडे घेऊन जाणार असेल तर त्या सत्यतेचा उपयोग काय? जसे पेशंट अमुक

दिवसांत जाणार, असे डॉक्टर पेशंटला सत्य सांगून खचवत नाहीत. तिच्या नवऱ्याचे व्यसन, त्यामुळे झालेले नुकसान हे खरेच होते, पण ते आता या वेळी प्रस्तुत नव्हते. ते तिला गळफटवणारे होते, तिच्यात आणि दिरात अंतर निर्माण करणारे होते. त्या सहचरीने या विचारांची खिडकी घट्ट बंद केली आणि योग्य विचारांचे दार उघडून दिले. आणि मग काय, आनंदाची आंघोळच! मलाही कळले, की आपली बाजू खरीही हवी आणि प्रस्तुतही.

यातूनच पुढे मुक्ताने 'सहचरी गट' सुरु केला. सुनंदा असताना तिची ही इच्छा मुक्ताने पुरी केली. थोडं मुक्ताविषयी सांगू? मुलगीच आहे, मग सांगणारच भलं! तसं नाही हां, जे आहे तेच सांगतो. मुक्ता पुणे विद्यापीठातून क्लिनिकल सायकॉलॉजीत एम. ए. झाली. त्या परीक्षेत तर ती पहिली आलीच, पण इतर डिपार्टमेंटमधूनही ती पहिली होती. म्हणून राज्यपालांचे सुवर्णपदकही मिळाले. तिचे गुरुजी पलसाने सर तिला म्हणाले, "आता पीएच.डी. कर." सगळे म्हणत होते, मुक्ता पीएच.डी. झाली की डिपार्टमेंटला लेक्चररचा जॉब हमखास मिळेल. आणि नंतर खात्रीने ती विभागप्रमुख होईल. अगदी लहान वयात.

तिने विषय शोधत शोधत शेवटी मुक्तांगणमधला 'रिलॅप्स प्रिव्हेन्शन' हा विषय निवडला. त्याचा आराखडा केला. तिला त्यासाठी स्कॉलरशिपही मंजूर झाली. ती सुनंदाच्या खोलीत बसे आणि सुनंदाचे पेशंटबरोबरचे बोलणे नुसते ऐकत असे. त्या काळात, ९३-९४ मध्ये सुनंदाचे कॅन्सरपर्व चालू होतेच. काही महिन्यांनंतर मुक्ताने ठरवले, इथेच काम करायचे. 'इथे मला इतका अनुभव मिळतोय, मग पी.एचडी. करून वेगळं काय मिळणार आहे' म्हणून पीएच.डी. सोडून दिली.

आम्ही मुलींना कधीच सांगितलं नव्हतं, की तुम्ही अमुक करा, तमुक क्षेत्र निवडा, असं. मुक्ता नेहमी म्हणायची, "मी मोठी झाले की एक छान शाळा काढणार आहे." त्यामुळे तिचं ते क्षेत्र, असं धरून चाललेलो. एम.ए.नंतर विषयांची शोधाशोध करत भटकली आणि स्वतः होऊन ती मुक्तांगणकडे आली आणि रमलीच तिथं. लोकांना वाटतं, मुक्तांगण हे नाव तिच्यावरूनच दिलं. पण तसं नाही. मुक्तांगणच्या आधी पंधरा वर्षं ती जन्मली. आणि पु.लं.नी आवडीचं नाव म्हणून ते दिलं. आणि तशी बरीच मुक्तांगणे महाराष्ट्रात, पुण्यातही आहेत. दुसरं, काहींना असं वाटतं, तिला आम्ही या कामासाठी आधीपासूनच तयार केलं. तसंही नाही. अगदी प्राथमिक शाळेतसुद्धा जायची सक्ती नव्हती, तर पुढची गोष्ट कशाला? विद्यापीठात तिला मोठ्ठा पगार मिळाला असता. ती 'एच.ओ.डी.' झाली असती. पण ते नाकारून ती इथं आली, हे मला विशेष वाटतं. बारावीला असताना शेजारच्या बाई परीक्षेचा फुटलेला पेपर घेऊन आदल्या दिवशी आल्या होत्या. मला दाखवूही नका, म्हणून मुक्ताने दार खाडकन लावून घेतले होते, तेव्हा तिच्यातली नैतिक चुणूक दिसलीच होती.

सुनंदा गेल्यानंतर मुक्तांगण चालले ते मुक्ता होती म्हणूनच. जीव ओतून काम करणारा स्टाफ होता, मी- आनंदही लागेल तेव्हा होतोच. पण तरीही. सर्व स्टाफने तिला जसे स्वीकारले तसे इतर कुणाला स्वीकारले असते का, शंकाच आहे. तिच्यामध्ये पेशंटविषयी प्रेम, काळजी आहेच, आणि चांगली, संस्था चालवताना लागते तशी व्यवस्थापनाची नजर आहे. हे दोन्ही गुण सुनंदामध्ये होते. मुक्तामध्येही आहेत. ते व्यक्त होतात तिच्या स्वतंत्र बुद्धीने.

तर तिचा तो सहचरी गट.

सहजीवन सभेत बायकांना व्यक्त होता येतेच. पण तरीही वेगळा गट का? कित्येक गोष्टी सगळ्यांसमोर नाही बोलता येत. त्यातनं सहचरी मीटिंग्ज सुरू झाल्या. मुक्ता त्याला हजर असायची. अधूनमधून मी जायचो. मुली म्हणायच्या, "का हो बाबा, मुलींवर माया पातळ केली?" त्यांना माझी-सुनंदाची सुरुवातीची भांडणे, त्यातनं आम्ही काढलेली वाट हे परत परत ऐकायला आवडते. मग गाणी म्हणायला लावतात. आमची मुलं म्हणतात, "बाबा, आमच्या बायकांना तुम्ही डोक्यावर चढवून ठेवलंय. भांडणात सारखी तुमची उदाहरणं देतात, की आमची बोलती बंद." ए.ए.मध्ये

व्यसनी लोकांच्या बायकांचा अल ॲनॉन म्हणून ग्रुप आहे. 'सगळे खापर आपण आजवर नवऱ्याच्या पिण्यावर फोडत होतो. आता आपण आपलेही दोष शोधू या. आपला नवरा प्रत्यक्ष दारू पीत होता. पण अप्रत्यक्षपणे आपणही चोवीस तास दारूच्या विचारातच होतो. त्या सगळ्यातून मुक्त होऊ या,' अशी त्यांची भूमिका. सहचरीमध्ये ती भूमिका तर असतेच, पण जीवनातल्या अनेक साध्या, जिव्हाळ्याच्या विषयांवरही गप्पा होतात. मिळणाऱ्या थोड्या पैशात घर कसं चालवायचं, इथपासून तो सण साधेपणाने कसे साजरे करता येतील इथपर्यंत कुठल्याही विषयावर.

पुढे नव्या इमारतीत आल्यावर सगळ्या पेशंटसाठी पोळ्या करण्याचे काम सहचरींवर सोपवले. बाकी स्वयंपाक मुख्य किचनमध्ये पेशंट मित्रांच्या साहाय्याने. पोळ्या करण्यासाठी सहा-सात बायका सेवेत घेतल्या, त्याही सहचरीच. आता तर त्या विक्रीसाठी चटण्या, मसाले करतात. कंपन्यांना डबे पुरवतात.

एकदा मी मुक्तांगणमधनं बाहेर पडत होतो. समोरून काम करणाऱ्या पाच-सहा सहचरी मुली आल्या. माझ्याबरोबर मुक्तांगण पाहायला आलेला मित्र होता. त्या गाडीच्या दाराशी जमल्या. हसत माझी थट्टा करत होत्या. माझ्या मित्राला मी म्हटलं, "आत्ता या हसताहेत, पण यांचे नवरे पीत होते तेव्हा कशा रडत होत्या."

ते ऐकून एकजण पुढे आली. म्हणाली, "बाबा, आज पण माझा नवरा पितोच आहे. पण मी आता रडत बसले नाही. अशीच हसतमुख राहणार आहे."

मी थक्कच झालो. तिच्या त्या हसण्याने केवढे आश्वासन मिळाले होते. सहचरी गटाने तिला शिकवले होते, आपत्तीने रडत बसायलाच पाहिजे असं नाही. आपत्तीला आपत्तीच्या जागी ठेवू. त्यासाठी काय करायचे ते करू. पण माझ्या चेहऱ्यावरचे हसू, हा माझा निर्णय असेल.

सुनंदा अशीच होती. तिच्याच रस्त्याने या तिच्या मुली चालल्यात. ती गेल्याला बारा वर्षे झाली तरी.

आणखी एक घटक राहिलाच. मुलं. त्यांच्यावर तर वडलांच्या व्यसनाचा सर्वांत वाईट परिणाम होत असावा. बायकोला कसं, त्रास आहे, पण तो माहेरच्यांशी, मित्र-मैत्रिणींशी बोलता येतो. त्याचं ओझं कमी होऊ शकतं. इथं ही मुले म्हणजे मुके प्राणी. तोंड दाबून बुक्क्यांचा मार. त्यांच्याकडे बघूनच पोर आपली वाढ करून घेत असते. एक वेळ वडील नसते तरी ते बरं वाढलं असतं. पण दारू पिऊन घराबाहेर धिंगाणा करणारे, हात उगारणारे, मारणारे वडील...त्या पोराच्या कोवळ्या मनाचा कसा कुस्करा होत असेल!

अशा मुलांसाठी काही तरी करायचं ठरवलं. एरवी बायकांशी बोलता येतं, त्यांचं कौन्सेलिंग करता येतं. पण मुलांच्या बाबतीत? ते शब्दांत व्यक्त करू शकत नाहीत. ते बोलून मोकळे होऊ शकत नाहीत. सोसावं तर लागतं, तेही सतत. काहींच्या मनावर उमटलेले ओरखडे जन्मभर त्यांच्या आयुष्याचा भाग होऊन राहतात.

आम्ही पेशंट मित्रांच्या मुलांबरोबर बोलायचा प्रयत्न करू पाहत होतो. पण जे भोगलेलं, दुःसह असं काही बोलणं त्यांच्या त्या कोवळ्या मनाला झेपेल का? की मोकळं होण्याऐवजी जास्त मोडतोड, नुकसान होईल? एक मुलगा एवढंच म्हणाला होता, "मला शेजारच्यांसारखं घर का नाही मिळालं?" या एका वाक्यात त्याच्या जीवनाचं जसं दाहक सत्यच सामावलेलं. तो त्याच्या वडिलांविरुद्ध बोलू शकत नव्हता. त्या असुरक्षित भयानक रात्रींविषयी बोलायला त्याच्याकडे शब्द नव्हते. पण त्याला जाणवत होतं, जे आपल्याकडे आहे त्यापेक्षा शेजारच्यांकडे वेगळं आहे. आपल्याकडचं जे आहे ते असंच असायला हवं असं काही नाही. मग त्याला दिसतं ते शेजाऱ्यांचं घर.

त्याला हेवाही वाटत असेल त्या घरातल्या मुलांचा. ती मुलं याला खेळायला घेत असतील का? की कधी याच्या मर्माला टोचत असतील? कोण जाणे!

पहिली काही वर्षे पु. ल., सुनीताबाई मुक्तांगणच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला नेहमी यायचे. बरोबर मुख्यमंत्री शरद पवारांनाही घेऊन आलेले. त्या कार्यक्रमात एका पेशंट मित्राची छोटी मुलगी बोलली. काय बोलली ती? केवढं शहाणपण! जेमतेम दहा-बारा वर्षांची पोर ती. तिनं 'पूर्वी आणि आता' अशी दृश्येच उभी केली. "पूर्वी बाबांच्या व्यसनाच्या काळात मैत्रिणींना घरी बोलावू शकत नसे. आता सगळ्या आमच्याच घरी असतात. खेळायला, अभ्यास करायलाही. पूर्वी बाबा घरी येणार याची भीती वाटायची. आल्यावर काय काय होईल याची कल्पना नसायची. आता बाबांची मी वाट पाहत असते." एवढं सांगून तिने समोर बसलेल्या आमच्या मित्रांना सांगितलं, "तुम्ही पीत असता तेव्हा तुम्हाला घरचे लोक टाकून बोलतात. तुम्हाला वाटत असेल, घरच्यांना तुम्ही आवडत नाही. पण सगळ्या काकांनो, खरं सांगू? तुम्ही आम्हाला हवे असता..."

ऐकताना पु.लं.चे डोळे डबडबले. त्या वेळच्या व्हिडिओमध्येसुद्धा ते आले आहे. नंतरही म्हणत होते, "काय रे, किती लहान पोर ती! किती शहाण्यासारखं बोलली! काय तिचा गुन्हा रे?" शरद पवार एवढे जाड त्वचेचे राजकारणी, पण तेही हलले. मला नंतर ना. धों. महानोर सांगत होते, "पुढे २-३ दिवस मी पवारसाहेबांबरोबर होतो. प्रत्येक सभेत त्यांनी त्या मुलीचं उदाहरण दिलं. आपल्या पोरांवर अशी वेळ आणू नका, असं वारंवार सांगत होते."

किती मुलं आठवताहेत. मित्रांच्या बायका म्हणजे माझ्या मुलीच. मुलींची दुःखं ऐकत आलेलोच होतो आणि अखंड मनस्तापाचा धनी होत होतो. पण पोरांची स्थिती पाहून फार कळवळायला व्हायचं. ती पोरं सुस्थितीतली असोत की गरिबीतली. प्रवास एकच : अखंड असुरक्षितता, मोडतोड, इत्यादी.

काही मुलं आठवताहेत. आमच्या एका मित्राची दोन मुलं. त्यातलाही थोरला आठवतोय. वडील व्यसनाच्या आधी खूप मोठ्या पगारावर काम करणारे मॅनेजर. आई त्याच्या व्यसनाला कंटाळून मुलांना घेऊन दुसरीकडे राहत होती. तिला नोकरी होती. त्यामुळे आर्थिक प्रश्न फारसा नव्हता. अगदी धाकटी मुलगी असावी. ती लहान असल्यामुळे तिच्यावर या सगळ्याचा फारसा परिणाम झालेला नव्हता. पण थोरला तिसरीत होता. खरं तर सातवीत असायचा, पण बालवर्गातच नापास व्हायचा. त्यामुळे शाळा यांच्यामागे लागली होती, की याला कमी बुद्धीच्या मुलांच्या- स्लो लर्नर्स स्कूलमध्ये घाला. त्या आईला कळत नव्हते काय करावे ते.

पुण्यातल्या तथाकथित चांगल्या, अर्थात इंग्लिश मीडियम शाळेत तो होता. हा मुलगा गृहपाठ करून आला नाही तर काय काय शिक्षा असायच्या, त्या ऐकून तर मी थक्क झालो. त्या मुलाला मध्ये उभे करून इतर मुलांनी त्याच्याभोवती फेर धरायचा आणि म्हणायचे, "ही इज अ बॅड बॉय, ही इज अ बॅड बॉय' असे. त्या शिक्षिकेने सांगितले, "तू उद्यापासून मुलीचा ड्रेस घालून ये." बाप रे! काय ही शाळा! काय ती शिक्षिका! तिने त्या मुलाला जवळ घेऊन विचारपूस केली असती तर समजले असते, तो का गृहपाठ करत नाही ते. त्या काळात त्यांच्या घरात त्याचे बाबा दारू पिऊन आले की रात्रभर नुसती भांडणेच चालत. कित्येक वेळा शेजाऱ्यांनी तक्रार केली, वगैरे. अशा मुलाशी उलट किती सहानुभूतीने वागायला हवं होतं. त्याचे लहानपणचे मनाचे ओरखडे पाहवत नव्हते. मधल्या एका अवस्थेतली आठवण त्याने कशीबशी सांगितली. तो शाळेत होता, त्या खिडकीतून रस्ता दिसत असे. वडलांना हे सगळे सोडून गेलेले. वडलांना मुलांची आठवण आली की ते दारू प्यालेले, कपडे फाटलेले कधी चिखलाने भरलेले, अशा अवस्थेत शाळेसमोर जाऊन उभे राहत. मधल्या सुट्टीत तरी भेटेल तो, अशा आशेने. वर्गातली मुलं याला टोचण्यासाठी म्हणत, "ते बघ तुझे बाबा!" याला मेल्याहून मेल्यासारखे व्हायचे.

सुनंदा त्याच्या बाबांना बघत होती आणि मी या मुलाला. शाळेत गेलो. त्या शिक्षिकेला भेटलो. त्या इतक्या हट्टी होत्या की काही ऐकूनच घेईनात. मग मुख्याध्यापिका बाईंना भेटलो. त्यांनी मात्र माझे म्हणणे ऐकून घेतले. येवढेच म्हणाल्या, "त्या बाईंना मी सांगते." पण, याची जागा दुसऱ्या शाळेत. हा इथं मागंच पडणार. त्याचं यात नुकसान आहे, हे मात्र म्हणत राहिल्या. मग मी त्यांना म्हटले, "त्याचे वडील आता आमच्याकडे ॲडमिट आहेत. ते बरे होण्याच्या मार्गावर आहेत. या वर्षी त्याला बसू द्या. त्याने प्रगती नाही केली तर मग दुसऱ्या शाळेत घालू." ते त्यांनी ऐकले. त्याचे वडील, म्हणजे आमचा मित्र बरा झाला. नंतर मुक्तांगणमध्ये राहून काम करु लागला. त्याचे दिसणे, सफाईदार इंग्लिश, त्याचा 'कॉर्पोरेट लुक' असल्यामुळे मुक्तांगणची बाहेरची कामे तो हातोहात करु लागला. कंपन्यांमध्ये, ऑफिसेसमध्ये जावे लागे. तिथल्या वरिष्ठांना भेटून कामे करी. त्यांच्या कंपनीतून दारुमुळे काढून टाकलेल्या आमच्या अनेक मित्रांना त्याने त्याच्या बोलण्याच्या कौशल्यावर परत रुजू करुन घेतले. नवरा-बायकोचे संबंध सुधारणे मात्र जरा अवघड होऊन बसले होते. ती काही गोष्टी सोडायलाच तयार नव्हती. पण तरीही घर नीट चालू लागले होते. त्या वर्षी तो मुलगा चक्क पास झाला- पंचावन्न टक्के मार्क मिळवून! एरवी नव्वद टक्केवालेही चेहरा पाडून बसतात. तिथे हा पंचावन्न टक्के, तेही तिसरीत की चौथीत. आम्हा सगळ्यांना अपार, अद्भुत आनंद देऊन गेला.

या सगळ्या परिस्थितीत काही मुले कुढी व्हायची, इतर दुष्परिणाम व्हायचे. तर काही स्ट्राँग होतानाही पाहायचो. एक मुंबईचं कुटुंब. नवरा दारुत. बायको नोकरीत. कंटाळून तिनं मुलांसहित घर सोडायचं ठरवलं. तर थोरला मुलगा जेमतेम दहा-बारा वर्षांचा, म्हणजे सहावी-सातवीत असणार. तो आईला म्हणाला, "तुला जायचं तर जा, पण मी इथंच राहणार. कारण बाबांना आताच खरी मदतीची गरज आहे." हे शहाणपण इतक्या लहान वयात? अशीच शाळकरी मुलं आठवतात. एकाच्या आईनं वडलांच्या व्यसनाला कंटाळून जाळून घेतलं. (हो, अशा आत्महत्या करणाऱ्या, प्रयत्न केलेल्या स्त्रिया बऱ्याच.) मुलानं मुक्तांगणची माहिती काढून तो वडलांना घेऊन ॲडमिट करायला घेऊन आला. आई-वडिलांची कावड घेऊन जाणारा श्रावण बाळच तो! कधी कधी त्यांचं ते शहाणपणही नको वाटायचं. या वयात त्या पोरानं दंगा करायचा, मस्ती करायची, आई-वडिलांकडे हट्ट करायचा. तर तो हे काय करतोय? तो किती शांत आहे, प्रगल्भ भाषेत बोलतोय! पण तरी त्या मोडलेल्या मुलांपेक्षा हे किती बरं.

पण तरी हे प्रकरण जरा गुंतागुंतीचं आहे. कुठं तरी वाचलं होतं, दारुड्या लोकांच्या मुलांमध्ये दारुडे होण्याचं प्रमाण इतर लोकसंख्येच्या मानाने जास्त आहे. आमच्या मित्रांच्या अनुभवावरून हे पटलंच मला. ते मित्र म्हणतात त्याप्रमाणे लहानपणी दारु पिणाऱ्या वडलांचा त्यांना राग येत असे, द्वेष वाटत असे. आपल्या आयुष्यात दारुला स्पर्शही करायचा नाही, याचा प्रबळ निश्चय झालेला असतो. आणि हे मित्र मोठे होतात तेव्हा नकळत दारु सुरु होते आणि बघता बघता ते व्यसनाधीन होतात. एकाने सांगितलं, की 'पहिला पगार झाला. खूप आनंद झाला. मग काय करायचं? वडलांचा पॅटर्न मनात खोल कुठे तरी बिंबलेला होताच, तो वर आला आणि वाटेत दारु पिऊनच घरी आलो. आईनं कपाळाला हात लावला." अशा अनेक स्त्रिया आहेत की ज्यांनी नवऱ्याचं दारुडेपण भोगलं, आणि नंतर मुलाचं. त्या वेळी दारुला उपचार असू शकतात, त्यातनं तो बरा होऊ शकतो, हे तरी कुठे ठाऊक होतं?

या लहान मुलांच्या अज्ञात मनांचा ठाव घेणं कठीण होतं. त्यांना कौन्सेलरशी बोलताही येत नसे. मग त्यांच्यासाठी आपण काही आनंद देणारे उपक्रम करु यात का? त्यातनं 'अंकुर' या गटाची स्थापना झाली. उन्हाळ्याच्या, दिवाळीच्या सुट्टीत त्यांची शिबिरं घ्यायची. बंधूने ती जबाबदारी मागून घेतली. त्याने मुलांच्या साहाय्याने रंगीत कागद कापून आमच्या हॉलच्या भिंतींना चिकटवून हॉल रंगीत, सजवून टाकला. मग पॅसेज रंगीत केला आणि आम्ही आत येतो त्या प्रवेशद्वारालाही छान

सजवले. दिवसभर ओरिगामी, गाणी, ओल्या मातीच्या वस्तू, चित्रे काढणे...असे विविध उपक्रम. त्यात मुलं एवढी रमली की आम्हा सगळ्यांचे डोळेच ओले.

त्यांच्या चित्रात आम्ही त्यांच्या अंतर्मनातलं काही व्यक्त होतंय का हे पाहत बसलो नाही. आम्हाला त्यांना हसवायचे होते, रमवायचे होते. सगळ्यांच्या मनःस्थितीचं प्रमुख कारण तर स्पष्टच होतं. मग त्यावरच बोलायचं, टोकायचं कशाला? त्यांना चार चांगले क्षण मिळणे, हाच त्यांच्या दुखऱ्या मनाला दिलासा होता. बाकीचं काम त्यांचं ते करणार होते. शिबिरांना येऊन येऊन ते एकमेकांचे मित्र झाले होते. वडलांवरून इथं कुणी त्यांना चिडवणार नव्हतं. एरवीच्या २६ जानेवारी, ३१ डिसेंबर, २६ जून, दिवाळी अशा सर्वांच्या मिळून कार्यक्रमाला ते येत. आमच्या इकडे कार्यक्रम चालू असतो आणि बाहेर पोरांचा धुमाकूळ. तेच तर आम्हाला हवं असतं ना!

■

६

मला सांगता सांगता अधूनमधून विषय बदलावासा वाटतो. तुम्हाला वाचताना तसं वाटतं का? अहो, जुन्या आठवणी. बऱ्या असोत, वाईट असोत, मन हलतेच ना जरा. तर आता सांगणार आहे नव्या वास्तूविषयी. आम्हाला आमची वास्तू मिळेल असे वाटले नव्हते. ती मिळावी अशी इच्छाही नव्हती. कारण मेंटलमधे मुबलक जागा, मोठी बिल्डिंग होतीच. ती दीर्घ मुदतीची, नाममात्र भाड्याने. त्या वेळेला सुनंदा होती म्हणून त्यांचा त्रासही फारसा नव्हता. पण अचानक असे काही झाले की कुणाचा विश्वास बसणार नाही. प्रत्येक यंत्रणेत कुणी तरी एखादा चांगला माणूस असतोच, आणि त्याला आपला आणि आपल्याला त्याचा शोध लागावा लागतो. इथं पुणे महानगरपालिकेमधले अशोक कळमकर हे उपायुक्त भेटले. पुढे तो माझा लहान भाऊ अशोक झाला आणि तोही मला 'ए बाबा' म्हणू लागला. त्याची मुलगी प्राजक्ता तर बाबड्याही म्हणते, इतके सगळे जुळले. 'जागेला सोन्याचा भाव' ही म्हणही मागे पडलेली. मग कशी जागा मिळाली? अगदी अशक्याच्या जवळपास असणाऱ्या शक्यतेने.

आमच्या दिल्लीच्या खात्याने एक योजना सगळ्या राज्यांना पाठवली. तुमच्या राज्यामधल्या शहरांमधे व्यसनमुक्तीचे काम करणारी एखादी संस्था असेल, त्यांना जागेची गरज असेल, आणि तुम्ही त्यांना जागा दिली, तर आम्ही बिल्डिंगसाठी आठ लाखांपर्यंत ग्रँट देऊ, असा त्याचा अर्थ. ते पत्र महाराष्ट्र सरकारकडे, ही योजना शहरांसाठी असल्याने 'नागरी विकास' खात्याकडे ते पत्र गेले. ते पत्र फिरत फिरत पुणे मनपाकडे आले. तिथेही आतल्या आत फिरत नागरवस्ती विभागाचे प्रमुख अशोक कळमकरांच्या टेबलावर येऊन पडले. त्यांनी वाचल्या वाचल्या त्यांचे दोन सहकारी आम्हाला भेटायला पाठवले आणि मी अशोकला भेटलो. ती पहिली भेट.

एखादा वरिष्ठ अधिकारी इतका हसतमुख असू शकतो, उत्साही, आपण होऊन कृती करणारा असू शकतो, हे फार दुर्मिळ दृश्य मी पाहत होतो. त्यांच्या कामाचा एवढा पसारा होता, की त्यात या त्यांच्या 'कक्षे'बाहेर असलेल्या पत्रावर अशी झटकन कृती करायचे अपेक्षितच नव्हते. त्याने अनेक झोपडपट्ट्यांमधे बालवाड्या, बायकांचे बचत गट असे मोठ्ठेच काम उभारलेले. शिवाय नेहरू (बहुधा जवाहर) योजनेतून अनेक बेकार तरुणांना काही कौशल्ये शिकवायचे कामही ते करत. आणखी बरेच. पण कामाने तो दबला नाही. चेहरा प्रसन्न. त्याचे ऑफिसही तसेच प्रसन्न. भिंतीवर चित्रे. फायली, कॉम्प्युटर जिथल्या तिथे.

अशोकने सांगितले, "तुम्हाला जागा हवी आहे का?"

मागच्यासारखा हा एक 'कुबेर' प्रश्न. पण त्या वेळेपासून आतापावेतो मी निर्ढावलेलो होतो. म्हणालो, "हो." नंतर सुनंदाला याचे जरा आश्चर्य वाटले. म्हणाली, "कशाला हवी आहे जागा?" मी म्हटले, "असू दे. जागा असली की उपयोग सुचेल." एक जागा सॅलिसबरी पार्कच्या छान एरियात होती. मोठी झाडे, सपाट लेव्हलचा प्लॉट होता. कुणाच्याही तोंडाला पाणी सुटलं असतं. पण त्या जागेवर गार्डनसाठी रिझर्वेशन होतं. अर्धी जागा बांधून घ्या आणि अर्धी गार्डन विकसित करून पब्लिकला खुली करून द्या, असा प्रस्ताव त्या जमीनखात्यापैकी कुणी सुचवला. पण अशोक म्हणाला, "नको नको. या लोकांना पुढं कुणी यावरनं त्रास द्यायला नको. त्यापेक्षा दवाखाने, हॉस्पिटलसाठी रिझर्व्ह केलेल्या जागा बघू यात." ते भूमी जिंदगानीवाले आणि इतर म्हणाले, "आपण सगळं काम असं परफेक्ट करून देऊ की त्रास झालाच नाही पाहिजे." तरी अशोक मान

हलवत म्हणाला, "तरीही नको. ही सज्जन माणसं आहेत. यांना सगळं कायदेशीरच करून देऊ. अगदी सरळ मार्गाने."

अशी जागा एक दिसली. तिचं पहिलं दृश्य प्रेमात पडण्याजोगं अजिबात नव्हतं. गंजलेल्या तारांचे ठिकठिकाणी तुटलेले कुंपण. आत नुसता उकिरडा माजलेला. डुकरं होती, गुरं होती. आसपासच्या माणसांनी त्याला उघड्या शौचालयाचं स्वरुप दिलेलं. पण ती जागा आमच्या आधीच्या मुक्तांगणच्या जवळ, अगदी एखादा किलोमीटरही नसेल, इतकी जवळ होती. ती जागा समोर होती, पण ताब्यात यायला बराच काळ गेला. त्या अवधीत तीन कमिशनर बदलले. या तिघांनीही चांगला हातभार लावला. त्यातल्या एकांनी तर बदली झाल्याच्या सकाळी चार्ज सोडायच्या आधी या प्रकरणावर सही केली होती. नंतर हे प्रकरण स्थायी समितीकडे आले. तिथंही भरपूर वेळ गेला. वास्तविक मी पूर्वी सार्वजनिक जीवनात वावरलो होतो, त्यामुळे ही राजकारणी मंडळी मला माहीत होती. पण अशोकने सांगितले, "बाबा, त्यांना सांगायचं काम मी करीन. आमचे रोजचे संबंध आहेत." तरीही आमच्या भागातले नगरसेवक अडून बसले. ते मान्यता देईनात. त्यांना तिथं मनपाचा दवाखाना करायचा होता. वास्तविक दहा मिनिटांच्या पायी अंतरावर दुसरा दवाखाना होता आणि त्यालाही कमी प्रतिसाद होता. तरीही त्यांचा तो हट्ट होता. वास्तविक तो नगरसेवक म्हणजे दलित समाजातला, आमच्या चळवळीतला. शेवटी अशोक म्हणाला, "एकदा आपण दोघं त्याच्या घरी जाऊ. त्यानं त्याचं समाधान झालं तर बघू." तसे आम्ही गेलो. दलित वस्तीतलं एक बांधलेलं पक्कं घर. त्यांच्याशी बोललो आणि त्यानं अनुमती दिली. अशोकचा कयास बरोबर ठरला होता.

पण पुढं काय करायचं?

मग सुनंदाने त्याच्यासाठी साफसफाई टीम तयार केल्या. कुंपण जिथे तुटले होते ते बांधून घेतले. पोरांनी सगळा कचरा, वाढलेली झुडुपं छान साफ केली. कुणी हितचिंतकाने सुचवलं, "काही तरी बांधकाम करा; नाही तर तुम्ही वापर करीत नाही म्हणून कुणाचा हात पडायचा." एखादी शेड बांधावी? त्या काळात अरुण देशपांडेकडे मी त्याने बांधलेले डोम पाहिले होते. मग तिकडे अंकोलीला आमची दहा लोकांची बॅच ट्रेनिंगला पाठवली. त्यांनी आल्यावर लोखंडी अँगल्सचा डोम तयार केला. ते बरोबर अडीच तासांत सगळा डोम उभा करत. परत उतरवत. हा खेळच झाला त्यांचा. त्यांनी नंतर येणाऱ्या मुलांनाही हे तंत्र शिकवलं. मग शेवटी त्यावर लोखंडी जाळी ऊर्फ चिकन मेश लावून फेरो सिमेंटने लिंपून टाकले.

किती तरी दिवस तो डोम येवढंच त्या जागेवरचं बांधकाम. पण ती आमची वास्तू होती. तिथं आम्ही एकजण राहायला, राखण करायला ठेवला होता. त्याला मुलं 'डोम'कावळा म्हणायची. तोही हसून हाताने पंख हलवल्यासारखं करायचा.

इकडं मेंटलमधला त्रास वाढू लागला, तसं आपल्या जागेत आपण जावं, असं सगळ्यांनाच वाटू लागलं. आपण शेड उभ्या करू, झोपड्या बांधू, पण तिकडे चला, असं मुलं म्हणू लागली. पण कसं करणार? त्यासाठीही पैसा लागणार होता. तो कुठून आणायचा?

कधी कधी 'छप्पर फाडके'चा अनुभव येतो, तसे झाले. मी सचिवालयात गेलो असताना अरुण घाटेने एकांची ओळख करून दिली. मुख्यमंत्री सचिवालयात ते उपसचिव म्हणून काम करायचे. माझी माहिती सांगताना त्याने मुक्तांगणचे सांगताच ते म्हणाले, "ते का तुम्ही? कमाल आहे! मुख्यमंत्री फंडातून पंधरा लाख मंजूर होऊन पडलेत, पण तुमचा पत्ताच नाही." मी थक्क झालो. म्हणालो, "असा अर्ज आम्ही केलेलाच नाही." नंतर कळले, एक मित्र आमच्याकडे ॲडमिट होता. त्याचे वडील आमदार होते. प्रामाणिक, स्पष्टवक्ते, चळवळी करणारे अशी त्यांची ख्याती. त्यांनी मुख्यमंत्र्यांना परस्पर अर्ज केला आणि त्यानुसार हे पैसे मंजूर झालेले.

मग जरा उत्साह आला. आता निदान शेड्स बांधता येतील. पण तेवढ्यात माझा कोल्हापूरचा मित्र शिरीष बेरी भेटला. शिरीष हा आर्किटेक्ट. मोजकी पण चांगली कामे करणारा. त्या बाबतीत तो जगप्रसिद्ध. जपान सरकारच्या आर्किटेक्चर म्युझियममधे याचे डिझाइन लावलेले. त्याला म्हणालो, “स्वस्त आणि चांगल्या शेड्सचं डिझाइन दे ना करून.” तो म्हणाला, “कशाला? आपण तुमच्यासाठी चांगलं सेंटरच बांधू.”

“अरे पण मित्रा, पंधरा लाखांत काय होणार?”

“प्लॅन तर करू. काम सुरु केलं की पैसे येतील आपोआप. माझा अनेक संस्थांच्या बाबतीत हा अनुभव आहे.”

मग मी स्वप्नंच पाहायला सुरुवात केली. आपलं असं केंद्र. ती टोलेजंग इमारत नसावी. ती फार उठून दिसणारी चकचकीत इमारतही नसावी. ती साधी असावी, पण छान असावी. शिरीष माझ्याशी, सुनंदाशी, मुक्तांगणमधल्या सगळ्यांशी बोलला.

त्याने विचारले, “तुम्हाला इमारत कशी हवीय?” मी म्हणालो, “सिक्युरिटी महत्त्वाची. कोणीही सहजासहजी बाहेर जाता कामा नये. तसेच दारु-ड्रगसारखं काहीही आत येऊ शकलं नाही पाहिजे.”

“आणि?”

“आत राहणाऱ्यांना जेलसारखं, कोंडल्यासारखं वाटायला नको. असं काही तरी.”

शिरीष गेला. त्यानं पुढच्या वेळी नकाशा दाखवला. कुठेही चौकोनी करकरीतपणा नव्हता. मधे गोलाकार अंगण. त्यात एक स्टेज, भोवती ऑडिटोरियमसारख्या पायऱ्या, त्याही स्टेजभोवती गोलाकार अशा. त्या स्टेजच्या गोलाच्या मधून निघणाऱ्या त्रिज्यांच्या दिशेने कॉन्सिलर्सच्या खोल्यांची रचना, वगैरे. कुठूनही कुठे पाहता येईल, कुठूनही कुणालाही हाक मारता येईल. त्या ऑडिटोरियमच्या कडेकडेने फुलझाडे-वेली लावायला फ्लॉवर बेड्स. कौन्सिलरच्या प्रत्येक खोलीबाहेर अशीच फ्लॉवर बेड्सची वेटोळी. आल्या आल्या बिल्डिंगच्या मधे थेट आकाश दिसावे अशी गोलाकार जागा मोकळी ठेवलेली.

प्लॅन बघून तर आम्ही स्वप्नराज्यात गेलो. डोळ्यांसमोर इमारत दिसूच लागली. मटेरियल काय वापरायचे? आमच्या जागेजवळच दगडाच्या खाणी होत्या. मला दगडी बांधकाम आवडते. एकदा केले की जवळपास कायमचे. रंग द्यायला नको. पावसाळ्यात एकदा ती इमारत धुऊन निघतेच. पण मग तुरुंगच वाटेल त्याचं काय? या जेलने दगडांचं पेटंट घेतलंय की काय? दगडी बांधकाम बघितलं की जुनी देवळं का आठवू नयेत? शिरीष म्हणतो, ‘दगड हे नैसर्गिक माध्यम.’ खाणीतून काढायला लागेल तेवढीच शक्ती वापरावी लागते. विटांसाठी शेतजमिनीवरची माती काढणे, तिला उष्णता देणे. त्यासाठी कोळसा... हे अपरिहार्य असलं, तरी कमीत कमी वापर तर करू यात. म्हणून बाहेर भिंत दगडांची आणि तिला आतून एक थर विटांचा, अशी रचना केली.

सुनंदा यात फार नसायची. मधनं मधनं होणारा कॅन्सरचा उद्रव, त्यासाठीचे उपचार, यातून जो वेळ मिळायचा तो ती मुक्तांगणच्या पेशंटसाठीच द्यायची. कधी कधी गाडी वळवून इकडे बांधकामाकडे आणायचो. दगडांमधून वाट काढणे, खड्ड्यांवरच्या फळीवरुन चालणे, हे तिच्यासाठी ठीक नव्हते. मग ती बाहेर गाडीत बसूनच काम पाहायची. आधी डे-केअरसाठी इमारत बांधायची होती. नंतर हा मेंटलचा त्रास वाढू लागल्यावर प्लॅन वाढत गेला. मजले चढत गेले. पूर्वीचं तीस लाखाचं बजेट, पन्नासवर गेलं. शेवटी नव्वदवर गेलं.

पैसे मागणे माझ्या स्वभावातच नाही. प्रचंड संकोच वाटायचा. माझी जीभच रेटायची नाही. मित्र म्हणायचे, तू कुठे तुझ्यासाठी मागतो आहेस पैसे? हे सगळ्यांचं काम आहे. माझा मित्रपरिवार मोठा. त्यातले काही धनिकही. इतरांना वाटले, की मी मागितले की हां हां म्हणता पैसे जमतील.

पण माझे-मित्रांचे संबंधच वेगळ्या पायावर आधारलेले. त्या संबंधांचा चांगल्या कामासाठी का होईना, उपयोग करणे मला कसेसेच वाटे. मैत्रीची लज्जत जाईल, असे वाटले. मग एक मार्ग मित्राने सुचवला, की हे धार्मिक किंवा अन्य ट्रस्ट असतात, त्यांना अर्ज तर करू या. त्यांच्याकडे जमा होणाऱ्या पैशातून लोकोपयोगी संस्थांना मदत करणे, हे त्यांचं कामच आहे. मग सिद्धिविनायक ट्रस्ट, साईबाबा संस्थान यांना अर्ज केले. टाटा, दोराबजी ट्रस्ट, कमिन्स इंडिया ट्रस्ट यांनाही अर्ज केले. या सगळ्यांनी पाच-पाच लाख दिले. साईबाबा संस्थानमधे राजारामचे वडील मधुकर जोशी हे विश्वस्त होते. त्यांच्या प्रयत्नांनी दहा लाख मिळाले. नाना पाटेकर शूटिंगसाठी मेंटलमधे आला होता. मुक्तांगणमधेही आला. सुनंदा आजारली असूनही काम करत होती. तिला त्याने जरा जवळ घेऊन विचारलं, “तुझ्यासाठी काय करू सांग.” तिने नव्या बिल्डिंगच्या मॉडेलकडे बोट दाखवले. त्याच्या निर्मात्याने नंतर पाच लाखांचा चेक पाठवला. (तो अशी अट घालायचा, अशा संस्थेला इतके पैसे दे. त्याची पावती दाखव, की मग शूटिंगची पुढची तारीख मिळेल.) सदाशिव अमरापूरकरने एक लाख दिले. सुनंदाची बालमैत्रीण जयश्री फिरोदिया, त्यांच्या ट्रस्टने एक लाख पाठवले. हे सगळे वेगवेगळ्या टप्प्यांवर मिळाले. हिंदुस्थान बिल्डर्सच्या दिलीप मेहेंदळे यांनी इमारत बांधली. पैसे संपत आले की मी सांगायचो, “वेग कमी करा. मी सांगेन तेव्हा बांधकाम थांबवा. मला तुमच्या कर्जात राहायचे नाही.” ते हसायचे. म्हणायचे, “द्या हो कधीही. पैसे कधीही मिळतील. पण असं काम, असं डिझाइन, शिवाय शिरीषसाहेबांच्या हाताखाली काम... हे दुसरीकडे मिळायचं नाही.” एका उद्योगपतींचे मॅनेजर आले होते. त्यांनी संस्था पाहिली, प्लॅन पाहिला, मॉडेल पाहिले आणि एक अनपेक्षित प्रश्न विचारला, “आम्ही देणगी दिली तर आमच्या थोरल्या साहेबांचे नाव संस्थेला देणार का?”

बाप रे! काय हा प्रश्न! कोणी असा विचारू शकतो? मी म्हटलं, “पण मग आधी ज्यांनी देणग्या दिल्या त्यांच्यावर अन्याय नाही का होणार?”

ते हसले. म्हणाले, “एकूण किती खर्च आहे प्रोजेक्टचा?”

“ऐंशी लाख.”

“तो सगळा आम्ही एक रकमी देतो. मग?”

एखादा क्षण खूप लांबतो, लांबवला जातो, खूप मोठा होतो, तसा तो क्षण होता. काय काय मनात येऊन गेलं असेल! चला, एका क्षणात सगळे प्रश्न सुटतील. पण... त्या कुणा अनोळख्याचं नाव? केवळ पैसे देतो म्हणून? मग पु.लं.नी ठेवलेल्या या मुक्तांगण नावाचं काय?

मी म्हणालो, “नाही जमायचं. नाव तेच राहणार.”

हात झटकून ‘काय मूर्ख माणूस आहे,’ असा बहुधा विचार करत ते निघून गेले. तो सुन्नपणा गेला नव्हता. मला देणगी देऊन स्वतःची नावे देणारांचा फार तिटकारा आहे. देणगी देणं हे समाजासाठी मोठं काम ते करतात, पण ते सगळं नाव देण्यात घालवतात. याचा उबग येतो. नगरला सर्वत्र सारडा, सोलापूरला दमाणी, पुण्यात गरवारे... असे अनेक. अमेरिकेतल्या धनिकांची आठवण झाली. रेडवुड ह्या झाडाचं जगात शेवटचे राहिलेले जंगल एका धनिकाने विकत घेतले आणि त्याला नाव दिले म्यूर नावाच्या वनस्पती शास्त्रज्ञाचे. संरक्षित करून सरकारला अभयारण्य करण्यासाठी दिले. आजही त्याला ‘म्यूरवुड नॅशनल पार्क’ म्हटलं जातं.

तर सांगत होतो, अशा मोठ्या देणग्यांनी निम्मा खर्च भागलाय. मग उरलेले चाळीस लाख कसे उभे राहिले? तर सर्वसामान्य, मनात सद्भाव असलेल्या लोकांकडून. कोणी हजार, कोणी पाच हजार, कोणी दहा हजार. पण तेवढेच. हे सगळे न मागता. यांना कसे कळले, मुक्तांगण स्वतःची इमारत बांधू पाहतेय ते? कदाचित काहींचा कुणी नातेवाईक आमच्याकडे ॲडमिट असेलही. पण तसे थोडेच

असावेत. जशी वाईट, चुकीची अफवा स्वैरपणे, वेगाने पसरते, तसं चांगल्या कामाच्या गरजेची बातमीही पसरते का? कोण जाणे! पण धन्य वाटलं. देणगीसाठी कुणा धनिकाच्या वेटिंगरुममधे त्यांच्या बोलावण्याची वाट बघत बसावे लागले नाही. महर्षी कर्व्यांचं ब्रीद आपण चालवू शकलो याचं समाधान.

तो सगळा काळच आर्थिक हलाखीचा. 'फिंगोर्डप'चे मित्र म्हणाले, "अरे, इस फील्डमें तो फंडिंगका प्रॉब्लेमही नहीं होना चाहिये। वो देख, यूरोपियन कमिशनसे उस ऑर्गनायझेशनको तीन करोड मिल गये..." मला फॉरेन फंडिंग या प्रकाराचा धसका होता. एकदम धाडकन, जरुरीपेक्षा किती तरी जास्त पैसे येतात. मग चकाचक ऑफिस, गाड्या येतात. सहकाऱ्यांमधे चढाओढ. आणि शेवटी यांच्याकडे पैसा आहे, आम्ही द्यायची गरजच नाही, असं लोक म्हणू लागतात. म्हणजे लोक सहभाग समाप्त. नकोय ते. पुढे अमेरिकेतले भारतीय मित्र म्हणू लागले, आम्हाला तुला मदत करायचीय. त्यात काय गैर आहे? तेही खरंच. मग फॉरेन फंडिंग स्वीकारण्याचं एफ. सी. आर. ए. सर्टिफिकेट मिळवलं. आणि विश्वस्त मंडळात ठरवले, की परदेशातून येणाऱ्या वैयक्तिक देणग्याच स्वीकारु यात. पण ही सुनंदा गेल्यानंतरची, फार पुढची गोष्ट.

कुणी सांगितलं, तुम्हाला इन्कम टॅक्स डिपार्टमेंटचं '८० जी' आहे ना, तर १००% टॅक्स एक्झम्शन मिळवा. लोक लाखो रुपये घेऊन तुमच्या दारात येतील. पण अनुभवी मित्राने सल्ला दिला, की या भानगडीत पडू नकोस. ते लोक लाखो कोटी रुपये घेऊन येतात, तुम्ही इतके ठेवा, आम्हाला इतके परत द्या असंही म्हणतात. मग आपल्याला त्याचा खोट्या पावत्या करुन खर्च दाखवावा लागतो. हा मार्ग तर... विचार करणेही नको.

मग फिल्मस्टार्सना घेऊन कार्यक्रम करा. सदाशिव (अमरापूरकर) म्हणाला, 'मी तू म्हणशील त्या कुठल्याही 'स्टार'ला आणू शकतो.' पण ते फिल्मी स्टार लोकांची संस्कृती म्हणजे व्यसनांना, हिंसेला उत्तेजन देणारी. आपण ज्यासाठी काम करतो, त्याच्याबरोबर उलटी. असली विसंगती नको. त्यांच्यापैकी कुणी स्वतः यावं आणि वैयक्तिक देणगी द्यावी, पण कार्यक्रम करुन त्यांच्या हॉटेलचा, दारुचा खर्च आपण करायचा? काही त्यातली माणसे म्हणून चांगलीही आहेत, पण ते निर्माण करीत असलेली संस्कृती?

मग संस्था उभारणाऱ्यांनी काय करावे? माझ्या मनात हा प्रश्न रुंजी घालत होता. स्वप्ने पाहूच नयेत का? जरूर पाहावीत, पण रुढ मार्गाने धनिकांकडून पैसे मिळतील, हे गृहीत धरू नये. सुनंदा नेहमी म्हणायची, "आपलं कामच आपल्याला वाचवेल." त्या मंत्राचा अडीअडचणीत खूप उपयोग झाला. आपलं काम करीत राहावं, कामावरचं लक्ष ढळता कामा नये. कधी तरी लोकांचं, समाजाचं लक्ष जातं. कोणी तरी आधाराला पुढे येतं. आणि तसंच या इमारतीच्या बाबतीत झालं, आणि एकूण मुक्तांगणच्या प्रवासाबाबतही.

इमारत तयार झाली तेव्हा सुनंदा जाऊन तीन वर्षं झालेली. खरं तर उद्घाटन समारंभ मोठा व्हायचा. पण सुनंदाच्या राज्यात अशा कार्यक्रमांची सवयच मोडलेली. छोटा आणि साधा कार्यक्रम केला. त्यात आनंदने दोघांच्या मुलाखती घेतल्या. अशोक कळमकर आणि शिरीष बेरी. शिरीष बेरीने त्याची प्लॅन करण्याची प्रक्रिया उलगडून दाखवली.

'या कामात 'एकमेकांशी चांगला संपर्क असणं' याला महत्त्व होतं, तसंच पारदर्शकतेला. आणखी निसर्गाच्या सान्निध्यालाही. म्हणून हा स्पेस (अवकाश) हा बंदिस्त न ठेवता वाहता ठेवला. त्यात सहसा कुठे अडथळा नाही. कुठेही बंद दरवाजे, सरकत्या जाळ्या, असा बंदिस्तपणा ठेवला नाही.'

अशोक कळमकर इतका नम्र की बस्स. म्हणाला, एका चांगल्या कामाला मदत करता आली हेच

मोठं भाग्य. अशोकची मदत वेळोवेळी होत राहिली. त्याला खूप आधी हार्ट अटॅक आला होता. मी हॉस्पिटलमधे भेटायला गेलो होतो. त्याला म्हणालो, “मित्रा, आता तरी काम कमी कर. एक वॉर्निंग मिळाली आहे.” तो हसला. बरा होऊन त्याच वेगाने काम करीत राहिला. मनपाचे कुठलेही काम निघाले की त्याला फोन लावायचा. सांगायचे आणि विसरुन जायचे. त्याच्या बायकोला मी माऊ किंवा माऊताई म्हणायचो, तर प्राजक्ताला प्राजी.

मधे बातमी आली, त्याच्यावर काही नगरसेवकांनी टीका केली होती. मी त्याला विचारलं, तर एवढंच म्हणाला, “सगळी कामं आमच्याच मार्फत झाली पाहिजेत, असा त्यांचा हट्ट आहे. आमच्या परस्पर चांगली कामं करता?” म्हणून छान हसला.

आणि नंतर काही महिन्यांतच ती कोसळणारी बातमी, प्राजक्ताचा फोन : ‘बाबा गेला.’ निष्प्राण देह पाहताना काय वाटलं ते सांगता येणं कठीण. अरुण घाटेनंतर हाही एक आधार कोसळला. एक चांगला मित्र गेला. प्राजी नंतर सांगत होती, त्याआधीच त्याला त्रास सुरु झालेला होता; पण त्याकडे दुर्लक्ष करुन तो काम करत राहिला. काय म्हणावे या अति चांगुलपणाला! कसली जीवघेणी ही कर्तव्यदक्षता!

एका दुपारी सकाळच्या थेरपीज संपल्यावर जागा बदलायचा प्लॅन केला आणि पोरांनी तिकडले सामान इकडे हलवले. एका पेशंट मित्राचा ट्रक त्याने आणला. रात्री उशिरापर्यंत ही हलवाहलवी सुरु होती. त्या वेळी ॲडमिट असलेले मित्र, गावातले बरे झालेले मित्र ही सगळी वानरसेना कामाला लागली होती. अनेकजण तर खुर्च्या, बॉक्सेस डोक्यावर घेऊन पायी निघाले होते. पळून जायला एवढी संधी, तरी सर्व काही शाबूत राहिले. मी संध्याकाळनंतर नव्या जागेत गेलो आणि खारीचा वाटा म्हणून आवराआवरीला मदत करायला लागलो, तर मुलांनी खुर्ची दिली आणि म्हणाले, “बाबा, इथं बसा. आम्ही सगळं करतो. मिटलेल्या लोखंडी खाटांचे ढीग, गाद्या, लॉकर्स, कपाटे, टेबले... काय संसार जमला होता गेल्या पंधरा वर्षांत! बघता बघता वॉर्ड लावला गेला. मग किचन. सकाळी ऑफिसे लावणार होती. त्यांच्यासाठी राजारामच्या शब्दात ही ॲक्टिव्हिटी ही ‘वेगळी थेरपी’ मिळाली होती.

किती लवकर रुळलो त्या जागेत. शिरीषने खोल्यांना, लायब्ररीला निम्म्या भिंतींवर मोठमोठ्या काचा बसवल्या होत्या. वॉर्डच्या दारालाही काचा. मुक्ता याला घाबरलीच. म्हणाली, “पेशंट एक्साइट होतात तेव्हा ते या काचा नक्कीच फोडणार.” शिरीष म्हणाला, “तसं काही होणार नाही. एक वर्षभर वाट बघू आणि तसं झालं तर हे बदलू.” पण तसं करायची वेळच आली नाही. नंतरच्या काळात इमारत दोनदा वाढवावी लागली. मुंबईचे एक अनामिक उद्योगपती पुढे आले. त्यांनी स्त्रियांच्या केंद्रासाठी पैसे दिले. अमेरिकेतल्या अनिल देशपांडे या मित्रानेही मोठी आर्थिक जबाबदारी उचलली. पुढचे हे सगळे आपोआप होत गेले. विनासायास.

कितीजणांचे हात लागावेत? माझे मित्र शरद आणि सुचेता तरडे यांनी दर्शनी भिंतीवर एक छानसे एका कुटुंबाचे, समूहाचे शिल्प उभारुन दिले. त्यात एकत्र राहणं, चांगलं राहणं, एकोप्यानं राहणं.. असं बरंच काही सूचित होतं. बरेच जण फोटोसाठी ते शिल्प पार्श्वभूमी म्हणून वापरतात. आता जे मित्र ॲडमिट व्हायला येतात ते या इमारतीचं अंतरंग पाहून प्रसन्न होतात. बऱ्याचजणांचा इथे येण्याला विरोध असतो, तो ही इमारत, पायऱ्यापायऱ्यांचं ऑडिटोरियम, अगत्याची वागणूक पाहून निम्माअधिक मावळतोच.

आर्किटेक्चरच्या मासिकात या इमारतीचे फोटो आले, त्यावर लेख आले. शिरीषने लिहिलं होतं, या थेरपीमधे आर्किटेक्चर कसं सहभागी होऊ शकतं याचा हा प्रयोग होता.

मित्रा, तो प्रयोग आम्ही आता अनुभवतो आहोत. इथले मोकळे आकाश मनाचा थेट ठाव घेतंय. तुझ्या या फ्लॉवर बेडवरची फुलं मनात अशी अलगद उतरतात, की प्रसन्नतेची सतार आपोआप वाजू लागते. गुरुवारी पालकांच्या भेटीच्या दिवशी मुक्तांगणमधे गर्दी उसळते. तुझ्या त्या ऑडिरियमच्या पायऱ्यापायऱ्यांवर पेशंट मित्र त्यांच्या घरच्यांच्या घोळक्यांमधे बसलेले असतात. येवढ्या मोठ्या वयाच्या मित्रांना पोर समजून आया घरून आणलेल्या त्याच्या आवडत्या पदार्थांचे घास भरवत असतात. घास घेणाराच्या डोळ्यांत अश्रू, भरवणाऱ्यांच्याही, आणि हे पाहणाऱ्या आपल्याही.

मुक्तांगणमधे प्रत्येक गोष्ट स्वतंत्र विचार करून केलेली. सगळे करतात म्हणून ते करायचे, हे आमच्या घरच्याही संस्कृतीत बसत नसे. तसे इथेही. घरी मुलींना वाढवताना, त्यांची शाळा-माध्यम निवडताना जसे करत होतो, तसे या मुक्तांगणच्याही घरात चाललेले. सगळ्या हॉस्पिटलमधे किंवा तत्सम संस्थांमधे वॉर्ड चकाचक पांढरे असतात. गाद्यांवर पांढऱ्या चादरी. उशाही तशाच. जमेल तिथं पांढऱ्या टाइल्स. या सगळ्याला स्ट्रॉंग जंतुनाशकाचा घपकन वास आला की एकदम ए-वन हॉस्पिटलचा माहोल. आम्हाला मुक्तांगण हे मित्रांना घर वाटायला हवे. त्यांना विचारलं, "घरात पांढरी स्वच्छ बेडशीट्स असतात का?' बहुतेकांचं उत्तर 'नाही' आलं. ते म्हणाले, "उलट, त्यावर आम्हाला झोपच लागणार नाही." मग घरच्यासारख्या चादरी आल्या. तशीच पांघरुणे आणि हिवाळ्यातली ब्लँकेटेही. झाडझूड, फरशा पुसणे ही कामे पेशंट मित्रच करायचे, त्यामुळे फरशा लख्ख. दुसरी गोष्ट, पेशंट मित्रांना आम्ही परके वाटायला नको. म्हणून डॉक्टर असो की कौन्सेलर, कुणी एप्रन घालायचा नाही. इतर ठिकाणी डॉक्टर्स, कौन्सेलर्स आपापल्या खोल्यांमधे बसून राहतात. बाहेर कुणी तरी शिपाई. बेल वाजवली की तो आत येणार. मग अमक्या पेशंटला बोलाव, सांगायचे. तसे इथे नाही. सगळा स्टाफ हवे तेव्हा वॉर्डात जाऊन पेशंट मित्राशी बोलणार. हवे असल्यास खोलीत घेऊन येणार, इत्यादी. तसे दोघेजण सर्वांचे मदतनीस म्हणून बाहेर बसलेले असतात. पण त्यांचे तेवढेच काम नाही. माझ्या, मुक्ताच्या मजल्यावर अशोक पवार असतो. कोणी पाहुणे आले आणि त्यांना मुक्तांगण दाखवायचे असले तर तो ते काम उत्तम पार पाडतो. खूप कमी शिकलेला आहे, पण उच्चशिक्षित पाहुणेही त्याच्यावर खूष असतात.

अशोकचा विषय निघालाय तर त्याच्याविषयी सांगू? तसा मुक्तांगणमधला प्रत्येकजण एकेक हकीगतच आहे. विषय निघाला की सांगतो येवढंच. अशोक हा सुनंदाचा नाना पेठेतल्या दवाखान्यापासूनचा पेशंट. त्याचे वडील यायचे. ते निवृत्त पोलिस. अशोक दारुत पडून असायचा. दारूचा परिणाम संपला की त्याला प्रचंड त्रास होऊ लागायचा. तो चालू शकत नसे. घराचा जिनाही उतरु शकत नसे. म्हणून वडील त्याला दुकानातून दारु आणून द्यायचे. त्या खात्यात असून ते निर्व्यसनी, प्रामाणिक आणि पापभीरु. पण मुलाचा त्रास पाहावायचा नाही म्हणून हे करीत असत. अशोकचे त्या अवस्थेत हात इतके कापत की स्वतःच्या हाताने तो पिऊ शकत नसे. ग्लास हिंदकळत असे. तोंडापर्यंत येतच नसे. मग वडील त्याला दारु पाजत असत. मगच त्याचा त्रास थांबत असे. सुनंदाने त्याला गोळ्या सुरु केल्या, त्याची मानसिक स्थिती सुधारण्यासाठी, त्याला डिप्रेशनमधून बाहेर काढण्यासाठी. हळूहळू तो सुधारु लागला. त्याला घेऊन त्याचे वडील नाना पेठेतल्या दवाखान्यात येऊ लागले. तो इतका कृश झाला होता, की क्वचितच अशी माणसं पाहायला मिळतील. मग तो स्वतः एकटा येऊ लागला, घरापासून चालत. एकदा दुपारचे आम्ही स्कूटरवरून चाललो होतो. सुनंदा म्हणाली, "तो बघ- बसस्टॉपवर आपला अशोक उभा आहे!" एरवी अनेक माणसे बसस्टॉपवर उभी असतात. त्यात आश्चर्य ते कसले? पण ज्याला हातपायसुद्धा हलवता येत नसे त्याची ही प्रगती. मुक्तांगण सुरु झाल्यावर तिने अशोकला तिथे रोज यायला सांगितले. तो दोन बस बदलून यायचा.

त्याचा एक दुखरा कोपरा होता. त्याची बायको आणि मुलगा याच्या व्यसनाला कंटाळून

मुंबईला निघून गेलेले. सुनंदाने तिला एकदा भेटायला बोलावले. एकदा आली. तिला भरोसा वाटला. मग सुट्टी काढून येऊ लागली, आणि नंतर नेहमीसाठीच.

तर अशोकचा विषय कशावरुन निघाला? हां हां, आठवले. तर पेशंट आणि उपचारक यांच्यात जवळपास अंतर नसावे, या धडपडीचं चाललं होतं. याच्यामागे आमची स्पष्ट मतं होती. एरवी इतर आजारांच्या उपचारांमधे डॉक्टर हा जवळपास सर्वाधिकारीच. इकडे आम्ही मानतो, की आपल्या आजाराविषयी आपल्याइतकेच पेशंटलाही कळते. कित्येकदा तर जास्तच. फक्त त्या दुष्टचक्रातून त्याला बाहेर पडता येत नसते. म्हणून आम्ही पेशंटवर उपचार करतो, असे नसून त्याच्या उपचारांमधे तो आमचा साथीदार असतो. आम्ही त्याला बरं करतो, असं आम्ही कधी म्हणत नाही. त्याच्या बरं होण्याला आम्ही त्याला मदत करतो, असं म्हणणं जास्त बरोबर. हे सगळं अनुभवातनं येत गेलेलं. पेशंट, कैदी वगैरेंना युनिफॉर्म असतो. हॉस्पिटल्समधे हिरवे किंवा निळे, तर जेलमधे भरड कापड आणि वर निळी रेघ, असलं काही तरी. आम्हाला युनिफॉर्मसारखं तर हवं होतं, पण त्यातनं पेशंटची कॅटॅगरी वेगळी करायची नव्हती. मग पर्याय निघाला, की पांढरे कपडे. पण ते कसेही. पेशंटने घरुनच आणावेत. घरात घालायला असतो तसा पायजमा-शर्ट. त्यात वेगवेगळेही असतील. त्यात पांढरा रंग हा समान धागा.

काही वेळा या पांढऱ्या कपड्याचा वेगळा उल्लेख पेशंट करताना ऐकले. मी चांगला राहणार आहे. मला इथं परत पांढऱ्या कपड्यांत यायचं नाहीये. असं. पण याला दिलासा असा- काही पेशंट बाहेर गेले, बरे असले तरी असेच पांढरे कपडे घालतात. इतरांना सांगतात, "म्हणजे मला मुक्तांगण माझ्याबरोबरच आहे असे वाटते आणि मी जाग्यावर राहतो."

इथे उपचारातच नव्हे तर सर्व उपक्रमांत सगळा स्टाफ, सगळे मित्र भाग घेतात. त्यामुळेच मुक्तांगण त्यांना त्यांचं वाटत असावं. अशा सर्वांच्या सहभागाचे एक उदाहरण म्हणजे दर बुधवारचा अंतर्दीप प्रज्वलन विधी. त्याआधी पेशंट जसे इतर हॉस्पिटलांत डिस्चार्ज होतात तसे व्हायचे. अकाउंट सेटल करायचं, लायब्ररीचं पुस्तक नावावर नसल्याचं लिहून आणायचं. आणि मग त्याला 'ऑन पेपर' डिस्चार्ज मिळणार. एकदा घरी मी, आनंद, सुनंदा, मुक्ता गप्पा मारत असताना ही कल्पना सुचली. ती पुढे पेशंट, स्टाफने विकसित केली. कल्पना अशी, की जाणाऱ्यांना चांगला हृद्य निरोप द्यायला पाहिजे. त्याची त्याला आठवण राहिली पाहिजे. मग निघाले, त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करू यात. ते आपल्या संस्कृतीचंही प्रतीक. मला संत साहिरोबांची ओळ आठवली, 'अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे.' खरंच, मुक्तांगणमधे मिळवलेलं शहाणपण म्हणजे ज्ञानदिवाच. मग एखादी प्रार्थना हवीच. सुनंदाचं आवडतं भजन म्हणजे 'वैष्णव जन तो तेणे कहिये।' गांधीजींचं आवडतं. तिचे वडील सकाळी उठल्यावर म्हणायचे. तिनं अलीकडे यशोला ते शिकवलं, आणि बऱ्याचदा ते म्हणायला सांगायची. सुनंदा गेल्यावर तिचा देह आमच्या घरी आणून ठेवला. तिथंही यशोने उत्स्फूर्तपणे हे भजन म्हटलं आणि मन हलकं झालं. त्या भजनात वैष्णव जनाची लक्षणं सांगितली आहेत. तो वैष्णव शब्द हवे असल्यास बदलून तिथं चांगला माणूस असं समजावं. मग त्यात चांगला माणूस कसा असावा, याची लक्षणंच सांगितली आहेत. मला त्यातल्या पहिल्या ओळीचाच पुढचा अर्धा भाग फार आवडतो. 'पीड परायी जानी रे।' चांगला माणूस कुणाला म्हणावे? दुसऱ्यांचं दुःख जाणतो त्याला. या एका छोटा, साध्या, कसलेही शाब्दिक अलंकार नसलेल्या ओळीत कसं सगळं मानवी जीवनाचं ध्येय सांगितलेलं आहे. आता आपण पीड पराई जानत नसल्याने शुष्क, कोरडे, पैशामागे, सुखामागे धावणारे रोबो झालेलो आहोत. आमचा पेशंट मित्र त्या संस्कृतीतला नसावा, तर या पीड पराई जाननेवाला असावा. त्यात पुढेही इतर बरीच लक्षणे सांगितली आहेत. पण मी या पहिल्या ओळीतच रमलेलो. येवढं आलं तरी खूप. हे आलं की बाकीचे गुण आपोआप येतील.

पुढे? आणखी काय?

त्याला काही तरी वस्तू देऊ यात, म्हणजे तो त्याच्यात-आपल्यात दुवा राहील. ए.ए.सारखं प्लॅस्टिकचं टोकन द्यावं? नको. त्यावर उपयोगी पडेल असा मजकूर हवा. मग कार्डच देऊ या. सुरुवातीचं ते साधं कार्ड आता बरंच विकास होत चाललंय. त्याला आता तीन-चार घड्या असतात. त्याच्यावर त्याचं नाव-पत्ता असतो, तसा मुक्तांगणचाही. त्याला एक निरोप छापलेला असतो. 'मित्रा, तू व्यसनमुक्त राहावेस, अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे. तुला कधीही मदत लागल्यास सांग. आम्ही चोवीस तास उपलब्ध आहोत,' या अर्थाचा. रोजची प्रार्थना असते. कुणी कल्पना काढली, की आला तेव्हाचा फोटो काढावा आणि जातानाचाही. दोन्ही फोटो शेजारी शेजारी लावावेत, म्हणजे आपल्यात काय फरक पडला ते दिसेल. त्यावर एक मित्र म्हणाला, मग येतानाचं आणि जातानाचं वजनही टाकू यात की. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. कारण बऱ्याचजणांचे या पाच आठवड्यांत पाच किलो वजन वाढते. काही इतके अशक्त अवस्थेत आलेले आणि जाताना नऊ-दहा किलो वजन वाढलेले.

काही तरी संस्कृतीचे संगीत हवे.

मग मी मंत्र रचले. मंत्रध्वनी मनातले अवकाश उजळवून टाकील. आणि त्या परिचित सुरांमुळे त्याचा तो स्वीकारही करेल.

मग ओळी सुचल्या,

'मुक्तांगणचे मित्र, उपचारक, देती शुभेच्छा तुला
राहो दूर तू मोहाच्या व्यसनांच्या आणि स्वभावदोषांच्या'
मला काय झाले होते कोण जाणे, मी म्हणतच गेलो, जसे कुणी कानात घातलेल्या इयरफोनवर सांगितल्यासारखे.

'जे आज अडकले व्यसनात,
दे हात त्यांना मदतीचा'

किंवा

'दुखविलेस ज्यांना तू, मनोभावे माग त्यांची क्षमा'

असे बरेच काही. या मंत्रध्वनीत एक आदिमता आहे. ती अनेक धर्मांच्या संगीतात बरीच सारखी आहे. सगळ्यांच्याच मनाच्या तारा छेडल्या जातात.

शेवटी एखादं गीत हवं. मग लिहिलं,

'मोकळ्या आकाशी आला सुंदर प्रकाश
उंच उडायला तुला मोठे अवकाश'
यशो हे गीत म्हणायची, आणि पेशंट मित्रांना तो हलकेच दिलेला एक हृद्य निरोप असायचा.

'कुटुंब उभे रे मित्रा तुझ्या स्वागताला,
पोटात घालून सर्व भीषण काळाला'
ही ओळ घरच्यांना हलवून जाई. 'फक्त आजचा दिवस' हा ए.ए.चा संदेशही येऊन जायचा.

उजाडे दिवस नाही घोट मी घेणार
मिळे एक दिन, मानी सर्वांचे आभार...
असं बरंच काही.

मी हे संध्याकाळी फिरताना उमा-विरुपाक्षांना हे सांगत होतो. विरुपाक्ष म्हणाले, "मग त्यात

आणखी एक करु शकाल. हातावर दही ठेवा. प्रवासाला निघताना प्रवास सुखाचा व्हावा, अशी त्यामागची भावना." वाः वाः! तेव्हापासून जाणाऱ्यांच्या हातावर दही. त्यात साखर घातलेली. त्यामुळे कार्यक्रम झाल्यावर उरलेली वाटी बंधू मटकावायचा.

सुनंदा पूर्वी सांगायची, आणि आता मुक्ता नेहमी सांगते, "हे कार्ड शर्टाच्या वरच्या खिशात ठेवा. वरचा खिसा डाव्या बाजूला असतो. तो आपल्या हृदयाजवळ असतो. कधी व्यसनाची आठवण झाली तर हे कार्ड काढून वाचा. मन शांत होईल." काही मित्र रोज उठल्यावर आणि झोपताना कार्डावरची प्रार्थना वाचतात. काहीजण त्यावरची गीतेही म्हणतात. एकाने सांगितलेला अनुभव आठवतोय. तो दारुची बाटली विकत घ्यायला दुकानात गेला. पैसे देताना पैशाबरोबर हे कार्ड वर आले. ते पाहिल्यावर त्याचा स्पर्श झाल्यावर काय झाले कुणास ठाऊक, त्याने काउंटरवर बाटली तशीच ठेवली आणि गेल्या पावली परत आला. असे बऱ्याचजणांचे तऱ्हतऱ्हेचे अनुभव.

यशोला शेवटी म्हणायला मी काही गीतं लिहून दिली होती. ती म्हणतेही छान. तिचा प्रामाणिक, नितळ, निर्मळ सूर भिडतो थेट मनाच्या गाभ्यात, खोल.

त्या कार्यक्रमात पेशंट मित्र बोलतात छान. कुणी इथं आला. त्याला अजिबात राहायचं नव्हतं. पहिल्या आठवड्यात सगळ्यांना खूप त्रास दिला. तो सांगत होता, पळून जायचा काही वेळा प्रयत्न केला. एका आठवड्यानंतर जो रमलो तो रमलोच. आता इथून पाय निघत नाही. कुणी सांगतं, या पस्तीस दिवसांत इथं इतके जिवाभावाचे मित्र मिळाले, तितके गेल्या कित्येक वर्षांत मिळाले नव्हते. कुणी म्हणतं, या पाच आठवड्यांत मी इतका हसलोय, की मला सगळ्या आयुष्यात इतकं हसल्याचं आठवत नाही. आपल्याला हसता येतं, हेच विसरुन गेलो होतो. कुणी म्हणतं, इथं जेवढं प्रत्येक माणसाकडून प्रेम मिळालं तेवढं आजपर्यंत कुठं मिळालं नव्हतं... असं बरंच काही. मी मनातनं गहिवरतो. सुनंदा गेल्यावर तिच्या कामातला जीव, लगन शिल्लक राहील का, ही कधी कधी भीती वाटते. तर हे ऐकल्यावर ती भीती कुठं पळून जाते कुणास ठाऊक!

जसा हा अंतर्दीप, तसे आणखी काही. आमचे मित्र काही वेळा अशा प्रोग्रॅम्सची भर घालतात. ते मलाही माहीत नसते. रात्री साडेआठला जेवण असते. त्यापूर्वी ए. ए.च्या प्रार्थना असतात. मी एकदा अवेळी गेलो, तर मुक्तांगणमधे कमालीची शांतता. पाहिलं, तर सगळे खाली बसलेले, डोळे मिटून शांतपणे. मी नंतर वॉर्डप्रमुखाला विचारलं, हे काय? तो म्हणाला, "आम्ही वीस मिनिटे मौन पाळतो." "हे कधीपासून सुरु झालं?"

"कधीपासूनच."

ती मन भिरभिरणारी मुलं एका जागी शांत बसलेली पाहून मन हेलावलं. हा उपक्रम कोणी सुरु केला असेल कोण जाणे, पण दृश्य मोठं पाहण्यासारखं. कुणी हास्य क्लब सुरु केला, पण तो पुढे चालला नाही. आमचं बंधन म्हणाल, तर येवढंच, की हिंदू वगळता अन्यधर्मीय कुणाला इथं परकं वाटता कामा नये. कुणीही बाजूला पडता कामा नये. म्हणून आरती नको, गणेशोत्सव नको. पण दिवाळी आम्ही सगळे मिळूनच करतो. तसाच ३१ डिसेंबरसुद्धा.

जिम्नॅशियम असेच सुरु झाले. एक आमचा मित्र बॉडीबिल्डर होता. कुठल्या तरी विभागाचा तो 'श्री'सुद्धा होता. तो पहाटे चारला उठून सहापर्यंत व्यायाम करायचा. त्याला हवी ती किमान साधने आम्ही आणून दिली. काही तर मोडकी स्टुले वगैरे जोडून, फळ्या ठोकून मुलांनी बेंचेस तयार केले. तो असतानाच्या काळात त्याचे काही शिष्य तयार झाले. त्याच्यानंतर ते सगळे त्यांनी चालवले. आता नव्या इमारतीत त्यांनी तर चांगलेच जिम तयार केलेय. तिथं पहाटे 'घुमणारी' मंडळी प्रत्येक बॅचमधे निघतातच.

त्या काळात म्युझिक थेरपी हा शब्द सर्वत्र ऐकू येऊ लागला होता. लोकांना, पेशंट मित्रांना, मग

ते कुठल्याही प्रकारचे असोत, म्युझिक थेरपीचा लोक वापर करु लागले होते. अमुक राग ऐकवला की मनात अमुकभाव निर्माण होतो, असे ऐकले. त्यामुळे अमुक पेशंटना अमुक रागांचं प्रिस्क्रिप्शन, हेही ऐकलं होतं. ती म्युझिक थेरपी मुक्तांगणचंही दार ठोठावू लागली. मला प्रश्न पडला, की अमुक रागाने अमुकच भाव तयार होतो, हे कशावरून? तो राग ज्याप्रकारे गायला वाजवला जातो त्यावर ते अवलंबून. वसंतराव देशपांडे सांगायचे, जोगिया रागात 'जिया मिलनकी आस' ही करुण बंदिश आहे, आणि 'वद जाउ कुणाला शरण' हे वेगळ्या रसाचे, जरा उडत्या चालीचे नाट्यगीतही आहे. भैरवीत तर करुण गीतापासून शृंगारिक लावण्यांपर्यंत सर्व काही आहे. काहीजण तर त्याही पुढे जाऊन गंधार (किंवा तत्सम कुठला) लावला की अमुक भाव निर्माण होतो, म्हणू लागले. बरे, हा विषय संगीतज्ञांचा. आपल्याला काही कळत नाही. पण मला जे काही कळत नाही ते पेशंट मित्रांना तरी कसे कळावे? मी शास्त्रीय संगीताचा अनेक वर्षे श्रोता आहे. पण आमचे पेशंट मित्र? त्यांची संगीताची पार्श्वभूमी म्हणजे फिल्मी संगीत. शास्त्रीय संगीताची सवय असल्याशिवाय त्याचा आनंद किंवा परिणाम तरी कसा होणार?

हे सगळे बाजूला ठेवले आणि दर शनिवारी सकाळी आम्ही त्यांना आवडणाऱ्या गाण्यांची मैफिल ठेवू लागलो. त्यांच्या जीवनात जिथं संगीत आहे तिथून सुरुवात केली हे बरंच झालं. त्यातलं गांभीर्य मागे सरकलं आणि आनंद पुढे आला. प्रत्येकाला जे येतं, आवडतं ते गाणं त्याने म्हणायचं. बरेचजण फिल्मी म्हणत. पण काही खेड्यातली माणसं, वयानं मोठी. त्यांना भजन यायचं. ते म्हणायला सांगायचो. एक काका म्हणाले, मला काहीच म्हणता येत नाही. त्यांना म्हटलं, "पण तुम्ही आरती तर म्हणता की नाही?" ते जरा लाजले, पण म्हणू लागले. सगळ्यांनी टाळ्यांनी ताल धरला. खूप मजा आली. कितीजणांनी सांगितलं, की त्यांनी कित्येक वर्षांनी गाणं म्हटलं. काही काय, बरेचजण आयुष्यात पहिल्यांदाच इतक्याजणांसमोर गाणं म्हणत होते. तिथं गाण्याचा दर्जा महत्त्वाचा नव्हता, म्हणणं महत्त्वाचं. आपल्या वरच्या वर्गाचं तर हे दुखणंच झालंय. आपण श्रोते असतो. तिकीट काढून मैफिलींना जातो. पण आमचं गुणगुणणं संपल्यात जमा. मुक्तांगणमधे गाणं आणि मोकळं होणं, हे जर होत असेल तर त्याला उपचार का म्हणू नये? पण तो तरी दावा कशाला? आमची ती छान मैफलच असते.

यात माझा फायदा असा, की मला नवीन, अलीकडची गाणी कळायला लागली. आवडलेलं गाणं मी लिहून घेऊन त्यांच्याकडून शिकू लागलो. माझं सिनेमे पाहणं मागेच गळून पडलेलं. आधी ओतूरला होतो, तिथं सिनेमे, रेडिओ असलं काही नव्हतं. पुण्याला आल्यावर पैशाची कडकी. त्यामुळे एकूण मी नवखाच. त्यातली शास्त्रीय संगीताचा बेस असलेली गाणी मला आवडू लागली. 'छैंया छैंया'मधे मधमाध सारंग भेटला, 'सांज ढले'मधे बिभास.

मग मी एक खेळ केला. असं रागावर आधारलेलं गाणं कुणी म्हटलं की ते मी पकडायचो. याच्यासारख्या सुरांचं दुसरं गाणं कुठलं आहे, असा प्रश्न विचारायचो. आणि आश्चर्य म्हणजे कुणी तरी बरोब्बर त्याच रागातलं गाणं सुचवायचं. मग ते त्याने किंवा कोणी म्हणायचं. अशीच तीनचार गाणी झाली, की मग मी म्हणायचो, या सगळ्यातला समान धागा म्हणजे अमुक राग. मग त्याचे सूर गाऊन दाखवायचो. गाता गाता मधेच त्या गाण्याची ओळ त्यात मिसळायचो आणि दाखवायचो, बघा, तेच संगीत आहे. मग त्या रागातली चीज येत असली तर ती म्हणून दाखवायचो, इतर गाणीही सांगायचो. हिंदी गाण्यांमधे ठायी ठायी येणारा राग शिवरंजनी. 'जाने कहाँ गए वो दिन' हे गाणं कुणी म्हटलं की मी हे कोडं घालायचो. 'मेरे नैना सावन भादो, फिर भी मेरा मन प्यासा' हे कुणाला आठवायचं. कुणाला 'रंग और नूरकी बारात' आठवायची, कुणी मराठी गाणी काढायचं. 'सावळाच रंग तुझा' किंवा 'नयन खेळले जुगार' हे वाटव्यांचं दुर्मिळ गाणं आठवायचं. तर कुणी सुधीर फडक्यांसारखा आवाज काढून 'एक धागा सुखाचा' म्हणायचं. मला कल्पनाच नव्हती, की आमच्या

या पोरांना गाण्याची एवढी रेंज माहिती आहे. तसाच यमनचा विषय निघाला की गाण्यांच्या थप्प्या एकावर एक येऊन पडायच्या. आमचा एक मित्र श्रीरंग 'रंजिशी सही' असं सही सही म्हणायचा की देखते... नाही नाही, सुनते रहना. कुणी मेहंदी हसनची 'आए कुछ अब्र' ही यमनमधली अवीट गझल म्हणायचा. व्यसनाच्या काळात गझल ऐकणं हा त्या संस्कृतीचा भाग असतो. त्यामुळे त्यांना खूप गझल माहीत असत, काही गाऊ शकत. फक्त व्यसनाचं समर्थन असणाऱ्या गझला (हंगामा है क्यूं बरपा)सारखी आम्ही बाजूला ठेवायचो इतकेच.

या सगळ्यातून माझ्या समोर गझलचे मोठेच विश्व उलगडले. गुलाम अली, मेहंदी हसन, फरिदा खानुम... सगळ्यांनी माझी वही भरली. यमनमधली फरिदा खानुमची 'आज जानेकी ज़िद ना करो' ही गझल नसती ऐकली तर आयुष्यात काही तरी उणे राहिले असते. काय मुलांचे आवाज होते! कुठं हे सगळं गाडलं गेलं होतं? दर बेंचमधे कुणी पेटी, कुणी तबला, कुणी ढोलकी वाजवू शकणारे भेटतातच. मुक्तांगणमधेही कुणी त्यांच्या गाण्याच्या वह्या ठेवून जातं, पुढच्यांसाठी.

अशा उपक्रमांमधे आनंद ठाण्याहून येऊन दाखल झाला की मग उत्साहाची परिसीमाच. सांताक्लॉजसारखा तो पोतडीतून वेगवेगळ्या आयडिया काढायचा, की नादावलीच पोरं. पोरं कशाला, मी, सुनंदाही. एकदा त्याने फळ्यावर लिहिले, 'मुक्तांगणचा पक्षी'. पिंजऱ्यातून उडू पाहणारा पक्षी हे मुक्तांगणचे सिंबॉलच आहे. म्हणाला, "हे शब्द शेवटी येतील अशी कविता निर्माण करु यात." आधी 'पक्षी'ला जमणारे 'क्षी'कारान्त शब्द त्याने मित्रांना शोधायला लावले. कुणी म्हणालं, नक्षी. कुणी म्हणाले, साक्षी. जसजशा सूचना येतील तसतसे ते शब्द आनंद फळ्यावर लिहायचा. कुणी म्हणाले, 'ओक्साबोक्शी'... यावर दुमत झालं, पण आनंदने तो स्वीकारला. त्या सगळ्यांनी मिळून एक ओळ तयार केली-

'स्वप्ने विरली, दिशा हरवली, रडलो ओक्साबोक्शी'

साक्षी शब्द कसा वापरावा? त्यातून दुसरी ओळ आली,

'आयुष्याला ग्रहण लागले, व्यसने केवळ साक्षी'

मग आनंद म्हणाला, हे सगळं इथं येण्यापूर्वीचं. नंतर काय झालं? त्यातनं पुढच्या ओळी आल्या,

'व्यसनमुक्तिच्या उपचारांची मनी उमलता नक्षी'

आणि ती शेवटची ओळ अलगद जाऊन बसली-

'उपचारांनी मार्गी लागे 'मुक्तांगणचा पक्षी'

वाः वाः! आनंद चालना देत होता, पण सगळं आलं होतं आमच्या या मित्रांकडून. निर्मितीचा आनंद सगळ्यांच्या चेहऱ्यांवरुन नुस्ता वाहत होता. कैफ चढावा तसा. निर्मिती काय असते हा एक अनुभव आणि सगळ्यांमिळून निर्मिती, हा आणखी विलक्षण अनुभव.

आमचा आनंद म्हणजे एक बहुरुपी महामानव आहे. त्याची महिन्याची दोन दिवसांची फेरी म्हणजे चैतन्याची शिरशिरीच. त्याने, सुनंदाने स्टाफ मीटिंग सुरु केल्या. त्यात स्टाफने काहीही व्यक्त करावे. त्याला उत्तरे मिळतात. कधी त्याचे रुपांतर चर्चासत्रातही होते. आनंद त्यांना पेशंटचा ग्रुप घेऊन दाखवतो, कौन्सेलिंगची प्रात्यक्षिके देतो. कधी स्वतः पेशंट बनतो, आणि स्टाफ मित्र त्याला कौन्सेलिंग करायचा प्रयत्न. नंतर काय चुकले, काय बरोबर त्याची चर्चा. स्टाफमधले बरेचसे फारसे न शिकलेले. त्यांना हे मात्र चांगले कळते. अनुभव आणि शिकवण एक दुसऱ्यास मिळतात.

असा हा आनंदीआनंद.

पुढे काही वर्षांनंतर एक संगीत दिग्दर्शक ॲडमिट झाला. त्याने त्याच्या काळात सगळ्या मुक्तांगणच्या गाण्यांना चाली लावल्या, त्यात या कवितेलाही लावली. त्या वेळी योगायोगाने एक

अनेक तंतुवाद्ये वाजवणारा, एक तबला-ढोलकी वाजवणारा... असा सगळा संच ॲडमिट होता. त्यांनी यशोलाही गाण्यासाठी त्यांच्या टीममधे घेतले. सगळ्यांनी आग्रह केला, की 'बाबा, आपण याची कॅसेट काढू यात.' मग काय, गावातला स्टुडिओ बुक केला. त्याआधी सारख्या तालमी. सगळे मुक्तांगण त्यात बुडून गेले होते. स्टुडिओत नेताना कुणी भरकटू नये, याची काळजी घेतली होती. पण संगीताचाच कैफ एवढा होता, की पाय घसरायची कुणाला आठवणही आली नाही. आता त्याची 'मोकळ्या आकाशी' ही कॅसेट झाली आहे. ती आमच्या स्टॉलवर विक्रीसाठी ठेवली आहे. पेशंट मित्र घरी जाताना घेऊन जातात. कुणी सांगतं, 'बाबा, रोज आरती झाली की ही कॅसेट ऐकतो,' तेव्हा धन्य वाटतं.

त्या संगीत दिग्दर्शकाबद्दल सांगू थोडं?

राजीव त्याचं नाव. वडील प्रतिष्ठित. सज्जन. सुसंस्कृत. एकदा पुण्याच्या विमानतळावर भेटले आणि त्यांनी मुलाच्या व्यसनाचं दुःख सांगितलं. त्यांच्याकडे यापूर्वी मी, सुनंदा काही वेळा गेलेलो. पण या सुखी वाटलेल्या कुटुंबात असा प्रश्न यावा? राजीव वरच्या मजल्यावर राहायचा. रात्री पिऊन आल्यावर वडलांना टाळून वर जाण्यासाठी या पठ्ठ्याने त्या अवस्थेत शिडी शोधून घराला लावली. पडला. गोंधळ. त्या शेजाऱ्यापाजाऱ्यांमध्येही चर्चा. या अब्रूदार माणसांना किती मेल्याहून मेले झाले असेल! आधी त्यांना आम्हा दोघांपाशी हा विषय काढावा वाटे, पण धीर होत नव्हता. या प्रसंगानंतर तो झाला. राजीव मनाने फार चांगला. अगदी लहान मुलासारखा स्वभाव. मुक्तांगणमध्ये आला. तसा तो सेलेब्रिटी. पण तो भाव त्याच्या वागण्या- बोलण्यात नव्हता. पडेल ते काम केले. 'मोकळ्या आकाशी'चे काम करताना त्याने अनेकांची मदत घेतली. त्याच्या तालमी म्हणजे आनंदोत्सवच. पुढे घरी गेला. काही वेळा परत व्यसनात. मी त्याच्या कौन्सेलरला कारण विचारले. तो म्हणाला, "त्याचा व्यवसायच विचित्र आहे. रेकॉर्डिंगचे, एडिटिंगचे बहुतेक काम रात्री. बाजूचे सगळे 'घेणारे'च. याची सोब्रायटी टिकत नाही." पण पुढे ती टिकू लागली. त्याला आपण मुक्तांगणमध्ये होतो हे कधी लपवावेसे वाटले नाही. 'वैशाली' हॉटेलात सगळ्या मित्रांसमवेत भेटला. पुढे येऊन माझ्या पायाला हात लावून नमस्कार केला. तो नुसते हॅलो म्हणून टाळू शकला असता.

आता परवा वाढदिवसाच्या कार्यक्रमाला आला होता. 'म्युझिक'मधल्या लोकांचा अवतार होता. गळ्यात तऱ्हेतऱ्हेच्या माळा, कानात भिकबाळी, वगैरे. मी म्हटलं, "काय रे हे?" तो हसून म्हणाला, "मला जरा दागिन्यांची आवडच आहे." त्याच्या शेअरिंगमध्ये म्हणाला, "पूर्वी दारूच्या वासाने अस्वस्थ व्हायचो. आता त्या वासाची तिडीक येते." आता त्याला बरीच कामे मिळताहेत. किती छान!

सुनंदाचा सगळ्यात आवडता कार्यक्रम म्हणजे शेवटच्या शनिवारच्या सकाळी साडेदहाचा वाढदिवस कार्यक्रम. पूर्वी ज्या महिन्यात पेशंट मित्राने ॲडमिशन घेतली असेल, आणि तेव्हापासून आजपर्यंत तो जर सोबर किंवा व्यसनमुक्त असेल, तर त्याचा वाढदिवस त्या महिन्याच्या शेवटच्या शनिवारी. मित्रांच्या या वाढदिवसांचे कौतुक आम्हालाच. बाहेरचे म्हणतात, "तू व्यसनात गेलास आणि त्यातून बाहेर पडलास, त्यात काय पराक्रम केलास?" पण ती काय लढाई असते, हे त्यांना कसे कळणार? मोहाचे किती क्षण येतात, त्यावर मात करून विजय मिळवतो, हे कित्येकदा त्याच्या कुटुंबीयांच्याही लक्षात येत नाही. तेव्हा हा एक कौतुकसोहळा असतो. ए. ए.मधल्या मेडल देण्यावरून ही कल्पना सुचली. पण त्यांच्याकडे प्रत्येक मीटिंगमधे कुणाला ना कुणाला मेडल असतेच. इथं तो स्वतंत्र कार्यक्रम.

त्या दिवशी सकाळपासून (काही तर आदल्या रात्रीपासूनच) उत्साही, उल्हसित चेहरे दिसू लागतात. बायका लग्नकार्यासारख्या साड्या नेसलेल्या. कधी पागोटेवाले, टोपीवाले काठी

टेकत येणारे वडील, आणि त्यांना आधार देत येणाऱ्या आया. लहान पोरं तर कधी धावत येऊन मुक्तांगणमधे सर्व मजले बागडत असतात. मला सगळ्यांची नावे, गावे लक्षात नसतात. पाया पडला की उठवून विचारायचे, मित्रा, किती वर्षं? आमच्याकडची इतरांना अजब वाटेल अशी गोष्ट अशी, की एक वर्ष पूर्ण करणारांचे विशेष कौतुक होते. कोणी दहा वर्षं, कुणी वीस-बावीस वर्षं पुरी करतं. त्यांना बुजुर्ग म्हणून मान असतो. पण त्यांचे ते रुटीन झालेले. पण पहिल्या एक-दोन वर्षंवाल्यांना जो झगडा करावा लागतो तो विशेष असतो. त्या दिवशी दहा-पंधरा पांढऱ्या खुर्च्या एका बाजूला ठेवलेल्या असतात. मधल्या आसनावर मी व सुनंदा बसायचो. आता मी व मुक्ता बसतो. समोर एका बाजूला सध्या ॲडमिट असलेले पेशंट. दुसऱ्या भिंतीकडेला आलेले नातेवाईक आणि मागे अकरा शनिवारचे व्रतवाले काही. त्यांच्याविषयी नंतर सांगेन. हॉल गच्च. या सगळ्यातून वाट काढत, आपापल्या बापाला शोधून, त्यांच्या मांडीत बसणारी, चप्प तेल भांग, डोळ्यांत काजळ घातलेली पोरे. कधी तर पेशंटच अशा पोरांना वरचेवर 'पासऑन' करतात. बापाच्या मांडीत बसल्यावर पोराच्या चेहऱ्यावर पसरणारे अनमोल स्मित.

वाढदिवशे आपापले अनुभव सांगतात. ऐकणाऱ्या आत्ताच्या मित्रांना ते किती थरारक वाटत असतील! बोलणारे अनेकजण सांगतात, "मी ॲडमिट होतो तेव्हा तुमच्यासारखा इथेच पांढऱ्या कपड्यात होतो. हा शनिवारचा कार्यक्रम ऐकला आणि ठरवलं, की पुढच्या वर्षी काही झालं तरी या पांढऱ्या खुर्चीत बसण्याचा मान मिळवायचाच." हे अनुभव ऐकणारे सर्वचजण अनेकदा थरारून जातात. व्यसनाच्या काळात देवळाबाहेर कशी भीक मागत होतो, काहींनी 'आई गेली, मयतीला पैसे नाहीत' म्हणून अनेकांकडून अनेकदा पैसे काढलेले. घरची भांडी चोरून विकायचो, नेहमीची विकली तर लक्षात येईल म्हणून माळ्यावरची मोठमोठी भांडी विकली, मुलीच्या गळ्यातली साखळी ओढली, लॉकअपमधे गेलो, तिथं जन्मभर सचोटीने घालवलेले माझे शिक्षक वडील कसे आले, त्यांचा चेहरा पाहताना मला मेल्याहून मेल्यासारखे झाले, हे सांगताना या मित्राचा गळा दाटून यायचा. आता सचोटीने, निर्व्यसनी राहतो, तरी माझ्याकडे घरातले आसपासचे लोक आधीच्याच दृष्टीने पाहतात किंवा पाहायचे, असे कोणी सांगत. मित्र भेटला, दारूचा आग्रह झाला. ग्लास ओठापर्यंत आणला, पण ठेवून दिला आणि परत आलो. कुणी मुक्तांगणला होतो कळल्यावर व्यसनी म्हणून कामावरून काढून टाकतो, तर दुसरा उलट जास्त ममतेने वागवतो, आधाराचा हात देतो. पूर्वी वडील माझं तोंड पाहत नव्हते, आता ते कसे माझी वाट पाहत बसतात. पूर्वी मुलं घाबरायची, आता कशी चिकटतात, वगैरे वगैरे. जीवनाचा अखंड घोंघावता प्रवाह समोर वाहत असतो. सुख-दुःख, आशा-निराशा, इज्जत-बेइज्जत यांच्या झोक्यांवरून मन हेलकावत असते.

त्यांच्या घरचेही बोलतात. बायका आग्रहाखातर समोर येतात, माईक हातात धरतात आणि काही न बोलता रडत रडत परत जातात. काही सांगतात, ते पूर्वीचं खरं की आताचं, हा प्रश्न पडतो. ते स्वप्न होतं की हे स्वप्न, कळत नाही. कुणी जाकीटवाले आजोबा खिशातून कागद काढून कविता वाचून असेच विवश होतात. हे दिवस कधी दिसतील असं वाटलंच नव्हतं, असा बऱ्याचजणांचा सूर. कसे दिवस काढले ते आठवणेही नको वाटते. हा मुलगा इतका बदललाय की खरंच वाटत नाही, तो खरा की हा खरा. ऐकताना ज्याचे मन गलबलत नाही असा माणूस तिथे नसतोच. प्रत्येकजण अधःपतनाचे विविध नमुने, पराकोटी हेही ऐकत असतोच आणि स्वतःमधल्याच चांगुलपणाच्या दर्शनाने, स्पर्शाने माणसे किती बदलू शकतात याची पराकोटीही अनुभवतो. या आजाराने या मित्रामागोमाग फरपटत गेलेले संसार पाहतो आणि झाले गेले विसरुन कंबर कसून संसार उभा करणारी ती सबल, सक्षम स्त्री पाहतो आणि वाढदिवस लक्षात ठेवून तिला फूल देणारा नवराही.

अनेकांनी आधी केलेल्या चुका माहीत असूनही माणसे नव्याने आणि उत्साहाने त्याच चुका का करतात कोण जाणे! कोणी सांगायला गेले तर त्यालाच तत्त्वज्ञान शिकवतील. नशाच काय, अनेक

प्रश्नांबाबत माणूस तसेच करतो. येवढा बुद्धिमान असूनही. हे सगळेच आपल्या बुद्धीपलीकडचे. पण या सगळ्याला एक उःशाप आहे ही किती छान गोष्ट! माणूस चूक सुधारू शकतो. त्याचा स्वभाव बदलू शकतो. त्याची जीवनशैली बदलू शकतो. हा बदललेला माणूस बदलाचा दूत होतो आणि दुसऱ्यांना मदत करु शकतो. हे सारे किती आश्वासक!

अरेच्या, पुढचा भाग सांगायचा राहिलाच की! तो बराच मजेदार आहे. पण त्याआधी 'मनोगत'चे प्रकाशन होते. हे मुक्तांगणमधले हस्तलिखित मासिक. कव्हरपासून आतला मजकूर लिहिणे, चित्रे काढणे, प्रत्येक पानाला कडेने महिरप काढणे... हे सगळं आमचे मित्रच करतात. त्यांच्यातनंच एखादा संपादक निवडला जातो. तो चार-पाचजणांची टीम निवडतो. ते साहित्य जमवतात. तो आठवडा म्हणजे आमची ही मुलं मुक्तांगणमध्येच पण कुठं कुठं जाऊन लिहीत असतात. सगळं जसं मजेदार अभ्यासू वातावरण. या शनिवारच्या कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन होते. मग तो अंक लायब्ररीत ठेवला जातो. असे वीस वर्षांचे अंक आहेत. मागच्या पेशंटनी लिहिलेले अनुभव, गोष्टी, कविता हे पुढच्या पिढ्या वाचतात. हेही एक प्रकारे अनुभव संक्रमणच. दारुवरचे विनोद असतात, कार्टून्स असतात. बाहेरच्यांना या अंकांचा 'दर्जा' कसा वाटेल ते माहीत नाही, पण ते आम्ही आमच्यासाठी लिहिलेले असते. तेवढी दाद आम्हा सगळ्यांना पुरेशी असते. सगळ्या संपादक मंडळाला पुढे बोलावून, त्याला फूल देऊन कौतुक केले जाते. आता तर 'आनंदयात्री' हे छापील द्वैमासिक सुरु झालंय. ते पेशंट मित्रांच्या घरोघर पोहोचतं. आणि त्याही मार्फत होतो, परत मुक्तांगणचा संपर्कच.

नंतर सुरु होतो बक्षीस समारंभ. कुठल्याही विभागाला, कुठल्याही नंबराला बक्षीस एकच- सुंदर कागदात गुंडाळलेले साधे पेन. आधी टेबल टेनिस, चेस, क्रिकेट वगैरे खेळांची बक्षिसे. ती देण्याआधी बंधूची छान कॉमेंट्री असायची. बुद्धिबळाच्या बक्षिसाच्या आधी म्हणायचा, आतापर्यंत आपण आपल्या घरच्यांशी (पिण्यासाठी) बुद्धीचे खेळ करायचो. आता आमचे मित्र खरा बुद्धिबळ खेळतात. आमच्या इथल्या बुद्धिबळाचे नियमही वेगळेच आहेत बरं का! राजा मेला तरी खेळ संपत नाही. बोर्डावरची शेवटची सोंगटी मरेपर्यंत खेळ चालतो. तशीच क्रिकेटविषयीही कॉमेंट्री.

मग वेगळाच बक्षीस समारंभ. आदर्श रुग्णसेवा. म्हणजे धावून धावून ज्यांनी पेशंटची विथड्रॉलमधे सेवा केली ते. मग ते कधी चार-पाच निघतील, कधी सात-आठ-दहाही. मुक्तांगणमधले सर्व प्रोग्रॅम्स वेळेवर अटेंड करणाराला बक्षीस. योगासने- पीटी चांगले करणारा, दाखल झाल्यापासूनच जो उपक्रमांमधे उत्साहाने भाग घेतो, त्याला 'प्रॉमिसिंग न्यू कमर'चे बक्षीस. काही वेळा घरचे कोणी मयत झाले (किंवा त्यालाच आजार झाला), तर तिकडे जाऊन परत येऊन प्रोग्रॅम पुरा करणारालाही बक्षीस.

मग निवेदक एक बक्षीस सगळ्यांना विचारुन जाहीर करतो. "या महिन्याचा 'नॉटी बॉय' (खोडकर मुलगा) कोण?" सगळेजण एकच नाव घेऊन ओरडतात, तर कधी दोन-तीनही. या खोडकर मुलांनी सगळ्यांना चिडवलेले असते, अनेकांच्या खोड्या काढलेल्या असतात आणि सगळ्या वॉर्डला पोटभर हसवलेले असते. पण बक्षीस घ्यायला तो नॉटी बॉय येतो तो असा लाजत, चेहरा पाडत, की खरेच वाटू नये. नंतरचे बक्षीस आणखीच गमतीचे. जेव्हा ग्रुप थेरपी किंवा अन्य कार्यक्रम चालू असतात तेव्हा काही मुले रेंगाळतात, काही लपून बसतात. जॉन (अंकल) सगळ्यांना बाहेर काढत असतो. या लपायच्या जागाही माहीत झाल्याने तिथूनही हुडकून काढतो. तर लपण्याची नवीन जागा ज्याने शोधली त्याला बक्षीस असते. कारण ती लपायची जागा त्याच्यामुळे समजली. एवढेच काय, काही मुले पहिल्या आठवड्यात पळून जायचा प्रयत्न करतात. ज्याने पळून जायला नवी फट शोधली त्यालाही बक्षीस. कारण त्याच्यामुळे तीही फट आम्हाला समजते आणि बुजवता येते. मुक्तांगणमधे अशा गुन्ह्यांकडे खेळकरपणे पाहिले जाते. नाही तर शिस्तीचा दरवेळी बडगा उगारला

असता तर ही मजा आली नसती.

निवेदक सांगतो, की 'कशी वॉर्डमधे मजा येते. पेटी असतेच. सगळे गाणी म्हणतो, नाचतोही. अगदी पोट सुटलेली वयस्क माणसेही हिंदी सिनेमा टाइप नाचतात.' मी त्यांना नेहमी म्हणतो, "मला तुमचा हेवा वाटतो. मी येऊ का मजा बघायला?" पेशंट म्हणतात, "पण त्यासाठी अॅडमिट व्हावं लागेल."

मी पराभव आनंदाने मान्य करतो.

एकूण काय, मुक्तांगण म्हणजे एकेक रत्नं भरली आहेत. मी बुधवारी जातो. ती सगळी मंडळी भेटली की अगदी पोट भरते. त्यातले काही चेहरे आठवताहेत.

वर्षानुवर्षे प्रकाश वायंगणकर एकच एक काम करतोय, पण कंटाळत नाही. माहिती देण्याचं, आलेल्यांना अॅडमिशनची तारीख द्यायचं काम फार महत्त्वाचं. कारण त्यानं एखादं उद्धट उत्तर दिलं तर सगळ्या संस्थेचं नाव खराब होणार. नंबर देण्यात गैरकारभार होऊ शकला असता, पण आजवर एकही तक्रार नाही असं चारित्र्य. किती दडपण येत असेल त्याच्यावर! कारण येणारे लोक हे त्यांच्या माणसाला अॅडमिट करायला घायकुतीला आलेले असतात. त्यांना समजावून सांगणं, त्रागा न करता किंवा कोरडेपणा न आणता. किती कठीण काम! रिटायर झाला, तरी तसाच तेच काम करायला दुसऱ्या दिवशीपासून हजर. तशाच सस्मित चेहऱ्याने.

तिथंच घोटाळणारा जॉन आठवतो. मुक्तांगणमधल्या शिस्तीला तो जबाबदार. एवढी शे-दीडशे माणसं जिथं राहतात, तिथं थेरपीच्या तासांमधे कणीदार शांतता. झोपलेल्यांना उठवणे, पहिल्या आठवड्यातल्या अनुत्सुक मित्रांना थेरपी हॉलकडे ढकलणे... त्या काळात जॉनच्या आरडाओरड्याने मुक्तांगण दणदणत असतं. पेशंट-पेशंटमध्ये काही कुरबूर झाली तर ती मिटवणं... खरं तर जॉन व्यसनात असताना एवढा गरम डोक्याचा होता की बस्स. त्याच्या बायकोची तीच एक तक्रार असायची. पण इथं तो पूर्ण बदललेला. अंतर्दीप कार्यक्रमात लोक म्हणत, पहिल्या आठवड्यात त्यांच्यावर खूप चिडायचो, पण नंतर आठवडे उलटत गेले तसं जाणवलं, जॉन सर म्हणजे नारळ आहेत. वरून कठीण, पण आत नरम, गोड. एका पेशंटने मला सांगितलं, की माझी बाकी काही तक्रार नाही, पण जेवण वाढताना ते चेहरा फार गंभीर ठेवतात. त्यामुळे बरं वाटत नाही. मग जॉनला बोलावून मी त्याला सांगितलं, "जॉन, कीप स्मायलिंग." लांबून दिसला तरी मी दोन्ही बोटांनी स्वतःच्या ओठांच्या कडा उचलून दाखवायचो. की मग तो स्मित करायचा. आता तर जेव्हा बघाल तेव्हा ते स्मित असतंच. आणि मुक्तांगणची शिस्तही तशीच. वॉर्डात सांभाळून घ्यायचं काम कोल्हापूरचा नितीन करतो. त्याच्यावर सगळ्यांचं प्रेमच आहे. म्हणून ते त्याचं ऐकतात. तो एका निवृत्त, मध्यमवर्गीय वडिलांचा मुलगा. एक-दोनदा अॅडमिशन घेऊन उपयोग झाला नाही. कोल्हापूरला आमच्या मीटिंगला ते आले होते. आमची ताकद संपली, काय करावे, असे डोळ्यांत पाणी आणून म्हणाले. माझे मन गलबललेच. तिथून मग खर्चाची जबाबदारी आमच्याकडेच घेतली. त्याला घेऊनच आलो. तो बरा झाला. मुक्तांगणमधेच राहून काम करू लागला. तिकडे कोल्हापुरात त्याचे म्हातारे आई-वडील मीटिंगला न चुकता येतात. पूर्वी जे कधीही नव्हते, ते हसू अलीकडे चेहऱ्यावर झळकू लागले आहे. मी विचारतो, कसे आहात? नुसते छानसे हात हलवतात.

कधीही मी गेलो की विनय (राजोपाध्ये) पुढे होऊन माझ्या खांद्यावरची पिशवी काढून घेणार. ती हलकी असते. मी ती द्यायला तयार नसतो. पण त्याचा तो हक्क होऊन बसला आहे. तो उत्तम चित्रकार आहे. त्याची चित्रे त्या वेळच्या मासिकांमधे नेहमी येत. नंतर व्यसनात पूर्ण बुडला. संसार मोडला. याला एकदा अपघात झाला, तेव्हा त्याची, तो गेल्याची बातमी पेपरात छापून आली होती. आमच्याकडे चांगला व्हायचा, पण बाहेर गेला की रिलॅप्स. त्या अपघाताने मेंदूवर विपरीत परिणाम

झाला असावा. त्याच्या म्हाताऱ्या आईने त्याला आमच्यावर सोपवले आहे. कुठे गावात चित्रप्रदर्शन असले की मुक्ता त्याला 'एस्कॉर्ट' देऊन पाठवते. त्याने मुक्तांगणची व्यसनाविषयीची जाणीव निर्माण करणारी १५-२० मोठी पोस्टर्स तयार केली आहेत. ती आम्ही पथनाट्य असेल तिथं दोऱ्या बांधून टांगतो. मी नवीन प्रार्थना किंवा गीत लिहिले की त्याच्या टप्पोऱ्या मोठ्या अक्षरात लिहून तो भिंतींवर लावत असतो. कधी माझ्या भाषणातून काही वाक्यं उचलतो आणि ती कुठे कुठे भिंतींवर लावतो. किचनमधून फेरफटका मारताना दोन पोस्टर्स पाहिली. खाली माझे नाव 'बाबा' बघून चकित झालो. 'जब तुम सब्जी काटते हो, तो समझो तुम अपना अहंकार काटते हो' असे एक. आणि दुसरे, 'जब तुम बर्तन साफ करते हो, तो समझो अपने मन को साफ करते हो।' माझ्या भाषणातून ही वाक्ये त्याने बरोबर कशी उचलली? मी ती ओघात बोलून गेलो, म्हणून कधीच विसरुन गेलो होतो. 'आनंदयात्री' द्वैमासिकाच्या कव्हरचे काम तोच करतो. मग माझ्यापुढे तो येऊन बसतो. "काही तरी लाइन सुचव ना." मग तो पुढे घेणेकऱ्यासारखा बसला की सुचतेही मला एखादी ओळ.

शेखर पुरंदरे म्हणजे एकदम शांत आणि जबाबदार माणूस. पेशंट, कौन्सेलिंग इ. भरपूर कामे तर असतातच. पण त्याचबरोबर सर्व रेकॉर्ड वेळोवेळी पुरे करून घेतो. केंद्र सरकारला पाठवायचा कागदपत्रांचा गठ्ठा तोच तयार करतो. पूर्वी मी हे काम करताना किती गांजून जायचो; पण तो हे काम लीलया करतो. असे बरेच. पण तरी सगळ्यांची आत्या, प्रफुल्ला मोहिते मॅडम राहिल्याच. कां, तर त्या नुकत्याच सुरु झालेल्या 'निशिगंधा' या स्त्रियांच्या वॉर्डमधे बुडून गेल्यात. प्रफुल्ला ऊर्फ फुला ही माझी धाकटी बहीण. त्यामुळे मुक्ता तिला आत्या म्हणायची. मग मुक्तांगणच तिला आत्या म्हणू लागले. तिने अठराव्या वर्षी पळून जाऊन प्रेमविवाह केला; पण त्याने तिला खूप त्रास दिला. दारुची सवय आणि पुढे व्यसनच. रात्री-अपरात्री तिला आणि त्यांच्या दोन चिमण्या पोरांना घराबाहेर काढी. या दोन पोरांना घेऊन किती रात्री तिने जिन्यात काढल्या असतील. ती कधी तरी आमच्या घरी यायची तेव्हा चेहऱ्यावर मारहाणीच्या खुणा. विचारले की सांगायची, काही नाही, जाता जाता दार लागलं, किंवा खिडकी लागली. हे सगळं समजल्यावर तिला न् मुलांना आम्ही त्या घरातून कायमचे घेऊन आलो. तिचा नवरा खूप आक्रमक असल्याने तिला सोलापूरला दुसऱ्या बहिणीकडे-सविता-चंदूकडे पाठवून दिले. तिथे येऊन तो त्रास देईल अशी भीती होतीच. ती तिथल्या प्रकाश पवार या पोलिस अधीक्षक स्नेह्यांना सांगताच त्यांनी रोज एका शिपायाला चौकशी करुन यायची ड्यूटीच लावून दिली. पण दारुमुळे तो पुढे गेलाच. मग फुलाने छोट्या-मोठ्या नोकऱ्या करुन पोरांची शिक्षणे पुरी केली.

या दरम्यान आमचा सोलापूर फॉलोअप सुरु झालेला. ती मीटिंगला तर असायचीच, पण उरलेल्या महिन्यातही अनेक पेशंटना मदत करायची. तयार करुन पाठवायची. मी तिथल्या एका मीटिंगला गेलो असताना हे पाहिले. आल्यावर मुक्ताला म्हटलं, फुलाला इकडंच आणू यात का? हवे तर सोलापूर फॉलोअपला ती जात जाईल. मुक्ताला ती कल्पना खूपच आवडली. फुलाच्या मुलीचे लग्न झालेले. मुलाचे कॉम्प्युटरचे शिक्षण पुरे झालेले. मुक्तांगणशेजारीच जागा घेतली. मग काय, संध्याकाळी उशिरापर्यंत ती मुक्तांगणमधेच बसू लागली. ती अबोल आहे, पण मायाळू स्वभावाने तिने सगळ्यांना आपलेसे केले. एखादा पेशंट बरा झाला, तरी त्याचं सगळं मार्गी लागेपर्यंत ती त्याचे सगळे हातातच घेते. कधी घरी येते. बरोबर तिचा त्या त्या वेळचा 'लाडका मुलगा' असतोच, आणि ती त्याला बराच करून सोडते. एक इंदूरचा मुलगा असाच बरा केला, आणि तो आमच्याकडेच काम करतो. त्याची आई तिकडून कधी तरी भेटायला येते. एकदा ते तिघं समोरुन येत होते. मी त्यांना विचारलं, "कसा आहे तुमचा मुलगा?" त्या हसून म्हणाल्या, "माझा कसला, तो आता आत्याचाच मुलगा आहे."

फुला सुगरण आहे. तिने सहचरींच्या स्वयंपाकाला वेगळीच चव लावली आहे. त्या सगळ्या

मुलींची ती जीव की प्राण आहे. कधी ती मला 'निशिगंधा'मधे त्या मैत्रिणींशी बोलायला बोलावते. इतकं सुंदर ठेवलंय तिनं सगळं! तिथली स्वच्छता, तिथले पडदे, तिथले बेडशीट्स... प्रसन्नच वाटतं. तिथल्या अनेक पेशंट मैत्रिणींचं मी कौतुक करतो तेव्हा त्या म्हणतात, "आमचं काही नाही. सगळं काम आत्यांचंच. त्या आहेत म्हणून आम्ही आहोत." मला त्या वेळची चेहऱ्यावर जखमा, वळ असलेली फुला आठवते आणि आताची आत्या... हा मुक्तांगण स्पर्श!

मधेच अरुणा आठवते. तिचं घरही व्यसनाने उद्ध्वस्त झालेलं होतं. नवरा आता गेला. आता ती सावरली आहे. प्रशिक्षित तर आहेच, पण स्वानुभवाच्या स्पर्शाने तिच्या कौन्सेलिंगमधे जिवंतपणा आहे. पलीकडे साथ-साथ चालवलेली, विवाहविषयक पेपरात, मासिकात लिहिणारी वंदना कुलकर्णी आहे. ज्या मित्रांच्या जीवनात असे वैवाहिक प्रश्न असतील ते पेशंट, नातेवाईक तिच्याकडे गर्दी करतात. त्या विषयात एक वेगळा कौन्सेलर लागेल हे वंदना येण्यापूर्वी वाटलेच नव्हते. आठवड्यातून एकदा रेणू गावस्कर येते. या सगळ्यांचे ग्रुप्स पेशंट मित्रांना खूप आवडतात.

मुक्तांगणच्या सुरुवातीला अनिता मोडक या मैत्रिणीने सुचवले, तिचा एक विद्यार्थी आहे, गरजू आहे. भास्कर मोरे तसा इथं आला. त्यानं ते काम तर केलंच, पण हळूहळू इतर कामं अंगावर घेतली आणि आता कौन्सेलर झाला. पोलिसांना ड्रग विकणारांची माहिती जमवून द्यायचं कामही त्यानं हौसेने स्वतःकडे घेतलं.

काही काही मदतनीस मित्र कधी तरी दिसतात. महेंद्र आठवतो. इतका हुशार! साहित्यातली इतकी चांगली अभिरुची, की मी नवं काही लिहिलं की त्याला फोन करतो. सक्काळी साडेसहा-सातलाच उगवतो आणि वाचत बसतो. त्याचे ग्रुप्स उत्तम होतात. त्याचं रिपोर्ट रायटिंग उत्तम. पण हा पठ्ठ्या सोब्रायटी फार काळ टिकवू शकत नाही. माझा तो लाडका मुलगा. जेव्हा 'त्या' अवस्थेत मुक्तांगणमधल्या कोपऱ्यात कुठे तरी निश्चल पाहत उभा असताना दिसतो तेव्हा पोटात खड्डा पडतो. कुठे गेलं त्याचं सळसळतं चैतन्य? कुठे गेली त्याची उत्तम गुणग्राहकता? तो बरा होतो आणि लगेच पहिल्यासारखा उत्साही होतो. आनंदनेही त्याला खूप मदत केलीय. मला तर तो बापच मानतो. त्याचे वडील काही काळापूर्वी गेले, तेव्हापासून हे नातं जास्त दृढ. मी त्याला विचारतो, "तू ज्या वेळेस घ्यायला जातोस, त्या क्षणी आम्हा कुणाची का रे आठवण येत नाही? एखादा फोन केला असतास तर?" त्यावर मान हलवत म्हणतो, "नाही जमलं. समजलंच नाही कसं झालं ते. प्रयत्न करीन परत असं झालं तर." त्याच्या प्रामाणिकपणावर, सिन्सिरिटीवर माझा पूर्ण भरोसा आहे. त्याचा कधी राग येणं शक्यच नाही. कुणाचा द्वेष नाही, मत्सर नाही, भांडण नाही... असा निर्मळ मनाचा माणूस. मग हे काय त्याच्या मागे लागलंय? महेंद्रसारखे काहीजण पाहिले की वाटते, आपल्याला समजते ते फार थोडे आहे. न समजणारा भाग सागराइतका मोठा आहे. पण त्याने पाय जमिनीवर राहतात. आपल्याला आपण सर्वज्ञ आहोत, असा भास होत नाही. या परिस्थितीत आपण काय करू शकतो? त्याला हवी तेव्हा परत परत मदत. जे चार-सहा मिळतील ते महिने आपले. आता बराच काळ चांगला आहे. एकदा माझं लेखन वाचायला सक्काळीच येणार होता. आम्हा सगळ्यांना रविवारी सकाळी बेकरीतलं गरम गरम पॅटिस खायची इच्छा झाली. पण उठून आणणार होण? मी महेंद्रला आणायला सांगितले. पैसे घेतले पाहिजेत, म्हटल्यावर नुसता हसला. जाताना आईने तेच म्हणताच 'माझे वडीलही मला येताना असंच काही आणायला सांगायचे,' असे म्हणून निघून गेला. आमची बोलतीच बंद झाली. तसाच आमचा अंकुश दरवेश. प्लंबिंग असो, वायरिंग असो, कुठल्याही यंत्राचा कुठलाही बिघाड असो, त्याचं एकच उत्तर- अंकुश!

मी कधी मुक्तांगणमधे गेलो आणि माझ्या खुर्चीत बसलो, की घाऱ्या डोळ्यांचा, सोनेरी केसांचा गोरा संजय भगत उगवतो. आल्या आल्या खाली वाकून पाया पडणार. मान पुढे झुकवून नम्रपणे बोलणार. हा जगातल्या बऱ्याच देशांत बड्या कंपन्यांमधे जॉब केलेला. तो तिथेही बराच

वरिष्ठच असणार. पण व्यसनाच्या चक्रात सापडला आणि वाहत वाहत मुक्तांगणच्या किनाऱ्याला लागला. तिथेच बरा झाला, आणि आता त्याने मुक्तांगणला वाहूनच घेतले आहे. मुक्ताचा तर तो कार्यक्षम सहायक आहे. रिपोर्ट बनवायचे, दिल्लीला पाठवायचे. खोपोली-नायगावजवळच्या रिलायन्स कॉलनीमधे दर महिन्याला जातो. पेशंट फॉलोअप तर असतोच, पण त्यांच्या कामगार ते एक्झिक्युटिव्ह अशा साऱ्यांचे ट्रेनिंग क्लासेस घेतो. अशा अनेक कंपन्यांना तो ॲप्रोच होतो. मुक्तांगणला त्यांच्याशी अधिकृतपणे जोडून घेतो. माझा कुठे कार्यक्रम असेल तर लोक मला बायोडेटा, फोटो मागतात. माझ्याकडे कुठला असणार? मग ते परस्पर मुक्तांगणमधे फोन करणार. संजय त्यांना हवे ते सर्व 'ऑनलाइन' पाठवणार.

मध्यंतरी मी त्याला सांगितले, गेल्या पाच वर्षांतली पेशंटची वर्गवार, वयवार यादी कर. ते आज सोबर आहेत की नाहीत ते शोधून काढ. त्यांच्या घरी फोन कर, घरच्यांना विचार आणि पुढच्या महिन्यात मला काय निघते ते कळव. तो तत्परतेने कामाला लागला. आणखी एक महिना मागून घेतला आणि आश्चर्यकारक आकडा समोर ठेवला. ७० टक्के पेशंट बरे झालेले. माझा विश्वास बसत नव्हता. म्हणून म्हटले, की ते नक्की सोबर आहेत का याचे पुरावे, अगदी लिखित पुरावे गोळा कर. 'यस बाबा' म्हणून तो सुटलाच. आता मी त्याला पाच वर्षांपूर्वीचा पाच वर्षांतल्या पेशंटचा अभ्यास सांगणार आहे. बघू या काय होतंय ते. तो असा सॉफिस्टिकेटेड असला तरी आफ्टर केअरमध्ये राहतो. टपोरी लोकांबरोबर चांगले जमवून घेतो.

टपोरी म्हटल्यावर किचनमधली पोरं आठवली. हाफपँट-बनियनवर काम करणारी. कुणी दाढी वाढवलीय, तर कुणी डोक्याला पट्टी बांधलीय. काय धूमधाम कामं करतात ते! उकळत्या रश्शाची मोठी पातेली उतरवून गॅसभट्टीवर दुसरी चढवायची म्हणजे सोपं काम नव्हे. शिवाय एवढी उष्णता. मी कधी गेलो की काम थांबवून उभे राहतात. त्यांच्या त्या गुमान चेहऱ्यांवर हास्य पसरते. म्हणतात, या बाबा.

आमच्या बहुतेक स्टाफने किचनपासूनच सुरुवात केलेली आहे. आधी आफ्टर केअरमधे राहतात. किचनमधे काम करतात. खूप कष्टाचं, जिकिरीचं काम. नंतर हळूहळू तिथे रुळतात. मग त्यांना किचन सांभाळून थोडी बाहेरची कामे देतो. कधी तो सभ्य कपड्यांत आम्हा सगळ्यांच्या खोल्यांच्या बाहेर मदत करायला बसतो. मग त्यातले काही हेरुन त्यांना पेशंटचे ग्रुप घ्यायला सांगतो. तिथेही ज्याचं काम चांगलं, त्याच्यावर पेशंट सोपवतो, की तो कौन्सेलर होतो. या सगळ्यातून तो गेल्याने त्याला कामाची, कष्टाची लाज वाटत नसते. बाहेर लोक भेटीसाठी येतात. त्यांना आम्ही इतके चांगले, नम्र, कामसू लोक आणतो कुठून, असा प्रश्न पडतो. त्यांना काय सांगायचे, की माणूस चांगला असतोच, फक्त इथे त्यावरची पुटं काढण्याचं काम केलं जातं.

केंद्र सरकारचे सेक्रेटरी खूप मागे एकदा आले होते. सर्व पाहून ते म्हणाले, "व्हॉट आय ॲप्रिशिएट, की कार्यकर्त्यांची तुमची दुसरी फळीही तयार आहे. इतर संस्थांना हा फार मोठा प्रॉब्लेम आहे." मी आमच्या किचनमधल्या पोरांना जसे आहात तसे या, असा निरोप पाठवला. ते हाफ पँटी, मळके तेलाचे डाग पडलेले कपडे घातलेले, कुणी दाढ्या-केस वाढवलेले.. असे सगळे येऊन उभे राहिले. मी त्यांना म्हटले, सर, ही आमची थर्ड जनरेशनही तयार होते आहे. संस्थेची पुढची धुरा हेच वाहणार आहेत. या अभूतपूर्व दृश्याकडे पाहिले आणि त्यांनी मला न् सुनंदाला नमस्कारच केला.

समुद्राच्या निळ्याभोर पाण्यात छोट्या छोट्या माशांचे थवे लीलया जाताना-येताना टीव्हीवर पाहतो, तशा अनेक आठवणी, अनेक चेहरे डोळ्यांसमोर येऊन झपकन जातातही. या पाण्यातनं, आकाशातल्या निळाईतनं सुनंदाचा चेहरा समोर येतो. तिला जाऊन तेरा वर्षं झाली, तरी आठवणी, नुसत्या माझ्याच नाही तर सर्वांच्या, जराही पुसट-क्षीण होत नाहीत. अडचणीच्या प्रसंगात मनातल्या मनात हरघडी तिला सल्ला विचारत असतो. कधी इन्स्पेक्शन उत्तम झाले, कधी बरा न होणारा

पेशंट बरा होतो, कधी कुणी नवीन उपक्रम सुरू करतं. त्या वेळी मनाला जे समाधान मिळतं त्यात ती असतेच. एक बारकीशी, जगाच्या दृष्टीने सुस्वरूप नसलेली ही व्यक्ती. कधी भाषणे केली नाहीत की लिहिले नाही. सार्वजनिक जीवनात स्वतः दूर राहून मलाच पुढे करत राहिली... काय म्हणावे या मुलीला! कधी जगाकडे काही मागितले नाही. साध्या शाब्दिक कौतुकाचीही अपेक्षा केली नाही. पण बघता बघता ती इतकी मोठी होत गेली, की मलाच कमालीचा अचंबा वाटतो. आधारही वाटतो. दुनियेत त्या वरवरच्या कुठल्याही गोष्टींची आवश्यकता नसते. जीव लावून काम केलं की काय उभं राहतं बघा!

आताची मुलं चाललेला विषय बाजूला ठेवून आम्हाला मोठ्या मॅडमविषयी सांगा, असा हट्ट धरतात, तेव्हा मन शहारतं. मी म्हणतो, “तुम्हाला काय माहीत मोठ्या मॅडम?” ते म्हणतात, इथल्या प्रत्येक स्टाफच्या बोलण्यात त्या सारख्या येतच असतात. पूर्वीच्या पेशंटचे शेअरिंग असते. त्यात त्यांच्याविषयी उल्लेख असतोच. मला बरे वाटते. माझ्या मनात सुनंदा ठायी ठायी आहे याचं आश्चर्य नाही. पण इतक्या लोकांच्या मनावर तिचे गारूड असावे? मग त्यांना तिची एखादी आठवण सांगतो, की ते वेगवेगळ्या मुलुखातले, गरीब ते अमीर, शिकलेले-बिन-शिकलेले, खेडूत-शहरी चेहरे उजळताना पाहतो, तेव्हा जे वाटते ते शब्दांपलीकडचे!

■

७

कुठलीही संस्था चालवणं म्हणजे सुरळीत, सुखाचा प्रवास नसतो. ती वाटचाल हेलकाव्यांनी भरलेली. अगदी सुरुवातीलाच जोरदार हेलकावा आला तर संस्था बंदच पडण्याची शक्यता. संस्था चांगली चालू लागल्यावर तो आला तर संस्था तो हेलकावा पचवू शकते. आम्हाला या दोघांच्या जरा मध्येच आला. पण हादरुन गेलो. असे होऊ शकते? हा माणूस असे करु शकतो? इ. प्रश्नांचे जसे मोहोळच उठले.

थांबा, सांगतोच आहे मी सगळं. रमेश शिंदेची ओळख कुठे तरी झाली. त्याला पुण्यातल्या गुन्हेगारी समाजाची खडान् खडा माहिती होती, तसेच पोलिस अधिकाऱ्यांच्यातही ऊठबस होती. तो स्वतःही म्हटलं तर बेकायदेशीर, पण म्हटलं तर लोकांना उपयोगी पडणारं काम करायचा. त्याची-माझी मैत्रीच झाली. त्याच्यामुळे अनेक पोलिस अधिकाऱ्यांची ओळख झाली, आणि काही गुन्हेगारांचीही. मला या गोष्टी जाणून घेण्यात उत्सुकता होतीच. त्याच सुमारास मुक्तांगण सुरु झालेले. मग त्याच्याकडे असलेली मोठी खोली त्याने आम्हाला देऊ केली. ती आमच्या पेशंटना जमायला चांगली सोयीची होती. तिथं आमचं कौन्सेलिंग सेंटर सुरु झाले. आमच्या ट्रस्टी मीटिंगमध्येही निमंत्रित म्हणून तो काही वेळा हजर राहिलाय. पुढे पुढे कौन्सेलिंग सेंटरमध्ये त्याचा हस्तक्षेप वाढू लागला. आमचा कोणी पेशंट उभा असला, की त्याला तो 'जा रे, जरा बिडी बंडल आण' किंवा 'चहा सांगून ये' अशी कामे सांगू लागला. सुनंदाच्या तंत्रात हे बसणारे नव्हते. ती जागा सोडावी असे ठरवले. मग कुठे जाणार? आमची लोकमान्यनगरमधली जागा मोकळी होती. तिथे ते केंद्र हलवले आणि शांतपणे बाजूला झालो.

माझे त्यांच्याकडे जाणे-येणे अधूनमधून होतेच, पण प्रमाण कमी झाले. यानंतर काही काळ गेला. आमचा एक पेशंट सांगत आला, की आपल्याविरुद्ध काही तरी संकट येतंय. तसे त्याच्या मित्राला त्याच्या मित्राने सांगितले. मी म्हटले, "संकट काय असणार? ग्रँटचे का? ते नेहमीचेच आहे." पण ते संकट आलेच. एक मोठ्ठा लखोटा आला. रमेश शिंद्यांनी चॅरिटी कमिशनर ऊर्फ धर्मादाय आयुक्तांकडे आमच्या विरोधात अर्ज केलेला. आरोप काय? तर संस्थेत खूप भ्रष्टाचार आहे. पण त्याबाबतचा एकही पुरावा दिलेला नव्हता. दुसरा आरोप, संस्थेची घटना हुकूमशाही स्वरुपाची आहे. ती रद्द करुन नवीन घटना करण्यात यावी. आश्चर्य म्हणजे त्या नव्या घटनेतही आमची विश्वस्तांची नावे आणि त्याचे नाव. मी हे वाचून हडबडून गेलो. तो अंधारातून अनपेक्षितपणे येणारा बाण शिंद्यांचा होता तर! पण त्यांना मी चांगला माहीत आहे. सुनंदाला त्यांनी बहीण मानलेले. आम्ही कोण, कशी माणसे आहोत, हे माहीत असूनही? घटना तर आम्ही रिटायर्ड चॅरिटी कमिशनर ॲड. आ. द. काळे यांच्याकडून करुन घेतलेली. ती या कमिशनरांनी मंजूर केलेली.

त्या वेळचे संस्थेचे अध्यक्ष राम शेळके (शांता शेळके यांचे धाकटे भाऊ) होते. ते म्हणाले, "शिंद्यांना सांगून पाहतो." आम्ही सगळ्यांनी विरोध केला. म्हटले, "त्यांनी तक्रार करण्यापूर्वी काही बाजू मांडली असती तर विचार केला असता. आता नाही." सुरेंद्र पाटील हे इन्स्पेक्टर आमचे समान मित्र. त्यांनी आम्हा दोघांना आणि त्यांना जेवायला बोलावले. चर्चा होऊन मैत्रीत तोडगा काढू, असा त्यांचा उद्देश असावा. पण आम्ही एकही शब्द बोललो नाही. ते आरोप फार जिव्हारी लागले होते. आजवर कुणी आम्हा दोघांच्या चारित्र्यावर संशय घेतला नव्हता. पण एक माणूस, तोही जवळचा, उठतो आणि सरळ आरोप कसा काय करु शकतो? बरे, चुका होऊ शकतात. त्या सुधारुही शकतो.

तसे त्यांनी दाखवले असते तर आम्ही तेही जरूर केले असते.

काळ्यांकडे एका संध्याकाळी जाऊन बसलो. ते अर्धा तास सर्व आरोपपत्र वाचत होते. माझ्या मनात काहूर उठले होते. एखादा डॉक्टर आता रोगाचं काय निदान सांगतोय, या तऱ्हेचं काही तरी. खाली ठेवून म्हणाले, "हां, आता लिहून घ्या मी सांगतोय ते." त्यांनी फुलस्केप कागदाचा गठ्ठाच हातात दिला. ती भाषा सगळी वेगळीच. आपण म्हणजे 'जाब देणार', वगैरे. मी एकेक वाक्य लिहून घेत होतो. त्या आरोपांना ते चपखल कायदेशीर उत्तर देत होते. एकेका वाक्यागणिक माझी मनःस्थिती सुधारु लागली. सलाईन चढवलेल्या पेशंटसारखीच. हळूहळू धुगधुगी आली. नंतर तर टवटवीतपणाही आला. ते सगळे उत्तर आम्ही दाखल केले.

या आरोपाची बातमी एका इंग्लिश पेपरात छापून आली. एकाही मराठी पेपरात आली नाही. मी एका वार्ताहराला याचं कारण विचारलं. तो म्हणाला, नुसते आरोप केले तर आम्ही छापत नाही, पण निकाल लागला, किंवा अगदी अंतरिम स्टे जरी मिळाला तरी आम्ही छापतो.' ती छापून आलेली बातमी झेरॉक्स करुन शिंद्यांनी ठिकठिकाणी पाठवली. दिल्लीला पाठवली असणार. पण तिथल्या कागदपत्रांच्या सागरात ती गडप झाली असणार. मुंबईला आरोग्य विभागाला पाठवलेलं पत्र अरुण घाटेकडे आलं. शिंद्यांनी लेटरहेड छापून घेतलं होतं. त्यावर संस्थेचं नाव, तपशील, आमचा सिंबॉलही. मी अरुणला विचारलं, आता याचं काय करायचं? तो म्हणाला, "याला उत्तर द्यायचं." तसा कागदाला कागद मिळाला, आणि तिथून पुढे काही झालं नाही. आमचे चार्टर्ड अकाउंटंट म्हणाले, "कोण हा माणूस? किती वेळा त्यानं फोन केला! तुम्ही या संस्थेचे हिशोब नीट तपासा, असं म्हणत होता. शेवटी मी सांगितलं, की माझं काम मला नीट कळतं."

मी मित्रांना, संबंधितांना हे सांगत सुटलो होतो. एक मित्र म्हणाला, "अरे, पुण्यातल्या प्रत्येक संस्थेच्या मागे कुणा तरी उपद्व्यापी माणसाचा भुंगा लागलेलाच असतो." त्याने पुण्यातल्या नामवंत संस्थांची नावे सांगितली, आणि त्यांच्यामागे लागलेल्यांचीही. मला वाटले, मी पुण्याचा. पुण्यात इतकी वर्षे राहतोय. पण मला हे माहीत नव्हतं. चला, त्या निमित्ताने ही बाजू कळली तरी.

दर महिन्याला तारीख पडायची. दुपारी तीन वाजता. मी, रामभाऊ शेळके आणि आ. द. काळे असे तिघे त्या टळटळीत उन्हात जायचो. काळे एके काळी महाराष्ट्राचे चॅरिटी कमिशनर होते. त्यांनी निवृत्तीनंतर ठरवले होते, की या विभागात वकिली करायची नाही. म्हणून ते तिकडे मुख्य कोर्टात वकिली करत. पण केवळ आमच्या प्रेमासाठी त्यांनी हा अपवाद केला होता. त्या वेळची इमारत अतिशय अपुरी होती. एका अरुंद बाल्कनीत एक बाक होते, त्यावर आम्ही तिघे बसून राहायचो. काळ्यांना इथले अनेक कर्मचारी भेटायला येत, पण ते हसून नुस्ता हात वर करीत. वाट पाहून शेवटी पाच वाजता तिकडच्यांचे वकील मेडिकल सर्टिफिकेट फडफडवत यायचे, आणि तारीख पुढच्या महिन्यात दुपारी तीन वाजता. शिंद्यांनी पाच-सहा वकिलांचा ताफाच नेमला होता. त्यात एक आमच्या चळवळीत असलेल्या स्त्री वकीलही होत्या. त्या पुढे खूप प्रसिद्ध झाल्या. नंतर कधी तरी एका कार्यक्रमात भेटल्या. म्हणाल्या, "ती केस स्वीकारली ही माझी मोठी चूक झाली."

त्या काळात हे एक मोठे विश्वच पाहायला मिळाले. रोज शेकडोंची गर्दी व्हायची. या थोड्या काळात किती तरी म्हणजे हजारोंनी संस्था स्थापन झाल्या असतील. अपुरी जागा, अपुरा स्टाफ. हे सगळं कसं उरकत असतील? शिवाय आमच्यासारखे खटले. तेव्हा एक ओळखीचा बॉडी बिल्डर भेटला. "तू इकडे कुठं?" तो म्हणाला, "आमच्या संस्थेत भांडणं चाललीत ना." आमच्या गावच्या देवस्थान कमिटीचे लोक बहुधा अशाच कारणासाठी आलेले दिसत. एकदा त्या आवारात बायकांची खूप गर्दी. कारण विचारलं तर कळलं, कुठल्याशा सरकारी अनुदानासाठी संस्था रजिस्टर असावी, असा फतवा निघालाय. म्हणून ही गर्दी. या प्रकरणानंतर कधी तरी आम्हाला एका ट्रस्टला देणगीसाठी अर्ज करायचा होता. त्यासाठी चॅरिटी कमिशनरचं संस्था नीट चालली

असल्याचं सर्टिफिकेट हवं होतं. काळ्यांबरोबरच मी गेलो. आमची फाइल काढली. गेल्या वर्षीच्या अकाउंटपासून सगळे व्यवस्थित लावलेले. मी तर हातच जोडले. तारीख आली की टेन्शन यायचे. तारीख झाली की मन उड्या मारत घरी यायचं. कुणी सांगितलं, या काळात तुला देशाबाहेर जायचं असलं तर या कोर्टाची परवानगी घेऊनच जाता येणार. बाप रे! मला कुठंही जायचं नव्हतंच. पण नकळत नेहमीचं संचारस्वातंत्र्य झालं की गडप. नकळत हाता-पायांत एक अदृश्य बेडीच जशी चढली. मला तारखेचं भान ठेवावं लागे. कुठेही, कुणालाही या तारखेला कार्यक्रम द्यायचा नाही, बोलावणं स्वीकारायचं नाही.

पण हे सगळं मानणाऱ्याला. शिंद्यांसारखं मेडिकल सर्टिफिकेट देऊन या बेड्या उधळून लावता आल्या असत्या. पण त्या पंथाचे आपण नाही. भर दुपारी तीन वाजता त्या बाकड्यावर बसताना मन उद्विग्न व्हायचं. माझ्याबरोबर या दोघांनाही हा त्रास. त्या वेळी मागे बदलीप्रकरणात मनात आलेलं वाक्य आठवलं, 'सामाजिक काम करतोस काय, मग घे ही त्याची शिक्षा!' हे वाक्य मी पुढे मंत्र म्हणून वापरत आलोय. आपल्याला शिक्षा ही हवीच. सरळ मार्गाने न जाता सामाजिक कामात कशाला गेलास? कुणी सांगितलं होतं तुला? या वाक्याने मला हसू येतं. ताण विरघळतोच. अशा तारखा पडत होत्या. त्यांची सर्टिफिकेटं येत होती. तारखा पुढं ढकलल्या जात होत्या.

एका तारखेला चॅरिटी कमिशनरांनी आम्हाला आत बोलावले. म्हणाले, “दोन्हीकडचे वकील कुठं आहेत? मी आत्ता केस चालवणार आहे.” सगळी गडबड उडाली. त्यांचे वकील आले. त्यांनी मेडिकल सर्टिफिकेट देऊ करताच तेही साहेबांनी उडवून लावले. म्हणाले, “अशा केसमध्ये तक्रार करणारा केस चालवायला उत्सुक असतो आणि संस्थाचालक तारखा घेऊन उशीर करायला बघतात. इथं उलटाच मामला दिसतोय. मी दरवेळी यांना इथं बसलेलं पाहतोय, आणि तुम्ही सर्टिफिकेट देताय?”

त्यांनी ताडताड प्रश्न विचारायला सुरुवात केली. त्यांच्या केसमध्ये अनेक त्रुटी होत्या. साहेबांनी सांगितले, “हा अर्ज या त्रुटींमुळे निकालात काढतोय. तुम्हाला नंतर स्वतंत्र अर्ज करायचा असेल तर करु शकता.” झालं, केस संपलीच इथं. जेमतेम दहा-पंधरा मिनिटं लागली असतील सगळ्याला. येताना मी खूष होतो. पण काळे म्हणाले, “शिंद्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर आपल्याला गुणात्मक विजय मिळायला पाहिजे होता.” मी मात्र सुटकेच्या विजयामुळे नाचत सुटलेलो. नंतर त्यांनी अर्ज केला नाही. त्यांचे वकील भेटले. त्यांना याबाबत मी विचारले. ते म्हणाले, “आम्ही त्यांना सांगितले, की या केसमध्ये जास्तीत जास्त व्हायचे ते झाले आहे. आणखी काही निष्पन्न होणार नाही.”

नंतर मी कुठल्याही प्रकारे शिंद्यांशी संबंध ठेवला नाही. सुनंदा गेली तेव्हा भेटायला आले तेवढेच. त्या रस्त्यानेही कधी मी गेलो नाही. बऱ्याच वर्षांनी एकदा फोन आला होता : “तुमच्या ओळखीचे ते अमुक इन्स्पेक्टर आहेत. मला एक फ्लॅट हवा आहे. तुम्ही शब्द टाका, ते काम १०० टक्के होणार.” मी त्यांना म्हटलं, “आपण चुकून भेटलो. तुमचे तुम्ही आणि आमचे आम्ही. आपण कधी भेटलोच नव्हतो, असे समजू या.”

हे लिहितानाही खूप कष्ट पडले. कारण ठरवून मागे टाकलेला तो विषय होता. पण सांगावाच लागला. आठवणींची चव सदा सर्वत्र गोड नसतेच. आंबट, तुरट, कडू हे असतंच कमी-जास्त मिसळलेलं. आम्ही तर यातून खूप शिकलो. ट्रस्टी मीटिंगमध्ये बाब कितीही क्षुल्लक असो, त्याची नोंद करु लागलो. अकाउंटमध्ये अधिक व्यवस्थितपणा आणला. आवश्यक असतील ती रजिस्टरे भरु लागलो, येवढेच नव्हे, तर सरकार दरबारी आवश्यक नसलेली रजिस्टरेही ठेवू लागलो. मागे सांगितल्याप्रमाणे सर्व व्यवहार चोकने करु लागलो. आमच्यासारख्या किती तरी संस्था दरवर्षीचे हिशोब वेळेत पुरे करीत नाहीत. आम्ही महिन्याचे हिशोब जमवून बंद करु लागलो. सामानाचे डेड स्टॉक रजिस्टर अद्ययावत नव्हते, ते केले. सगळीकडे विचारत सुटलो, आणखी काय काय करायला

पाहिजे सांगा, ते करतो. नंतर कोणी काही म्हणायला नको. हा झटका बसला तो शिंद्यांमुळे. तसे त्यांचे उपकारच म्हणायचे.

शिंद्यांनी त्या काळात आणखी एक उपसंकट उभे केले होते. त्या वेळी सतीश गवई हे आय. ए. एस. ऑफिसर समाजकल्याण विभागाचे संचालक म्हणून बदलून आले. शिंद्यांनी त्यांना फोन करुन, स्वतःचे बंगाली नाव सांगून त्यांना हैराण केले. मजकूर एकच, “या संस्थेमध्ये भ्रष्टाचार आहे. त्यांची कडक तपासणी करा.” त्यांनी हाताखालच्यांना तसा आदेश दिला. आणि ते आलेच. त्यांनी बरेच दोष काढले. पण त्या बऱ्याचशा अज्ञानातून झालेल्या उणिवा होत्या. तसे रेकॉर्ड ठेवायला त्यांनी आजवर सांगितले नव्हते. दरवर्षी अशीच इन्स्पेक्शन होत होती, तरीही.

आम्ही या सगळ्याला उत्तर दिले. नंतर गवईसाहेबांना मी भेटलो. त्यांनी दुसऱ्या ऑफिसरकरवी परत इन्स्पेक्शन केली. त्यांचा अहवाल, शेरा उत्तम असा होता. आमच्या एका कार्यक्रमाला गवईसाहेब आले होते. ते प्रांजळपणे म्हणाले, “एक फार मोठी चूक माझ्या हातनं घडू पाहत होती, पण मी तिच्यातून वाचलो.” ते आता आमचे, संस्थेचे चांगले मित्र आहेत.

आता तर काय, अशी रजिस्टरे, रेकॉर्ड हे आपोआपच रोजच्या रोज त्या त्या क्षणाला भरले जाते. आमच्या काही स्टाफ मित्रांनी सुचवले, “बाबा, ते आयएसओ ९००१ आपण घ्यायचं का? वर्षभर तयारी करु आणि मग तीही परीक्षा देऊन टाकू.” मी फारसा अनुकूल नव्हतो. मी म्हणालो, “पेशंट मित्रांच्या, त्यांच्या घरच्यांच्या चेहऱ्यावरचे प्रसन्न हास्य, हेच आपले आयएसओ सर्टिफिकेट.” पण मुक्ता म्हणाली, “त्या निमित्ताने आपल्या सगळ्या सिस्टीम्स गियरअप होतील.” मग ते कन्सल्टंट वर्षभर येत राहिले. प्रत्येक वही, रजिस्टर, अकाउंटची प्रत्येक एंट्री तपासली. दोष दाखवून सुधारून घेतले. आणि नंतर ती कमिटी आली. त्यांनीही सगळे काटेकोर तपासून आय.एस.ओ. ९००१चे सर्टिफिकेट दिले. व्यसनमुक्ती क्षेत्रात हे मिळवणारी भारतातली ही पहिलीच संस्था ठरली. परत दुसऱ्या वर्षी मिळाले. आणि तिसऱ्या वर्षीही चालूच आहे.

पूर्वी मी म्हणायचो, “आमचं काम बघा. दोषांकडे, चुकांकडे काय बघता? आता म्हणतो, “दोष दाखवाच. म्हणजे आम्हाला सुधारता येतील.” कारण हे कळलंय, की शंभर टक्के दोषमुक्त कुणीच नसतो. शोरुममधनं बाहेर काढलेल्या गाडीतनंही हवालदार दहा चुका काढून दाखवतो. तसंच आहे हे. पण इथं दोष दाखवणाराचं उलट स्वागत आहे. कारण निर्दोषतेकडे नेणारा तो मार्गदर्शकच आहे.

असाच आणखी एक अनुभव. खूप शिकलो त्यातनं.

सुनंदा गेल्यानंतरचं एक प्रकरण आहे. ते सांगणे जरा अवघड आहे, म्हणून मी लिहायचं नाही असंच ठरवलं होतं. पण आनंद (नाडकर्णी)ने सुचवलं, लिही म्हणून. मग मी त्यातून जरा मोकळा होऊ पाहतो. कारण हे जवळच्या, आवडत्या माणसाविषयी आहे. शिरलेला काटा दुखत राहतो. तरी तो काढला नाही की त्याचं कुरुप होतं. तसं याबाबत झालंय. त्याचं नाव सुहास. सुहास देवकर. आमच्या मैत्रिणीचा भाऊ. कॉलेजात होता, पण जायचाच नाही. कुणाशी फारसं बोलायचा नाही. कुणाशी फारसं पटायचंही नाही. पण तो गुणी होता. चांगली चित्रं काढे, छान वाद्यं वाजवीत बसे. गोष्टी लिहीत असे. मी त्याची गोष्ट घेऊन संपादक मित्राकडे गेलो. त्याने छापलीही. मला तो संपादक मित्र नेहमी म्हणायचा, “अरे, त्या मुलाला लिहायला सांग. चांगलं लिहितो. वाचकांचे फोन आले.” पण त्याही बाबतीत तो लहरी होता. पुढं काही लिहिलं नाही. सुनंदा आवर्जून त्याच्यापाशी जाऊन चौकशी करायची. त्यामुळे आमच्याशी त्याचे बरे संबंध होते. पण तरी दर वेळी नीट बोलेलच असे नाही.

सुनंदाने मुक्तांगण सुरु केले, तेव्हा सुहासला विचारले, “काय रे, येतोस का आमच्या टीममध्ये?” आश्चर्य म्हणजे तो आला, आणि त्याहून आश्चर्य म्हणजे छान रुळलाही. सर्वच कामांत गती

असल्याने तो सुनंदाचा उत्तम सहायक झाला. इतका, की सुनंदाचा वारस कोण, तर त्याच्याकडेच बोट दाखवावे. त्यातून त्याची लहर कधी तरी वर यायची. पण सुनंदा त्याला बरोबर आवर घालायची.

सुनंदा असतानाच आनंदने मुक्तांगणची कार्यपद्धती सुधारावी म्हणून एक 'कोअर ग्रुप' तयार केला. सुहास त्याच्यात मुख्य. त्यांनी विचार करून सुधारणा सुचवाव्यात ही अपेक्षा. मधल्या काळात सुनंदा गेली. सुहासने कोअर ग्रुपलाच 'कंट्रोल ग्रुप' बनवायला सुरुवात केली. ते ऑर्डर्स सोडू लागले, निर्णय घेऊ लागले. मुक्ता तिथं स्टाफवर होती. पण तिला येऊन चारच वर्षे झालेली. ती कुचंबून गेली. त्या चार-पाच लोकांचा इतरांना त्रास होऊ लागला, पण ते गप्प बसू लागले. त्यांनी थेट माझ्याविरुद्ध, सुनंदाविरुद्ध बोलायला सुरुवात केली. त्यांचे तसले बोलणे ऐकून तुषार चिडला आणि रागावून त्यांना अद्वातद्वा बोलला. झाले. हे निमित्त झाले. कोअर कमिटी संपावर गेली. पॅसेजमध्ये ते खुर्च्या मांडून बसून राहिले. तुषारने माफी मागितल्याशिवाय काम सुरु करणार नाही, अशी भूमिका घेतली.

हे मुक्तांगणमध्ये जाण्यापूर्वी मला कळले. मी तुषारला बोलावून घेतले. म्हणालो, "तू माफी लिहून देतोस का?" तो म्हणाला, "बाबा, तू म्हणत असलास तर मी कुठेही सही करायला तयार आहे." मी तसे लिहून घेतले आणि मुक्तांगणला गेलो. समोरच सुहास आणि तीन-चारजण बसलेले. मी इतका त्यांचा प्रिय दोस्त, पण आज त्यांनी ओळखीचे चिन्हही चेहऱ्यावर दाखवले नाही. मी वर गेलो. लायब्ररीत मीटिंग बोलावली. 'त्यांना'ही निरोप पाठवला. ते आले. त्यांनी काही बोलायला सुरुवात करायच्या आत मी तुषारचे माफीपत्र वाचून दाखवले आणि नंतर त्यांना फैलावर घेतले. "पेशंट्स, नातेवाईक यांच्यापुढे असे वागण्याची जरुरी होती? धरणे कधी धरतात? मी तुम्हाला उपलब्ध नसतो तर. इथे मी आहे. मला भेटू शकला असता. तुमचा प्रश्न सांगू शकला असता. हे वागणे आपल्यासारख्या कौन्सेलरना शोभले का?" नंतर सांगितले, "हा कोअर ग्रुप मी या क्षणी विसर्जित करीत आहे. ट्रस्टी या संस्थेचे मुख्य अधिकारी आहेत. चॅरिटी कमिशनरच्या नियमानुसार त्यांचाच इथे अधिकार चालतो, अन्य कोणाचा नाही." पुढे असेही बजावले, "ज्यांना मुक्तांगण-सोडून जायचे त्यांनी आत्ताच जावे. उरलेल्यांनिशी मुक्तांगण चालवायला आम्ही समर्थ आहोत."

बाप रे, काय माझ्यात ताकद आली होती! मीच चकित झालो. सुनंदा गेलेली. हे गेले असते तर मी मुक्तांगण कसे चालवणार होतो? पण ते आतूनच आले. विसंगती कायम ठेवून काम करायचे नाही. विसंगती निपटून काढल्याने जे नुकसान होईल ते होवो, ते भरुन काढता येईल, पण हे विसंगतीचे काटे खपवून घ्यायला नकोत.

सुहासला रजेवर पाठवले. काही दिवसांतच तो परत आला. चुकलो, म्हणाला. पण मधल्या काळात ट्रस्टींनी मला बजावले होते, त्याला परत घ्यायचे नाही. हे झाले तरी नंतर त्याचे संबंध ठीक राहिले. आता तो आवडीच्या क्षेत्रात चांगले काम करतोय. दुसऱ्या व्यसनमुक्ती केंद्रात पार्ट टाइम कामही करतोय.

पण मला राहून राहून आश्चर्य वाटत राहिले, की सुहासचा स्वभावच तसा होता, पण त्याच्या नादी आमच्या इथं बरी झालेली काही मुले, अगदी आमची मुलं कशी काय लागली? की सुनंदा गेल्यावर यांची सद्दी सुरु झाली, म्हणून त्यांनीही व्यावहारिक विचार केला? मग आपण समजतो त्या निष्ठेचे काय? फार काय, सुनंदाने सुहासच्या आयुष्यात एवढे काही केले की कोणी करणार नाही. एका जीवघेण्या संकटातून वाचवलेच. त्याचीही आठवण त्याने ठेवू नये?

येवढे खरे, की या निमित्ताने माझे मलाच दर्शन झाले. एरवीचा पडते घेणारा शामळू स्वभाव, कुणाला न दुखावणारा, पण प्रसंग येताच ही ताकद कुठून आली? ती आत होतीच की काय? मग ती एरवी काय करते?

या उलघालीत आणखी एक व्यथा म्हणजे बरोबरचे काही सहकारी कायमचे सोडून गेले. जगातूनच गेले. पहिले अध्यक्ष व्ही. डी. ऊर्फ व. द. देशपांडे यांचे निधनही मनाला खोल चीर पाडून गेले. व्ही. डी. आम्हा दोघांचे सल्लागार मित्र होते. त्यांना कधी डळमळलेले पाहिले नाही. अगदी त्यांना कॅन्सर झाला तरी. आधी त्यांच्या पत्नीचे निधनही त्यांनी असेच पचवलेले. ग्रामायन, विषमता निर्मूलन अशा अनेक उपक्रमांत त्यांचा महत्त्वाचा वाटा. महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातल्या एखाद्या समस्येचा किंवा उपक्रमाचा वेध घेण्यात सतत गुंतलेले असत. त्या दोन्ही आपत्तींनंतर सुनंदाशी ते खूप बोलत. त्यातनं त्यांची दाट मैत्रीही झाली. शेवटीही ते गेले ते सुनंदा त्यांच्या उशाशी बसलेली असतानाच. व्ही. डी. अध्यक्ष असल्याने आमच्या सभांना एक छान संयत रुप येत असे. एखादा अगदी उघड उघड सोपा निर्णय घ्यायचा असला, तर मी विचारत असे, "मग काय व्ही.डी., करु यात ना तसं?" ते शांत बसत. काही वेळाने म्हणत, "नको, असं नको करायला." नंतर ते त्याची कारणमीमांसा करत, की लख्खकन डोळेच उघडावेत. त्यांनी चहुबाजूंनी विचार केलेला असे. ते वाहून जाणाऱ्यातले नव्हतेच. आपण जाणार हे समजताच त्यांनी त्यांचे मित्र ए. पी. कुलकर्णी यांना इकडे पाठवले. तेही व्ही.डीं.सारखेच विचारी, उत्साही. व्हीडींसारखेच ग्रामीण भागातले संशोधन प्रकल्प, त्यांचे संशोधन, नियोजन करणारे. ते आजतागायत अध्यक्ष आहेत. मधल्या काळात राम शेळके ऊर्फ अप्पा अध्यक्ष होते. अति सज्जन आणि साधा माणूस. त्यांना हृदयाजवळच्या रक्तवाहिनीला फुगा आला होता. ते निदान त्यांनी घरी सांगितले नव्हते. फक्त मला सांगितलेले. रात्री घरी सर्वांबरोबर पत्ते खेळताना गेले. मी हे निदान नंतर सांगताच सगळ्यांना आश्चर्य वाटले. आणि तिसरी सुनंदा. तिच्याविषयी काय बोलायचे? शब्दच नाहीत. तसाच माधव काळे. माझा वर्गमित्र. आणि चित्रा, सुनंदाची वर्गमैत्रीण. आर्थिक अरिष्टातून माधवने कितीदा मार्ग काढलाय. हा इंडस्ट्रीत असतो. अशा अडचणींची त्याला माहिती असणार. पण हे मला माहीत नव्हते. वाटायचं, अरे, आपला माधव हा, किती वेगळाच आहे! आपल्याच मित्राची आपल्याला ओळख नसावी?

पेशंट मित्रांपैकीही किती गेले! पहिल्यांदा आम्ही फॉलोअपला परगावी कुणाला पाठवायचो. पेशंटची यादी देऊन त्यापुढे दोन कॉलम केलेले. व्यसनमुक्त आहे किंवा नाही. नंतर आम्हाला तिसरा कॉलम करावा लागला, हयात आहे की नाही, याचा. कारण व्यसनातून जरी बाहेर आला, तरी मधल्या काळात शरीर अनेक व्याधींनी पोखरलेले. त्याचा परिणाम चालूच असायचा. पण तरीही नातेवाईक म्हणायचे, गेला तेव्हा व्यसनात नव्हता, यात समाधान आहे. एक मराठीचा प्राध्यापक असलेला मित्र आठवतोय. त्याचे अक्षर इतके उत्तम होते, की इतर अॅडमिट मित्र त्याच्याकडून आपली पत्रे लिहून घ्यायचे. त्या वेळेच्या 'मनोगत' या आमच्या हस्तलिखित मासिकात त्याचे अक्षर सापडेलही. पण तो अॅडमिट व्हायला आला तर त्याला स्वतःची सही फॉर्मवर करता आली नाही, इतका त्याचा हात कापत होता. दुसरा कोणी त्याचा हात धरून फॉर्मवर अंगठा उमटवला होता. दोन-चार दिवसांतच त्याचं अक्षर पूर्ववत झालं. तो सगळ्यांशी वागायला इतका चांगला होता, की देवमाणूसच. तो ज्या वेळी घरी जायला निघाला तेव्हा सगळा वॉर्ड गेटपर्यंत त्याला पोचवायला गेला होता. तो मित्र वर्षभराने गेल्याची वार्ता आली. बायको नंतर इकडे आली होती. म्हणाली, "गेलं एक वर्ष इतकं सुखात गेलं, की त्या आधारावर उरलेलं आयुष्य काढीन मी." सगळ्यांचे डोळे पाणावलेच. इतका सज्जन माणूस अशा व्यसनात सापडावाच का? त्याची इतकी वर्षे व्यसनात जावीत, की त्याच्या संसाराची धूळधाण व्हावी? तोच माणूस हा? केवळ सज्जनपणा माणसाचं जीवन नीट रस्त्यावर ठेवू शकत नाही का? की त्याला त्याच्यात अधिक काही असावे लागते? सारेच यक्षप्रश्न.

कोल्हापूरचा गंगाधर आठवतोय. मी तिकडे गेलो की माझ्या दिमतीला तो हजर असायचा. बाबांना अशा जुन्या गाडीने फिरवावं लागतं, म्हणून काही हजार रुपये खर्च करून त्याने ती जुनी फियाट दुरुस्त करून, रंगवून घेतली होती. मी गाडीत बसायचो तो दरवाजा नीट उघडला जायचा

नाही, त्याचे त्याला फार वाईट वाटायचे. माझ्याबरोबर सर्वच कामांत असायचा. चप्पल घ्यायची असो, मुलींसाठी साज घ्यायचा असो, की उचगावला नसीमा हुरजुकांकडे जायचं असो- तो ती जुनी फियाट घेऊन तयार. कोल्हापूरला आमच्या मीटिंग्ज व्हायच्या, त्याचा तो जसा प्राण असायचा. कुणी मित्र चांगल्या अवस्थेत नसला की माझी भेट घडवून आणायचा. व्यसन सुटल्यावर त्याने त्याचा इन्शुरन्सचा व्यवसायही खूप वाढवला. असं काही सांगून म्हणायचा, "ही सगळी मुक्तांगणची कृपा." मधल्या काळात त्याची मुलं शिकली. तो आणि कुंदा आजवर न जगलेलं छान निवृत्त आयुष्य जगणार होता. तोच त्याला किडनीच्या कॅन्सरचं निदान झालं. खूप मोठ्या आकाराचा तो ट्यूमर मिरजेच्या हॉस्पिटलात काढला गेला. आम्ही हे सगळे ऐकून हबकलोच.

पण भेटायला गेलो तर तो केवढा प्रफुल्लित होता! म्हणाला, "बाबा, तुमची, मॅडमची, मुक्तांगणची आठवण काढतो." त्याची बायको कुंदा रडत होती. तिला तो समजावत होता. मुक्तांगणमध्ये शिकलेले 'तरी बरं' आणि 'फार तर काय होईल' हे मंत्र वापरत होता. 'तरी बरं, किडनीचा कॅन्सर झालाय. एक गेली तर दुसरी स्पेअर आहेच. लिव्हर किंवा मेंदूसारखा एकच अवयव असलेल्याला झाला असता तर?' किंवा पुढचं ऐका. 'तरी बरं, सोबरायटीमध्ये (व्यसनमुक्तीच्या काळात) झाला. नाही तर त्या वेळी गटारात पडून मेलो असतो तर? आता मरेन तर मानाने मरेन.' असेही म्हणाला, "चला, ही सोब्रायटीची सात वर्षे मिळाली हे काय कमी आहे? हे दिवस दिसतील कुणाला वाटलं होतं? आणि आता सगळे मुक्तांगणचे मित्र तुझ्या पाठीशी आहेत."

बाप रे! मान खाली घालणारा, नम्रतेचा परिपाक असलेला गंगाधर हे बोलतोय? ही ताकद कुठून आली? मुक्तांगण त्यानं किती आत्मसात केलंय! सुनंदाचा तो खरा पुत्र.

खूप हसतमुख होता, आणि तसाच गेला तो. त्याच्या आयुष्यात जे जे मिळवलं ते त्याच्या मरणात व्यक्त झालं. लोक त्याला 'बाबांचा हनुमान भक्त' म्हणून चिडवायचे. मित्रा, कोण कुणाचा भक्त? तुझ्याकडनंच खूप शिकायचा प्रयत्न करतोय.

पटकन आठवल्या, सुनीता काळे. कोल्हापूरच्याच. आमच्याच तिथल्या परिवारातल्या. त्यांचे यजमान पूर्वी व्यसनाधीन होते. पण ए. ए.च्या मार्गाने ते व्यसनमुक्त असलेले. खरं तर त्यांना या मार्गाची काही गरजच उरलेली नव्हती. आमच्या कोल्हापूरच्या मीटिंगला यायच्या. त्या ग्रुपमधली आपापसातली भांडणं मिटवायच्या. कुणी पीत असला, खूप त्रास देत असला तर स्वतःच्या घरी राहायला घेऊन जायच्या. त्याचं सगळं सांभाळायच्या, करायच्या. दारुड्याला सांभाळणं सोपं का असतं? पण त्यांच्या मायेने तो पोरगा शांतही व्हायचा. नंतर पुण्याला मुक्तांगणला पाठवायची तजवीज करायच्या. कुणी व्यसनमुक्तीचं वर्ष पुरं केलं की त्याला घेऊन पुण्याला यायच्या. शेवटच्या शनिवारच्या कार्यक्रमात हजर असायच्या. हे सगळं अगदी मागे राहून. मी त्यांच्या घरी जेवायला यावं अशी त्यांची फार इच्छा होती. "पण म्हणायचं कसं? बाबा आधीच एवढे बीझी!" असं कुणापाशी म्हणाल्या. ते कळल्यावर मी स्वतः होऊन जेवायला गेलो, तर कोण आनंद! पुढे कॅन्सर. तरीही शेवटपर्यंत हे काम करीत राहणं, काही न मागता जाणं... अगदी सुनंदा, गंगाधर यांच्या मालिकेतलं सगळं. काय हे मरण!... जावं तर असं!

असेच काही पेशंट मित्रांचे जाणे लागून राहिलेय. ही मरणं टाळता आली असती. ते हकनाक गेले. मुंबईचा डॉक्टर ॲडमिट होता. तो फिजिशियन. त्याची बायको गायनॅकोलॉजिस्ट. दोघांकडेही डबल डिग्र्या. दोघेही मुंबईला स्वतंत्र प्रॅक्टिस करणारे. तो बरा झाला. चांगला राहिला. दोघंही दर महिन्याच्या सहजीवन सभेला मुंबईहून यायचे. छान भाग घ्यायचे. दोघंही हसतमुख. असे करता करता पुढे पुढे ते येईनासे झाले. आम्हाला हे नेहमीचं होतं. पेशंट बरे झाल्यावर ते अशा मीटिंग्जना नियमित येतात. पुढं पुढं त्यांच्या कामात बुडतात. मग येणं-जाणं कमी होतं. तेच अपेक्षित असतं. आणि वर्षानंतर एकदम बातमी आली की तो डॉक्टर मित्र गेला! बाप रे! असा कसा गेला? किती

सुदृढ शरीराचा! त्याची व्यसनमुक्तीही चांगली चाललेली. कुठलेही शारीरिक आजार नसलेली. मग काही दिवसांनी धीर एकवटून तिला फोन केला. ती सावरलेली होती. शांत होती. तिनं सांगितलं ते असं : त्याला गुटखा खायचं व्यसन होतं, पण हिला ते माहीतच नव्हतं. दोघं सकाळी आपापल्या प्रॅक्टिसला जायचे ते थेट रात्रीच भेटायचे. सुटीच्या दिवशी तिला याच्या गालाला काळं लागलेलं दिसलं. "बघू रे हे काय लागलंय," म्हणून पुसायला गेली तरी पुसलं गेलं नाही. मग तिनं याला 'आ' करायला सांगितलं, तर हे सगळं दिसलंच. ताबडतोब ॲडमिट केलं. त्याचं ऑपरेशन झालं.आणि काही दिवसांत तो गेलाही.

मला ह्या मिरवणाऱ्या गुटखा उत्पादकांविषयी संताप येतो. काय त्यांचे ऐश्वर्य, केवढे बंगले, केवढ्या गाड्या! पण कितीजणांचे बळी गेले असतील, आणि अजून जाणार आहेत? मला पानाच्या दुकानांच्या बाहेर गुटख्याच्या माळा लावलेल्या दिसल्या की त्या मृत्यूच्या मुंडावळ्या वाटतात. त्याच्या डॉक्टर पत्नीने उर्वरित आयुष्य कसं घालवावं, हे ते गुटखा उत्पादक सांगतील काय? टाटा कॅन्सरमध्ये म्हणे एक वेगळाच गुटखा वॉर्ड केलाय. काय ही स्थिती!

तसाच दुसरा आमचा दिलीप पोरवाल. मारवाडी समाजातला. त्याला आम्ही अकाउंटंट केले होते. लोक म्हणायचे, "या पेशंटकडे तुम्ही लाखो रुपयांचे व्यवहार सोपवता?" पण आमच्या विश्वासाला त्याने कधी तडा दिला नाही. बाहेर स्मोकिंग करायचा. गिळायला त्रास होऊ लागला. मी आमच्या कॅन्सरतज्ज्ञ डॉक्टर अनुराधा सोवनीकडे नेलं. नुस्तं बघूनच कळत होतं, घशाचा, गळ्याचा कॅन्सर आहे. आणि हेही उघड होतं की तो सिगारेटमुळे झालेला आहे. त्या रात्री कल्पनाचा रडत फोन आला, "बाबा, तो अजून सिगारेट पितोय." मी त्याला विचारले, तर म्हणाला, "बाबा, आज खूप टेन्शन आलंय. आज घेऊ द्या. उद्या ॲडमिट व्हायचंय, तेव्हा ती आपोआप बंद होणारच आहे." मी त्या सिगारेट, तंबाखूमधल्या निकोटिन या द्रव्याला सलाम केला. साक्षात मृत्यू समोर आला तरी त्याची पकड सुटू नये? त्या पकडीपुढे बायको, दोन मुली, आम्ही...हे सगळे दुय्यम? 'संजीवन'मध्ये ऑपरेशन. अन्ननलिका कापून जठर वर ओढून शिवले. नंतर घरी आला. रेडिएशन सुरु झालेली. 'इनलॅक्स'मध्ये रेडिएशन घेऊन मुक्तांगणमध्ये कामालाही येऊ लागला. आणि एका स्टाफ मित्राने येऊन सांगितले, की तो इनलॅक्स ते मुक्तांगण या रस्त्यात एके ठिकाणी स्कूटर थांबवतो आणि सिगारेट ओढतो. त्याने स्वतः पाहिलेलं. परत एकदा निकोटिनला सलाम. निपाणी परिसरात तंबाखूची शेती पाहिलेली. त्याला कुंपण नसते. का? तर जरुरीच नाही. गुरं त्या तंबाखूच्या रोपाला तोंडही लावत नाही. जे गुरांना कळतं ते माणसांना का कळू नये? आणि येवढी शरीराची धूळधाण होऊन आमच्या दिलीपला ते कळू नये? प्रत्येक सर्जरीला मी असायचो. हात हातात घ्यायचो. असहायपणे तो माझ्याकडे पाहायचा. शेवटी गळा-घसा एकच होऊन गेलं. जे अन्न खावे ते छातीत जाऊ लागले. तिथं प्ल्यूरसी झाली, वगैरे वगैरे... एके दिवशी सासऱ्यांचा फोन आला. गाडी भरधाव सोडली आणि पोहोचलो. खोलीतल्या सगळ्यांना बाहेर काढून डॉक्टरांनी मला सांगितलं, की 'तो गेलेलाच आहे. आम्ही व्हेंटिलेटर चालू ठेवला. कारण त्याच्या नातेवाइकांना हे सांगायचं धाडस होईना.' मग त्याच्या सगळ्या नव्या उतरवल्या. बाहेर जाऊन सगळ्यांना हे सांगायचं काम मलाच करावं लागलं. खरं तर मरणाच्या बाबतीत मी घट्ट नाही. आजारी माणसालाही भेटायला जाताना पाय जड होतात. आणि काय हा प्रसंग!

खूप काळ कल्पना (त्याची बायको) आली की रडत बसायची. मग मी तिला जरा रागावलोच. म्हणालो, "तू अशी रडत बसलीस तर मुलींचं काय होणार?" मग ती जाग्यावर आली. तिचं ब्यूटी पार्लर, मेंदी रंगवणं, इ. उद्योग चांगले चाललेत. एका मुलीचं लग्नही झालं. दुसरीही शिकून चांगली नोकरी करतेय. हे दिलीप गेल्यावर आठ-दहा वर्षांत घडलेलं.

सुरुवातीच्या काळात बिडी-तंबाखू मुक्तांगणमध्ये चालत असे. इतर बहुतेक केंद्रांमध्ये तसेच

असते. कारण तो पेशंट दारु सोडायला आलाय, बिडी-सिगारेट नव्हे. सगळी व्यसने एकदम थांबवू नका, नाही तर त्याचा उलटा जोराचा स्फोट होईल. असा त्यामागचा तर्क. पण हे सगळे मृत्यू आम्हाला वेगळंच शिकवीत होते. सुनंदाच्या काळात तिनं तंबाखूबंदीचा प्रयोग केला, पण तो फसला. स्टाफनेच विरोध केला. मग मुक्ताच्या काळात तिने तो प्रयोग परत सुरु केला. परत सल्ले मिळाले, की यामुळे मुक्तांगणकडे येणाऱ्या पेशंटची संख्या कमी होईल. लोक चोरुन पुड्याबिड्या आणतीलच, वगैरे. पण आम्ही ठाम होतो. 'संख्या कमी झाली तरी चालेल, पण ही विसंगती आहे. चालवून घेणार नाही. मॅडमची राहून गेलेली अपुरी इच्छा आपण पुरी करु यात.' मॅडमचं नाव काढल्यावर विरोध मावळला आणि निकोटिनविरहित- निको-फ्री वातावरण तयार झाले. तरीही अधूनमधून पुड्या-बिड्या सापडू लागल्या. तर कळले, की त्यांचे नातेवाईक, विशेषतः महिला, गुरुवारी भेटायला डबे घेऊन येतात, त्यात त्या लपवून आणतात. पेशंटनी तसं करण्याचा दबाव आणलेला असतो. मग त्याचंही चेकिंग. आणि आता आम्ही जवळपास निको-फ्री झालो आहोत. याचे श्रेय कौशल्याने, कुणाला न दुखावता झडती घेणाऱ्या आमच्या संजय बाबर, अंकुश दरवेशला. आता त्याचे परिणाम लगेच जाणवतात. "आता दारु सोडून वर्ष पुरं झालं. पुढच्या वर्षीचा निश्चय म्हणजे सिगारेट, तंबाखू सोडणार. जर मी सोडू शकलो तरच बाबांच्या हातनं मेडल घेण्याचा मला अधिकार राहील." आणि अनेकजण, ज्यांनी हे दोन्ही सोडले, त्यांचा आम्ही विशेष उल्लेख करतो आणि त्यांना मानाचं फूल देतो. कधी कधी त्याबरोबरच बायकांनी मिश्री लावायचं सोडलं म्हणून त्यांनाही हे मानाचं विशेष फूल देतो.

त्या वेळी दारात दूर उभ्या असलेल्या निकोटिनला मी मनातल्या मनात टाटा करतो.

अशा दुःसह प्रसंगांना जसे सामोरे जावे लागते, त्याची भरपाईही होत असते. होतेच असे नाही. पण जर आपली वृत्ती समाधानी ठेवली तर दुःसहाचे उलट असे सुसह्य क्षणही भेटतात. फक्त त्यांना आनंदाने स्वीकारता आलं पाहिजे. ज्यांनी त्रास दिला त्यांना त्रास झाला पाहिजे, असे म्हटले तर वेगळ्याच रस्त्याला आपण जातो. एक छोटी आठवण सांगतो. कुणाला ती क्षुल्लक वाटेल. पण आठवली खरी. मी गाडी चालवत होतो. आमचा पेशंट मित्र तुषार मागे बसला होता. त्याचे आडनाव संपत. ज्याचा उत्साह कधी संपत नाही तो, असे मी त्याला चिडवतो. तुषार त्या वेळी माझा मदतनीसही होता. मुक्तांगणमधला एक छान कार्यक्रम संपवून आम्ही घरी चाललो होतो. आणि बाँबे सॅपर्स भागातल्या रस्त्यावर प्रचंड जाम झालेला. गाड्या ठप्प उभ्या. पुढच्या वीतभर हलल्या की मागच्या बोटभर पुढं सरकणार. या सगळ्यात माझी गाडी पुढच्या रिक्षाच्या बंपरला टेकली. झाले. तो रिक्षावाला उतरुन भांडायलाच आला. मी हात जोडून म्हटलं, "ट्रॅफिकमध्ये असं होतंच. सोडून द्या. तुमचं नुकसान झालं असलं तर माफ करा. पुढे जाऊन गॅरेज बघू." तो आणखी काही बोलणार, तोच मागून तुषार जोरात म्हणाला, "तू कुणाशी बोलतो आहेस? काहीएक नुकसान झालं नाही तुझं." मी तुषारला गप्प केले. पण रिक्षावाल्याला हातात कोलीतच मिळालं. गाडीच्या या बाजूने बाह्या सावरत येऊन "कोण रे तू? खाली ये...(एक-दोन शिव्या)..." असे म्हणताच मी परत हात जोडले. म्हणालो, "त्या माझ्या मुलाच्या वतीनं मी क्षमा मागतो, पण जाऊ द्या आता." त्याबरोबर तो म्हणाला, "तुम्ही कसं चांगलं बोलताय, आणि हा कसा..." (परत अपशब्द). परत हात जोडले. आणि तो रिक्षात जाऊन बसला.

तुषार मागे धुमसत होता. जाम पार केल्यावर गाडीने वेग पकडला, तसा म्हणाला, "बाबा, तू का माफी मागितलीस? तुझी लायकी काय आणि त्याची लायकी काय? आणि तो काय इश्यू तरी होता का त्याला भांडायला?"

मी म्हटलं, "ट्रॅफिकमधलं भांडणं पटकन विझवून टाकलेलं बरं असतं. त्याचा इतर

वाहनवाल्यांनाही त्रास होतोच ना. आपण कशासाठी जन्माला आलेलो आहोत? ट्रॅफिकमध्ये शिस्त आणणं हे आपलं काम आहे की मुक्तांगणचं काम? जर ट्रॅफिकला शिस्त लावायची असेल तर त्याच्यासाठी सगळा वेळ दिला पाहिजे. बोल, कशासाठी आपण आहोत?"

तुषार हसला. नंतरही तो इतरांना सांगत सुटला. शेवटी म्हणायचा, "आपला बाबा म्हणजे सँपल आहे!"

नंतर आम्ही मुक्तांगणच्या नुकत्याच झालेल्या कार्यक्रमाविषयी बोललो. कोण किती छान बोललं, कित्येक वेळा ते जाता जाता, सहजपणे किती शिकवून जात होते...असे बरेच. ट्रॅफिकमधल्या त्या भांडणाची चव आता दोघेही विसरून गेलेलो.

मुक्तांगणमध्ये जे मित्र परत नशेकडे वळतात, त्यातल्या बऱ्याचजणांचे राग हे मोठेच कारण असते. राग आवरणे, ही युक्ती जसे विसरूनच गेलेले. बऱ्याचजणांची बाजू खरीही असते. पण भांडण पेटले की पर्यावसान म्हणजे परत व्यसन. मग आम्ही या मित्रांना सांगतो, आपलं हे माघार पर्व आहे. आपली बाजू खरी असली तरी माघार घ्यायची. जसे उपास करणारे अमुक खायचे नाही, असे व्रत करतात, तसे आपले हे व्रत. भांडणात विजयी झालात आणि व्यसनमुक्तीची लढाई हरलात, तर कसे होईल? कशाचा जास्त तोटा आहे? मी माझ्या जीवनातलीही उदाहरणे देतो. सुनंदाच्या-माझ्या सहजीवनातली. एकेका रात्री मी शेकडो वेळा माफी मागितली असेल. दुसऱ्या दिवशी सगळं शांत झाल्यावर फिरायला जायचो. तिथं ती म्हणायची, "खरं तर परवा तुझं बरोबर होतं. मी उगीचच..." मी तिला थांबवत म्हणायचो, "जाऊ दे गं. होतं कधी कधी. त्यात काय एवढं?" की ती छान हसायची. की जे मिळायचं ते शब्दांत कसं सांगू? आणि मी तेव्हा भांडत बसलो असतो तर? हा जवळिकीचा क्षण मिळाला असता का मला? आणि अशी पुढे होऊ घातलेली भांडणे जिरली असती का जागीच?

एक मित्र पुण्यातल्या फॅक्टरीमध्ये कामगार होता. तो परत परत रिलॅप्स होत होता. थांबा, रिलॅप्स म्हणजे काय आणि स्लिप म्हणजे काय ते सांगायला हवं. एखाद्या वेळी दारू घेतली. नंतर भानावर आला. परत दारू घेतली नाही. याला स्लिप म्हणायचे. पाऊल घसरले, पण तोल सावरला. पण रिलॅप्स म्हणजे एकदा घेतली आणि घेतच राहिला, की पिण्याचे परत तसेच चक्र सुरु झाले. हा रिलॅप्स. स्लिप झाल्यावर पेशंट मित्र आपण होऊन येतात. सांगतात. त्यांच्या कॉन्सेलरशी बोलतात. कुणी दोन दिवस, आठवडा राहतातही आणि परत जातात. पण रिलॅप्सवाल्यांना परत ॲडमिट करावे लागते. पाच आठवड्यांचे उपचार घ्यावे लागतात, वगैरे. तर तो कामगार. परत परत रिलॅप्स व्हायचा. मग कारण कळले, की कामावर गेल्यावर कामगार चिडवायचे. "हे बघा...साहेब दारू सोडणार म्हणे...कुठून आलेत माहीताहे? मेंटलमधून. (तेव्हा मुक्तांगण तिथं होतं.) आता सांगताहेत शहाणपण! पण कितीजणांना टोप्या घातल्यात, माहीत आहे?"

मग तो चिडायचा. तुंबळ भांडण, की नंतर तुंबळ पिणेही. त्याला आम्ही सगळ्यांनी सुचवले, "तू हात जोडून त्यांना म्हण, की बरोबर आहे तुमचं. मी अनेकांना टोप्या घातल्यात. तुम्हाला माहीत नाहीत, त्याही सांगतो हवं तर. पण आता मी सुधारतोय. आणि तुमच्यासारख्या मित्रांची मला गरज आहे." त्या वेळेस परत गेला आणि नंतर कधी तरी आला हसत हसतच. म्हणाला, "तुम्ही सांगितलेलं म्हटलं, तेव्हा त्यांना जसा हजार व्होल्टचा झटकाच बसला. सगळे माझ्याभोवती जमले. मला धीर दिला. मुक्तांगणची चौकशी केली. आमच्या युनियन लीडरने मीटिंगमध्ये माझं शेअरिंग (अनुभवकथन) ठेवलं. आता सगळ्यांनी ठरवलंय, फॅक्टरीत आणखी चार लोक आहेत त्यांना मुक्तांगणमध्ये आणायचंय." जरा लाजत म्हणाला, "सध्या त्यांचं कौन्सेलिंग करतोय." वाः वाः मित्रा, कुठून कुठे पोहोचलास! नुसती दिशा बदलल्याने एवढं होऊ शकतं? अवघड वाटणारं तरी

किती सोपं.

आमचे हे मित्र व्यसनाच्या काळात जेवताना ताटं भिरकावून देतात. मारहाण वगैरेही अधूनमधून असतेच. या सगळ्या मुळाशी तो राग बसलेला असतो, तेच बऱ्याचजणांचं दुखणं असतं. त्याचंच काय, आपल्या सर्वांचंच. आणि रागाच्या तळाशी काय असतं, तर अहंकार. 'मी म्हणतो ते बरोबर, तसंच झालं पाहिजे.' किंवा 'हे होणार हे माहीतच होतं. मी सांगत होतो, ते ऐकलं नाही त्या वेळी.' अशा वेळी आम्ही त्याची जरा फोड करून चर्चा करतो. 'ज्याला दुनियेतल्या सगळ्या गोष्टी माहीत आहेत असा कोणी माणूस आहे का? (मला अतिशय आदर वाटतो ते) डॉ. अब्दुल कलाम पुरणपोळ्या करू शकतात?' खूप हसतात सगळे. माझ्या कवितेतलं एक कडवं सांगतो.

'आहे माहित त्याला सगळे
संपुन गेले कधीच शिकणे
पळा पळा सर्वज्ञ येतसे
चालत आहे मेला तरिही.'

कुतूहल नसलेला माणूस जिवंत काय, मेलेला काय, सारखंच. मला सगळे माहीत असणे शक्य नाही, ही बेसलाइन आखली की समजून घ्यायचे रस्ते खुले होतात. कुतूहल असेल तर ज्ञानाचे झरे वाहू लागतात.

पेशंटच्या बायका त्यांना विचारतात, "एवढे तुम्ही शहाणे, तर मग व्यसनात कसे फसलात? मग त्या वेळी आम्ही थांबायला सांगत होतो, तर का नाही ऐकलंत?" यावर आता आमचे मित्र रागावत नाहीत, तर हसतात. म्हणतात, "बाबा, तुमच्यामुळं आमच्या बायका फार बोलायला लागल्यात."

सुनंदाचा एक पेशंट आठवतो. तो खूप शिकलेला. फर्डे इंग्लिश बोलणारा. दोन-चार दिवसांत त्याने दोन-तीन कागद टाइप करून सुनंदापुढे ठेवले. म्हणाला, "मी गेल्या काही दिवसांत मुक्तांगणचा अभ्यास केला. त्यात ज्या सुधारणा व्हाव्यात असे वाटते त्या लिहिल्या आहेत." सुनंदाने ते कागद बाजूला ठेवले. त्यावर नाराज होऊन म्हणाला, "तुम्हाला वाचावेसे नाही वाटले? "

ती म्हणाली, "मुक्तांगण सुधारायचं नंतर बघू. तू कसा सुधारशील ते आधी बघू."

म्हणजे हा उच्चशिक्षित माणूस त्याच्या शैक्षणिक अहंकारामुळे कशाला अग्रक्रम द्यायचा तेच विसरला. मग ज्ञानाचा काय उपयोग? आपल्या अनेकांच्या वर्गातले जे टॉपर असतात, त्यांना कोलमडायला एक धक्का पुरतो. कारण तोवर पराभव अनुभवलेलाच नसतो, आणि दरवर्षी मिळणाऱ्या मार्कांनी तो अहंकार अधिकाधिक घट्ट होत जातो. आणि मग जीवन योग्य रस्त्याने नेण्याची कला ते शिकतच नाहीत. त्यापेक्षा आम्ही शिक्षक-वडलांचे रट्टे खाल्लेले लोक बरे. जगातले भलेबुरे बऱ्यापैकी कळते. कारण वास्तवाच्या धगीमध्ये ही मडकी चांगली पक्की झालेली.

जे. कृष्णमूर्तींचे एक वाक्य वाचले होते. 'प्रेम आणि अहंकार हे एकत्र नांदू शकत नाहीत.' मी या वाक्याने चक्रावलोच. किती खरे आहे ते! अहंकार विसर्जित केल्याशिवाय खऱ्या प्रेमाचा अनुभव आपल्याला मिळू शकतो का? लहान मुलांशी खेळताना आपलं मोठेपण बाजूला ठेवलं तरच आपल्याला, त्यांच्याशी, त्यांना हवं तसलं खेळता येतं. सुनंदा आपली सायकियाट्री बाजूला काढून ठेवायची तेव्हाच ती पेशंट मित्रांशी एकरूप होऊन त्यांचे जीवन समजू शकायची. सगळ्यात आम्हाला वाटेत आडवा येणारा अहंकार म्हणजे नवरेपणाचा. परंपरेने त्यांना हे एक सत्तास्थान दिलेले असते. असलेली सत्ता कोण सोडणार? केवढे त्याचे फायदे! आपण ओरडलं की घर चिडीचूप. 'आवाज नाय पायजे', 'वर तोंड करून बोलू नको', 'थोबाड फोडीन तुझं'... आणि ह्या नुसत्या धमक्या नसतात. आमच्या मित्राची बायको दुसऱ्यांच्या घरी घरकाम करून कसेबसे घर चालवायची. कुणाच्या घरी गेल्यावर रात्रीतल्या मारहाणीमुळे सुजलेला जबडा, चेहऱ्यावरचे वळ, जखमा...हे काय काय

पदराखाली लपवायची. पंधरा मिनिटं उशीर झाला तर आपल्याला चालत नाही. (आणि आपलेही बरोबरच आहे) पण ती बाई कुठल्या परिस्थितीतून आलीय, हे विचारायचे राहूनच जाते. बायकोला नवरा गुरासारखे मारत असला तरी बाजूचे लोक मधे पडत नाहीत. गुरांना असे मारले तर 'ॲनिमल क्रुएल्टी'खाली खटला होऊ शकतो. पण इथं? कायदे, समाज हात बांधून बघे बनतात. सुशिक्षित, अतिसुशिक्षितांमध्येही वेगळे चित्र नाही. सुरुवातीला सभ्य भाषेत घडते आणि शेवटी तिकडेच वाहत जाते.

हे प्रत्येकाचेच होते असे नाही. बायका सांगतात, "तसा तो देवमाणूस आहे. पितो आणि पडतो. त्याचा त्रास नाही." पण ते वाढत थेट मृत्यूच्या जवळपास पोहोचल्यावर, मग सगळी धावाधाव. पिणारे रात्री जे करतात, ते त्यांना सकाळी आठवतही नसते. काय म्हणावे? एकाची बायको सांगत होती, "रातभर धिंगाणा, आन् सकाळी माफ्या मागतू. मंग मी म्हनते, कशाला नाटकं करतू रे?"

आम्ही त्यांना सांगतो, "ते सकाळचे माफी मागणे खरेच असते. त्या वेळेचा उपयोग करून घेऊ. त्याला सांगावंस, की तुला खरंच वाईट वाटतंय ना, मग चल, मुक्तांगणला जाऊ. नुसतं भेटून तर येऊ, असं."

मी पोवाड्यात लिहिलं होतं,

'उघडू शकतो बूच बाटलिचे
परंतु लावू शकत नसे
नशेत असता काय करितसे
नंतर त्याची स्मृती नसे'.

त्यांना खरोखरच आठवत नसते. लोकांना हा ढोंग करतोय असे वाटते. तो बाटलीचे बूच उघडू शकतो, पण कधी थांबावे हे त्याला कळत नाही. कळले तरी थांबू शकत नाही. हाच त्याचा आजार. एक मित्र सांगत होता, "बाबा, त्या काळात सकाळी उठलो आणि समोर बायको दिसली, की बघायचो, डोक्याला पट्टी नाही बांधलेली. म्हणजे चला, रात्री हिला जास्त मारहाण नाही केली. मग टी.व्ही.कडे बघायचो. चला, काल टी.व्ही. नाही फोडला. रस्त्याने जाताना समोरून गल्लीतला माणूस येताना दिसला, की मनात यायचं, रात्री याला आपण शिव्या नाही ना दिल्या? चला, रस्ता बदलावा हे बरं." त्यांची सकाळ अशा अजाण, अज्ञात भीतीने व्यापलेली. ही मारझोड करणाऱ्या, जेवणाचे ताट भिरकावणाऱ्या मित्रांची दुसरी बाजू तितकीच अविश्वसनीय वाटावी अशी.

व्यसनाच्या काळात काहींनी खूप कर्जे करून ठेवलेली. त्यामुळे घेणेकरी भेटेल, हीसुद्धा त्यांना भीती असते. लांबून दिसला तरी रस्ता बदलून तो प्रसंग टाळायचा. अशी टाळाटाळी म्हणजे परत व्यसनाला आमंत्रणच. कुठल्याही तऱ्हेचं टेन्शन म्हणजे व्यसनाकडे जाणारी वाटच जशी. अशाच एका मित्राच्या बाबतीत सुनंदाने असं केलं. त्याला त्याने घेतलेल्या कर्जांची यादी करायला लावली. रक्कम किती मोठी असो की छोटी, ते लिहायचं. तशी त्यानं यादी केली. ती खूपच मोठी झाली. हा कसं फेडणार? आणि आता तर नोकरी गेलेली. पण सुनंदाने सांगितले, की इथून घरी गेलास की सगळ्यांना भेटायचे. अगदी स्वतःहून. त्याच्या घरी जाऊन सांगायचे, की 'मी तुमचे इतके रुपये देणे लागतो. आज मला नोकरी नाही. प्रयत्न चालू आहेत. नोकरी मिळाल्यावर पहिल्या पगारापासून मी तुमचे पैसे परत करणार आहे.'

तो मित्र तिच्याकडे डोळे विस्फारून पाहतच राहिला. "कसे भेटणार? आणि एवढे पैसे परत कसे करणार?" पण सुनंदाचं त्यानं ऐकलं. नंतरच्या वेळी सांगत आला, "त्यातल्या काहींनी सांगितले, तू बरा झालास ना? असाच राहा. आमचे पैसे मिळाले समज. म्हणून ते माफ करून टाकले." समाजात शिल्लक असलेला हा चांगुलपणा पाहून मन गलबललेच. लोकांना हा पैसे परत करत नाही, यापेक्षा

त्यांना टाळतोय, ही गोष्ट जास्त लागून राहते. आज आपल्या हातात पैसे परत करणे नाही, तर निदान भेटू यात. ते तर आपल्या हातात आहे. सुनंदाच्या एकेक उदाहरणावरुन मुक्तांगणमध्ये एकेक पद्धती पडत गेल्या. “कर्ज खूप आहे? यादी कर.”, “भांडणं होतात? भांडणं लिहून काढ.” असे बरेच काही.

काहींना जवळ येणाऱ्या कोर्टाच्या तारखा, हे व्यसनाकडे जाण्याचे मोठेच कारण असते. व्यसनाच्या काळात छोटे-मोठे गुन्हे झालेले असतात. कधी काळी होऊन गेलेले छोटे गुन्हे. आमचा नाशिकचा पेशंट मित्र. घरातले भांडे चोरुन विकले. भाऊ पोलिसात गेला, तक्रार केली. ती केस मधूनमधून उभी राहायची. पुढची तारीख पडायची. भावाचं याचं भांडण, म्हणून हे सगळं. त्यासाठी आधी या मित्राला काही दिवस लॉकअपमध्येही टाकलेले. आता तारीख आली की पुण्याहून बसने नाशिकला जायचे आणि यायचे. किती खर्च! या सगळ्यात तशी किती भांडी आली असती! शिवाय त्या तारखेमुळे परत व्यसनात जाण्याचा धोका. शेवटी मी नाशिकला फॉलोअपसाठी गेलो असताना त्याच्या बरोबर कोर्टात गेलो. एक बाई जज्ज होत्या. त्यांच्या खोलीत जाऊन ही केस सांगितली. त्या खूपच अस्वस्थ झाल्या. संतप्तही झाल्या. मी म्हणालो, “तुम्ही काहीही निकाल द्या, पण लवकर द्या.” त्यांनी तसा दिला, आणि तो सुटलाच. संपलेच ते तारखेचे चक्र.

काही सरकारी नोकरीतले मित्र... खूप उचल, कर्जे घेऊन ठेवलेली. त्याचे हप्ते कापून कापून पगार खूप कमी हाती येतो. त्यात व्यसन चालू असले तर घर म्हणजे उद्ध्वस्त धर्मशाळाच. पण व्यसनातून बाहेर असला, तरी या तुटपुंज्या पगारात कसे भागवायचे ही समस्या. एक एस.टी.चा ड्रायव्हर मित्र आठवतोय. त्याची दापोलीत नोकरी. कधी कधी पुण्याकडची बस मुद्दाम मागून घ्यायचा. दुपारी मुक्तांगणला यायचा. कौन्सेलरला भेटला की त्याचा फॉलोअपही व्हायचा. मला भेटला. हातात एक दीड-दोन फूट लांब आणि दोन इंच रुंद अशी कागदाची पट्टी दाखवली. ही एस.टी.ची पगाराची स्लिप. व्यसनमुक्त झाल्यावर आधीची कर्जे फेडली आणि आता पूर्ण पगार हाती पडतो, असे तो सांगत होता. काही अशा जुन्या पट्ट्याही दाखवल्या. जेमतेम चतकोर पगार त्याच्या हाती त्या वेळी पडायचा.

काहीजण कर्ज परत करुन आर्थिक प्रगती करायचे. कुणी स्कूटर तर कुणी बाइक घ्यायचे. अशोक वैद्यने त्याच्या स्कूटरवर मुक्तांगण असे रंगवून घेतले होते. एरवी अशी वाहने, वस्तू यांचे मला फारसे अगत्य नाही. पण या मुलांच्या दृष्टीने तो एक टप्पा असतो. त्याचे कौतुक आम्ही करणार नाही तर कोण? जगाला काय माहीत की हा कुठून कुठवर आला आहे? आमची एक घरकाम करणारी मुलगी सुवर्णा (तिचा नवरा मुक्तांगणमधनं बरा झालेला.) सगळ्यांना कानातले आणि गळ्यातले दाखवत होती. ते साधे, अगदी कमी किमतीचे होते. पण नवऱ्याने आणले याचं कोण कौतुक! आणि दुसऱ्या सहचऱ्याही ते बघून, हात लावून कौतुक करीत होत्या. आपण होऊन आणलेल्या त्या सरीची सर दुसऱ्या कशाला येणार?

ही त्या मित्रांच्या नव्या जीवनाची सुरुवातच असते. आधीचा सगळा इतिहास. एक मित्र आहे. तो उच्चशिक्षित, आणि कंपनीत मोठ्या पदावर होता. व्यसनात सर्वच गमावले. नोकरी, घर, नातेवाईक, आणि बायकोही. आमच्याकडे जेव्हा बरा झाला, तेव्हा कुठं जायचं हा प्रश्न होता. त्याची एक खोली होती. पण सगळे नातेवाईक एकाच घरात राहत असल्याने ती कुणी तरी वापरत होतं. सुनंदाने त्या नातेवाइकांना समजावले आणि खोली परत मिळाली. पुढे काय? डिग्र्या असून उपयोग काय? पत गेलेली. सुनंदा म्हणाली, “काहीही काम करण्याची तयारी आहे का?” तो ‘हो’ म्हणाला. मग दोनशे रुपये पगारावर लक्ष्मी रोडलगतच्या कुठल्या रस्त्यावर एका छोट्या आइस्क्रीमच्या दुकानात तो काम करु लागला. आम्ही एकदा त्या भागात गेलो होतो. त्याच्या दुकानात डोकावलो. एरवी या कामाला पोरं असतात, तिथं हा मध्यमवयीन उच्चशिक्षित माणूस काम करत होता. त्याने मालकांची ओळख करुन दिली. त्यांनी आम्हाला आग्रहाने आइस्क्रीम खायला लावले. तो इतका प्रामाणिक की

मालकांनी त्याच्यावर दुकानच सोपवले. पुढे मुंबईच्या एका ए. ए. मित्राने याला विचारले, त्याच्या ट्रॅव्हल कंपनीचं पुण्याला ऑफिस होतंय. येतोस का? आता याला पूर्णवेळ नोकरी मिळाली. त्याच्या वागणुकीने तो तिथला मॅनेजर झाला. आता त्याची स्वतःची ट्रॅव्हल एजन्सी आहे. त्याचे आता लग्नही झाले आहे. या सगळ्यात वेळोवेळी त्याने केलेली प्रगती सांगायचा. कधी स्कूटर, कधी घर, कधी गाडी. या गोष्टी असणे ही इतरांच्या दृष्टीने सर्वसामान्य गोष्ट असते. आणि वस्तू म्हणजे सुख नव्हे, असेही आपण म्हणत असतोच. पण त्या नुसत्या वस्तू नव्हत्या, तर त्या त्याने कष्ट करून मिळवलेल्या इज्जतीचं प्रतीक होत्या. कुणी मित्र अचानक घरी येतो. म्हणतो, “बाबा, खाली चला.” गेलो की स्कूटर किंवा गाडी दाखवणार. म्हणतो, “गाडी घेतली आणि पहिलं तुमच्याकडे आलो. बाबा, तुम्हाला पहिली राऊंड.” ती राऊंड म्हणजे जगातल्या कुठल्याही महागड्या मर्सीडिझपेक्षाही मला भारी वाटते. त्याला झालेला आनंद वेगळाच असतो. सचोटीने, कष्टाने घेतलेली गाडी. मला दाखवायला आणली. मी तरी असा कोण? खरे प्रयत्न सगळ्यांनी केलेले. पण मीही मुक्तांगणचा प्रतीक बनतो. त्याचे कौतुक आमच्याशिवाय कुणाला असणार? सगळ्या मुक्तांगणच्या वतीने मी त्याची पाठ थोपटतो.

बिहारचा अरुणोदय का आठवला? तोही सुशिक्षित, सौम्य माणूस, त्याआधी सांगितलेल्या मित्रासारखाच. अशी या प्रवासात व्यसनी असलेली पण कमालीची सज्जन माणसं पाहिलीत. आश्चर्य वाटते. व्यसनात असतानाही त्यांनी कुणाला त्रास दिला नाही, असे विलक्षण. तर अरुणोदय हा तरुण मुलगा. इंजिनियरिंगला होता, पण पूर्ण करू शकला नाही. एक पाय पोलिओने थोडा अधूही होता. मुक्तांगणमध्ये आला आणि त्याच्या जीवनातून दारू नाहीशीच झाली. जशी ती कधी आलीच नव्हती. चिंचवडला जागा घेऊन राहत होता. त्याने कोर्स पुरा केला नाही. पण तो इंजिनियरिंगचे क्लासेस घेऊ लागला. आणि ते वर्षागणिक खूप लोकप्रिय होऊ लागले. आज पुण्यातल्या चांगल्या क्लासेसमध्ये त्याचं नाव घेतलं जातं. त्याने इंजिनियरिंगच्या काही विषयांत पुस्तकं लिहिलीत. दरवर्षी वाढदिवसाला तो दाखवायला आणतो. आता इंजिनियरिंगच्या कोर्सेसना टेक्स्ट बुक्स म्हणून त्यांचा समावेश झालाय. एक इंजिनियर न झालेला हे करु शकला.

अन्य प्रांतांतून येणाऱ्या मित्रांचे प्रमाण बरेच आहे. एक जम्मूचा मुलगा अॅडमिट झाला. तो बरा झाल्यावर तिथनं पेशंटची जशी रांगच लागली. शेजारच्या राज्यांमधले तर भरपूरच येतात. पण एकदा ईशान्येकडच्या राज्यांची अशीच लाइन लागली होती. नागालँड, मणिपूर असे कुठून कुठून यायचे. तिकडे ब्रह्मदेश शेजारी. त्यामुळे हेरॉइनचा प्युअर माल मिळतो. तो पाण्यात विरघळू शकतो. त्यामुळे सगळे सिरींजने ड्रग घेणारे. तिथली मुलं आल्या आल्या सांगायची, “मी एच. आय. व्ही. पॉझिटिव्ह आहे.” त्या वेळी काय, आजही असं कुणी इतक्या थंडपणे सांगताना आपण ऐकत नाही. पण तिकडे ती इतकी सर्वसाधारण बाब. त्या भागातला एक उंच धिप्पाड मुलगा आला होता. स्पंदन त्याचं नाव. तो असाच पॉझिटिव्ह. पाहून कुणाला खरंही वाटलं नसतं. त्याला विथड्रॉल एवढ्या जबरदस्त आल्या की चार-चार माणसांना तो आवरत नसे. नंतर तो शांत झाला. कमालीचा मितभाषी आणि सभ्य होता. तो सधन घरातला. त्याला म्हटलं, “तुला दरवेळी नव्या सिरींजेस वापरणं सहज शक्य होतं. मग एचआयव्हीपासून दूर राहू शकला असतास.” तो म्हणाला, “कुठून तरी निरोप यायचा, माल आला आहे. मग त्या गुप्त जागी जमायचो. एकजण सिरींज भरुन तयार करायचा. एकेक टोचून घ्यायचा. थोडी घेतली की पुढच्या माणसाला. सगळा गुपचूप कारभार. पोलिस आले की सगळे टाकून पळून जायचे. या सगळ्यात एकमेकांची रक्तानं भरलेली सुई टोचून घ्यायची. मग दुसरं काय होणार?”

स्पंदन बरा होऊनही घरी जाऊ शकत नव्हता. कारण घरचे त्याला स्वीकारायला तयार नव्हते. मग आम्ही इथेच ठेवून घेतले. छोट्या नोकऱ्या करायचा. राब राब राबायचा. पगार खूप कमी. पण

हळूहळू त्या क्षेत्रात ओळखी झाल्या. कुठल्या मशिनचा तो सेल्समन होता. नंतर तो एका विभागाचा मुख्य झाला. मला एकदा एका विमानतळावर भेटला. त्याचा वेष, हसतमुख चेहरा, त्यावरचा आत्मविश्वास...आणखी काय बक्षीस हवं असतं माणसाला? त्याला इतकी वर्षे इकडे येऊन झाली. पण तो एचआयव्हीसहित किती वर्षं जगतो आहे, आणि तेही इतक्या रसरशीतपणे!

या सगळ्या मुलांमुळे एचआयव्ही प्रॉब्लेम अगदी थेट येऊन भिडला. मग त्या टेस्टची सोय केली. ज्याचा इतिहास अनेक स्त्रियांशी संबंधांचा, त्याला तपासणीपूर्व कौन्सेलिंग, जर पॉझिटिव्ह आला तर तपासणी-उत्तर कौन्सेलिंग, असे आमचे लोक सर्रास करु लागले. आमच्या प्रचारसाहित्यात, उपक्रमात याचाही भाग सामील झाला. या प्रश्नावर सिनेमा काढावा म्हणून दिल्लीच्या एका संस्थेने मुक्तांगणला पैसे दिले. मग सुमित्रा आणि सुनीलने 'बेवक्त बारिश' हा छान सिनेमा दिग्दर्शित केला. त्याचेही प्रयोग जमेल तिथं होत असतात.

किती दिवसांनी स्पंदन आठवला. त्याचं हे आयुष्य त्यानं एकट्यानं घडवलं. तेही या जीवघेण्या दुखण्यासह. कधी एकटेपणाविषयी तक्रार नाही. त्याचं एचआयव्ही स्टेटस लपवणं नाही. त्याला न स्वीकारणाऱ्या घरच्यांविषयी अढी नाही. हसतमुख, नम्र. त्या विमानतळावर सुटातल्या स्पंदनने खाली वाकून नमस्कार केला. सगळे बघायलाच लागले. खरं तर मीच त्याच्या पाया पडायला हवे होते.

माझ्या 'बाबा'पणाविषयीही सांगतो. मला सुधीरने (गाडगीळ) मुलाखतीत प्रश्न विचारला होता, "तू पूर्वी बाबालोकांवर टीका केलीस, आणि आता तूच बाबा झाला आहेस. मुक्तांगणचे पेशंट तुझ्या पाया पडतात, हे कसे काय?" ही विसंगती कुणालाही वाटू शकेल. पण माझा नाइलाज होत गेला. मुक्ता-यशो मला 'ए बाबा' म्हणतात, म्हणून शेजारी राहणारा राजाराम 'ए बाबा'च म्हणू लागला. तो मुक्तांगणमध्ये काम करतो. तिथंही तेच नाव गेलं. त्यात मी वयाने त्यांच्यात मोठा, आणि शिवाय पांढरे केस-दाढी. आमच्याकडे एक सिंधी मुलगा होता. मी आणि सुनंदा आलो की तो सुनंदाबरोबर माझ्याही पाया पडू लागला. मी त्याला विरोध केला. तरी कुठूनही यायचा आणि काही समजायच्या आत पाया पडून जायचा. माणसाने दुसऱ्या माणसापुढे असे का वाकावे? मग मी युक्ती केली. तो दिसला आणि मीच जाऊन त्याच्या पाया पडलो. तो इतका कावराबावरा झाला की बस्स. केवढा धक्का बसला होता त्याला, बाप रे! बाजूला जाऊन जवळपास थरथरत उभा होता. नंतर आमची गाडी आली की तो लांब, करुण चेहरा करुन उभा राहायचा. मला बंधू म्हणाला, "बाबा, त्याला फारच लागलंय ते." मग मी त्याला पाया पडण्याची मुभा दिली. कारण त्याची स्थिती मला पाहवेना.

इतर पेशंटनाही मी विरोध करायचो. गाडगेबाबा पाया पडणारांच्या मागे लाकूड घेऊन लागायचे, ते सांगून झाले. शेवटी मी हरलो. एका पेशंटची बायको म्हणाली, "अवं बाबा, आजवर कुनापुढं वाकला नाही. आता वाकतोय, तर घ्या की तेचा नमस्कार!" तेही खरंच. त्यांची ही कृती म्हणजे त्यांच्या बरे होण्यातला एक भाग असतो. कुणाविषयी तरी त्यांना आदर वाटू लागतो, ही किती छान गोष्ट! कार्यक्रमाला येणारे त्यांचे आईवडीलही पाया पडू बघतात. मी त्यांना म्हणतो, "तुम्हाला परवानगी नाही. फक्त आमच्या या मुलांना आहे." तोवर मी घरात आईवडलांच्या कधी पाया पडत नसे. मग मी त्यांच्याही अगदी खाली वाकून पाया पडू लागलो. त्या सगळ्यांना हा आश्चर्याचा धक्काच होता. पण मी विचार केला. यांनी मला या जगात आणले, मला सांभाळले, आजारपणं काढली. शिक्षण दिलं, शहाणपणही दिलं. मग मी ते व्यक्त करायला नको का? शब्दांनी म्हणायला गेलो तर त्यांनीच थांबवले असते. मग संस्कृतीमधला चालत आलेला हा मार्ग का स्वीकारु नये? आई-वडिलांना किती आनंद झाला हे त्यांच्या डोळ्यांतच दिसले. नंतर मी सासूसासऱ्यांच्याही पाया पडू लागलो. त्यांनी जन्म दिलेली सुनंदा मला मिळाली, ही किती छान घटना, म्हणून. कोणाकडे गेलो, आणि घरात वडील माणसे असतील तर वाकून पाया पडतोच. आता आई घरी असते.

प्रवासाला निघालो, एवढेच काय, पुण्यातल्या माझ्या कार्यक्रमाला निघालो, तरी तिच्या पाया पडतो. ती म्हणते, “छान होऊ दे.” हे सगळं मला कुणी शिकवलं? तर माझ्या मुक्तांगणच्या मुलांनी.

तर, कुठं आलो भरकटत बघा. राग, टेन्शनविषयी सांगत होतो. टेन्शन किंवा मानसिक ताण हाही व्यसनमुक्तीला धोकाच. पूर्वी व्यसनात असताना अप्रिय विचार मनात आला, की तो विसरण्यासाठी, दाबून टाकण्यासाठी एकच इलाज- दारु पिणं. आता बरा झाल्यावर तो पर्याय हातात नाही. मग या ताणांवर कसा काबू मिळवायचा? माझ्या जीवनात अनेकदा अप्रिय घटना घडतात. कधी मुक्तांगणविषयी, कधी व्यक्तिगत कारणही. पण झोप जरा डळमळते. जाग आली की तोच विचार. सकाळी उठलो की फ्रेश वाटते. लगेच फोनाफोनीला सुरुवात. कधी प्रश्न नुस्ता मित्रांमध्ये शेअर करणे, तर कधी उपाययोजनेला लागणे. एक रात्र गळफटण्यात जातेच. मी मला तेवढा अवधी दिलाय. त्या घटनेचा परिणामच होऊ नये, ही मला न जमणारी गोष्ट. धक्का बसला की थोडा तोल जातो, पण नंतर लगेच जाग्यावर येतो. हे मी पेशंट मित्रांना सांगतो. थोडा धक्का बसेल, पण कोलमडायचं नाही म्हणजे झालं.

मी शाळा-कॉलेजातले परीक्षेचे पेपर लिहायचो. पेपर म्हणजे संकटच. प्रश्नपत्रिका पाहिल्यावर पहिला प्रश्न वाचताना जीव घाबरून जायचा. पुढं पुढं मी याला तोंड द्यायची युक्ती शोधून काढली. प्रश्नपत्रिका वाचायची. पाच मिनिटं शांत बसायचं. प्रश्नांचे तीन भाग करायचे. एक म्हणजे अजिबात येत नाहीत ते प्रश्न. दुसरा, जे येतील, पण प्रयत्न करून येतील असे, आणि तिसरा, हमखास येतील ते. हमखास येणाऱ्यांपासून सुरुवात केली की उत्साह, आत्मविश्वास वाढू लागायचा. त्या झपाट्यात दुसऱ्याही भागातले प्रश्न सोडवून टाकायचे. आणि मग शेवटी येत नाहीत ते ट्राय करायचे. काही तरी त्यातले जमतेच. त्यात थोडे मार्क पडले, तरी तेवढेच. पण त्या प्रश्नांच्या भीतीने आत्मविश्वास खचला असता तर? जे येते तेही धड लिहिले नसते. ही युक्ती अनेकजण वापरतात. मग ते जगण्यातल्या संकटांचा सामना करताना का वापरत नाहीत?

आमच्या मित्रांशी बोलताना हे सुचवतो. संकटाचे आधी भाग पाड. अशी अशक्य, शक्य आणि सहजसाध्य अशी प्रतवारी लाव. सहजसाध्य लगेच करायला घे. एका विभागामध्ये असताना दुसऱ्या विभागाचा अजिबात विचार करायचा नाही म्हणजे ते जमतं. पुढचा विचारही त्या वेळी करायचा नाही. माझे परीक्षेत एकदा हातपाय गळाले होते. आता मी नापास होणार. मग आई काय म्हणेल? वडील काय म्हणतील? जगाला तोंड कसं दाखवायचं? मेडिकलची ॲडमिशन तर हुकलीच. मग काय? बी.एस्सी? नंतर बीएड? शिक्षक? ते तरी जमणार आहे का? पण आतून काही तरी ऊर्जा आली, कुमक आली आणि हे विचार मी बाजूला सारु शकलो. नाही तर पेपर कोरा टाकून बाहेर पडायचा. ही आतून ऊर्जा, कुमक येणं हा योगायोग होता. ती येईलच असा भरवसा कसा द्यायचा? म्हणून पद्धत असलेली बरी. जसं कर्जाच्या बाबतीत आधी लिहिलंय तसंच. कर्जांची यादी केली की भीती सीमित होते. आधी ती मोठ्ठा बागुलबोवा दाखवते. पण कागदावर एक,दोन, तीन, चार अशा पद्धतीने लिही, म्हणजे बघ, भीती कशी आवरुन-सावरुन बसते ते. मग जी असेल ती वास्तव असेल. शत्रूचं नेमकं बळ किती, हे कळलं की लढायला बरं पडतं.

हे सगळं कळत गेलं- आमच्या मित्रांच्या अनुभवांमधून. कुणाला एका क्षणी ब्रह्मज्ञान झाल्याचं वाचतो. इथे असं आपोआप सगळं ज्ञान मिळत नाही. फार ठेचकाळत, परिस्थितीचे रट्टे खात खात, कणाकणाने मिळतं. कितीही मिळालं तरी ते अपुरंच. हजारो मित्रांच्या जीवनाचा प्रवाह अखंड वीस-पंचवीस वर्षे पाहत होतो. त्यातून हे शिकलो, की शिकणं कधी पुरं होत नाही. आम्ही सगळेच शिकत गेलो. जे शिकलो ते पुस्तकाबाहेरचं होतं. या अखंड, प्रभावी प्रवाहामुळे आम्हा सगळ्यांचे स्वभावाचे कंगोरे कमी-अधिक झिजले. आम्ही सगळे एकमेकांना अनुरुप होत गेलो. आमचं श्रेय काय, तर मित्र जाताना म्हणतो, “इथं जेवढं प्रेम मिळालं तितकं आतापर्यंत कधी मिळालं नव्हतं.” हे ऐकलं की जीव

धन्य होतो. समजायचं, सुनंदाच्या आपुलकीच्या रस्त्याने आपण नीट चाललो आहोत. येवढं बास आपल्याला.

■

८

ज्या मित्रांना इच्छेविरुद्ध आणले, त्यांचा एक नेहमीचा संवाद असतो. पहिल्यांदा तर साफ नाकारायचे. 'दारु? छेः! आपण कधी शिवतच नाही, अगदी थेंबालाही.' मग आपण म्हणतो, की 'अहो, तुमचे घरचे सगळे म्हणताहेत, तुम्ही घेता म्हणून.' त्यावर तो जराही खजील न होता म्हणतो, "हां, उलिशिक (एवढीशी) घेतो. तीसुद्धा कधीमधी." त्यावर आपण म्हटले, की पण सगळे सांगताहेत की तुम्ही तर रोज घेता... त्यावर तो उसळून म्हणणार, "दारु कोण घेत नाही? जग, दुनिया घेतीय. मग मलाच का वेगळं पाडून बोलता? मी पितो; पण गप येऊन झोपतो. आपल्या पिण्याचा कुणाला त्रास नाही." जर आपण म्हटलं, की तुमच्या मिसेसची तुम्ही मारहाण करता म्हणून तक्रार आहे...त्यावर तो तिला शिवीगाळच सुरु करणार.

आम्ही आमच्या मित्रांना सांगत असतो, "हे तू खोटं बोलत नाहीस, तुझ्यातली दारु खोटं बोलायला भाग पाडते." जिथं दारु मिळणार नाही तिथं जायचं हा टाळणार. जो मित्र पिणारा नाही त्याच्याबरोबर राहायलाही हा तयार नसतो. दारु न घेण्याविषयी कुणी सांगू लागलं, की हा मनात म्हणणार, की झाले यांचे उपदेशाचे डोस सुरु! आणि कान मिटून घेणार. ड्रगवाल्यांचं तर यांच्याहून अर्जंट. गाव सोडून कुठं जायलाच तयार नसतात. कारण आपल्या गावात जसा माल हमखास मिळतो, तसा तिथं मिळेल की नाही याची शाश्वती नसते. एक मित्र म्हणाला, "औरंगाबादला नातेवाइकांचे लग्न होते. जावेच लागले. स्टॉक पुरेसा नेला, पण तो कधी संपला ते कळलंच नाही. गावभर भिरभिर फिरायला लागलो. पण नवख्या गावात माल कुठं मिळतो हे काय माहीत? मग तसाच एसटीत बसलो आणि आलो परत. तिकडे लोकांनी शोधाशोध केली असेल, पण माहीत नाही."

मुंबईतल्या ॲडिक्टना माल हमखास मिळतो. कुठंही. एकजण सांगत होता, "कुठल्याही स्टेशनवर कुठल्याही वेळेला जाऊन उभा राहा, कोणी तरी जवळ येऊन विचारणार, माल मंगता है?" मी म्हणालो, "पण मला आजवर कुणी नाही असं विचारलं?" तो म्हणाला, "ते ॲडिक्ट पाहूनच विचारतात. आमची 'सूरत'च वैसी है ना!" म्हणजे काटकुळा देह, डोळ्यांभोवती काळं, काळे ओठ, इत्यादी.

तर दारुविषयी सांगत होतो. 'जग-दुनिया पिते, मग मलाच का बोलता?' हे वाक्य म्हटले तर खरेच आहे ना. बरेच लोक दारु पितात. मग सगळ्यांना दारुडे म्हणायचं? ए.ए.च्या पुस्तकात की अन्य ठिकाणी एक वर्गवारी वाचली. अधूनमधून, कधी समोर येईल तेव्हा दारु पिणारे, ते सोशल ड्रिंकर. जर दारु पुढे आली तरच ते घेणार, एरवी नाही. पण त्यातल्या काहींना दारु आवडायला लागते. वीकएण्डला ठरवून ते मित्रांसोबत घेणार. ते प्लॅन्ड ड्रिंकर. ठरवून पिणारे. त्यातले काही आणखी पुढे जातात. दारु जवळपास रोजच्या रुटीनमध्ये जाऊन बसते. ते हॅबिच्युअल ड्रिंकर. सवय लागलेले. त्याच्या पुढची पायरी म्हणजे ॲडिक्ट, व्यसनी, दारुडे, गर्दुल्ले वगैरे. हे म्हटलं तर टप्पे, पण ही एक सलग प्रक्रिया. कुणी हळू पुढं सरकतोय, कुणी वेगानं, तर कुणी जागीच बसलाय. जागतिक आकडेवारी सांगते, १०० जर सोशल ड्रिंकर असतील, तर त्यातले १३ लोक ॲडिक्ट होतात. आपण भारतीय तर दारुला लवकर बळी पडणारे. म्हणून आपल्यात ते प्रमाण जरा जास्त असणार. तर ते २० धरुयात? म्हणजे पाचातला एक व्यसनी? बाप रे! तो कोण असणार? त्याला काही टेस्ट असते का हो? नाही बुवा. त्याला काही टेस्ट नाही की नियम नाहीत. काहीजण सुरुवात करतात आणि झपाट्याने इतरांना मागे टाकत थेट व्यसनीच होतात, तर काहीजण काही वर्षे एकेका पायरीवर

थांबत थांबत पुढे जातात. काहीजण बरीच वर्षे सोशल ड्रिंकर असतात आणि झपकन व्यसनीच बनतात. तेव्हा मंडळी, ही गोष्ट डेंजरस आहे. दूर राहणे चांगले.

आम्ही, मुक्तांगण सुरु होण्याआधी, एका थेरपीविषयी ऐकले होते. आमच्या एम.बी.बी.एस.च्या अभ्यासातही ती थेरपी होतीच. 'डायसल्फीराम' नावाचे औषध असल्याचे वाचले. (तेव्हा वाटले होते की हा कुठला राम?) त्यालाच अँटॅब्यूज थेरपी म्हणतात. तर हे औषध घेतले की दारुविषयी घृणा निर्माण होते. रोज एक किंवा दोन गोळ्या घ्यायच्या, की त्याला दारु पिण्याची भीतीच वाटू लागते. गोळ्या घेत राहील तितके दिवस तो व्यसनमुक्त राहील.

आमचे मित्र या 'रामा'लाही फसवतात. आमच्याकडे ॲडमिट झालेले अनेक मित्र ही थेरपी पचवून बसलेले असतात. एकजण सांगत होता, "बायको गोळ्या द्यायची. मग महिन्याभराने दारुची आठवण यायला लागली. गोळी गालात ठेवून पाणी पिऊन गोळी घेण्याचे ॲक्टिंग केले आणि बाहेर जाऊन दारु घेतलीच. परत दुसरी गोळी घ्यायला त्या दिवशी परत आलोच नाही." दुसरा असाच एक सांगत होता, "सकाळी आणि रात्री गोळी. त्याबरोबर मधली वेळ कुठली? तर लंच टाइमची. तेव्हा त्या गोळ्यांचा परिणाम 'निल' असणार. तेव्हा घेऊन पाहायला काय हरकत आहे? मग घेतली न् काय!" थोडं विषयांतर करु? इथं 'घेतली'च्या ऐवजी 'टाकली' म्हणाला असणार. यांची यांची भाषा आहे. हा टाकणे शब्द फक्त दारुच्या बाबतीत लावला जातो, नाही तर अर्थ बदलतो. दूध टाकले म्हणत नाहीत. दारु (पोटात) टाकली, हे बरोबर. त्यात एक 'चपटी' टाकली म्हटले तर अधिक खास. चपटी म्हणजे चपट्या आकाराच्या दारुच्या बाटल्या. आपण रस्त्याकडेला, कधी बागेत, कधी निसर्गरम्य ठिकाणी पाहतोच त्या. त्यापेक्षा मोठी, गोल बाटली म्हणजे 'खंबा'. 'आख्खा खंबा उतरवला घशात! आहेस कुठं?' असा त्याचा वाक्यात उपयोग. पाणी न घालता घेतली तर 'कच्ची' किंवा 'कोरडी' घेतली, असे. ऐकून ऐकून असे बरेच शब्द माहीत झाले. सुनंदा पेशंटशी बोलताना असा शब्द मध्येच टाकायची. पेशंट थक्क होऊन विचारायचा, "मॅडम, तुम्हाला कसं माहीत?"

तर त्या 'राम'विषयी सांगत होतो. त्यासाठी आधी सगळ्या टेस्ट नॉर्मल याव्या लागतात. मग पहिला प्रयोग हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होऊनच. ते औषध देतात. त्यावर तो पितो त्या ब्रँडची दारु पाजतात. ती दारु आणि औषध एकत्र आले की त्यातून एक विषारी पदार्थ तयार होतो. त्यामुळे माणसाला प्रचंड त्रास होतो. तो जर अतिच वाढला तर मृत्यूही येऊ शकतो. म्हणून ती रिॲक्शन कंट्रोल करावी लागते. म्हणून तर हे सगळे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करुनच करतात. येवढा खटाटोप करण्याऐवजी मुक्तांगणमध्ये दाखल करा. दोन दिवसांत विथड्रॉलमधून बाहेर येईल. आठ दिवसांत साऱ्या मुक्तांगणचा दोस्त होईल. आणि होईलच तो सामील आमच्या दिंडीत...'दिंडी चालली चालली, नशामुक्त रहायाला' परत समजा तो पडला व्यसनात, तर त्याला उचलून परत चालायला लावायला आमच्या दिंडीचे टाळकरी आहेतच. पण गोळ्या घेऊन बरा झाला आणि परत गेला व्यसनात, तर त्याला उचलायला गोळ्या थोड्यात येणार आहेत?

तशीच कथा गर्दच्या मेथॉडॉन या पर्यायाबद्दल. युरोप आणि अमेरिकेत ड्रगवरचं हमखास उत्तर म्हणजे मेथॉडॉन, हे रुढ झालं. ठिकठिकाणी ॲडिक्टना ते मोफत मिळू लागलं. आणि काही काळाने लक्षात आलं, की त्या मेथॉडॉनचंही व्यसन लागतंय. वाः वाः! औषधानेच रोग आणला! हॉलंडमधल्या केंद्रातला एक ड्रग ॲडिक्ट सांगत होता, "ड्रगचं व्यसन सोडणं सोपं, इतकं या मेथॉडॉनचं अवघड. सरकारने आम्हाला ड्रग्ज फुकट द्यावीत. एकदा ड्रग घ्यायला लागलो की मेथॉडोन आपोआप सुटेल. मग राहता राहिलं ड्रग. ते आम्ही कसंही सोडू शकतो." वाः गुरु! उलट्याचं पालटं आणि पालट्याचं उलटं. हा सगळा उपद्व्याप कशाला करायचा?

त्यापेक्षा आमचा मार्ग बरा. आम्ही याला 'हमखास' बरा करणार, असा दावा नाही करत.

त्याला बरं व्हायला मदत करतो. कोणी विचारतो, “बरा होईल याची गॅरंटी काय?” आम्ही सांगतो, “आमच्या शंभर टक्के प्रयत्नांची गॅरंटी देतो.” बरं झालं, त्या औषधांच्या वाटेने आम्ही गेलो नाही. किती कमीजणांना ते परवडलं असतं! त्यात फक्त डॉक्टरला महत्त्व आलं असतं. आमच्या इथेही डॉक्टर आहेत, पण ते टीमचा एक भाग म्हणून. त्या टीममध्ये कमी शिकलेले, निरक्षरही आहेत. पण ते ज्या आपुलकीने काम करतात, की पाहणारा धन्य होतो.

मघाशी या नशील्या क्षेत्रातल्या शब्दांविषयी थोडंसं बोललो. काही आमचे, ए.ए. परिभाषेतले शब्द आधी स्लिप, रिलॅप्सविषयी सांगितलेलेच आहेत. तसाच एक शब्द सोब्रायटी. म्हणजे या क्षेत्रात व्यसनापासून दूर. पण सोबर या शब्दाचा तसा इंग्लिशमधला अर्थ काय आहे? सोबर माणूस म्हणजे सभ्य, संयमी, मवाळ असा काही असणार. नशामुक्त हा अर्थ त्याला तिकडे कधी तरी चिकटला असणार. इकडे तो खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचलाय. कोणी खेडूत सांगत येतो, “हा पोरगा चांगला आठ महिने ‘सोबूर’ व्हता, पण पुढं ढेपाळला गडी.” सोबरचा त्यांनी सोबूर केला. तसाच दुसरा शब्द म्हणजे ‘शेअरिंग’. आपले अनुभव दुसऱ्यांना ऐकवणे. आपल्याकडे दुःख वाटून घेतले म्हणतातच. इथं दारुमधले अनुभव वाटून घेतले की माणसाचे डोळे उघडतात. ए.ए.च्या सभेत कधी भाषण नसतेच. जे असतं ते शेअरिंग. किती छान! प्रास्ताविक नाही. सत्कार नाहीत. ओळख नाही. थेट अनुभवालाच भिडणार. आपले सार्वजनिक क्षेत्र यांच्याकडून कधी शिकणार?

पेशंट मित्राने उपचार घेऊन घरी गेल्यावरही मुक्तांगणशी संपर्क ठेवायचा असतो. आमच्याकडचा याला शब्द म्हणजे ‘फॉलोअप’. हा सर्रास वापरला जातो. ‘फॉलोअप ठेवाल तर सोब्रायटीचे दरवाजे तुमच्यासाठी खुलेच आहेत मित्रांनो’ असे आम्ही नेहमी म्हणतो. या फॉलोअपचे ‘फॉलोप’ असे एक रुप. तर खेड्यापाड्यांपर्यंत “काय करता? आमचा फालुप कमी पडला” असे रुप. एकाने तर त्याला ‘फालू’ म्हटल्याचं ऐकलंय.

आता विषय निघालाच फॉलोअपचा, तर त्याविषयी सांगणं आलंच. काहीजण पहिल्यांदा बरे झाले की घोषणा करतात, “आता जन्मभर ‘तिचा’ थेंबही घेणार नाही.” असेच आणखी कोणी म्हणतात, “आता मी गुत्त्यावर जाऊन दाखवीन, पण पिणार नाही.” यातला निश्चय चांगला असला तरी या क्षेत्रात तो धोकादायकही असू शकतो. त्यातून पुढे अचानक बेसावध क्षणी ‘तो’ विचार वरती येतो त्या वेळी हे निःशस्त्र असतात, की चालला आमचा मित्र तिच्यात पोहायला की बुडायला. दुसरा गुत्त्यात जाऊन बसणारा शूरवीर जाऊन नीट परत येईलही. पण एखाद्या वेळी तो वास नाकातून मेंदूपर्यंत पोहोचला तर? असली धाडसं कशाला करायची? एकेक दिवस मिळवत दारुविना आयुष्य पदरात पाडून घ्यायचे. ते खरे शौर्य. एखाद्या लढाईतलं नव्हे, तर ती असते शांतपणे, स्थिरवृत्तीने केलेली लढाई.

या सगळ्यालाच फॉलोअप म्हणायचे. तो मित्र मुक्तांगणमध्ये नियमित येत राहिला, ए.ए.च्या मीटिंगला जात राहिला, तर अशा साहसांपासून त्याला मित्र, कौन्सेलर आदी मंडळी वाचवू शकतात. कुणी एकदम कामाचे क्षेत्र बदलायला निघतो, तर कोणी धंद्यासाठी मोठे कर्ज घेऊ पाहतो. आमचा सल्ला एकच- एकदम काही करायचे नाही. हळूहळू काम करीत आधी आपली पत किंवा इज्जत तयार करायची. मग पुढचे पाऊल उचलायचे. इतरांसारखी उडी घ्यायची नाही. कारण आपल्याला ते परवडणार नाही. इतरांनी जरुर साहसे करावीत. पण आपला जीवनक्रम वेगळा आहे. आपण शांतपणे, धीमेपणाने वाटचाल करीत राहावे. कर्तव्ये तर करावीतच, पण आनंदही लुटावा.

पुण्यातल्या लोकांना प्रत्यक्ष भेटता येते. लांबच्या लोकांना? ते फोन करतात. मुक्तांगणमध्ये राहणारे आमचे स्टाफ मित्र तर संध्याकाळी-रात्री उपलब्ध असतातच. रोज संध्याकाळी कुणाकुणाचे, कुठून कुठून फोन येत असतात. “बंधुदादा आहे का? तो नाही? बरं, नितीनदादा असेल ना, त्याला दे.” बोलायला पेशंटना कुणीही चालतो. तो मुक्तांगणचा असला की झाले. जशी माहेरवाशीण

माहेरी फोन करते, त्या ओढीने हे करतात. हो, नाही तरी अनेकांच्या बायका, आमचे हे मित्र चिडचिड करु लागले, की म्हणतात, "जा, चार दिवस माहेरी (मुक्तांगणला) जाऊन या म्हणजे बरे व्हाल!"

मलाही कधी रात्री-अपरात्री फोन येतो- "घरच्यांशी भांडण झालंय. डोकं सटकलंय. काय करु?" मग पाच मिनिटं बोललं तरी तो शांत होतो आणि परत नशेकडे वळणे थांबते. आम्ही त्याला सांगतो, " अशा वेळी कुणाही हितचिंतकाला फोन करीत जा. स्वतःला वाचव. दुसऱ्या दिवशी भेटून अपरात्री फोन केल्याबद्दल माफी माग." पेशंट मित्रांची केवढी तरी पत्रे येतात. काय, कसे चाललेय, हेही असते आणि वरचेवर होणाऱ्या भांडणांविषयीही असते.

विश्वंभर केळकर आता स्टाफवर आहे. त्याला टेल्कोत चांगली नोकरी होती. व्यसनात बरेच काही घालवल्यावर आमच्याकडे आला. बरा झाला. पुण्यातच राहणारा. त्यामुळे दर बुधवारच्या अंतर्दीप कार्यक्रमाला दिसू लागला. सुरुवातीचा एक महिना गेला, दुसरा गेला. शेवटी त्याचा वर्षाचा वाढदिवस आला. एव्हाना स्टाफमध्ये, पेशंट्समध्ये विश्वंभरचे 'एक्कावन्न बुधवारचे व्रत' फेमस झाले होते. बावन्नाव्या बुधवारी आम्ही वर्ष पुरे झाले म्हणून त्याला फूल देऊन शुभेच्छा दिल्या. तो पुण्यात होता, आणि मोकळा होता म्हणून हे शक्य झाले. पण पुण्यात असे किती तरी मित्र होते. ते दर बुधवारी येऊ लागले. अशा 'व्रतस्थ' लोकांचे वर्षही सहजपणे पूर्ण होऊ लागले.

पुण्याबाहेरच्यांसाठी कुणी तरी आयडिया काढली (त्याचा जनक कोण ते मला माहीत नाही.), महिन्याच्या शेवटच्या शनिवारी व्यसनमुक्तीच्या वाढदिवसांचा कार्यक्रम असतो. झाले. त्याचे अकरा शनिवारचे व्रत तयार झाले. बाहेरगावच्या लोकांनाही महिन्यातून एकदा इथे येणे शक्य होते. शनिवारी बऱ्या झालेल्या पेशंटचे ऐकताना हुरुप येतो, शिवाय कॉन्सेलरला भेटून फॉलोअप करता येतो. पेशंट मित्र आपसात म्हणू लागले, अकरा शनिवार इथं या कार्यक्रमाला यायचं, आणि बाराव्या शनिवारी ऐटीत येऊन बाबांच्या हातून मेडल घ्यायचं. व्रत हा परंपरेत रुजलेला शब्द. त्यामुळे मनात जाऊन बसतो थेट. 'फॉलोअपला येत जा' म्हटल्याने जे होणार नाही ते या जादूच्या शब्दाने अलगद होऊ लागले.

तसं आम्ही बऱ्यापैकी परंपरेला धरुन असतो. अंतर्दीप कार्यक्रमात दीपप्रज्वलन, मंत्रध्वनी, हातावर दही वगैरे आहेच. पण काही सर्वमान्य भारतीय सणही साजरे करतो. त्यातला एक दिवाळी आहे. ज्या दिवसांत बाहेर लोक फटाके, फराळाचे पदार्थ, ओवाळण्या वगैरे करीत असतात, त्या वेळी हे बिचारे मित्र मुक्तांगणच्या भिंतीआड असतात. कशी करावी दिवाळी? फटाके नकोत. नरकचतुर्दशीच्या आंघोळी? त्या करणं सोप्पं. तेल, उटणी आणून दिली. पेशंट एकमेकांना ती तेल-उटणी लावून आंघोळी करतात. दिवाळीआधी शेकडो (कदाचित हजारही) आकाशकंदीलही ही मुले करतात. बाहेरच्या कंपन्या विकत घेतात. मुक्तांगणमधली दिवाळीही आकाशकंदिलाने सजलेली, रंगीबेरंगी झालेली. दारासमोर रांगोळ्या. आमच्या ऑडिटोरियमच्या उघड्या स्टेजवर तीन-चार-पाच किल्ले तयार झालेले. त्यांच्यापैकी बक्षिसासाठी नंबर लावण्याचे अवघड काम माझ्याकडे. मग मुक्तांगणमध्येच बनवलेला फराळ. चकल्या, चिवडा, करंज्या इत्यादी. मग आम्ही हॉलमध्ये एकत्र बसून गाणी म्हणतो. शेवटी मला बासरीचा आग्रह... इत्यादी.

या दिवाळीची तयारी किती दिवस आधी चालू होते. ही सगळ्यांना, 'वेगळी थेरपीच' असते. त्यात मुलं रमतात. त्यांची कलावृत्ती तर जागी होतेच, पण टीममध्ये काम करण्याचा आनंदही मिळतो.

तर फॉलोअपविषयी चालले होते. ही दिवाळी मध्येच उपटली. खरंच, 'उपटली' हा शब्द कसा गमतीदार आहे ना! मध्ये येणाऱ्याला तोच आणि एखादं लहान पोर बघता बघता उंच होतं, त्यालाही म्हणतात, बघता बघता उपटलं की हे पोर. तर आता फॉलोअपविषयीच सांगतो. मध्ये काही उपटलं तरीही.

प्रसाद ढवळे हा स्टाफ मित्र आमच्या फॉलोअप प्रोग्रॅमचा जनकच. तो मूळ कराडचा. तिथं त्याचे आई-वडील, पत्नी राहायचे. त्यांना भेटायला तो महिन्यातून एकदा जायचा. एकदा त्याने सुनंदाला विचारले, “मी कराडला जातोच आहे तर तिकडल्या पेशंटचा फॉलोअप करू का?” तिने परवानगी काय, प्रोत्साहनच दिले. महिन्यातून एकदा कराडला फॉलोअप मीटिंग सुरु झाली. पुढे मग तसेच पुढे जाऊन सांगलीला ग्रुप घेऊ लागला. मग तासगावच्या पेशंटचा आग्रह म्हणून तिकडेही. पुढे इचलकरंजी (तिथं तर आता आमचा तगडा ग्रुप आहे.), शेवटी कोल्हापूर...दोन दिवसांत तो जसा सगळा दक्षिण महाराष्ट्रच उरकायला लागला. त्यांचा शांत, ऋजू स्वभाव, कमालीची सिन्सिरिटी ह्यामुळे ते काम वाढतच गेलं. मग आमचे इतरही मित्र इतर शहरांमध्ये महिन्यातून एकदा जाऊ लागले. नगर, औरंगाबाद, नाशिक, सोलापूरला ग्रुप सुरु झाले. सोलापूरला जाणारा स्टाफ मित्र सकाळी इंदापूरला ग्रुप घेऊन दुपारी सोलापूरला घेणार. औरंगाबादच्या पुढे नांदेड सुरु झाले. असे या फॉलोअप सेंटर्सचे मोहोळच तयार झाले. मी अशा ठिकाणी बहुधा दर तीन महिन्यांनी जातो. आमचा स्टाफ मित्र आधी जाऊन घरोघरच्या ‘होम व्हिजिट्स’ करतो. जे बरे नसतील त्यांना ॲडमिशनच्या तारखा देतो. मग पालकांची, पेशंटची वेगळी वा एकत्र सभा घेतो. मी येणार त्या दिवशी जास्त गर्दी... बाहेर मला जे स्थान आहे त्यापेक्षा आमच्या पेशंट मित्रांमध्ये मला वेगळंच स्थान आहे. त्यातला बराच भाग सुनंदाकडून आपोआप आलेला आहे. शिवाय तो परिणाम माझ्या माणूसवेड्या स्वभावातून आणखी वाढला आहे. मुक्तांगणमध्ये मिळणारं सर्व प्रेम माझ्यावर ट्रान्स्फर झालेलं आहे.

कोल्हापूरला जयंतची बायको माझ्यासमोर आणली होती. तिच्या अंगावर, चेहऱ्यावर मारल्याचे काळे-निळे डाग. मी विचारलं, “जयंत कुठं आहे?” कुणी म्हणालं, “तो कोपऱ्यावर उभा आहे.” “बोलाव त्याला.” तसा तो आला. मान खाली घालून पण दुरुत्तर करायच्या तयारीने उभा. मला सुनंदा आठवली. ती कशी पेशंटला तयार करायची! मी जयंतला म्हणालो, “जयंत, किती दिवस वाया घालवणार आहेस? चल, मुक्तांगणमध्ये ॲडमिट हो. सगळं काही नीट होईल.”त्याने मान हलवली. आणि पुढच्याच आठवड्यात तो दाखल झाला. कोल्हापूरहून मित्रांनी गाडीत घालून आणले. वाटेत तो अनेकदा प्याला. गोंधळ घातला. पण पोहोचला. तिथेही बरीच गडबड केली. पण दोन दिवसांत शांत झाला. नंतर सुरळीत पार पडले. इतर मित्रांना सांगायचा, “बाबांनी शब्द टाकला. त्यांचा शब्द कसा खाली पडू द्यायचा? म्हणून तयार झालो.” तेव्हापासून आजतागायत बरीच वर्षे तो व्यसनमुक्त आहे. त्याचा संताप फार वाईट होता. त्याच्या बायकोला मध्ये एकदा विचारले, “काय, संताप कसा आहे जयंतचा?” ती हसून म्हणाली, “त्यांचा राग थंड झालाय, पण मीच कधी कधी रागावते.” त्याची बदली झाली. रद्द करण्यासाठी मुंबईला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेला. व्यसनाच्या काळात भडक स्वभावामुळे अनेक मारामाऱ्या केल्याने नाव खराब झालेले. जयंत त्यांना माझे नाव घेऊन सांगत होता, “मी आता व्यसनमुक्त आहे. त्यांना विचारा हवं तर.”

ते माझ्या पुस्तकांचे वाचक होते. ते म्हणाले, “उगाच मोठमोठ्या लोकांची नावे घेऊ नकोस...”

“तुम्हाला ते तुमचे प्रसिद्ध लेखक असतील, पण आमचा तो बाबा आहे.” म्हणून तिथूनच त्याने मला फोन लावला. मी त्यांच्याशी बोललो, “येवढी एकदाच बदली रद्द करा, म्हणजे तो या फॉलोअप ग्रुपमध्ये राहील. ती मुदत संपली की मग अवश्य करा बदली.” तसा पुढच्या वेळी बदलीच्या जिल्ह्यात गेला. आता त्याने तिथं ग्रुप सुरु केलाय.

तसाच मकरंद. उच्चशिक्षित. वडलांच्या व्यवसायात सहभाग. पण दारु वाढली. बायको त्याला सोडून जायच्या विचारात होती. मला तिने तसे सांगताच त्यालाही बोलावले. (तोही कोपऱ्यावरच उभा.) त्यानेही ऐकले. मी त्याला म्हटले, “आता तुझी जबाबदारी माझ्यावर. मी म्हणेन तितके दिवस मुक्तांगणमध्ये थांबायचे.” तेही कबूल केलं. त्याच्या आधी एक-दोन ॲडमिशन्स झालेल्या होत्या.

पण या वेळी त्याने माझ्यावर सोपवलेले. तो तिथं तीन महिने राहिल्यावर त्याला घरी पाठवले. त्याची बायको, त्याची लेक हे माझे कुटुंबीय. कधीही आलो की एक संध्याकाळ मागून घेतो. सगळे मिळून पन्हाळ्याला जातो. एका बुरुजाच्या तळात मागे एक वाहत्या वाऱ्याची छान जागा आहे, तिथं निवांत बसतो. त्या वाऱ्यातही बासरी वाजवतो.

रणजित जाधव आणि सुहास घाटे हे दोघे मित्र भेटले. व्यसनाच्या क्षेत्राशी काही संबंध नसूनही रणजितने त्यांच्या जाधवांच्या दगडी बंगल्यातली जागा दिली. सुहास कौन्सेलिंग करतो. आणखी एक पेशंट आठवतोय. दीपक. तो बायकोला खूप मारायचा. त्याच्या मारहाणीमुळे बायको कराडच्या हॉस्पिटलात दाखल झालेली. मागच्या वेळी कोल्हापूरमध्ये भेटली, तेव्हाच अंगावरच्या जखमा, पट्ट्या पाहिल्या होत्या. मी कराडला प्रसाद ढवळेकडे राहिलो होतो. सकाळी उठून रिक्षाने स्टँडवर जाऊन तिथून एस.टी.ने कोल्हापूरला जाणार होतो. निघताना प्रसाद म्हणाला, "बाबा, तुम्ही त्या बाजूला बसा. दीपक त्या बाजूला हॉस्पिटलबाहेर उभा राहणार आहे. त्याला तुम्हाला लांबून नमस्कार करायचाय. तो म्हणाला, "बाबांशी बोलायची माझी लायकी नाही, पण नमस्कार करावासा वाटतोय." तसा तो दिसला. नमस्कार झाला. मी हात हलवला. त्या घटनेनंतर वर्तन सुधारले. मीटिंगला यायचा. पण अधनंमधनं घ्यायचा. तरी मीटिंगला हमखास यायचा. म्हणायचा, "बाबा, जेवायला या ना घरी." मी म्हणायचो, "तू एक वर्षभर व्यसनमुक्त राहा, मग मी येईन जेवायला." तसे त्याने मनावर घेतले. वर्ष पूर्ण केल्याच्या कार्यक्रमात माझ्याकडून मेडल घेताना हळूच म्हणाला, "बाबा, लक्षात आहे ना?" मी हसून मान हलवली. पुढच्या वेळी कोल्हापूरला गेल्या गेल्या या वेळी दीपककडे जेवायला जाणार, ही बातमी कर्णोपकर्णी दीपकपर्यंत पोहोचली. आणि आलेच दोघं भेटायला. या वेळी तिचा चेहरा साफ दिसत होता. चेहऱ्यावर आनंद फुललेला. घरी गेलो. आसपासचे लोक, नातेवाईक जेवायला बरोबर होते. जेवून खाली उतरलो. दोघं गाडीपर्यंत पोहोचवायला आले होते. दीपक म्हणाला, "आता बाबा, परत कधी येणार जेवायला?" मी हसून म्हटलं, "तू गुटखा सोडशील त्यानंतर वर्षाने."

त्याने चमकून बायकोकडे पाहिले. ती 'आता कशी'ची खूण करून हसत होती.

परवाच घडलेलं उदाहरण सांगतो.

मला एका पेशंट मित्राचं पत्र आलं होतं. चांगलं दोन-तीन पानी. असं पत्र मुक्तांगणमध्ये संबंधित कौन्सेलरकडे मी सोपवत असतो. म्हणून बॅगेत घातलं. आणि ते इतर कागद, पुस्तकांमुळे कुठं कोपऱ्यात जाऊन बसलं. परवा पिशवी साफ करताना ते सापडलं. जितेंद्र त्याचं नाव. त्यानं सोब्रायटी चांगली टिकवली आहे. पण कर्ज आहे. नोकरी जाते, येते. कमी पगाराची. ज्या जमिनीवर कर्ज काढले त्या जमिनीचा ताबा एका जवळच्या नातेवाइकाने बळकावलेला. कर्ज मात्र याच्या डोक्यावर...वगैरे वगैरे. एक-दोन महिन्यांपूर्वीचं ते पत्र. मला अपराधीच वाटलं. ते पत्र घेऊन मुक्तांगणमध्ये गेलो. त्या भागातला फॉलोअप प्रसाद ढवळेकडे. त्याला बोलावलं. पत्र दिलं. वाचून म्हणाला, "त्याचं आता व्यवस्थित आहे."

"म्हणजे काय?"

"त्याला घेऊन बँकेच्या (ती सहकारी बँक आहे.) अध्यक्षांकडे गेलो होतो. त्यांच्याकडून वरचे व्याज माफ करून घेतले. त्यामुळे कर्ज आटोक्यात आलंय. त्याची केस ऐकल्यावर त्यांनी त्याला बँकेतच नोकरी दिली. आता त्याच्या पगारातून बँक हप्ते कापून घेतेय."

मी थक्क झालो.

पुढे म्हणाला, "त्याचा फॉलोअप चांगला आहे. आपल्या तिथल्या साप्ताहिक सभेला तो नियमित येतो. आधी येऊन जागा झाडतो. सतरंजी घालतो..."

मला एकदम दिलासा मिळाला. या प्रसादचं आश्चर्य वाटलं. किती बुजरा हा! स्वतः केलेल्या कामाचा डांगोरा पिटणं तर राहोच, पण आपण होऊन उल्लेखही करू नये? मला असं कधी होता येईल? आपल्याकडे 'करून सवरून नामानिराळा' म्हणायची पद्धत आहे. ते आपण चुकीचं काही करणाऱ्यांच्या बाबतीत म्हणतो. इथे मला चांगल्या अर्थानं तेच म्हणावंसं वाटतं.

कोल्हापुरात पहिल्याने जाधवांच्या वाड्यात सभा होत असे. मग वि. स. खांडेकर प्रशालेच्या इमारतीत. पार्किंगसाठी असते तशी खालची रिकामी जागा मिळाली. साप्ताहिक बैठका व्हायच्या. महिन्याने प्रसाद ढवळेची मीटिंग. आणि मी येईन तेव्हा माझी. नाशिकला गंजमाळ भागात रोटरीने हॉल दिला. नगरला सोनार हॉस्पिटल, तर सांगलीला मेडिकल सेंटर...अशा सर्वत्र जागा तिथल्या तिथल्या हितचिंतकांनी हौसेने मिळवून दिल्या. नाशिकची मुले पुण्यात आली की म्हणतात, "बाबा, तुमची कोल्हापूरवर जास्तच माया. आमच्याकडे या की." कुणी मालेगाव-चांदवडचे आले की म्हणतात, "बाबा, तुम्ही नाशिकपर्यंत आलात, मग आमच्यावर माया पातळ का करता? चला की." वेळेत बसवून चाल्ला हा वेडा बाबा तिकडं. एरवी मला कार्यक्रमाची आमंत्रणे येतात. ती मी अशा बेताने स्वीकारतो, की तिथं आमची फॉलोअप मीटिंगही होईल. माझा कार्यक्रम त्या त्या ठिकाणच्या पेपरात आला की त्यांची विचारणा सुरू होतेच. परवा नाशिकला गेलो. वर्ष, दोन वर्षं, दहा वर्षं पुरी केलेले किती तरी पेशंट मित्र भेटले. काही वर्षांपूर्वी याच्या उलट चित्र होते. मी सभेच्या ठिकाणी आलो की सगळे भेटायला येतात. एकाला विचारलं, "मित्रा, कसा आहेस?"तो म्हणतो, "एकदम १०० टक्के सोबर." त्याची बायको मागून खूण करते, नाही, नाही. की मग मी त्या मित्राला बाजूला घेतो. जिथे सोब्रायटी असते, तिथं सांगायची गरजच नसते.

आता ठिकठिकाणचे पेशंट, त्यांच्या बायका एकमेकांना आधार देतात. दारूचा विचार जागीच काढून टाकला जातो. नवीन येऊ इच्छिणाऱ्या पेशंटची तिथेच इतकी तयारी करून घेतली जाते, की तो मुक्तांगणमध्ये आल्या आल्या रुळतो आणि उपचारांनंतर परत ग्रुपमध्ये जाऊन स्वतःला सुरक्षित करून घेतो. आता अशी तेवीस-चोवीस केंद्रे चालू आहेत. तरी एखादा स्टाफ मित्र बोलताना म्हणतो, "बाबा, मी अमक्या (नवीन) गावी फॉलोअपला जायला लागलोय. चांगला प्रतिसाद आहे." की धन्य होते. या सगळ्याचा खर्च म्हणाल, तर एस. टी. भाड्याचा. तिकडे पेशंट मित्र यांना हौसेने घरी उतरवायला नेतात. संध्याकाळी कार्यक्रम, रात्री उशिरापर्यंत गप्पा. काही ठिकाणी मी, ढवळे जातो. तेव्हा हॉल भाड्याने घ्यावा लागतो. जमलेले आई-वडलांसह, पत्नी, मुलांचे उजळलेले चेहरे पाहून जीव धन्य होतो.

मला कोल्हापूरची सहजीवन सभा आठवतेय. पन्हाळ्यावर एक बाग यासाठी घेतली होती. मी गेलो, तेव्हा पाहिले, स्वयंपाकाची मोठी भांडी दगडांच्या चुलीवर चढलीयत आणि आमचे पेशंट मित्र ढवळत उभे आहेत. कुणी भाजी चिरतंय, तर कुणी काही. आणि त्यांच्या बायका बाजूच्या हिरवळीवर हसत-खिदळत गप्पा मारताहेत. मला पाहून मित्र म्हणाले, "बाबा, तुम्ही तुमच्या मुलींसंग गप्पा मारा. आमचं तोवर होतंय." मी मुलींशी गप्पा मारीत बसलो. एखादी उठून स्वयंपाकाकडे जाऊन काही सांगू लागली, तर म्हणायचे, "तुम्ही गुमान तकडं जाऊन बसा. आम्हाला मुक्तांगणमध्ये या सगळ्याची सवय आहे."

येवढंच नव्हे, तर पहिली पंगत बायकांची. त्यात मलाही बसवले. त्यातही माझ्यासाठी कमी तिखटाचा स्वयंपाक. आमचे झाल्यावर त्यांना बसवले आणि आम्ही वाढले.

हे दृश्य मनात मावत नव्हतं. काय ही नात्यांची उलटापालट! पूर्वी इथे केवढी नवरेगिरी, नवरेशाही होती! आज हसणाऱ्या माझ्या मुली तेव्हा कशा यायच्या समोर! कुणाच्या कपाळावर पट्ट्या, तर कुणाच्या गालावर, हातांवर काळे-निळे वळ...आणि आता? सर्व पुरुषी अधिकार विसर्जित करून संसारातले पूरकत्व स्वीकारलेली माझी ही गुणी पोरं. त्या मुलींच्या चेहऱ्यांवरचं खळखळ हसू सारं

काही विसरल्याची साक्ष देणारं.

सुनंदा नेहमी म्हणायची, “मला तुझी फक्त व्यसनमुक्ती नको आहे. ती तर हवीच. पण तू मला अधिक चांगला माणूस व्हायला पाहिजे आहे.” पन्हाळ्यावरच्या बागेतलं ते दृश्य पाहताना मी आज कुठेही नसलेल्या पण तरीही सर्वत्र असलेल्या सुनंदाला सांगितलं, “बघ गं तुझी ही पोरं. किती शहाणी आहेत ती!”

मग महाराष्ट्रात ठिकठिकाणी अशा फॉलोअप सेंटरची साखळीच निर्माण झाली. ठाण्याच्या आय.पी.एच.मधली दर महिन्याची मीटिंग गेली चौदा वर्षं चुकली नाही. नाशिकच्या जुन्या भागात, जुन्या वस्तीत एक पेशंट मित्र राहतो. बऱ्याचदा फॉलोअप त्याच्या अंगणात होतो. चोहोबाजूंनी चाळी. सगळे आमच्या या छोट्या बैठकीकडे कुतूहलाने बघत असतात. बाहेर वाहतुकीला पूर आलेला आणि आमचे मनांचे हितगुज चाललेले. स्वतःचे प्रश्न ओळखणे, आपले स्वभावदोष जाणणे, भांडणे टाळण्यासाठी नवनव्या युक्त्या योजणे... असे शोधणे अखंड.

अगदी कालपरवाची इचलकरंजीची मीटिंग आठवतेय. तिथं दीपक (सोमाणी) काम करतो. चांगला तगडा ग्रुप जमवलाय. त्या सभेत मी तंबाखू व्यसनावर जास्त भर दिला होता. नंतर अशीच पाया पडायला गर्दी सुरु झाली. त्यात त्या पाया पडणाऱ्या माणसाला, आमच्या पोराला उठवायचो. विचारायचो, किती वर्षे सोबर? तो आकडा सांगायचा.

“तंबाखू चालू आहे का?”

तो लाजून कावराबावरा होऊन म्हणायचा, “हो.”

“चल, मग या क्षणापासून सोडायची. पुडी काढ खिशातली.”

तसा लाजत खिशातनं पुडी काढून माझ्याकडे द्यायचा.
“आता सोडणार ना? मला शब्द देतो आहेस, बघ. या बुढ्ढ्या बाबाला फसवायचं नाही.”

“शब्द देतो, सोडली तंबाखू.” सगळे टाळ्या वाजवत. मी शेकहँड करीत असे. असे प्रत्येकाच्या बाबतीत. खिशातल्या पुड्या निघत होत्या आणि माझ्या खिशात पडत होत्या. पुढे तर आधीचा संवाद व्हायच्या आतच एकाने आपली पुडी घेऊन माझ्या हातात ठेवली आणि नमस्कार केला. मग तसेच आणखीही. कोणी म्हणेल, यातले किती टिकतील? मान्य आहे. पण काही तर टिकतील? कदाचित एखादा प्राण वाचेल. हे कमी आहे का?

बाहेर येऊन परतीच्या वाटेवर रानात कुठे तरी काच खाली करून त्या पुड्या फेकून दिल्या, तेव्हा सुनंदाची आठवण झाली. गुरुवारी ॲडमिट होताना पोरं कुठं कुठं गर्दच्या पुड्या लपवून आणायची. त्या जप्त करुन घरी परतताना सुनंदा त्या होळकर पुलावरुन नदीत फेकून द्यायची. आमची मुले तिला कधी हसून म्हणत, “मॅडम, तिथले मासे आता गर्दुल्ले झाले असतील!”

तीही हसून म्हणायची, “नाही, ते शहाणे आहेत!”

■

बरंचसं सांगून झालंय. किती किती सांगणार? मर्म सापडले तरी पुरे.

देणगी दिल्यानंतर पु. ल. आमच्या सुरुवातीच्या समारंभात म्हणाले होते, "या केंद्राची भरभराट होवो, अशी शुभेच्छा तरी कशी देऊ? अशा केंद्रांची समाजाला आवश्यकताच वाटू नये, अशी केंद्रे लवकरात लवकर बंद पडोत, अशी इच्छा."

मग मीही मुक्तांगणच्या भरभराटीची कथा सांगतोय का? सुनंदाचं स्वप्न होतं, असा व्यसनमुक्त समाज निर्माण करू, की 'मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र' बंद करून तिथे 'मुक्तांगण सांस्कृतिक केंद्र' उभे करू. अनेक कलांना तिथे प्रोत्साहन मिळेल. अनेक नव्या कलाकारांना तिथे गुरु भेटतील. अनेक नवख्यांच्या कला सादर केल्या जातील... चित्रांची प्रदर्शने भरवू... कल्पना रम्य आहे, पण वास्तव वेगळं आहे. व्यसनांची प्रतिष्ठा वाढतेय. दारु पिणे-पाजणे हा शिष्टाचार झालाय. त्यामुळे तो दिवस आणखी लांब जातोय. मुक्तांगण पूर्वी तीस लोक ॲडमिट करीत होते, आता दीडशे. बाहेर पूर्वी एक कौन्सेलिंग सेंटर होते, आता तेवीस. असं बायकांमध्ये व्यसन नाही समजत होतो, आता त्यांच्यासाठी वेगळं केंद्र काढावं लागलं. हा एखाद्या कंपनीच्या चढत्या आलेखासारखा अभिमानाने सांगायचा विषय नाही. पण प्रश्न वाढतोय, तर जास्त काम करावंच लागतंय. जास्तीत जास्त मुलांना कार्यकर्ते व्हावंच लागतंय. त्यांच्या कामाचे तास ताणावेच लागतात. काय करणार? कारण ते चिंताग्रस्त पालक, ती त्याची उद्ध्वस्त बायको, ती कोमेजलेली चिमणी पोरे समोर उभी राहिल्यावर दुसरे काय करायचे असते?

कोणी म्हणतं, त्यांनी तिकडे व्यसनांचं उत्पादन वाढवायचं आणि तुम्ही हे धुणं उपसत राहायचं. किती दिवस करणार हे? पण वाहनांच्या धुराने कॅन्सरचं प्रमाण वाढतंय तर कॅन्सर उपचारकांनी दुसरं काय करायचं असतं? आग लावणारे आक्रमक आहेत, सशस्त्र आहेत, तर मग आगीत सापडलेल्यांना बाहेर काढायचं नाही का?

म्हणून मुक्तांगणची ही अनुभवात्मक दखल आहे. हा प्रगतीचा आलेख नाही. म्हणून संस्थेला दहा वर्षे झाली तर आम्ही मोठा समारंभ केला नाही. कुणी पाहुणा बोलावला नाही. तो होता सर्व आमच्या मित्र-कुटुंबीयांचा मेळावा. आणि दीप पेटवला तो पहिल्या पेशंट मित्राच्या हस्ते. पुढे बारा वर्षे झाली. सुनंदा गेलेली. आम्ही सगळे इतके कामाला लागलो, की लक्षातही आले नाही. आता पुढच्या वर्षी पंचवीस वर्षे पूर्ण होताहेत. तोसुद्धा साधासुधा मित्र मेळावा घ्यायची इच्छा आहे. सेवेचे कधी डांगोरे पिटतात का? मग आपण निरपेक्ष सेवा करणाऱ्या पेशंट मित्रांकडून काय शिकलो?

आम्ही व्यसनांचे उत्पादन रोखू शकत नाही हे खरे. पण नाही म्हणता म्हणता अठरा हजार पेशंट मित्रांना मदत करु शकलो. आम्ही दारुविरोधी आंदोलन निर्माण करु शकलो नाही, पण काही प्रमाणात जाणीव निर्माण केली. आज आमचे बरे झालेले बारा हजार तरी मित्र आहेत. त्यांच्या भोवतीच्या परिसरावर ते व्यसनमुक्त जीवनाचा प्रकाश टाकत आहेत. आणि अशांची संख्या वाढवणे, हे तर आपल्या हातात आहे. दारुचं, तंबाखू-बिडी-सिगारेटचं उत्पादन कमी करु शकत नाही, पण त्यांचं ग्लॅमर आपण कमी करु शकतो. आता ज्यांना दारु घ्यायची नाही, ते म्हणू शकतात, की मी घेत नाही, मला चालत नाही. ते अशा ठामपणे म्हणतात की त्यांना कुणी आग्रह करण्यास धजावू नये. सर्व समाज एकदम नाही बदलू शकत. पण बदलाची बीजे तर पेरु शकतो. उजेडाचे दिवे तर लावू शकतो.

'कितना भी हो घना अंधेरा
भागत है जब देखे ज्योत'
असे मुक्तांगणच्या एका प्रार्थनेत लिहिलंय

कदाचित, न जाणो, त्यातनं बदलाला आवश्यक असा 'क्रिटिकल मास' तयार होईल आणि बघता बघता व्यसनाची आग विझून जाईल.

सुरुवातीलाच उल्लेख केला, त्याप्रमाणे पु. ल. म्हणाले होते, “एकाही अशा घरात समाधानाचा दिवा पेटला, आणि त्या प्रकाशात ते कुटुंब सुखाने जेवतेय, असे झाले, तर माझ्या देणगीचे सार्थक झाले असे समजेन.” पु. ल. गेले, सुनीताबाईही गेल्या. पण आठवणस्वरूप या मातापित्यांना सांगू शकतो, की एक काय, हजारो दिवे लागलेत. आणखीही कित्येक लागतील. आणि एक ना एक दिवस अंधार हटेल. आमच्या हाती सत्ता नाही, भक्कम आर्थिक पाठबळ नाही. पण मायबापांनो, आतला सेवेचा अंकुर कधी लुप्त होऊ देणार नाही. आमच्या हातात आहे ते येवढंच आहे, पण ते खूप आहे.

■

परिशिष्ट

अनिल अवचट यांनी
मुक्तांगणसाठी लिहिलेली
प्रार्थना, गाणी, पोवाडे, फटका इ.

अंतर्दीप प्रज्वलन गीत

मुक्तांगणचे मित्र उपचारक देती शुभेच्छा तुला
राहो दूर तू मोहाच्या, व्यसनांच्या आणि स्वभावदोषांच्या।
कर संसार नेटका दे आनंदा आप्त कुटुंबाला
दुखविलेस ज्यांना तू मनोभावे माग त्यांची क्षमा।
जे आज अडकले व्यसनात दे हात त्यांना मदतीचा
कर जग आपुले निर्मळ कोमल आणि नित्यनूतन।
सर्वदूर पसरले असती हे या नवनिर्मितीचे क्षण
तुझ्या जीवनी पसरत आहे प्रकाश व्यसनमुक्तीचा।
प्रकाशात या उजळुन निघती घरेदारे सगेसोयरे
हा प्रकाश तू पसरव आता उजळू दे इतरांची मने।
परिसस्पर्शे या किरणांच्या उजळली सृष्टी पहा
फुले पाने वृक्ष वेली नद्या झरे वाहती अहा।

■

मोकळ्या आकाशी

मोकळ्या आकाशी आला सुंदर प्रकाश।
उंच उडायाला तुला मोकळे आकाश।
कुटुंब उभे रे मित्रा तुझ्या स्वागताला
पोटात घालून सर्व भीषण काळाला।
खंत करू नको आता गेल्या दिवसांची
ओझी नको वाहू तुझ्या केलेल्या गुन्ह्यांची।
भविष्याची चिंता आता करतो कशाला?
वर्तमान सूर्य बघ डोक्यावर आला।
झेपणार नाही त्याच्या लागू नको नादी
शक्ती आहे तेथे मात्र मार तू भरारी
नाही जमणार आणि जमणार काय
कळेल तुला ते आम्ही पाठीशी आहोत।
आवरी रागाला, नको राहू रे भुकेला
दमू नको जास्त, राही कधी ना अकेला।
नशेतून आता दूर, दूर तू राहावे
गेले हरपले दिन परत मिळावे।
उजाडे दिवस, नाही घोट मी घेणार
मिळे एक दिन, मानी सर्वांचे आभार
व्यसनावाचून फक्त आजचा दिवस
पालवी फुटेल नवे निर्मिन मी जग।
निश्चयाने जर असा राहशील रोजी
सरतील वर्षे कशी कळणार नाही।
आकाशी मोकळ्या आला सुंदर प्रकाश

सानेरी क्षणांचे आता आयुष्य झुंबर।

■

प्रार्थना

नहीं कर सकता आज कमी जो,
सहनेकी दे हिम्मत रे।
कर सकता हूँ मुमकिन है जो,
करने की दे ताकत रे॥
कर क्या सकता नामुमकिन क्या,
कैसे सुलझे उलझन रे।
फर्क मुझे जो नहीं समझता,
कर दे मुझे सयाना रे॥

■

कबीराच्या खडी बोलीतील रचना म्हणताना मीच एक रचना लिहिली

बीत गया सो बीत गया
क्युं करता है शोक
आज, अभीका क्षण है तेरा
उस बारे में सोच॥
भविष्य कोई ना जाने रे
क्युं कर उसकी चिंता
करना जो कुछ, भला भलाई
अब क्षण है मौका॥
बुरे करम से पछताते हो?
एक भलाई उसका औसद
कितना भी हो घना अंधेरा
भागत है जब देखे ज्योत॥

■

व्यसनात सापडलेल्या माणसाची मन:स्थिती काय असेल याची कल्पना करून लिहिलेला पोवाडा

व्यसनाच्या पोटी, झाले पुर्ते नुकसान
वाया गेले हो जीवन आता काय करु मी।
झाली मानहानी, आणि गेली ती नोकरी
उभा कर्जाचा डोंगर, जप्ती घरावरती॥
घरात भांडण, रोज रात्री मारहाण
शेवटी कंटाळून गेली, बायको-मुलं माहेरी।

पत नाही हो शिल्लक, उभे करीना दारात
आता करतो मुक्काम, फुटपाथवरती॥
हातपाय हो बधिर, उठे वेदनेचा डोंब
येई लिव्हरला सुज, डोळे पिवळे पडती।
उतरते दारू, तेव्हा होतो पश्चात्ताप
आणि करितो निश्चय, पुन्हा नाही घ्यायची॥
वेळ जाई जसा जसा, डळमळतो निश्चय
अडखळत बोलणे, घंटी वाजू लागली।
पाय ओढती देहाला, दिसे बाटली डोळ्याला
डोकं ठेवून बाजूला, जातो गुत्त्यावरती॥
गेला घोट एक पोटी, म्हणजे बोलतो इंग्रजी
मग राजा जसा राज्य करतो जगावरती।
जग होतसे धुसर, सारे दिसते डबल
मग दुकानही फिरू लागे स्वतःभवती॥
पुढे सारी हो अंधारी, वाटे फिरावे माघारी
आता काय कपड्यांत लघवी, भान नाही।
कोठे होतो कोठे आलो, काय केले मी स्वतःचे
कसे येऊ मी बाहेर त्याचे, ज्ञान नाही॥

■

फटका

व्यसनाधीन मित्राला एक चांगला मित्र भेटतो तो धीर देताना म्हणतो-

व्यसनामधी गुरफटल्या मित्रा, कधीच आशा सोडू नको
मुक्त होशी तू दारुनशेच्या, उपचारा तू विसरु नको।
नशेत घडल्या भीषण घटना, उगाच आठवित बसू नको
झाले गेले विसरून जा तू, भविष्य चिंता करु नको।
फक्त आज तू रहा दूर या, घातक घोटापासुन रे
मिळेल सारे गमावलेले, मित्र मैत्र अन् कुटुंब रे।
तब्येतीची नको काळजी, भरून सगळे येईल रे
हेळसांड थांबव शरीराची, लक्ष दे आता स्वताकडे।
व्यसन लागण्यापूर्वी होता, गुणी हुशार अन् जबाबदार
दारू वजा कर होशिल नेटका, पूर्वीसारखा हिंमतबाज।
टीबी डैबिटिस टाईफाइड अन् न्युमोनिया हे रोग जसे
व्यसन हाही एक रोग असुनी, तुला मदतीची गरज असे।
उघडू शकतो बूच बाटलीचे, परंतु लावू शकत नसे
नशेत असता काय करितसे, नंतर त्याची स्मृती नसे।
वाट कशाची अता पाहशी, उपचाराला हो तैयार
मुक्तांगणचे मित्र उभे रे, झटपट द्याया तुला आधार।
इथे नाही रे कुणी आरोपी, जाब नाही कुणी विचारणार
मुक्तांगण हा तुरुंग नाही, इथे शॉक नाही मिळणार।

आनंदाने निरोप घेशी, सांग कुटुंबा मी निघतो
व्यसनाचा भुतकाळ गाडण्या, मुक्तांगणला मी जातो।

■

स्वमदतगटाचा पोवाडा

यशोने तिच्या एपिलेप्सी स्वमदतगटासाठी पोवाडा लिहून मागितला. तो आता सर्वच स्वमदत गटांचा पोवाडा झाला आहे. त्यात मुक्तांगण, सहचरी आलेच.

असू दे आजार त्याला नाही हो भिनार
त्याला समजून घिऊ, छान जगायचं हाय।
खचनार न्हाय, नशिबाला बोल नाय
चिंता करु करु मन आता कोरनार न्हाय॥
दाक्तर सांगती तसं घिऊ उपचार
पन समद्यात मोठी आपली हिंमत हाय।
असु दे आजार नाही व्हनार बेजार
आमच्या दु:खाचा बाजार, आता मांडणार नाय॥
नका करु वं कणव, आता झाली वं जाणिव
घट्ट उभं पायावर आमी, ढळणार नाय।
जगु आजारासहित करु दुसऱ्या मदत
मन करुन आभाळ खुषी वाटणार हाय॥

■

मुक्तांगणमधून परत जाताना जाणारे मित्र हे गीत म्हणतात-

घेतले हे व्रत। नशेतून दूर।
कुटुंबा धरुन। राहीन मी॥
वेळच्या वेळेला। उठेन झोपेन।
जेवेन साधेच। आवडीने॥
टाळीन भांडण। घेईन माघार
देईन आधार। सकळांना॥
करीन मदत। धावून धावून।
आनंद घेईन। सेवेचाही॥
मुक्तांगण प्रेम। वाटीन सर्वांना।
जगता जगता। होई धन्य॥

■



अनिल अवचट यांची पुस्तकं

१) पूर्णिया
२) वेध
३) हमीद
४) छेद
५) माणसं
६) संभ्रम
७) वाघ्यामुरळी
८) कोंडमारा
९) गर्द
१०) धागे आडवे उभे
११) धार्मिक
१२) मोर
१३) स्वतःविषयी
१४) अमेरिका
१५) आप्त
१६) कार्यरत
१७) छंदांविषयी
१८) प्रश्न आणि प्रश्न
१९) जगण्यातील काही
२०) दिसले ते
२१) मस्त मस्त उतार
२२) सृष्टीत गोष्टीत
२३) वनात जनात
२४) मजेदार ओरिगामी
२५) मुक्तांगणची गोष्ट
२६) पुण्याची अपूर्वाई
२७) अक्षरांशी गप्पा
२८) हवेसे
२९) लर्निंग टू लिव्ह अगेन (इंग्रजी)
३०) रिपोर्टिंगचे दिवस
३१) माझी चित्तरकथा